
Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates




Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# क्रमबद्धपर्याय

▫ लेखक ▫

**डॉ० हुकमचन्द भारिल्ल**

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न, एम. ए., पीएच. डी.

श्री टोडरमल स्मारक भवन, ए–४, बापूनगर, जयपूर–१५

: अनुवादक :

**डॉ. प्रियंकर जैन**

हिंगोली

: प्रकाशक :

**पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट**

ए - ४ बापूनगर, जयपूर - ३०२०१५ (राज.)

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**क्रमबद्धपर्याय संस्करण :-**

मराठी आवृत्ति : ३,१००

हिन्दी आवृत्ति : ३२,०००

गुजराती आवृत्ति : ११,४००

कन्नड आवृत्ति : १,०००

तामिळ आवृत्ति : १,०००

मूल्य : पाच रुपये

प्राप्ति स्थान :

**वीतराग विज्ञान ग्रंथालय**
महावीर भवन
मुपो. मसरूळ जि. नाशिक

**पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट**
ए-४, बापूनगर, जयपूर-३०२०१५ (राजस्थान)

मुद्रक :
सेन्ट्रल प्रिन्टर्स
महावीर नगर,
नागपूर-९.

## विषय-सूची

| | पृष्ठ |
|---|---|
| १. प्रकाशकीय | ३ |
| २. आपले मनोगत | ९ |
| ३. क्रमबद्धपर्याय : एक अनुशीलन | १७ |
| ४. क्रमबद्धपर्याय : कांही प्रश्नोत्तरे | ८५ |
| ५. क्रमबद्धपर्याय : इन्टरव्यू | १११ |
| ६. सन्दर्भ ग्रंथ-सूची | १३१ |
| ७. अभिमत | १३५ |

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## Thanks & Our Request

This shastra has been kindly donated by Dakshaben Sanghvi, Geneva, Switzerland who has paid for it to be "electronised" and made available on the internet.

Our request to you:

1) Great care has been taken to ensure this electronic version of Krambaddh Pariyay (Marathi) is a faithful copy of the paper version. However if you find any errors please inform us on rajesh@AtmaDharma.com so that we can make this beautiful work even more accurate.

2) Keep checking the version number of the on-line shastra so that if corrections have been made you can replace your copy with the corrected one.

## Version History

| Version Number | Date | Changes |
|---|---|---|
| 001 | 12 September 2008 | First electronic version |

# प्रकाशकीय

क्रमबद्धपर्याय हा जिनागमातील सर्वाधिक महत्वपूर्ण तसेच मौलिक सिद्धांत आहे त्यावर या प्रकाशनामध्ये गंभीर विवेचन केलेले आहे. अशा या प्रकाशनाला समाजासमोर समर्पित करतांना आम्हाला अत्यंत हर्ष अनुभवास येत आहे.

क्रमबद्ध पर्यायाची चर्चा संपूर्ण जिनागमात तर सर्वंवच केली आहे. पण गेल्या काही वर्षापासून तत्त्वप्रेमी जिज्ञासू समाजात यावर विचारमंथन पण चालू आहे. याचे प्रमुख श्रेय आध्यात्मिक सत्पुरुष पूज्य श्री कानजी स्वामींना आहे. कारण त्यांनीच या युगात अगाध श्रुत समुद्राचे मंथन करून क्रमबद्ध पर्याया सारखी अनेक बहुमोल रत्ने समाजाला तर दिलीच आहेत; सोबतच निश्चय-व्यवहार निमित्त-उपादत्त वगैरे अनेक विषयांवर आगम संमत अन् युक्ति तसेच अनुभवाच्या कसोटीवर अगदी बावनकशी ठरणारे विवेचन समाजासमोर प्रस्तुत केले आहे व त्याद्वारे समाजात एका अभूतपूर्व आध्यात्मिक क्रांतीचा शंखनाद केला आहे.

येथे हा विचारणीय विषय आहे की – अखेरीस ही क्रमबद्धपर्याय नावाची वस्तू काय आहे ? व हीला समजायची आवश्यकता तरी काय आहे ?

क्रमबद्धपर्यायाचे स्वरूप समजण्याची आवश्यकता तर त्याचे स्वरूप समजून घेतल्यावरच समजू शकते. जगातील प्रत्येक घटकाची सत्ता (अस्तित्व) ही उत्पाद-व्यय-ध्रौवात्मक आहे. प्रत्येक द्रव्यात प्रत्येक समयात नवीन पर्याय उत्पन्न होते, जुनी पर्याय नष्ट होते तरीपण द्रव्य आपल्या स्वरूपाने कायमच राहते.

वस्तूच्या या परिणमन स्वभावासंबंधी एक प्रश्न सहजच उद्भवू शकतो की या परिणमन मागे काही स्वभावगत नियम आहे किंवा आम्ही त्यामध्ये जव्हा हवे तेव्हा बदल घडवू शकतो.

'क्रमबद्ध पर्याय हेच या प्रश्नाचे एकमात्र समाधान आहे व ते समाधान हे की प्रत्येक वस्तु एका निश्चित क्रमानुसारच परिणमित होत असते. कोणत्या वस्तूमध्ये, कोणत्या वेळी कोणती पर्याय उत्पन्न होईल हे निश्चित ठरलेलेच आहे; म्हणून क्रमबद्धपर्याय ही वस्तूच्या परिणमनाची व्यवस्था आहे – घटना आहे, प्रत्येक समयाच्या योग्यतेनुसार निश्चित क्रमाने परिणमित होण्याचा नियम म्हणजेच क्रमबद्धपर्याय होय.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



या संबधी विचार करता एक प्रश्न सहज उद्‌भवतो तो म्हणजे हे जे क्रमबद्ध परिणमन होते त्याचा क्रम कोण निर्धारित करतो ? आम्हाला तर असे दिसते की आमच्या इच्छेनुसार व प्रयत्नांच्या अनुरूप वस्तूचे परिणमन होत आहे. मग वस्तूमध्ये यावेळी जी पर्याय उत्पन्न झाली ती त्याच वेळी उत्पन्न व्हावी हे आधीच निश्चित ठरले होते हे आम्ही कसे मानावे ?

वस्तूच्या या क्रमबद्ध परिणमनासबंधी निर्माण होणाऱ्या या प्रश्नाचे समाधान होण्यासाठी सर्वज्ञतेचा आधार घेणे अपरिहार्य ठरते. असे निश्चित क्रमबद्ध परिणमन कुणी पाहिले; याचे एकमात्र उत्तर हेच आहे की सर्वज्ञांनी पाहिले; कारण सर्वज्ञांच्या ज्ञानात प्रत्येक वस्तूमध्ये होणाऱ्या भूत भविष्यत् व वर्तमानकालीन साऱ्या अवस्था (पर्यायी) जणू वर्तमान काळी घडताहेत, असे झळकते. तसेच तस्तुचे परिणमन सर्वज्ञांनी जाणलेल्या क्रमानुसारच घडते. असे न झाले तर सर्वज्ञाचे ज्ञान सम्यक् ठरणारच नाही.

वस्तूच्या परिणमनाची क्रमबद्ध अवस्था सहज समजून घ्यायची असेल तर तर सर्वज्ञतेचा आरसाच हवा. येथे एवढे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की सर्वज्ञाचे ज्ञान वस्तूचे परिणमन कसे असावे हे निश्चित करीत नाही; कारण निश्चित क्रमानुसार परिणमन करणे हा वस्तूचा स्वभावच आहे. केवलज्ञान फक्त त्या क्रमाने वस्तू परिणमित होत असते त्या क्रमाला मात्र जाणत असते.

सर्वज्ञांनी जाणलेल्या क्रमानुसार परिवर्तन केल्यामुळे वस्तू केवलज्ञानाच्या आधीन होऊन जात नाही; ती तर आपल्या आधीन असलेल्या स्वतःच्या योग्यतेनुसारच परिणमित होत असते. केवलज्ञानात तर त्या वस्तूतील प्रमेयत्व गुणामुळे वस्तूंचे ते परिणाम सहजच ज्ञान होते. म्हणूनच सर्वज्ञता आणि क्रमबद्ध पर्याय यामध्ये कारण-कार्य संबंध नसून केवळ द्योतक-द्योते (ज्ञायक-ज्ञेय) संबंध आहे. सर्वज्ञता क्रमबद्ध परिणामांची ज्ञापक आहे. करविणारी नाही.

समाजातील लोकप्रिय प्रवचनकार अन् गूढचिंतक डॉ. हुकमचंदजी भारिल्ल या विषयावर बहुधा प्रवचने करीत असत, हे ऐकून मला असे नेहमी वाटायचे की एका तासाच्या प्रवचनांमध्ये सर्वांगांनी विषयाचे स्पष्टीकरण होऊ शकत नाही. अन् लेखी स्वरूपात ते नसल्याने जितके काही स्पष्टीकरण होते ते ही स्थायी राहू शकत नाही. म्हणून मी अनेक वेळा त्यांना विनंती केली की त्यांनी या विषयाशी सबद्ध सर्व अंगोपांगांचे स्पष्टीकरण लिपिबद्ध जर केले तर सामान्य लोक देखील या विषयाला सहजच हृदयगम करू शकतील.

डॉक्टर साहेबाचे जीवनातील परिवर्तन देखील "क्रमबद्ध पर्यायाचे" स्वरूप लक्षात आल्यामुळे घडलेले आहे. हे त्यांनी आपल्या 'माझे मनोगत' या सोबतच्या लेखात स्पष्ट केले आहे. माझा अनुरोध स्वीकारून त्यांनी ५ जानेवारी १९७६

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ला लिखाणास सुरूवात केली अन् फेब्रुवारी १९७९ पासून आत्मधर्मात संपादकीय रूपात ही लेखमाला सुरू झाली. ९ डिसेंबर १९७९ ला हे लिखाण पूर्ण झाले व तेंच पुस्तक रूपाने आता जैन साहित्यात अमूल्य निधीच्या रूपात समाविष्ट झाले आहे

क्रमबद्धपर्याय समजण्यामध्ये एकान्त नियतवाद व पुरुषार्थहीनता यांची भीतीच सर्वाधिक बाधा आणणारी आहे यामुळे एकान्त नियतवाद येईल या भयाने पछाडलेले लोक म्हणतात की जर सारे काही निश्चित मानले तर लोकात कोणतीच व्यवस्था राहणार नाही मग अपराध्यांना दंड कशासाठी द्यावा ? कारण त्यावेळी त्याच्या कडून अपराध होणारच होता म्हणून घडला, यात त्या अपराध्याचा दोष कसा ?

याप्रकारे काही लोकांना अशाप्रकारे व्यवस्थित (नियमित) परिणमन स्वीकार अव्यवस्था निर्माण होईल असे वाटते परन्तु जर संपूर्ण परिणामांच्या परिप्रेक्ष्यात विचार केला तर कोणतीही अव्यवस्था यात नसून उलट सुंदरतम अशी व्यवस्था दृष्टोत्पत्तीस येईल.

जर अपराधी ठरण्याच्या क्रमामध्ये अपराध घडणे निश्चित असेल तर त्याचा दंड भोगणे ही निश्चितच असेल. असेच होणार होते' या सबबी खाली जर अज्ञानी अपराध करायची मोकळीक मागणार असेल; परंतु दंड भोगतांना 'दंड ही मिळणारच होता' हे स्वीकार करणार नाही, तर या क्रमात होणारा दंड थांबणार तर नाहीच. जर कुणाच्या परिणामामध्ये हिंसादिक पाप निश्चित असेल. तर त्याचे फळ म्हणून नरकादिकामध्ये त्याचे जाणेही निश्चितच आहे.

अपराध करण्यासाठी तर तो अपराधाचा क्रम स्वीकार करतो पण दंडाचा निश्चित क्रम स्वीकार करत नाही. पण जेव्हा मोक्षाचा पुरुषार्थ कर अशी प्रेरणा दिली जाते तेव्हा तो म्हणतो की जर मोक्ष मिळणे निश्चितच असेल तर मी पुरुषार्थ कां करू ? मोक्ष तर होऊनच जाईल. मोक्ष निश्चित होणार हे मानतांना त्याला मोक्षाचा पुरूषार्थ निरर्थक वाटतो; म्हणूनच क्रमबद्ध पर्याय स्वीकारतांना पुरूषार्थ नष्ट होईल याची भीती त्याला नेहमी ग्रासत असते.

वास्तविक दृष्टीने पाहिले तर वीर्यगुणामुळे प्रत्येक द्रव्याची प्रत्येक पर्याय आपल्या स्वसमयात पुरूषार्थपूर्वकच होत असते. म्हणून कोणतेही आत्मद्रव्य आत्मा कधीही पुरूषार्थ हीन असूच शकत नाही.

शास्त्रात धर्म, अर्थ, काम अन् मोक्ष हे चार पुरूषार्थ सांगितले आहेत. प्रत्येक जीवाचे वीर्य या रूपातच प्रस्फुरित होते, प्रवर्तित होत असते. अज्ञानी जीव पंचेंद्रिय विषयातच सुख आहे असे मानत असल्याने दुसऱ्याचा कर्ता

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



बनण्याच्या अहंकाराने सतत दग्ध होत असतो, पेटलेला असतो; म्हणूनच सतत तो अर्थ अन् काम या पुरुषार्थामध्येच व्यग्र असतो. पण जेव्हा तोच जीव ज्ञानी बनतो तेव्हा प्रत्येक वस्तूचे परिणमन स्वतंत्रपणे होत असते, हे समजतो व दुसऱ्याच्या कर्तृत्वाच्या अहंकारामुळे आलेल्या आकुलतेपासून मुक्त होतो व धर्म पुरूषार्थ पूर्वक मोक्ष पुरूषार्थाला सामोरा जातो.

अज्ञानी हे समजतो की एखादे विशेष कार्य केले असता उत्पन्न होणारे संकल्प विकल्प करणे हाच पुरुषार्थ आहे; पण वास्तविक दृष्टया (खरे पाहिले तर) हेच मिथ्यात्व आहे; आणि क्रमबद्ध पर्यायाचे स्वरूप समजल्यानंतर या मिथ्यात्वाचा नाश होऊन जातो. यालाच अज्ञानी पुरुषार्थाचा अभाव मानीत असतो.

विद्वान लेखक श्री भारिल्लांनी आपल्या मौलिक चिंतनाच्या प्रतिभेने जिनागमाचा आधार घेऊन एकान्त नियतवाद अन् पुरुषार्थ हीनतेच्या भयाचे निराकरण अत्यंत युक्तिपूर्वक केलेले आहेच व ते करतांना हे स्पष्ट केले की क्रमबद्ध परिणतीचा अर्थ केला काल याच समवायाची निश्चिती (नियति) नव्हे; द्रव्य क्षेत्र, काल अन् भाव किंवा स्वभाव, पुरुषार्थ, काललब्धि, भवितव्य (भाग्य) अन् निमित्त या साऱ्यांची निश्चितीही नियमाने आहे.

पाच समवायामध्ये काललब्धीस मुख्य करून अन् समवायांना गौणता देऊन कारण-कार्य मीमांसा जर केली तरच सम्यक्-एकान्त होईल, अन्यथा इतर समवायांचा अभाव मानल्यामुळे एकान्त नियतिवादच पुष्ट होईल; व हे खोटे असल्याने कोणीही विचारक त्यास इष्ट मानीत नाही.

क्रमबद्ध पर्यायाचे स्वरूप समजले तर हे सहज लक्षात येईल की मोक्ष मार्ग जर अंगी उतरावयाचा असेल तर क्रमबद्ध पर्याय समजणे किती आवश्यक आहे. जिनागमाच्या तळाला स्पर्श करणारी डुबकी मारल्यावर हे सहजच समजते की, क्रमबद्ध पर्याय, सम्यग्दर्शन, स्वकर्तृत्व, सहजकर्तृत्व, सम्यक्-पुरुषार्थ वगैरे वास्तव बाबी आत्मानुभूतीच्या प्रक्रियेशी सहजच जोडल्या गेल्या आहेत.

आत्मानुभूती प्रगट करण्यासाठी आपल्या त्रैकालिक ज्ञायक स्वभावाशी तन्मय होणे अत्यंत अनिवार्य आहे आणि या ज्ञायक स्वभावाशी तन्मय व्हायचे असेल तर क्रमबद्ध पर्यायाचे स्वरूप समजून घेऊन आणि कर्तृत्व बुद्धीचा अभाव करूनच ते शक्य होईल. आचार्य अमृतचन्द्र देवांनी समयसार गाथा ३०८-३११ च्या आत्मख्याती टीकेमध्ये क्रमबद्ध परिणमनाचा आधारेच अकर्त्ता

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



स्वभाव सिद्ध केला आहे; व पुस्तकाच्या प्रारंभी लेखकांनी ह्याच विषय चर्चिला आहे अन् प्रश्नोत्तर खंडात त्याचे विशेष स्वरूप स्पष्ट केले आहे.

या विषयाची महत्ता व गंभीरता पाहून जिनागमामध्ये उपलब्ध असलेल्या वस्तूच्या क्रमबद्ध परिणमनाची व्यवस्थेच्या आधाराने सम्यक् पुरुषार्थाशी यांचा मेळ घालणारी युक्ति संगत विवेचन प्रस्तुत करण्याची अतोनात आवश्यकता होती.

हे पुस्तक वरील आवश्यकतेची पूर्ती करण्यामध्ये पूर्णपणे सफल झाले आहे. जिज्ञासा उत्पन्न करणाऱ्या ज्या पद्धतीने सुव्यवस्थित शैली व सरळ भाषा यांच्या आधारे या विषयाचे सर्वांगीण अनुशीलन या पुस्तकात केले आहे, त्याचा फायदा पाठक वर्ग या पुस्तकाच्या गंभीर व तलस्पर्शी अध्यनाने व मननाने घेऊ शकतो.

गंभीर अनुशीलन केल्यावर विविध प्रश्नोत्तराद्वारे तर त्यांनी या विषयाला त्याही पेक्षा अधिक स्पष्टता प्राप्त करून दिली आहे. पूज्यश्री कानजी स्वामींशी घेतलेली मुलाखत तर या विषयाशी संबंधीत अनेक भ्रातींचे पुरे उन्मूलन करते.

जेव्हा आत्मधर्मात या विषयी लेखमाला सुरू झाली तेव्हा हजारो वाचकांनी तिचे हार्दिक स्वागत केले. अन् साऱ्या समाजात या विषयावर त्याहीपेक्षा अधिक चर्चा व्हायला लागली. सामान्य जनामध्येही पण या विषयावर स्वाध्याय, मनन, चिंतन प्रक्रिया प्रारंभ झाली. लेखमालेचा हा उत्तम परिणाम बघून अनेक ठिकाणाहून ही लेखमाला पुस्तकावर प्रकाशित व्हावी अशी मागणी आली. ही लेखमाला हिंदीत असल्याने हिंदीमध्ये 'क्रमबद्ध पर्याय' हे पुस्तक आम्ही प्रकाशित केले. त्याचा गुजराथी अनुवाद छापला गेला आणि मराठी अनुवाद आता आपल्या हाती पडत आहे.

हिंदी, गुजराथी, प्रमाणेच मराठी, तामिळ व कानडी भाषांनील आत्मधर्मातूनही (आता वीतराग विज्ञानातून) या लेखमालेचा अनुवाद प्रकाशित झाला. हे हजारोंच्या संख्येने तो ग्राहकांनी, जिज्ञासूंनी, व मुमुक्षूंनी आत्मसात केला. त्यातील मराठी अनुवाद आता आपल्या हाती पडत आहे.

सर्वांनी आपल्या अकर्त्ता स्वभावाच्या आश्रयाने क्रमबद्ध पर्याय चे स्वरूप समजावे व सम्यक् पुरुषार्थ करावा हीच माझी भावना आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



क्रमबद्धपर्याय पुस्तकाचे हिन्दीतून मराठी अनुवाद करण्याची जबाबदारी डॉ. प्रियंकरजी जैन यांनी अत्यंत व्यवस्थित पार पाडली. प्रकाशकीय व माझे मनोगत श्री मनोहर मारवडकर यांनी व इन्टरव्यु हा स्तभ श्री दिनेशभाई शहा, मुंबई यांनी अनुवादित केला. शुद्धि संशोधनामध्ये पं. राकेशकुमारजी जैनदर्शनाचार्य यांचे सहकार्य मिळाले.

श्री उदयकुमारजी पोहरे यांनी प्रिंटींगची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली. वरील कार्यामध्ये या लोकांचे सहकार्य मिळाल्यामुळे आम्ही हे प्रकाशन वेळेवर करू शकलो. त्याबद्दल मी या सर्वांचे आभार मानतो.

**नेमीचंद पाटनी**
मंत्री, पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# 'माझे मनोगत'

क्रमबद्ध पर्याय विषय, इतरांसाठी एक सिद्धान्त असू शकेल एकान्त ठरू शकेल, अनेकान्त असू शकेल, राजनीती ठरू शकेल, पुरुषार्थाला प्रेरणा देणारा अथवा पुरुषार्थहीनता निर्माण करणारी असू शकेल, एवढेच काय कोणासाठी कालकूट विष पण ठरत असेल. पण दुसऱ्यांसाठी ती अशीही असो माझ्यासाठी तर ते जीवन आहे, अमृत आहे; कारण माझे वास्तविक जीवन – याचे ज्ञान, याची धारणा व या क्रमबद्ध पर्यायाच्या आस्थेनेच सुरू झाले आहे.

क्रमबद्धपर्याय हा माझ्या जीवनाला फक्त वळण लावणाराच नसून त्याला आमूलाग्रह कायाकल्प करणारी संजीवनी आहे. माझा दृढ विश्वास आहे की ज्याला कुणाला याचे वास्तव स्वरुप समजेल, व हे तथ्य खऱ्या स्वरुपात स्पष्ट होईल, त्याचे जीवन देखील आनंदमय व अमृतमय झाल्याशिवाय राहणार नाही.

म्हणूनच मी हा विषय प्रत्येक घरापर्यंतच नव्हे तर प्रत्येक मनुष्यापर्यंत पोहोचवू इच्छितो, प्रत्येक व्यक्तीची निधी बनवायची इच्छा मी बाळगतो.

या क्रमबद्ध पर्यायासंबंधी केली जाणारी ठिसूळ, हलकी-फुलकी चर्चा व थट्टा विनोद तर मला मुळीच आवडत नाही स्वीकार पण नाही. लौकिक पातळीच्या थोडेसे वर डोकावूनच हा विषय समजून घ्यावा लागेल, समजावून द्यावा लागेल. या संबंधी सामाजिक राजनीतीच्याही पलीकडे जाऊन चर्चा करावी लागेल.

मला ही गोष्ट (क्रमबद्ध पर्यायाची) कशी उमजली याची एक कहानीच आहे. याप्रसंगी त्या कहानीचा त्या घटनेचा उल्लेख करायचा मोह आवरणे मला शक्य होत नाही.

घटना अशी घडली की उत्तर प्रदेशाच्या बबीना कँट नावाच्या झाशी जिल्ह्यातील एका गावात आम्ही दुकान चालवीत असू. घटना इ. स. १९५६ च्या दरम्यानच्या आसपासचीच आहे. माझे वडील बंधू पं. रतनचंदजी शास्त्री दुकानाचे सामान घेण्यास झाशीला गेले होते.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तेथे एका व्यक्तीने त्यांना प्रश्न केला की केवली भगवंतांनी जसे जाणले अन् पाहिले, तसेच होणार असेल व त्यात कोणतेही परिवर्तन संभव नसेल, तर मग पुरुषार्थ कुठे शिल्लक राहीला ? जर आम्ही काही करूच शकत नाही, तर मग आम्ही काही करावे तरी कशासाठी ?

या प्रश्नाचे त्यांचे भावुक हृदय हेलावले; ते स्तब्ध झाले. त्यांच्या समाधानार्थ त्यांनी काहीही उत्तर न देता पांडित्य-प्रदर्शन न करता एवढेच म्हटले की, बंधुवर, तुमचे म्हणणे तर ठीक आहे, पण मी यावेळी यासंबंधी काहीही सांगू शकत नाही; पुढील शनिवारी येईन त्यावेळी चर्चा करीन.

तो तर गेला, परंतु ते पूर्ण रस्त्यात विचार करीत होते. परत येताच त्यांनी मला सरळ तोच प्रश्न केला. मी ही विचारात पडलो. परस्पर विचार विमर्श झाला, पण निर्णय काहीही होऊ शकला नाही.

सायंकाळच्या प्रवचनातदेखील जेव्हा ही चर्चा मी सुरू केली, तेव्हा एक अभ्यासू बाई म्हणाली – यात काय विशेष ? ही तर कानजी स्वामींची 'क्रमबद्धपर्याय' आहे. या वेळेपावेतो आम्ही कानजी-स्वामींचे नाव तर ऐकले होते, परंतु क्रमबद्ध पर्यायाचे नाव देखील ऐकले नव्हते, म्हणून जेव्हा अधिक जिज्ञासा दाखविली तेव्हा त्यांनी मंदिरातून आत्मधर्माचे दोन विशेषांक आणून दिले; त्यामध्ये क्रमबद्ध पर्याय या विषयावर स्वामीजींनी दिलेली तेरा प्रवचने प्रकाशित झाली होती. पहिल्या अंकात तेरा प्रवचने व दुसऱ्यात पांच प्रवचने होती. हे अंक सन ५४-५५ मध्येच प्रकाशित झाले होते; नंतर तर तीच प्रवचने 'ज्ञानस्वभाव-ज्ञेयस्वभाव' नावाने पुस्तकात प्रकाशित झाली होती. त्यांना वाचून तर आमची हृदयाची दारे सताड उघडली अन् असे वाटले की आम्ही कोणतीतरी अपूर्व निधी प्राप्त केली आहे. आम्ही कृत्य-कृत्य झालो होतो. मग काय होते ? तेव्हापासूनच गंभीर अध्ययन, मनन, चिंतन, चर्चा-वार्ता सुरू झाली. व या विषयामध्ये इतका रस यायला लागला की वाढत्या वयातील सारी आकर्षणे फिक्की पडली. क्रमबद्ध पर्यायाच्या आकर्षणाने व्यापाराचा क्रमदेखील गडबडला. ग्राहक येऊन जाई, कारण त्याच्याशी बोलणाराच कोणी

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



शिल्लक राहिला नव्हता. तो गेल्यावर वाटे की व्यापार चौपट होईल पण त्याचवेळी क्रमबद्धाची आठवण येई व शब्द फुटत की जे क्रमबद्धात व्हायचे असेल ते होईल.

याप्रमाणे सुरू झालेला अध्ययन-मननाचा क्रम चालू झाला, तो चालूच राहिला. फलतः निमित्त उपादान, निश्चय-व्यवहार, कर्त्ता-कर्म वगैरेच खरे स्वरूप स्पष्ट होत गेले; कोठेही कोणतीही अडचण भासली नाही. नंतर स्वामीजींच्या सानिध्याचा पण लाभ मिळाला.

सर्वप्रथम स्वामीजींचे दर्शन, जेव्हा ते ई. स. १९५७ मध्ये शिखरजी यात्रेसाठी निघाले होते, तेव्हा झाले, बबीना मुक्कामावर त्यांना पूर्ण कार्यक्रम नसतानाही जबर्दस्ती रोकले होते. तेथे आम्ही फार आधीपासूनच व्यासपीठ उभारले होते अन् सारा समाज तेथे उपस्थित होता. स्वामीजींनी तेथे फक्त ५ मिनीटे मांगलिक प्रवचन केले होते.

त्यांचे सोबतच आम्ही सारेच सोनागिरीस गेलो. तीन दिवस-पर्यंत त्यांच्या प्रवचनाचा लाभ सपरिवार घेतला. त्यांच्याशी सामान्य चर्चा पण केली. त्यानंतरच काही दिवसांनीच चांदखेडीत त्यांच्या प्रवचनाचा लाभ मिळाला. त्यावेळी माझे देव-शास्त्र-गुरुपूजन प्रकाशित झाले होते. त्याच्या जयमालेत क्रमबद्धपर्याय पोषक काही ओळी आहेत, त्या अशा –

"जो होना है सो निश्चित है, केवलज्ञानीने गाया है।
उसपर तो श्रद्धा ला न सका परिवर्तन का अभिमान किया।
बनकर पर का कर्त्ता अब तक सत् का न प्रभो सन्मान किया।।

मी हे आपले प्रथम प्रकाशित पुस्तक स्वामीजींना समर्पित केले. त्याच्या समर्पणात मी लिहीले होते –

"ज्यांनी कलिकालामध्ये क्रमबद्ध पर्यायाचे स्वरुप समजावून आमच्या सारख्या दीन प्राण्यांवर अनन्त उपकार केले अशा पूज्यश्री कानजी स्वामींच्या करकमलामध्ये सादर समर्पित"

जेव्हा मी कथित पुस्तक स्वामीजींना समर्पित केले तेव्हा त्यांनी समर्पण वाचून प्रसन्न होऊन म्हटले –

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



"तुम्ही क्रमबद्धपर्याय जाणता ?"

या प्रश्नाच्या उत्तरात जेव्हा मी उत्साहपूर्वक 'होय' म्हटले तेव्हा ते म्हणाले –

"सोनगढला या. तेथे चर्चा करू"

त्यांचे हार्दिक निमंत्रण मिळाल्यामुळे माझे हृदय सद्‌गदित झाले.

मी कोटद्यापर्यंत त्यांचे सोबत गेलो. त्यांचे तेथे तीन दिवसाचे कार्यक्रम होते. त्यांच्या प्रवचनाचा लाभ घेण्यासाठी मी तेथेही तीन चार दिवस थांबलो. तेथील विशाल सभेत त्यांचेसमोर माझेही १५ मिनिटाचे व्याख्यान झाले. त्यात मी अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभाची व्याख्या केली होती; याची नंतर बरीच स्तुती केली गेली. स्वामीजींनीही प्रसन्नता व्यक्त केली होती.

त्यानंतर सन १९५७ च्या जुलै मध्ये २० दिवसांसाठी अनेक आत्मार्थी बंधूसह आम्ही दोघेही सख्खेभाऊ सोनगढला गेलो.

क्रमबध्द पर्यायाचे मर्म समजण्याआधी आम्ही आचार्य कुंदकुंदांचे नाव तर ऐकले होते, पण त्यांचा कोणताही ग्रंथ वाचणे तर अत्यंत दूर, तो तर पाहिलाही नव्हता, जरी त्यावेळी आमचे वय फार नव्हते; केवळ २०-२१ वर्षाचेच होते; परंतु शास्त्री, न्यायतीर्थ व साहित्यरत्न तर झालोच होतो; पंडित तर म्हणवीत होतो, व्याख्यानेही भरपूर देत होतो, लोकप्रिय व्याख्याता ही होतो पण जिनधर्माचे मर्म आम्ही जाणत नव्हतो.

नाही तरी काय केले असते ? अभ्यासक्रमात कुंदकुंदांचा कोणताही ग्रंथ नव्हता अन् आध्यात्मिक चर्चेचे वातावरणही कुठे नव्हते. सामाजिक लढाया, वाद अवश्य चालू होते, जैन समाजातील सर्व पत्र-पत्रिका त्यांनीच भरल्या.

आम्हालाही तर त्यांचेच आकर्षण होते. आम्हाला आध्यात्मिक रुची कोठे होती ? वडिलांना आवडते म्हणून जैनदर्शन शिकलो होतो; भाषा अन् परिभाषा या रूपात ते शिकलो होतो, भावात्मक रूपात काहीही हाती लागले नव्हते. सुरूवातीपासून क्षयोपशम विशेष होताच, म्हणून कोणतेही व्याख्यान अडथळचाशिवाय पुरे होत होते. शास्त्राचे मर्म तर समजले नव्हते, पण मान जरूर आला होता.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



जर क्रमबद्ध पर्यायाचे मर्म समजले नसते तर काय झाले असते, कुणास ठाऊक ? काय झाले असते ? सारे काही असेच चालू राहिले असते अन् बहुमूल्य मानव भव तसाच व्यर्थ वाया गेला असता. पण गेला कसा असता ? कारण आमच्या पर्यायाच्या क्रमामध्ये 'क्रमबद्ध पर्याय' समजली समजण्याचा काळ ही परिपक्व झाला होता.

यानंतर यामुळेच अनेक सामाजिक उपद्रवांचा सामना देखील आम्हाला करावा लागला, शारीरिक व्याधींनीही पछाडले, पण क्रमबद्धावरील श्रद्धेच्या बळावर आत्मबल कधीच खंडित झाले नाही. क्रमबद्ध पर्यायाची श्रद्धा ही एक अशी संजीवनी आहे की जी प्रत्येक परिस्थितीत धैर्य कायम ठेवते, शान्ती प्रदान करते, कर्तृत्वाचा अहंकार तोडते, ज्ञाता-दृष्टा राहण्याची पावन प्रेरणा देते, अजून विशेष काय असेच म्हणावे लागेल की ती जीवन सफल व सार्थक बनविते.

मागील २३ वर्षापासून क्रमबद्धपर्यायावरील श्रद्धा अखंड टिकली आहे, कधीही एकक्षण देखील त्या विषयी चित्त डोलायमान झाले नाही. जरी या काळात चिंतन, मनन. अध्ययनात अनेक दिशांनी विकास झाला, तरी श्रद्धेत किंचितही फरक पडला नाही.

क्रमबद्ध पर्यायासंबंधी मजकडून १९७९ च्या सुरूवातीपासूनच जे काही लिखाण होत आहे, ते सारे विगत २३ वर्षाच्या अध्ययन मननाचा, चिंतनाचा परिणाम आहे. म्हणून पाठक बंधूंना माझा एक विनम्र अनुरोध आहे की त्यांनी हे पुस्तक केवळ वाचून समाधान न मानता, हे सतत वाचावे, विचार करावा, मंथन करावे व याचा तळ गाठावा. याची चर्चा ही करावी पण गंभीरता पूर्वक याला विनोदाचा विषय बनवू नये किंवा सन्मानाचा मुद्दा बनवू नये.

जरी आजवर कुणी याचा विरोध करीत आला असेल तरी याची स्वीकृती माननांना कुणी पराजय झाला असे मानू नये, कारण याचा स्वीकार करण्यात पराजय असला तरी तो देखील खरा विजयच आहे. याच्या सहज स्वीकृतीत विजयच विजय आहे, पराजय मुळीच नाही.

याचा निर्णय करण्यात सर्वज्ञतेचा निर्णय अंतर्भूत आहे,सर्वज्ञांनी सांगितलेल्या वस्तूच्या स्वरूपाचा निर्णय अंतर्भूत आहे. मुक्तीच्या

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मार्गावर मार्गक्रमण करतांना जे काही आवश्यक आहे, ते सारे काही याच्या श्रद्धेमध्ये समाविष्ट आहे.

गेल्या २३ वर्षात शेकडो वेळा यावर व्याख्याने दिलीत, त्यांना लिपिबद्ध करण्याचा आग्रह देखील श्रोत्यांनी भरपूर केला, परंतु अजून पर्यंत ते लिहीले गेले नव्हते. आत्मधर्माच्या संपादकीयात लिहीणे भाग पडले म्हणूनच हे लिहीले गेले.

जरी एक देखील आत्मार्थी यापासून क्रमबद्धपर्यायाचे खरे स्वरूप जाणू शकला तरी मी आपले श्रम सार्थकी लागल्याचे समाधान प्राप्त करू शकेन.

हे लिहीतांना मी पूर्ण जागृत राहिलो आहे. सर्वप्रथम हा निबंध १९७९ मध्ये १६ पृष्ठांत २०० प्रतीमध्ये प्रकाशित केला होता. त्याला एलाचार्य मुनिश्री विद्यानंदजींच्या सान्निध्यात जयपूरला होणाऱ्या सेमिनारमध्ये प्रस्तुत केले होते. त्या सेमिनारमध्ये आलेल्या साऱ्या विद्वानांना तर तो दिलाच होता, पण अनेक प्रतिष्ठित विद्वानांच्या सेवेत खालील निवेदना सहित तो पाठविला होता–

"हा निबंध अजून अपूर्ण आहे. आवश्यक संशोधन अन् दुरुस्ती अजून व्हायची आहे. लवकरच प्रकाशित होणाऱ्या या निबंधाविषयी विद्वानांचे अभिमत, सूचना, सल्ला अनुरोधपूर्वक आमंत्रित आहे. आम्ही खात्री देतो की प्रकाशनापूर्वी आलेल्या सर्व सूचनांचा गंभीरता पूर्वक विचार करण्यात येईल."

परिणामतः अनेक विद्वानांची पत्रे आली, त्यामध्ये काही सूचना होत्या बाकी प्रशंसा बरीच होती.

त्यांच्यावर गंभीरता पूर्ण विचार करून हे कार्य पुढे चालविले मध्येच काही भाग वाढविला अशाप्रकारे २५ पृष्ठांचा हा निबंध झाला. म्हणून पुन्हा छापून तो विद्वानांकडे पाठविला त्यातही खालील अनुरोध केला गेला होता–

"हा निबंध आपल्या सेवेत आवश्यक सूचना व सल्ला मिळावी म्हणून अंदाजे दोन महिन्यांपूर्वी पाठविला होता, तेव्हा तो १६ पानांचा होता. आता तो वाढून या रूपात आहे. तरी तो अपूर्णाच

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आहे. अजूनही आपण महत्वपूर्ण सुधारणा सुचवाल अशी अपेक्षा करीत आहे. तसे तर आत्मधर्माच्या संपादकीय रूपात हा प्रकाशित होत आहे, नंतर हा पुस्तकाकार प्रकाशित करायची योजना आहे. जसे आधी सांगितले, तसाच विश्वास असूनही आम्ही देतो की, प्रकाशन पूर्व प्राप्त सूचनेवर गंभीरतापूर्वक विचार करून आवश्यक, संशोधन, व वाढ अवश्य केली जाईल.''

आत्मधर्माच्या वाचकांकडूनही अनेक पत्रे मिळालीत. हे सारे लक्षात ठेवून हा निबंध वाढविला गेला. हा विषय या काळात पूज्य श्री कानजी स्वामींनी सुरू केला होता त्याअर्थी त्यास अनुसरून त्यांचे ताजे विचार वाचकापर्यंत पोहोचावेत या भावनेने त्यांची एक मुलाखत (इंटरव्हयू) मी घेतली, ती आत्मधर्माच्या सप्टेंबर १९७९ च्या अंकात प्रकाशित झाली आहे.

या प्रकारे १९७९ पासून सप्टेंबर १९७९ पर्यंत सतत हिंदी आत्मधर्माच्या संपादकीयातून हा महानिबंध प्रकाशित केला गेला, जो आत्मधर्माच्या (२० × ३० / ८) आकारात ५० पृष्ठांचा झाला होता. यानंतर आक्टोबर १९७९ मध्ये हिंदी आत्मधर्मात (अपनी बात) 'माझे मनोगत' या शीर्षकाने या संबंधी एक संपादकीय लिहीले त्याला सर्वांग परिपूर्ण बनावे म्हणून जिज्ञासू पाठक व सन्मान्य विद्वानांकडून मार्गदर्शन अपेक्षिले होते आणि त्यांना विश्वास दिला होता की प्रकाशनापूर्वी आलेल्या सूचनांवर गंभीरतापूर्वक विचार करून आवश्यक संशोधन, बदल, वाढ, व स्पष्टीकरण अवश्य केले जाईल; या महानिबंधाच्या शुद्धीमध्ये त्यांच्या सूचनांचा भरपूर उपयोग केला जाईल.

या संपूर्ण आग्रह व विनंत्यानंतर जे काही प्राप्त झाले त्यामध्ये प्रोत्साहन आणि प्रशंसाच अधिक होती, सूचना अन् सल्ला कमी. परन्तु पुन्हा-पुन्हा केलेल्या विनंत्यामुळे जे काही मार्गदर्शन मिळाले, त्यांचा फायदा आम्ही मनमोकळेपणाने घेतसा. जे काही प्रश्न आले त्यांचे स्पष्टीकरण प्रश्नोत्तरांच्या रूपात करण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय बरेचसे संभाव्य प्रश्नही स्वत: उपस्थित करून समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे.

याप्रमाणे या ग्रंथाचे दोन खंड झालेत. १. क्रमबद्धपर्याय; एक अनुशीलन व २. क्रमबद्ध पर्याय : कांही प्रश्नोत्तरे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



शेवटी तीन परिशिष्टे देखील दिली; आहोत ज्यामध्ये पू. कानजी स्वामींशी घेतलेला इंटरव्ह्यू (मुलाखत), संदर्भ ग्रंथसूची, अन विद्वानांचे अभिमत दिले गेले आहेत.

हे वर्ष माझ्यासाठी क्रमबद्ध वर्षाच्या रूपात आले आहे आत्मधर्मात संपादकीयाच्या रूपात सतत याची चर्चा होत असल्याने या काळात मी जेथे जेथे प्रवचनार्थ गेलो. तेथे जनतेच्या आग्रहाखातर क्रमबध्दपर्यायावरच प्रवचने करावी लागली. श्री सम्मेद शिखरजी मुंबई, राजकोट, सतना. अजमेर, हस्तिनापूर इतकेच नव्हे तर सोनगढ शिबिरातही सतत दहा दिवस पर्यंत क्रमबध्द पर्यायावर प्रवचने झालीत. जयपूरमध्ये तर पूर्ण वर्षभर हा विषयच चर्चेचा विषय बनला होता. जिज्ञासू श्रोता अन् मेधावी विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून यावर अनेक प्रवचने देखील केलीत, त्यांचेशी चर्चा देखील भरपूर झाली.

क्रमबध्दपर्यायमय वातावरण सतत राहिल्याने देखील बरेच चितन या संदर्भात चालत राहिले ते सारेच जरी नसले तरी बरेच काही यात येऊन गेलेच आहे.

याप्रमाणे या पुस्तकास सर्वांग सुंदर बनविण्याचा भरपूर प्रयास केला गेला आहे. तरीपण काही त्रुटी राहिली असेल तर सर्व जिज्ञासू वाचकांना व सन्माननीय विद्वानांना सानुरोध आग्रह करतो की त्यांनी त्या त्रुटींकडे आमचे लक्ष उत्कृष्ट करावे. त्यांच्या सूचनांचा उपयोग आम्ही पुढील आवृत्तीत अवश्य करू यात काही न्यून असावे अशी आमची मुळीच इच्छा नाही,

जैन दर्शनातील सर्वाधिक महत्त्वपूर्ण अन् गंभीर अशा या विषयाला निर्विवाद रूपात सर्वांग परिपूर्ण करून प्रस्तुत करावे या भावनेनेच ही विनंती आम्ही केली आहे. विद्वज्जन यावर लक्ष केंद्रित करतील अशी आशा करतो.

शेवटी साऱ्या विश्वाने क्रमबध्द पर्यायाचे स्वरुप समजावे, स्वभावसन्मुख व्हावे व अनंत सुखी व्हावे या पवित्र मंगल भावनेनेच मी माझे मनोगत समाप्त करीत आहे.

**-डॉ हुकमचंद भारिल्ल**

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# प्रथम खंड

## क्रमबद्ध पर्याय : एक अनुशीलन

क्रमबद्धपर्याय आज दिगंबर जैन समाजाचा बहुचर्चित विषय आहे. अनुकूल किंवा प्रतिकूल का असेना परंतु क्रमबद्धपर्यायाची चर्चा आज तत्त्वप्रेमी समाजामध्ये सर्वत्र आढळते. जरी पुज्य श्री कानजी-स्वामींनी हा विषय मोठ्या गंभीरतेने प्रस्तुत करून आध्यात्म जगामध्ये एक क्रांतीचा जयघोष केला आहे हा महत्त्वपूर्णविषय समाजामध्ये आज चर्चेचा विषय देखील बनला आहे, तरी देखील या विषयाच्या खोलीमध्ये जाणाऱ्या व्यक्ती थोड्याच दृष्टीस पडतात. जैन दर्शनाच्या या अनुपम अनुबंधावर ज्या गंभीरतेने आणि खोलवर मंथन व्हायला हवे तसे दृष्टीस पडत नाही.

या महान दार्शनिक (उपलब्धी) प्राप्तीला व्यर्थ वाद–विवाद आणि सामाजिक राजनीतीचा विषय बनविला गेला आहे हा एक शुद्धदार्शनिक विषय आहे याला वाद–विवाद व थट्टेचा विषय न बनविता यावर विशुद्ध दार्शनिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. जैनदर्शनाशी संबंधित असल्यामुळे येथे या विषयावर जैनागमाच्या परिपेक्ष्यामध्ये संयुक्ती आणि सोदाहरण अनुशीलन अपेक्षित आहे.

'क्रमबद्धपर्याया'चा आशय हा आहे की या परिणमनशील जगाची परिणमनव्यवस्था 'क्रमनियमित' आहे. जगामध्ये जे काही परिणमन निरंतर होत आहे ते सर्व एका निश्चित क्रमामध्ये व्यवस्थित-रूपाने होत आहे. स्थूलदष्टीने बघितल्यास जे परिणमन अव्यवस्थित वाटते. सूक्ष्म विचार केल्यानंतर त्यामध्ये देखील एक सुव्यवस्थित व्यवस्था असल्याचे आढळून येते. ज्याप्रमाणे नाटकाच्या रंगमंचावर जे दृश्य व्यवस्थित दाखवले जाते, ते तर पूर्वीच निश्चित आणि पूर्ण व्यवस्थित असतेच; परंतु जे दृश्य अव्यवस्थित दाखवले जाते ते देखील पूर्व नियोजित व पूर्ण व्यवस्थित असते.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



एकदम व्यवस्थित दाखवला जाणारा एखादा गर्भ श्रीमंतांचा दिवाणखाना ज्याप्रमाणे पूर्व नियोजित आणि व्यवस्थित असतो; त्याचप्रमाणे अव्यवस्थित दाखवली जाणारी एखाद्या गरीबाची झोपडी काही अनियोजित आणि अव्यवस्थित नसते; परंतु ती देखील पूर्णतः नियोजित आणि व्यवस्थितच असते. त्याची मोडकी खाट आणि फाटलेले कपडे दाखविण्यासाठी आधीच चांगली खाट तोडावी लागते आणि चांगले कपडे पाहिजे तेथे फाडावे लागतात. कुठे ताट पडलेले आहे कुठे तांब्या- हे दाखविण्यासाठी व्यवस्थितपणे एका निश्चित ठिकाणी ताट आणि दुसऱ्या निश्चित ठिकाणी तांब्या आधीच ठेवावा लागतो.

ज्याप्रमाणे वरील अव्यवस्थित दाखविणारी व्यवस्था पूर्ण निश्चित आणि व्यवस्थित असते. बरोबर त्याचप्रमाणे संपूर्ण द्रव्याचे अव्यवस्थित वाटणारे परिणमन देखील पूर्ण निश्चित आणि व्यवस्थित असते

ज्याप्रमाणे नाटकामध्ये दृश्य क्रमशः येतात, एकदम येत नाहीत, त्याचप्रमाणे प्रत्येक द्रव्यामध्ये पर्यायी क्रमशःच होतात, एकदम नाही. नाटकात हे देखील निश्चित असते की कोणत्या दृश्यानंतर कोणते दृश्य येणार आहे; त्याचप्रमाणे पर्यायामध्ये देखील हे निश्चित असते की कोणानंतर कोणती पर्याय येणार आहे. ज्याप्रमाणे ज्यानंतर जे दृश्य येणे निश्चित असते, तेच दृश्य त्यानंतर येते इतर येत नाही. त्याचप्रमाणे त्यानंतर जी पर्याय (कार्य) होणार असते तेच होते, इतर नाही, ह्यालाच क्रमबद्धपर्याय म्हणतात.

प्रत्येक द्रव्याची ती परिणमन व्यवस्था व्यवस्थितच नाही, स्वाधीन देखील आहे; कुठलेही द्रव्य इतराच्या आधीन नाही. एका द्रव्याच्या परिणमनामध्ये दुसऱ्या द्रव्याचा काहीही हस्तक्षेप नाही.

ज्याप्रमाणे सर्वश्रेष्ठ दिगंबर आचार्य कुन्दकुन्द यांच्या प्रसिद्ध ग्रंथराज समयसारच्या ३०८ ते ३११ पर्यंतच्या गाथेच्या आत्मख्याति नावाच्या टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्र लिहीतात-

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



" जीवो हि तावत्क्रमनियमितात्मपरिणामैरूत्पद्यमानो जीव एव, नाजीवः ; एवमजीवोऽपि क्रमनियमितात्मपरिणामैरूत्पद्यमानोऽजीव एव, न जीवः ।

प्रथमतः तर जीव क्रमनियमित (क्रमबद्ध) अशा आपल्या परिणामांनी उत्पन्न होत असलेला जीवच आहे, अजीव नाही; त्याचप्रमाणे अजीव देखील क्रमनियमित (क्रमबद्ध) आपल्या परिणामांनी उत्पन्न होत असलेला अजीवच आहे, जीव नाही.

येथे समस्त जीव आणि अजीवांच्या परिणमनाला क्रमनियमित अर्थात क्रमबद्ध म्हटले आहे. जीव आणि अजीवाव्यतिरिक्त जगामध्ये आणखी आहेच काय ? जीव आणि अजीव द्रव्यांचा समुहालाच तर विश्व अर्थात जगत म्हणतात. याप्रमाणे समस्त जगाचे परिणमनच क्रमनियमित अर्थात क्रमबद्ध म्हटलेले आहे.

' क्रम नियमित ' आणि ' क्रमबद्ध ' शब्द एकार्थवाचीच आहेत. ज्याप्रमाणे जैनतत्त्व मीमांसेमध्ये स्पष्ट केले आहे :–

"प्रत्येक कार्य आपल्या स्वकालामध्येच होते, त्यामुळे प्रत्येक द्रव्याच्या पर्यायी क्रमनियमित आहेत. एकानंतर एक आपल्या-आपल्या स्वकालामध्ये निश्चय उपादानानुसार होत असतात.

येथे ' क्रम ' हा शब्द पर्यायींची क्रमाभिव्यक्ती दाखविण्यासाठी वापरलेला आहे आणि ' नियमित ' शब्द प्रत्येक पर्यायीचा स्वकाल आपल्या-आपल्या निश्चत उपादानानुसार नियमित आहे– हे दाखविण्यासाठी दिला गेला आहे.

वर्तमानकाळामध्ये जो अर्थ 'क्रमबद्धपर्याय' शब्दाद्वारे व्यक्त केला जातो, 'क्रमनियमित पर्यायांचा' तोच अर्थ आहे.[१]

लक्ष देण्यासारखी गोष्ट अशी आहे की येथे केवळ हे म्हटलेले नाही की पर्यायी क्रमाने होतात, परंतु हे देखील म्हटले आहे की त्या नियमितक्रमाने होतात, आशय हा आहे की ज्या द्रव्याची, जी

---

[१] जैन तत्त्वमिमांसा, द्वितीय संस्करण, पान २६८

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पर्याय, ज्या काळामध्ये, ज्या निमित्ताने व ज्या पुरुषार्थपूर्वक जशी होणार असते; त्या द्रव्याची, ती पर्याय, त्या काळामध्ये, त्याच निमित्ताने व त्याच पुरुषार्थपूर्वक तशीच होते; अन्यथा नाही" – हा नियम आहे.

कार्तिकेयानुप्रेक्षामध्ये म्हटलेले आहे :–

"जं जस्स जम्मि देसे जेण विहाणेण जस्मि कालम्मि ।
णादं जिणेण णियदं जम्मं वा अहव मरणं वा ।।३२१।।
तं तस्स तम्मि देसे तेण विहाणेण तम्मि कालम्मि ।
को सक्कदि वारेदुं इंदो वा तह जाणिंदो वा ।।३२२।।
एवं जो णिच्छयदो जाणदि दव्वाणि सव्वपज्जाए ।
सो सिद्दिट्ठी सुद्धो जो संकदि सो हु कुद्दिट्ठी ।।३२३।।

ज्या जीवाचे, ज्या देशामध्ये, ज्या काळामध्ये, ज्या विधानाने, जे जन्म किंवा मरण जिनदेवांनी नियतरूपाने जाणले आहे; त्या जीवाचे, त्याच देशामध्ये त्या कालामध्ये, त्याच विधानाने, ते अवश्य होते. त्यास इन्द्र किंवा जिनेन्द्र कोण टाळण्यामध्ये समर्थ आहे ? अर्थात् त्यास कोणी टाळू शकत नाही.

याप्रमाणे निश्चयाने जो द्रव्यांना आणि त्यांच्या समस्त पर्यायांना जाणतो तो सम्यग्दृष्टी आहे; आणि जो यामध्ये शंका करतो तो मिथ्यादृष्टी आहे."

जिनागमामध्ये आणखी अनेक ठिकाणी याप्रमाणे भाव व्यक्त केलेला आहे :–

"प्रागेव यदवाप्तव्यं येन यत्र यथा यतः ।
तत्परिप्राप्यतेऽवश्यं तेन तत्र तथा ततः ।।[1]

ज्याला, जेथे, ज्या कारणाने, ज्या प्रकाराने, जी वस्तु प्राप्त होणार असते, त्याला तेथे, त्या कारणाने, त्याच प्रकाराने तीच वस्तु अवश्य प्राप्त होते."

---

[1] आचार्य रविषेण : पद्मपुराण, सर्ग ११०, श्लोक ४०

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



"जो-जो देखी वीतरागने, सो-सो होसी वीरा रे।
बिन देख्यो होसी नहिं क्यों ही, काहे होत अधीरा रे॥
समयो एक बढ़ै नहिं घटसी, जो सुख-दु:ख की पीरा रे।
तू क्यों सोच करै मन कुडों, होय वज्र ज्यों हीरा रे॥"[१]

"जा करि जैसे जाहि समय में, जो होतव[२] जा द्वार।
सो बनि है टरिहै कुछू नाहीं, करि लौ नौ निरधार॥
हमकौ कुछु भय ना रे, जान लियो संसार॥ टेक॥"[३]

"सम्यग्दृष्टि के ऐसा विचार होय है – जो वस्तु का स्वरूप सर्वज्ञने जैसा जान्या है तैसा निरतर परिणमै है, सो होय है। इष्ट अनिष्ट मान दु:खी-सुखी होना निष्फल है। ऐसे विचार तै दुख मिटै हैं यह प्रत्यक्ष अनुभवगोचर है."[४]

बहुरि सम्यग्दृष्टि कै ऐसा निश्चय है– जिस जीवके जिस देश में जिस काल में जिस विधान करकै जन्म वा मरण वा लाभ-अलाभ सुख-दु:ख होना जिनेन्द्र भगवान दिव्य ज्ञान करि जान्या है; तिस जीवके तिस देश में तिस काल में तिस विधान करकै जन्म-मरण लाभ-अलाभ नियम तै होय ही, ताहि दूर करने कूं कोऊ इन्द्र अहमिन्द्र जिनेन्द्र समर्थ नाहीं है।"[५]

वरील प्रकरणांमध्ये प्राय: सर्वत्रच सर्वज्ञांच्या ज्ञानाला आधार मानून भविष्याला निश्चित निरूपित केलेले आहे आणि त्या आधारावर अधीर न होण्याचा आणि निर्भय राहण्याचा उपदेश दिलेला आहे. स्वामी कार्तिकेयांनी तर अशी श्रद्धा असणाऱ्यांनाच सम्यग्दृष्टी घोषित केले आहे आणि याप्रमाणे न मानणाऱ्याला मिथ्यादृष्टी म्हणण्यामध्ये देखील त्यांना किंचितही संकोच झालेला नाही.

---

[१] भैया भगवतीदास : अध्यात्मपद संग्रह, पान ८१

[२] भवितव्यता

[३] बुधजन : अध्यात्मपद, पृष्ठ ७९

[४] पं. जयचंदजी छाबडा : मोक्षपाहुड, गाथा ८६ चा भावार्थ

[५] पं. सदासुखदासजी कासलीवाल : रत्नकरंड श्रावकाचार, श्लोक १३७ चा भावार्थ

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



याप्रमाणे 'क्रमबद्ध पर्यायाच्या' सिद्धीमध्ये सर्वज्ञता सर्वात प्रबळ असे कारण आहे.

निष्पन्न–भूतकाळातील पर्यायांची क्रमबद्धता स्वीकार करण्या-मध्ये लोकांना काही बाधक वाटत नाही. परंतु अनिष्पन्न भविष्य-काळातील पर्यायी देखील निश्चित आहेत, असे म्हटले जाते तेव्हा लोकांना आश्चर्य वाटते की, जर सर्व काही निश्चित आहे तर आमचे हे सर्व करणे धरणे निरर्थक आहे. कर्तृत्वाच्या अभिमानाच्या ज्या भिंतीला तो अभेद्य समजून उभा होता, गर्व करीत होता, तीच ढासळते आहे– असे पाहून तो एकदम गडबडून जातो, त्याचे हे गडगडणे येवढे वाढते की आजपर्यंत सर्वज्ञ भगवंत आणि त्यांच्या सर्वज्ञतेचा तो अंतःकरणपूर्वक (बुद्धीपूर्वक नव्हे) स्वीकार करीत होता– त्यांच्या विषयी देखील त्याला शंका निर्माण होते, त्याचा देखील तो विरोध करतो.

आतापर्यंत तो सर्वज्ञांच्या सत्तेचा स्वीकार करीत आला, त्यामुळे एकदम त्याला त्यांचे अस्तित्वच नाही असे म्हणणे कठीण होते, म्हणून तो सर्वज्ञांच्या व्याख्याच बदलू पहातो. कधी म्हणतो की ते भूतकाळ आणि वर्तमानकाळाला जाणतात, परंतु भविष्यकाळाचे जाणत नाहीत, कारण भूतकाळामध्ये जे झाले ते होऊन गेले आणि वर्तमान काळात होत आहे, म्हणून त्यांना जाणण्यास काही हरकत नाही; परंतु भविष्य काळातील घटना ज्या घडलेल्या नाहीत, त्या ते कसे जाणतील ? आणि कधी-कधी म्हणतो की, भविष्याला जाणतात, परंतु सशर्त (काही अंशाने) जसे जो पुण्य करील तो सुखी होईल. जो पाप करील तो दुःखी होईल. जो अभ्यास करील तो पास होईल, आणि जो अभ्यास करणार नाही तो पास होणार नाही. इत्यादी अनेक मार्ग काढतो.

परंतु त्याचे हे सर्व परिश्रम व्यर्थ आहेत. कारण कुठे मार्गच नाही तर तो काढील कुठून ? कारण हे कसे शक्य आहे की तो सर्वज्ञांना मानेल, परंतु भविष्यज्ञांना मानणार नाही सर्वज्ञांचा अर्थ त्रिकालज्ञ आहे. जो भविष्याला जाणत नाही तो सर्वज्ञच कसा ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सर्वज्ञाची व्याख्या अशी आहे की जो सर्वांना जाणतो तो सर्वज्ञ. म्हटलेच आहे :–

"सर्व द्रव्य पर्यायेषु केवलस्य[१]

केवलज्ञानाचा विषय समस्त द्रव्य आणि त्याच्या तीन काळासंबंधी सर्व पर्यायी आहेत."

जे झाले आहे, होत आहे आणि भविष्यामध्ये होणार आहे; सर्वज्ञ भगवंतांच्या ज्ञानामध्ये ते सर्व वर्तमानवत् स्पष्ट झळकते.

या सूत्राची व्याख्या करताना आचार्य पूज्यवाद स्वामी लिहीतात :–

"तेषां पर्यायाश्च त्रिकालभुवः प्रत्येकमनन्तानन्तास्तेषु । द्रव्यं पर्यायजातं न किंचित्केवलज्ञानस्य विषयभावमतिक्रान्तमस्ति । अपरिमितमाहात्म्यं हि तदिति ज्ञापनार्थं सर्वद्रव्यपर्यायेषु इत्युच्यते ।[२]

सर्व द्रव्याच्या पृथक्-पृथक् तिन्ही काळामध्ये होणाऱ्या अनंतानन्त पर्यायी आहेत. या सर्वांमध्ये केवलज्ञानाची प्रवृत्ती असते. असे कुठलेही द्रव्य नाही आणि पर्यायसमूह नाही की जे केवलज्ञानाच्या विषयापासून दूर आहे. केवलज्ञानाचे महात्म्य अपरिचित आहे, ह्याचे ज्ञान करविण्यासाठी सूत्रामध्ये "सर्वद्रव्यपर्यायेषु" म्हटले आहे.

याचप्रमाणे भविष्याचे ज्ञान होते हे मानायचे, परंतु भविष्य निश्चित आहे असे मानायचे नाही, हे कसे शक्य आहे ? असे तर सर्व साधारण लोकदेखील म्हणतात की जो अभ्यास करील तो पास होईल. यामध्ये सर्वज्ञांच्या ज्ञानामध्ये दिव्यता कुठे राहिली ?

आचार्य कुन्दकुन्दस्वामी म्हणतात की :–

"जदि पच्चक्खमजादं पज्जायं पलयिदं च णाणस्य ।
ण हवदि वा तं णाणं दिव्वं ति हि के परूवेंति ।।[३]

---

[१] आचार्य उमास्वामी तत्त्वार्थ सूत्र अ. १ सूत्र २९

[२] सर्वार्थ सिद्धी, अ. १, सूत्र २९ ची टीका

[३] प्रवचनसार, गाथा ३९

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



जर अणुत्पन्न (भविष्याच्या) आणि विनष्ट (भूतकाळाच्या) पर्यायी सर्वज्ञांच्या ज्ञानामध्ये प्रत्यक्ष नसतील तर त्या ज्ञानाला दिव्य कोण म्हणेल ?''

धवला पुस्तक ६ मध्ये ह्याच विषय असा स्पष्ट केला आहे :-

''णट्ठाणुप्पण्ण अत्थाणं कधं तदो परिच्छेदो । ण, केवलत्तादो बज्झत्थावेक्खाए विणा तदुप्पत्तीए विरोहाभावा ।

**प्रश्न** :- जे पदार्थ नष्ट झालेले आहे आणि जे पदार्थ अद्याप उत्पन्नझालेले नाहीत त्यांना केवलज्ञानाने (कसे जाणता येते) कसे ज्ञान होऊ शकते ?

**उत्तर** :- नाही कारण केवलज्ञान सहाय-निरपेक्ष असल्यामुळे बाह्य पदार्थांच्या अपेक्षेशिवाय त्यांच्या (विनष्ट आणि अनुत्पन्न) ज्ञानाच्या उत्पत्तीमध्ये काही विरोध नाही.''[1]

आचार्य अमृतचंद्रांनी सर्वज्ञ समस्त ज्ञेयांना एका क्षणामध्ये संपूर्ण गुण आणि पर्यायासहित अत्यंत स्पष्ट रूपाने प्रत्यक्ष जाणतात ही चर्चा खालीलप्रमाणे केली आहे :-

''अथैकस्य ज्ञायकभावस्य समस्तज्ञेयभावस्वभावत्वात् प्रोत्कीर्ण लिखितनिखातकीलितमज्जितसमावर्तितप्रतिबिम्बितवत्तत्र क्रमप्रवृत्तानन्तभूतभवभ्दाविविचित्रपर्यायप्राग्भारमगाधस्वभावं गम्भीरं समस्तमपि द्रव्यजातेकेक्षण एव प्रत्यक्षयन्तं . . . ।[2]

एक ज्ञानयकभावाचा समस्त ज्ञेयाला जाणण्याचा स्वभाव असल्यामुळे क्रमशः प्रवर्त्तमान, अनन्त, भूत-वर्तमान-भावी विचित्र पर्याय समूह असणाऱ्या अगाध स्वभाव आणि गंभीर अशा समस्त द्रव्यांना जणू ते द्रव्य ज्ञायकामध्ये उत्कीर्ण झाले आहे, चित्रित झाले आहे, आत घुसले आहे, कीलित झाले आहे, बुडालेले आहे, सामावलेले आहे, प्रतिबिंबित झाले आहे, याप्रमाणे- एकाक्षणामध्येच जो (शुद्धात्मा) प्रत्यक्ष करतो. . . .''

---

[1] जैनेन्द्र सिद्धान्त कोष, भाग २, पृष्ठ १५१

[2] प्रवचनसार, गाथा २०० ची तत्त्वप्रदीपिका टीका

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



"अलमथवातिविस्तरेण, अनिवारितप्रसरप्रकाशशालितया क्षायिकज्ञानमवश्यमेव सर्वदा सर्वत्र सर्वथा सर्वमेव जानीयात् ।[1]

अथवा अतिविस्तार बस् – अनिवार पसरलेले प्रकाशमान असल्यामुळे ज्ञायिकज्ञान अवश्यमेव, सर्वदा सर्वथा, सर्वांना जाणते."

भगवती आराधनेमध्ये सर्वज्ञांच्या त्रिकालज्ञेचा स्पष्ट उल्लेख आहे, तो असा :–

"पस्सदि जाणदि य तहा तिण्णि वि काले सपज्जए सव्वे ।
तह वा लोगमसेसं पस्सदि भयवं विगदमोहो ॥२१४१॥

ते (सिद्ध परमेष्ठी) संपूर्ण द्रव्य त्यांच्या पर्यायांनी भरलेल्या संपूर्ण जगाला तिन्ही काळामध्ये जाणतात. तरीदेखील ते मोह रहितच असतात.

या प्रकारचा भाव आचार्य अमितगतींनी योगसारामध्येदेखील व्यक्त केला आहे :–

"अतीता भाविनश्चार्थाः स्वे-स्वे काले यथाखिलाः ।
वर्तमानास्ततस्तव्दव्देक्षि तानपि केवलं ॥[2]

भूत आणि भावी समस्त पदार्थ ज्या रूपाने आपापल्या काळामध्ये वर्तमान राहतात, केवलज्ञान त्यांना देखील त्याच रूपाने जाणते."

सर्वज्ञतेची सिद्धी आचार्य समंतभद्रांनी आप्तमीमांसेमध्ये, आचार्य अकलंकदेवांनी त्यांच्या अष्टशती टीकेमध्ये, व आचार्य विद्यानंदिनी अष्टसहस्री विस्ताराने केली आहे 'सर्वज्ञ सिद्धी' जैनन्यायशास्त्राचा एक प्रमुख विषय आहे. एक प्रकारे संपूर्ण न्यायशास्त्रच सर्वज्ञतेच्या सिद्धीमध्ये समर्पित आहे. तरी देखील जेव्हा न्यायविषयक अनेक उपाधींनी विभूषित विव्दव्दर्ग सर्वज्ञतेमध्येदेखील शंका व्यक्त करतो किंवा सर्वज्ञतेच्या नव्या-नव्या व्याख्या प्रस्तुत करतो, तेव्हा आश्चर्य झाल्याशिवाय राहात नाही.

---

[1] प्रवचनसार, गाथा ४७ ची तत्त्वप्रदीपिका टीका

[2] योगसार, अ. १ छन्द २८

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सर्वज्ञ भगवंतांचे भविष्यासंबंधीचे ज्ञान 'अभ्यास करील तर पास होईल' या रूपामध्ये अनिश्चयात्मक नसून 'हा अभ्यास करील आणि अवश्य पास होईल' किंवा 'अभ्यास करणार नाही आणि पासही होणार नाही' या रूपामध्ये निश्चयात्मक असते.

भविष्याला निश्चित मानण्यामध्ये अज्ञानीला स्वस्तुतीची स्वतंत्रता खंडित होते असे वाटते परंतु त्याचे लक्ष इकडे जात नाही की भविष्य अनिश्चितच मानल्यावर ज्योतिष्य इत्यादी निमित्तज्ञान काल्पनिक सिद्ध होतील, परंतु सूर्य ग्रहण इत्यादी अनेक वर्षापूर्वी घोषित होतात आणि ते सत्य निघतात. अवधिज्ञान आणि मनःपर्यय-ज्ञान देखील आपल्या मर्यादेत भविष्याला जाणतेच. लाखो वर्षा-नंतरच्या भविष्याबद्दल निश्चित घोषणांनी सर्वज्ञ-कथित जिनागम भरलेला आहे आणि त्या सर्व घोषणा 'असेच होईल' या भाषेत आहेत. सर्वज्ञानाच्या भविष्यज्ञतेच्या नकाराचा अर्थ समस्त जिनाग-माला तिलांजली देणे होईल.

'क्रमबद्धपर्याया'कडे प्रथम आमचे लक्ष गेले नाही आणि तो या युगामध्ये अशा एका व्यक्तीच्या माध्यमातून प्रस्तुत झाला की आम्ही त्या व्यक्तीला काही कारणामुळे पसंत करीत नाही याचा अर्थ हा तर होऊ नये की आम्ही सर्वज्ञानांच्या भविष्यज्ञतेचा देखील अस्वीकार करून (नाकारून) आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घ्यावी. हे आत्मघातकी पाऊल उचलण्यापूर्वी विचारवंतांनी परत एकवेळा पुनर्विचार करावा असा आग्रह आहे.

अत्यंत स्पष्ट असलेल्या वरील आगम प्रमाणापासून व अकाट्य युक्तीपासून वाचण्यासाठी काही लोक नियमसार गाथा १५९ चा आधार घेतात, तो खालीलप्रमाणे आहे :-

"जाणदि पस्सदि सव्वं व्यवहारणएण केवली भगवं ।
केवलणाणी जाणदि पस्सदि णियमेण अप्पाणं ।।

व्यवहारनयाने केवली भगवान सर्व जाणतात आणि पाहतात; निश्चयनयाने केवलज्ञानी आत्म्याला जाणतात आणि पहातात."

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



परमात्मप्रकाशामध्ये देखील या प्रकाराचे कथन येते :-

"ते पुणु वंदउँ सिद्धगण जे अप्पाणि वसंत।
लोयालोउ वि सयलु इहु अच्छहि विमलु णियंत॥[1]

मी त्या सिद्धांना वंदन करतो! जे निश्चयाने आपल्या स्वरूपामध्ये तिष्ठत आहेत, आणि व्यवहारनयाने लोकालोकास संशयरहित प्रत्यक्ष जाणत थांबलेले आहेत."

वरील कथनाच्या आधाराने ते लोक म्हणतात की, केवली भगवान पराला तर व्यवहाराने जाणतात, निश्चयाने तर जाणत नाहीत; आणि व्यवहार असत्यार्थ आहे– समयसार गाथा ११ मध्ये म्हटले आहे :-

"व्यवहारोऽभूयत्थो देसिदो दु सुद्धणओ।
व्यवहार अभूतार्थ आहे आणि निश्चयनय भूतार्थ आहे।"

वरीलप्रमाणे केवली भगवान पराला जाणतच नाहीत, तेव्हा समस्त द्रव्यांच्या भविष्यातील पर्यायांना जाणण्याचा प्रश्नच कुठे राहतो?

परंतु हे त्यांचे हे म्हणणे देखील पूर्वापर–विचार रहित आहे. कारण पराला जाणत नाहीत या कथनाने पराच्या भविष्याला जाणत नाहीत असे म्हणणे काही तरी समजू शकण्यासारखे आहे, परंतु आपल्या भविष्याला देखील जाणत नाही हे कसे सिद्ध होईल? म्हणून हे सिद्ध होऊ शकत नाही की ते भविष्याला जाणत नाहीत.

दुसरी सर्वांहून महत्त्वपूर्ण गोष्ट अशी आहे की, त्यांनी वरील कथनाच्या मर्माकडे लक्षच दिलेले नाही. वरील कथनास पूर्वापार चांगल्याप्रकारे पाहिल्यास सर्व काही स्पष्ट होते.

वरील संपूर्ण कथन 'स्वाश्रितो निश्चयः, पराश्रितो व्यवहारः' स्वाश्रित कथनाला निश्चय आणि पराश्रित कथनाला व्यवहार म्हणतात– या व्याख्येच्या अपेक्षेने वरील कथन केलेले आहे. नियमसारच्या वरील गाथेच्या संस्कृत टीकेमध्ये स्पष्ट उल्लेख आहे.

---

[1] परमात्मप्रकाश, अ. १, दोहा ५.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्यामध्ये 'स्व'चीच अपेक्षा आहे. ते निश्चयकथन आहे आणि ज्यामध्ये पराची अपेक्षा येते, ते व्यवहार कथन आहे, म्हणून केवली भगवान आपल्या आत्म्याला पाहतात– जाणतात– हे निश्चय कथन झाले आणि ते पराला जाणतात– पाहतात– हे व्यवहार कथन झाले; वरील कथनाचे तात्पर्य केवळ इतकेच आहे. ते पराला व्यवहाराने जाणतात– याचा अर्थ असा मुळीच नाही की ते पराला जाणतच नाहीत.

नियमसारच्या १५९ पासून १६९ पर्यंतच्या गाथा आणि त्यांच्या संस्कृत टीका एक वेळा काळजीपूर्वक चांगल्या पाहिल्या तर सर्व खुलासा होईल, यातील संपूर्ण प्रकरण भगवंतांची सर्वज्ञता सिद्ध करणारेच आहे. विस्तार भयाने ते सर्व येथे देणे शक्य याही जिज्ञासु वाचकांनी वरील प्रकरणाचे खोलवर मंथन करावे असा आग्रह आहे.

आचार्य जयसेन प्रवचनसार गाथा ३९ च्या तात्पर्यवृत्ती नामक टीकेमध्ये लिहीतात :–

"यथायं केवली परकीय द्रव्यपर्यायान् यद्यपि परिच्छित्तिमात्रेण जानाति तथापि निश्चयनयेन सहजानन्दैकस्वभावे स्वशुद्धात्मनि तन्मयत्वेंन परिच्छित्तिं करोति, तथा निर्मलविवेकिजनोऽपि यद्यपि व्यवहारेण परकीयद्रव्यगुणपर्यायपरिज्ञानं करोति, तथापि, निश्चयेन निर्विकारस्वसंवेदनपर्याये विषत्वात्पर्यायेण परिज्ञानं करोतीति सूत्रतात्पर्यम् ।

ज्याप्रमाणे केवली भगवान परकीय द्रव्य-पर्यायांना जरी परिच्छित्ति मात्ररूपाने जाणतात, तरीदेखील निश्चयनयाने सहजानंदरुप एकस्वभावी शुद्धात्मामध्येच तन्मय होऊन परिच्छित्ति करतात; त्याचप्रमाणे विवेकी लोकही जरी व्यवहाराने परकीय द्रव्य–गुणपर्यायांचे ज्ञान करतात, तरी देखील निश्चयाने निर्विकार स्वसंवेद-पर्यायाचेच ज्ञान करतात."

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



वरील कथनानुसार ज्या अपेक्षेने केवली भगवान केवळ आपल्यालाच जाणतात, पराला जाणत नाहीत; त्या अपेक्षेने अर्थात निश्चयनयाने सम्यग्दृष्टीदेखील केवळ आपल्यालाच जाणतो पराला जाणत नाही. म्हणून जर आपण सर्वज्ञांचे पराला जाणणे असत्य मानले तर मग सम्यग्दृष्टी ज्ञानीचेदेखील पराला जाणणे असत्य मानावे लागेल, परंतु ते तर प्रत्यक्ष सिद्ध आहे. ज्ञानींचे पराला जाणणे आपणास देखील अस्वीकृत होणार नाही अशी आशा आहे.

दुसरे असे की केवली भगवान स्वतःला तन्मय होऊन जाणतात; परंतु पराला तर जाणतात, परंतु त्यात ते तन्मय होत नाहीत, यामुळे देखील त्यांचे पराला जाणणे व्यवहार म्हटले आहे.

परमात्मप्रकाश अध्याय १, गाथा ५२ च्या टीकेमध्ये हा विषय अत्यंत स्पष्ट आहे :-

"कश्चिदाह – यदि व्यवहारेण लोकालोकं जानाति तर्हि व्यवहारनयेन सर्वज्ञत्वं, न च निश्चयनयेनेति।

परिहारमाह– यथा स्वकीयमात्मानं तन्मयत्वेन जानाति तथा परद्रव्यं तन्मयत्वेन न जानाति, तेन कारणेन व्यवहारो भण्यते न च परिज्ञानाभावात्। यदि पुनर्निश्चयेन स्वद्रव्यवत्तन्मयो भूत्वा परद्रव्यं जानाति तर्हि परकीयसुख-दुःखरागद्वेषपरिज्ञातो सुखी–दुःखी रागी-द्वेषी च स्यादिति महद्दूषणं प्राप्नोतीति।

**प्रश्न**-जर केवली भगवान व्यवहारनयाने लोकालोकास जाणतात तर व्यवहारनयानेच त्यांना सर्वज्ञत्व देखील असेल, निश्चय-नयाने नव्हे ?

**उत्तर**– ज्याप्रमाणे तन्मय होऊन स्वकीय आत्म्याला जाणतात त्याचप्रमाणे परद्रव्याला तन्मय होऊन जाणत नाहीत, यामुळे व्यवहार म्हटले आहे, त्यांच्या परिज्ञानाचाच अभाव असल्यामुळे म्हटलेले नाही. जर ते स्वद्रव्याप्रमाणे परद्रव्याला देखील निश्चय-नयाने तन्मय होऊन जाणत असते तर परकीय सुख आणि दुःखांना

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



जाणल्यामुळे स्वयं सुखी-दु खी आणि परकीय राग-द्वेषांना जाणल्यामुळें स्वयं रागी-द्वेषी झाले असते आणि याप्रमाणे महत्‌दूषण प्राप्त होईल."

तार्किक चक्रचूडामणी आचार्य समंतभद्र रत्नकरंड श्रावकाचाराच्या मंगलाचरणामध्ये श्री वर्द्धमान भगवंतांच्या केवलज्ञानामध्ये अलोकाकासहित तीन्ही लोकांच्या समस्त पदार्थांच्या स्पष्ट झळकण्याची चर्चा खालीलप्रमाणे करतात :–

नमः श्री वर्द्धमानाय निर्धूत कलिलात्मने,
सालोकानां त्रिलोकानाम्, यद्विद्या दर्पणायते।

ज्यांच्या केवलज्ञानरूपी दर्पणामध्ये अलोकाकासहित तीन्ही लोक झळकतात आणि ज्यांनी ज्ञानावरणादी पापरूपी मलास धुवून टाकले आहे, त्या वर्द्धमान भगवंतांना नमस्कार असो.

याप्रमाणे जैन-दर्शनाचे सर्वमान्य दिग्गज आचार्य श्री कुंदकुंद, कार्तिकेय, समंतभद्र, उमास्वामी, पूज्यपाद, वीरसेन, अमृतचंद्र, रविषेण इत्यादी अनेक आचार्यांच्या प्रबल प्रमाणांनी सर्वज्ञता आणि त्रिकालज्ञता सहजसिद्ध आहे.

उपर्युक्त अनेक प्रमाण दिल्यानंतर देखील लोकांच्या आग्रह असतो की आम्हाला स्पष्ट दाखवा की क्रमबद्धपर्यायबद्दल कोणत्या शास्त्रात लिहीलेले आहे ? परंतु मला म्हणायचे आहे की असे कोणतें शास्त्र आहे की ज्यामध्ये क्रमबद्धपर्यायाचा उल्लेख नाही ? चारही अनुयोगाच्या शास्त्रामध्ये येवढेच नव्हे तर पूजापाठातदेखील क्रमबद्धपर्यायाचा सूर उमटलेला दिसेल.

"भामण्डल की द्युति जगमगात,
भवि देखत निजभव सात-सात"[1]

---

[1] कविवर बृन्दावनकृत चंद्रप्रभपूजन, जयमाला

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तीर्थंकर भगवंतांच्या प्रभामंडळामध्ये आपापले सात-सात भव दिसतात, त्या सात भवामध्ये भूत भूतकाळाचे तीन भविष्यकाळाचे आणि एक वर्तमान काळचा दिसतो.

याप्रमाणे प्रत्येक भव्याचे कमीत कमी भविष्याचे तीन भव-निश्चित झाले, अन्यथा ते दिसतील कसे ? तीन भवाचे आयुष्य एकाच वेळी बांधली जात नाही. म्हणून हे देखील म्हणता येत नाही की आयु कर्माचा बंद झाल्यानंतर भव निश्चित झाले, यातून हाच निष्कर्ष निघतो की ते पहिल्यापासून निश्चित असतात, होत नाही.

प्रथमानुयोगाच्या सर्व शास्त्रात भविष्याच्या निश्चित घोषणा भरलेल्या आहे.

भगवान नेमीनाथांनी द्वारका जळण्याची घोषणा बारा वर्षा-पूर्वी केली होती. त्याचवेळी हे देखील स्पष्ट केले होते की कोणत्या-निमित्ताने, कसे, आणि केव्हा हे सर्व घडेल, प्रत्येक उपायानंतर देखील ते सर्व त्याचवेळी घडले.

येवढे खरे की ऐकणाऱ्यामध्ये वरील गोष्टीची प्रतिक्रिया आपापल्या भवितव्यानुसार भिन्न-भिन्न झाली. ज्यांचे भविष्य चांगले होते, त्यांना हे ऐकून वैराग्य झाले, अनेकांनी नग्न दिगंबर दीक्षा धारण केली, अनेकांनी अणुव्रते धारण केली, अनेक सम्यक्त्वी बनले, परंतु ज्यांची अधोगती होणार होती, त्यांना भगवंतांची घोषणा टाळण्याचा विकल्प आला. ते त्या प्रयत्नाला लागले. कशी द्वारका जळते ? त्यांनी आपल्या पुरुषार्थ जणु भगवंतांचे म्हणणे खोटे ठर-विण्यामध्येच लावला; परंतु भगवंतांनी तर जर पाहिले–जाणले होते, ते सांगितले होते, ते त्याचे कर्ते-धर्ते तर तर नव्हते.

भगवंतांच्या वाणीमध्ये द्वारका जळण्याच्या उपादानसह निमि-त्ताचादेखील स्पष्ट उल्लेख होता; परंतु निमित्ताधीन दृष्टी अस-णारांचे लक्ष्य उपादानाकडे गेलेच नाही, ते तर निमित्ताला हटविण्याच्या मागे लागले आणि आपल्या दृष्टीमध्ये निमित्तास हटवून स्वतःला सुरक्षित समजू लागले, परंतु . . .

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



निमित्ताधीनदृष्टी असणाऱ्यांना भगवंताच्या सर्वज्ञतेवर पूर्ण विश्वास नव्हता. त्यांची दृष्टी चंचल होती, हे खरे नव्हते की त्यांचा भगवंतांच्या वचनावर मुळीच विश्वास नव्हता, जर विश्वास नसता तर ते त्याला भ्याले नसते. त्यांनी त्यास टाळण्याचा असफल प्रयत्नही केला नसता. त्यांना विश्वास होता. परंतु पक्का विश्वास नव्हता, भरवसा होता, परंतु पूर्ण भरवसा नव्हता. अशीच डाम–डौल श्रद्धा होती, ज्यांची होनहार खोटी असते, त्यांची श्रद्धा सर्वज्ञांवरदेखील राहात नाही ज्यांचा संसार अल्प असतो, त्यांनाच सर्वज्ञता लक्षात येते.

भगवंतांच्या दिव्यध्वनीमध्ये असे आले की द्वारका बारा वर्षांने जळले तेव्हा अज्ञानींना असे वाटले की बारा वर्षांनी भगवान द्वारका जाळतील; परंतु भगवंतांना त्याच्याशी काही घेणे-देणे नव्हते, ते तर वीतराग होते. त्यांना कोणाशीही तिळमात्र राग-द्वेष नव्हता. म्हणून त्यांच्याकडून द्वारका–जाळण्याचा प्रश्नच निर्माण होत नव्हता. परंतु ते सर्वज्ञ होते. म्हणून भविष्यामध्ये कुठे काय होईल हे ते वर्तमानवत स्पष्ट पहात–जाणत होते, म्हणून त्यांनी त्याचवेळी बारा वर्षानंतरच्या जळत्या द्वारकेला स्पष्ट पाहिले होते त्यात बारावर्षांनी कशा ज्वाला भडकतील हे वर्तमानकाळी स्पष्ट दिसत होत्या त्यांच्या वाणीमध्ये तर सहजच हे उजागार झाले होते.

त्यांनी द्वारकेला जाळले नाही, परंतु अन्य कोणींही त्यास जाळले नाही, कारण त्यामध्ये स्वयं उपादानगत अशी योग्यता होती की ती स्वसमयामध्ये जळेल. तसेच त्याचे निमित्त कोण राहील, हे देखील त्या योग्यतेमध्ये सहभागी होते. त्यामध्ये पराचे काही कर्तृत्व नव्हते. कारण ज्या निमित्ताने ती पेटली ते स्वत:देखील हे इच्छित नव्हते की द्वारका जळावी. या उपादानगत योग्यतेकडे जगाचे लक्ष नसते. यामुळे जगाचे सहज परिणमन त्यांच्या लक्षात येत नाही.

भगवान आदिनाथांनी मारिचाबाबतीत एका कोडाकोडी सागर-पर्यंत केव्हा काय होईल सर्व काही सांगितले होते. आपणास त्याबद्दल काही शंका आहे? ते सर्व पहिल्यापासूनच निश्चित नव्हते? असंख्य भवापूर्वीच सांगितले होते की ते चोवीसावे तीर्थंकर होतील. तेव्हा

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तर त्यांच्या तीर्थंकर प्रकृतीचा बंधही झालेला नव्हता. कारण तीर्थंकर प्रकृतीचा बंध झाल्यानंतर असंख्य भव होत नाहीत. तीर्थंकर प्रकृती बांधणारा त्याच भवात किंवा तिसऱ्या भवामध्ये निश्चित मुक्त होतो. म्हणून हे देखील म्हणता येत नाही की कर्मबंध झाल्यानंतर त्यांचे भविष्य निश्चित झाले.

हे सर्व हेच सिद्ध करते की आदिनाथांच्या वेळीच निश्चित होते की ते चोवीसावे तीर्थंकर होतील, जेव्हा चोवीसावे तीर्थंकर होण्याचे निश्चित होते तर मग मधले भवसुद्धा निश्चतच होते. निश्चित होते म्हणूनच जाणता आले, आणि दाखवू शकले.

तिलोयपण्णति, अधिकार ४, श्लोक १००२ ते १०१६ पर्यंत अष्टांग निमित्त ज्ञानाने भविष्य जाणण्याचा स्पष्ट उल्लेख आहे. आचार्य भद्रबाहूंनी निमित्तज्ञानाच्या आधारावर उत्तर भारतामध्ये बारा वर्षांच्या दुष्काळाची घोषणा केली, जी पूर्णत: सत्य ठरली. सम्राट चंद्रगुप्ताच्या स्वप्नामध्ये आले होते, त्या आधारावरदेखील भविष्याची घोषणा केली होती.

तसेच करणानुयोगामध्येही लिहिलेले आहे की सहा महिने आठ समयामध्ये सहाशे आठ जीव निगोदातून निघतील आणि तेवढ्याच समयामध्ये तेवढेच जीव मोक्षालादेखील जातील. यापेक्षा अधिक जीव निगोदातून निघू शकतात काय ? किंवा मोक्षाला जाऊ शकतात काय ? हे निश्चित आहे किंवा नाही ? आहे तर मग यामुळे वस्तुची स्वतंत्रता खंडित होणार नाही काय ? येवढेच जीव मोक्षाला का जातील ? अधिक का नाही ?

करणानुयोगामध्ये चतुर्गतीच्या जीवांची निश्चित संख्या केव्हाच कमी अधिक होत नाही. जर सर्व काही निश्चित नाही तर मग जीवांच्या पाप-पुण्यानुसार नारकींची आणि देवांची संख्या न्युनाधित व्हावी.

करणानुयोगामध्ये हे देखील लिहीले आहे की, जीव नित्यनिगोदातून दोन हजार सागर वर्षांसाठी बाहेर निघतो. त्यामध्येदेखील दोन इंद्रियात येवढे, तीन इंद्रियात येवढे, चार इंद्रियात येवढे भव

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



धारण करतो, मनुष्याचे अठ्ठेचाळीस भव प्राप्त होतात. हे सर्व काय आहे ?

यामधून हा निष्कर्ष निघतो की चार गतींच्या जीवांची संख्या निश्चित आहे आणि प्रत्येक जीवाचे भवदेखील निश्चित आहेत. तसेच त्यांचा क्रमदेखील निश्चित आहे, नाहीतर सर्व व्यवस्था कशी बनेल? कुठे अधिक गर्दी होईल आणि कुठे स्थान रिकामे राहील. परंतु असे होत नाही.

यामुळे लोकांना असे वाटते की धर्म तर नाही परंतु पुण्य-पाप करणे देखील आमच्या हातात नाही काय ? आम्ही तर एकमद बांधले गेलो.

त्यावर आमचे म्हणणे असे आहे की शुभ आणि अशुभ भाव तर क्रमशः आपोआप बदलतातच. कारण दोन्हीपैकी कोणाचा ही काल अन्तमुहूर्तापेक्षा अधिक नाही, म्हणून प्रत्येक अन्तमुहूर्तामध्ये परिवर्तन आवश्यक आहे. अनंत प्रयत्न करूनही आपण अन्तमुहूर्ताहून अधिक शुभभावामध्ये थांबू शकत नाही जर शुद्धमध्ये गेलो नाही तर अशुभामध्ये येणे अनिवार्य आहे. हे परिवर्तन निगोदामध्येदेखील होत असते. तेथे देखील शुभभाव होतात; नाही तर तेथून जीव निघणारच कसे ? संज्ञी पंचेन्द्रिय होण्याचे पुण्य एकेन्द्रियापासून असंज्ञी पंचेन्द्रियापर्यंतचे जीव असंज्ञीदशेमध्येच बांधतात.

भरत चक्रवर्तीच्या त्या पुत्रांनी, जे निगोदातून निघून एकाधपर्यायाला विवक्षित करून सरळ चक्रवर्तीचे पुत्र होऊन त्याच भवामध्ये मोक्षाला गेले, मनुष्यभव आणि चक्रवर्तीच्या पोटी जन्म घेण्याचे व चरम शरीर प्राप्त करण्याचे पुण्य असंज्ञी अवस्थेमध्येच बांधले होते. परंतु हे सर्व सहज क्रमाने संपन्न झाले होते. संभव झाले होते; येथे बुद्धीपूर्वक काहीही प्रयत्न केलेला नव्हता.

म्हटलेच आहे :-

नित्य निगोद माँहि तैं कडिकर, नर परजाय पाय सुखदानी
समकित लहि अन्तर्मुहूर्त में, केवल पाय वरी शिव रानी ।।[1]

---

1 कविवर भागचंदजी कृत आध्यात्मिक पद.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तरीदेखील मी आपणाकडूनच जाणू इच्छितो की आपण कुठला पुण्यभाव करू इच्छिता : तीर्थंकर, चक्रवर्ती की इन्द्रपद प्राप्तीचे ? परंतु तीर्थंकर, चोवीसच असतात आणि ते देखील एका क्षेत्रामध्ये एका वेळी दोन नव्हे, मग दोन जीव एकाच वेळी तीर्थंकर होण्यायोग्य पुण्य बंध करू शकतात काय ? हे मी एका क्षेत्राच्या अपेक्षेने म्हणतो आहे. जर आपण म्हणाल की अडीच द्वीपामध्ये तर एकावेळी एकशे सत्तर तीर्थंकर होऊ शकतात. तरी-देखील काही हरकत नाही. कारण एकशे सत्तरच का ? दोनशे का नाही ? दोनशे जीव एकाच वेळी असे पुण्य का बांधू शकत नाहीत ?

"भरत क्षेत्रामध्ये जे आगामी तीर्थंकर होणार आहेत, त्यांच्या नावाची घोषणा जिनागमामध्ये झालेली आहे, तसेच त्यांची नावेदेखील घोषित झालेली आहेत, ते सर्व निश्चित होते म्हणूनच घोषित झालेले आहे. त्याशिवाय इतर कोणी एखादा जीव तीर्थंकर प्रकृती बांधू शकतो काय ? जर नाही, तर मग आम्हा सर्वांची एकोणीस कोडाकोडी सागरापर्यंत सुट्टी झाली. आणि आपण तर जाणताच की हा जीव निगोदातून निघून त्रसपर्यायामध्ये दोन हजार सागर वर्षच राहतो. जर यामध्ये मुक्त झाला नाहीतर त्याला निगोदामध्येच जावे लागते, परत अनंतकाळपर्यंत काही ठिकाणा नाही.

जर आपण म्हणाल "भरत क्षेत्रात नाही. ऐरावत किंवा विदेह क्षेत्राचे तीर्थंकर होऊ" परंतु भाऊसाहेब ! जर भरत क्षेत्राच्या तीर्थंकरांची घोषणा झालेली आहे. तर ऐरावत क्षेत्र व विदेह क्षेत्राच्या तीर्थंकरांची घोषणादेखील झालेली असणारच. येथील शास्त्रामध्ये इथला उल्लेख आहे, तेथील शास्त्रामध्ये तेथील असणार! भाऊ ! केवलींच्या ज्ञानामध्ये अनंतकाळपर्यंतच्या होणाऱ्या तीर्थंकरांची घोषणा झाली आहे, हलण्याडुलण्याला आता काही जागा नाही.

जर एखादा म्हणेल की,— "तीर्थंकर नाही तर नाही; चक्रवर्ती होऊ," परंतु चक्रवर्तींच्या जागा तर आणखी कमी आहेत. एका क्षेत्रामध्ये आणि जेवढ्या काळामध्ये तीर्थंकर चोवीस होतात,

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तेवढ्याच काळामध्ये चक्रवर्ती बाराच होतात, जर तीर्थंकरांचे निश्चित आहे तर चक्रवर्तींचेदेखील निश्चितच असणार. शास्त्रामध्ये तर यामुळे उल्लेख नसतो की कोणाकोणाचा उल्लेख करावा ? तीर्थंकरांचा उल्लेख करून सामान्यपणे हे दाखविले की सर्व काही निश्चित आहे. तेच जाणणे महत्वाचे आहे. हे जाणणे काही जरूरीचे नाही की कोणाचे काय होणार ? आणि सर्वांचे भविष्य सांगितले तरी पाठही कोणाकोणाचे राहील ? प्रत्येकाला दुसऱ्याचे भविष्य जाणण्याची रूची का ? सर्व आपापले भविष्य जाणू इच्छितात.

तीर्थंकर आणि चक्रवर्ती नाही तर नाही, पुण्य करून स्वर्गात तर जाऊ परंतु तेथे देखील सीट खाली असेल तर ना ? तेथे अकाल-मृत्यु होत नाही. जर कोणी देव किंवा इंद्र आता-आता स्वर्गामध्ये गेला असेल, तर मग जोपर्यंत त्याचे आयुष्य पूर्ण होत नाही तोपर्यंत त्या पदास योग्य पुण्य अन्य जीव बांधू शकत नाही, आणि त्याचे आयुष्यसुद्धा सागरो वर्ष असते. स्वर्गाचेच काय, खाली सीट झाल्याशिवाय नरकामध्येदेखील जागा मिळत नाही. आपले जेव्हा स्थान सुरक्षित (रिझर्व्हेशन असेल तेव्हाच सर्वत्र स्थान मिळेल.

जिनवाणीच्या उल्लेखाप्रमाणे आहे तर हे असेच. आपण जिन-वाणीलाच मानत नसाल तर गोष्ट दुसरी; परंतु तरीदेखील सुटका नाही. कारण मग तर आपणास फार काही मानणे सोडावे लागेल. मग आपण आदिनाथांनाही मानू शकणार नाही आणि महावीरांनाही नाही. चोवीस तीर्थंकर आणि बारा चक्रवर्ती मानणेदेखील शक्य होणार नाही. कारण हे सर्व आपण आगमामध्ये वाचूनच मानले आहे. जर आगमच सत्य राहीला नाही तर मग सर्व काही साफ झाले.

आपण आगमाच्या आधारावर काय मानले आहे, याबद्दल आपण काही कल्पना केली आहे ? जरा विचार करून बघा म्हणजे समजेल की स्वर्ग नरक सर्व गायब, जे काही डोळ्यासमोर आहे तेच राहू शकेल.

मला विश्वास आहे की येवढे पुढे जाण्यासाठी आपणही तयार नसणार जर माझ्या म्हणण्यामध्ये काही दम वाटत असेल तर मग एक वेळा गंभीरपणे विचार करावा.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



जेव्हा स्वत:ला प्रथमानुयोग किंवा करणानुयोगाचे विद्वान म्हणवून घेणारे देखील संपूर्ण पर्यायांच्या क्रमनियमित असण्याचा विरोध करतात तेव्हां आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. कारण प्रथमानुयोग आणि करणानुयोगमध्ये पावलो पावली त्याचे सबळ समर्थन केलेले आहे.

याचप्रमाणे चरणानुयोग आणि द्रव्यानुयोगाच्या शास्त्रामध्ये-देखील सर्वत्र याचाच प्रतिध्वनी उमटलेली दिसते. समयसार (आत्मख्याति) व कार्तिकेयानुप्रेक्षातील उद्धरणे यापूर्वी दिलेलीच आहेत. प्रवचनसार गाथा २०२ च्या तत्त्वप्रदीपिका टीकेमध्येदेखील पर्यायाच्या जन्मक्षणाचा आणि नाश क्षणाचा उल्लेख येतो. त्यातून-देखील याच विचाराची पुष्टी होते.

तसेच प्रवचनसाराच्याच ९९ व्या गाथेच्या टीकेमध्ये विस्तार-क्रमाप्रमाणेच प्रवाहक्रम (क्रमबद्ध पर्याय) हाराचा दृष्टांत देऊन स्पष्ट केला आहे, जो खालीलप्रमाणे आहे :–

"ज्याप्रमाणे द्रव्याची वास्तु समग्रपणाणे (अखंडतेने) एक असूनही, विस्तार क्रमामध्ये प्रवर्तनमान त्याचे सूक्ष्म अंश आहेत, ते प्रदेश आहेत. त्याचप्रमाणे द्रव्याची वृत्ती समग्रपणाने एक असूनही प्रवाहक्रमामध्ये प्रवर्तमान त्याचे जे सूक्ष्म अंश आहेत, ते परिणाम आहेत. ज्याप्रमाणे विस्तारक्रमाचे कारण प्रदेशाचा परस्पर व्यतिरेक आहे; त्याचप्रमाणे प्रवाहक्रमाचे कारण परिणामाचा परस्पर व्यतिरेक आहे.

ज्याप्रमाणे प्रदेश आपल्या स्थानामध्ये स्वरूपाने उत्पन्न आणि पररूपाने विनष्ट असल्यामुळे आणि सर्वच परस्पर अनुस्यूतीने रचित एक वास्तुपणाने अनुत्पन्न-अविनष्ट असल्यामुळे उत्पत्ती-संहार-ध्रौव्यात्मक आहे; त्याच प्रकारे ते परिणाम आपल्या समयामध्ये स्वरूपाने उत्पन्न आणि पररूपाने विनष्ट असल्यामुळे आणि सर्वत्र परस्पर अनुस्यूतीने रचित एक प्रवाहपणाने अनुत्पन्न अविनष्ट असल्या-मुळे उत्पत्ती-संहार-ध्रौव्यात्मक आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्याप्रमाणे वस्तुचा जो लहानात लहान अंश पूर्वप्रदेशाच्या विनाश स्वरूप आहे, तोच (अंश) त्याच्या नंतरच्या प्रदेशाच्या उत्पादनस्वरूप आहे, आणि तोच परस्पर अनुस्यूतीने रचित एक वास्तुपणाने अनुभवस्वरूप आहे (अर्थात् दोन्हीपैकी एकाही स्वरूपाचा नाही); याप्रमाणे प्रवाहाचा जो लहानात लहान अंश पूर्व परिणामाच्या विनाशस्वरूप आहे, तोच त्यानंतरच्या परिणामाच्या उत्पादस्वरूप आहे, आणि तोच परस्पर अनुस्यूतीने रचित एक प्रवाहपणाने अनुभव स्वरूप आहे.

याप्रमाणे स्वभावानेच त्रिलक्षण परिणाम पद्धतीमध्ये (परिणामाच्या परंपरेमध्ये) वर्तमान द्रव्य, स्वभावाचा अतिक्रम करीत नाही, म्हणून सत्त्वाला विलक्षणच अनुमोदले पाहिजे– मोत्याच्या हाराप्रमाणे.

ज्याप्रमाणे ज्याने (अमुक) लांबी ग्रहण केली आहे अशा लटकणाऱ्या मोत्यांच्या हारामध्ये आपापल्या स्थानांमध्ये प्रकाशित होणाऱ्या समस्त मोत्यांमध्ये मागच्या मागच्या स्थानातून मागचे मागचे मोती प्रगट होतात. आणि पहिले पहिले मोती प्रगट होत नाहीत म्हणून, तसेच सर्वत्र परस्पर अनुस्यूती रचणारे सूत्र अवस्थित असल्यामुळे त्रिलक्षणत्व प्रसिद्धीस प्राप्त होते (प्रगट होते.)

याप्रमाणे ज्याने नित्यवृत्ती ग्रहण केली आहे अशा रचित (परिणमित) द्रव्यामध्ये, आपापल्या समयामध्ये प्रकाशित (प्रकट) होत परिणामामध्ये, मागच्या–मागच्या समयातून मागचे मागचे परिणाम प्रगट होतात, आणि पहिले–पहिले परिणाम प्रगट होत नाहीत म्हणून, तसेच सर्वत्र परस्पर अनुस्यूती रचणारे प्रवाह अवस्थित असल्यामुळे त्रिलक्षण प्रसिद्धीस प्राप्त होते.

भावार्थ–ज्याप्रमाणे द्रव्याच्या विस्ताराचा लहानात लहान अंश प्रदेश आहे; त्याप्रमाणे द्रव्याच्या प्रवाहाचा लहानात लहान अंश परिणाम आहे. प्रत्येक परिणाम स्व कालामध्ये आपल्या रूपाने उत्पन्न होतो, पूर्ण रूपाने नष्ट होतो, आणि सर्व परिणामांमध्ये एकप्रवाहपणा असल्यामुळे प्रत्येक परिणाम उत्पाद विनाशाने रहित

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



एकरूप ध्रुव राहतो; आणि उत्पाद-व्ययध्रौव्यामध्ये समय भेद नाही, तिन्हीही एकाच समयामध्ये आहेत. अशा उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक परिणामाच्या परंपरेमध्ये द्रव्य स्वभावानेच सदा राहते. म्हणून द्रव्य स्वतःच मोत्यांच्या हाराप्रमाणे उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक आहे."

वरीलप्रकरणामध्ये व सर्वत्र परस्पर "अनुस्यूती रचित एक प्रवाह" हे वाक्य अनेक वेळा आले आहे, हे लक्ष देण्यासारखे आहे. आणि मोत्यांच्या हाराच्या उदाहरणाने हे स्पष्ट झाले आहे की, ज्याप्रमाणे हारांमध्ये मोत्यांचे क्षेत्र आपल्या क्रमामध्ये नियमित आहे; त्याचप्रमाणे फिरणाऱ्या हारामध्ये त्यांच्या प्रकटण्याचा कालदेखील नियमित आहे, त्याचप्रमाणे जसे प्रत्येक द्रव्यामध्ये जसे त्याचे प्रदेश (क्षेत्र नियमित (निश्चित) आहेत, त्याचप्रमाणे त्याचा काल प्रवाह देखील नियमित अर्थात् निश्चित आहे.

येथे क्षेत्राच्या नियमितक्रमाच्या माध्यमाने काळ (पर्याय) संबंधी नियमितक्रम स्पष्ट केलेला आहे कारण क्षेत्रासंबंधी क्रमनियमितता सहज समजू शकते.

ज्याप्रमाणे द्रव्याला संपूर्ण विस्तार क्षेत्ररूपाने लक्ष्य केले तर त्यांचे संपूर्ण क्षेत्र एकच आहे; त्याचप्रमाणे द्रव्यालातीन काळाच्या परिणामांना एकदम लक्ष केले तर त्याचा काळ त्रैकालिक एक आहे तरीदेखील, ज्याप्रमाणे क्षेत्रामध्ये एक नियमित प्रदेश क्रम आहे; त्याचप्रमाणे कालामध्ये (पर्यायामध्ये) देखील पर्यायींचा एक नियमित प्रवाह क्रम आहे.

ज्याप्रमाणे द्रव्याच्या विस्तारक्रमाचा अंश प्रदेश आहे; त्याचप्रमाणे द्रव्याच्या प्रवाहक्रमांचा अंश पर्याय आहे.

जरी हे कथन संपूर्ण द्रव्यांच्या अपेक्षेने आहे तरी येथे विस्तार क्रमाला जर आकाश द्रव्याच्या अपेक्षेने समजून घेतले तर सुविधा राहील. ज्याप्रमाणे अनंत प्रदेशी आकाशाचा जो प्रदेश जेथे स्थित आहे, तो तेथेच राहतो, त्याचे स्थान परिवर्तन संभव नाही; त्याचप्रमाणे सर्वच द्रव्यामध्ये प्रदेशांचा क्रम नियमित आहे, हे येथे मोत्यांच्या हारांचा दृष्टांत देऊन स्पष्ट केले आहे की, मोत्यांच्या हारामध्ये जो मोती जेथे स्थित आहे, त्याचे स्थानक्रम परिवर्तन संभव नाही.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



जरी आकाश अचल (निष्क्रय) द्रव्य आहे आणि जीव आणि पुद्गल सचल (सक्रीय) द्रव्य आहे, तरीदेखील हलणाऱ्या हाराचा दृष्टांत देऊन हे स्पष्ट केले आहे की, ज्याप्रमाणे हलणाऱ्या हारामध्येदेखील मोत्यांचा स्थानक्रम बदलत नाही; त्याचप्रमाणे सक्रिय जीवांमध्ये प्रदेशाचा क्रम बदलत नाही.

ज्याप्रमाणे आकाशादी द्रव्यांचा विस्तारक्रम नियमित आहे; त्याचप्रमाणे त्याचा प्रवाहक्रमदेखील नियमित आहे. ज्याप्रमाणे नियमित विस्तार क्रमामध्ये फेरबदल संभव नाही; त्याचप्रमाणे नियमित प्रवाह क्रमांकामध्ये फेरबदल संभव नाही. ज्याप्रमाणे प्रत्येक प्रदेशाचे स्वस्थान निश्चित आहे; त्याचप्रमाणे प्रत्येक परिणामाचा (पर्यायाचा) स्वकालदेखील निश्चित आहे.

ज्याप्रमाणे सिनेमाच्या रीळमध्ये लांबी आहे, त्या लांबीमध्ये जेथे जे चित्र स्थित आहे, ते तेथेच राहते, त्याचे स्थान परिवर्तन संभव नाही; त्याप्रमाणे चालत्या रीळमध्ये कोणते चित्र कोणत्या क्रमाने येईल हे देखील निश्चित आहे, त्यामध्येदेखील फेरबदल संभव नाही. पुढे कोणते चित्र येईल ह्याचे आम्हाला जरी ज्ञान नाही, परंतु त्यामुळे काही फरक पडत नाही. येईल ते आपल्या नियमित क्रमानेच.

ज्याप्रमाणे सोपान (जीन्या) वरील पायऱ्यांचा क्षेत्राच्या अपेक्षेने एक अपरिवर्तनीय निश्चित क्रम असतो. त्याचप्रमाणे त्यावर चढण्याचा अपरिवर्तनीय कालक्रम देखील असतो. ज्याप्रमाणे त्यावर क्रमानेच जाता येते, त्याप्रमाणे त्यावर चढण्याचा कालक्रमदेखील आहे.

ज्याप्रमाणे जेवढे लोकाकाशाचे प्रदेश आहेत, तेवढेच एका जीवाचे देखील प्रदेश आहेत; त्याचप्रमाणे तीन काळाचे जेवढे समय आहेत, तेवढ्याच प्रत्येक द्रव्याच्या पर्यायी आहेत. एका एका समयाची एक-एक पर्याय निश्चित आहे. ज्याप्रमाणे लोकाकाशाच्या एका-एका प्रदेशावर एक-एक कालाणु खचित (निश्चित) आहे; त्याचप्रमाणे तीन काळाच्या एका समयामध्ये प्रत्येक पर्याय खचित

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



(निश्चित) आहे; गुणांच्या अपेक्षेने विचार केल्यास तीन्ही काळाच्या एका-एका समयामध्ये प्रत्येक गुणांची एक-एक पर्यायदेखील खचीत आहे. याप्रमाणे जेव्हा प्रत्येक पर्याय स्वसमयामध्ये खचीत आहे निश्चित आहे, तर मग त्यामध्ये अदला-बदलीचे काय काम बाकी राहते? या संदर्भामध्ये टीकेमध्ये समागत हे वाक्यदेखील लक्षात घेण्यायोग्य आहे की, "प्रत्येक परिणाम आपापल्याच समयीच प्रगट होतो."

या सर्वातून हाच निष्कर्ष निघतो की, ज्या द्रव्याचा, जी पर्याय ज्या समयी, ज्या कारणाने होणार आहे, ती त्यानुसार होते.

प्रसिद्ध तार्किक आचार्य समंतभद्र स्वयंभूस्तोत्रामध्ये लिहीतात–

अलंघ्यशक्तिर्भवितव्यतेयं, हेतुद्वयाविष्कृत कार्यलिङ् ।
अनीश्वरो जन्तुरहं क्रियार्त्तः संहत्य कार्येष्विति साध्ववादी ।।३३।।

येथे भगवंतांना संबोधित करताना आचार्य समंतभद्र म्हणतात की, हे जिनदेव! आपण हे योग्यच म्हटले आहे की, हेतूद्वयाने उत्पन्न होणारे कार्यदेखील ज्याचे ज्ञापक आहे अशी जी भवितव्यता ती शक्ती अलंघ्य आहे अर्थात त्याच्या शक्तीचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही; ज होणार असते, ते होतेच. तरीदेखील हा निरीह संसारी प्राणी 'मी या कार्याला करू शकतो'– अशा अहंकाराने पीडित राहतो. परंतु जेथे भवितव्यतेविना अनेक सहकारी कारणांना मिळवूनदेखील कार्य संपन्न करण्यामध्ये समर्थ होत नाही

मुनिराज पद्मनन्दी लिहीतात–

"लोकाश्चेतसि चिन्तयन्त्यनुदिनं कल्याणमेवात्मनः
कुर्यात्सा भवितव्यतागतवती तत्तत्र यद्रोचते ।
मोहोल्लासवशादतिप्रसरतो हित्वा विकल्पान् बहून्.
रागद्वेषविषोज्झितैरिति सदा सद्भिः सुखं स्थीयताम् ।।५३।।[1]

मनुष्य मनामध्ये दररोज आपल्या कल्याणाचाच विचार करतो, परंतु येणारी भवितव्यता तेच करते, जे तिला रूचते म्हणून सज्जन

---

1 पद्मनंदीपंचविंशतिका, अ ३, श्लोक ५३

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पुरुषाने राग-द्वेषरूपी विषाने रहित होऊन मोहप्रभावामुळे निर्माण होणाऱ्या अनेक विकल्पाच्या विस्ताराला सोडून नेहमी सुखपूर्वकस्थित राहावे.

पंडित प्रवर आशाधरजी आध्यात्म रहस्यामध्ये लिहीतात–

"भवितव्यतां भगवतीमधियन्तु रहन्त्वहं करोमीति।
यदि सद्गुरुपदेशव्यवसित-जिनशासनरहस्या ॥६६॥

जर सद्गुरूंच्या उपदेशामुळेजिनशासनाचे रहस्य तू यथा-योग्य निश्चित केले असे समजू घेतले असेल– तर 'मी करतो' ही अहंकार पूर्ण कर्तृत्वाची भावना सोड आणि भगवती भवितव्यतेचा आश्रय ग्रहण कर."

वरील छंदामध्ये भवितव्यतेला भगवती म्हटलेले आहे. या छंदाची व्याख्या करताना पंडित श्री युगल किशोरजी लिहितात–

"भगवान सर्वज्ञांच्या ज्ञानामध्ये जे कार्य, ज्या समयी, जेथे, ज्याद्वारे ज्याप्रकारे होण्याचे झळकले आहे; ते, त्यासमयी, तेथेच, त्याचद्वारे आणि त्याचप्रकारे संपन्न होईल या भविष्यविषयक कथनाने भवितव्यावरील आशयामध्ये काही अंतर पडत नाही. कारण सर्वज्ञांच्या ज्ञानामध्ये त्या कार्यासह त्यांचा कारणकलापसुद्धा झळकलेला आहे. सर्वथा नियतिवाद अथवा निर्हेतुकी भवितव्यता जी असंभाव्य आहे, या कथनाचा विषय नाही. याशिवाय असेही आहे की, सर्वज्ञांच्या ज्ञानानुसार पदार्थांचे परिणमन होत नाही, परंतु पदार्थांच्या परिणमनानुसार सर्वज्ञांच्या ज्ञानामध्ये परिणमन अथवा झळकणे होते. ज्ञान ज्ञेयाकार आहे, ज्ञेय ज्ञानाकार नाही."[1]

आचार्यकल्प पंडित टोडरमलजींनी आपल्या मोक्षमार्ग प्रकाशकमध्ये अनेक ठिकाणी ह्याची चर्चा केली आहे. ते कथन खालील प्रकारचे आहे–

---

1 अध्यात्म- रहस्य, पृष्ठ ८१

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



"याप्रमाणे क्रोधाने वाईट व्हावे अशी इच्छा तर आहे, (पण) वाईट होणे भवितव्याच्या आधीन आहे . . . . . याप्रमाणे मानामुळे आपल्या मोठेपणाची इच्छा तर आहे, (पण) मोठेपणा मिळणे भवितव्याच्या आधीन आहे . . . . . याप्रमाणे मायेने इष्ट सिद्धीसाठी छल तर करील, परंतु इष्ट सिद्धी होणे भवितव्याच्या आधीन आहे . . . . . याप्रमाणे लोभामुळे इष्टप्राप्तीची इच्छा तर आहे. परंतु इष्टप्राप्ती होणे भवितव्याच्या आधीन आहे."[1]

कषायापाहुड आणि धवलामध्ये देखील म्हटले आहे–

प्रश्न :– या (सहासष्ठ) दिवसामध्ये दिव्यध्वनीची प्रवृत्ती का झाली नाही ?

उत्तर :– गणधाराचा अभाव असल्यामुळे.

प्रश्न :– सौधर्म इन्द्राने त्याच समयी गणधराला का उपस्थित केले नाही ?

उत्तर :– केले नाही, कारण काललब्धी शिवाय असहाय सौधर्म इंद्रांना, त्यांना उपस्थित करण्याच्या शक्तीचा त्यासमयी अभाव होता.[2]

कार्तिकेयानुप्रेक्षेच्या उल्लेखित उद्धरणामुळे अत्यंत स्पष्ट शब्दामध्ये म्हटले आहे की, ज्याचे परिणामन ज्या द्रव्य–क्षेत्र–काल–भावाच्या अनुसार होणे जिनेंद्रदेवांनी पाहिले आहे, त्यास इन्द्र तर काय स्वयं जिनेंद्रदेखील टाळू शकत नाहीत.

यावर अनेक लोक म्हणतात की, हे संपूर्ण बरोबर आहे. की जिनेंद्रदेव टाळू शकत नाहीत, कारण जैन मान्यतेनुसार जिनेंद्र भगवान जगाचे केवळ ज्ञाता-दृष्टा अहेत, कर्त्ता-धर्त्ता नाहीत; परंतु भगवान जरी टाळू शकले नाही तरी आम्हीही टाळू शकणार नाही काय ? जर आम्ही टाळू शकलो नाही तर मग आम्ही भगवंतांच्या–

---

मोक्षमार्ग प्रकाशक, पृष्ठ ३९

1 जैनेन्द्र सिद्धांत कोष, भाग २, पृष्ठ ६१४

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्ञानाच्या आधीन होऊ जसे त्यांनी जाणले, आम्हाला तसेच करावे लागेल; अथवा आमचे परिणमन तसेच होईल, जसे भगवंतांनी जाणले आहे.

त्यांचे हे म्हणणे बरोबर नाही, कारण वस्तुचे परिणमन भगवंतांच्या ज्ञानाच्या आधीन नाही. ज्या रूपामध्ये वस्तु स्वयं परिणमित झाली होती, होत आहे आणि होईल, भगवंतांनी तर त्यास त्या रूपामध्ये केवल जाणले आहे. ज्ञान केवळ पराला जाणते, परिणमित करीत नाही.

ज्याप्रमाणे ज्ञानाच्या आधीन वस्तु नाही, त्याचप्रमाणे वस्तुच्या आधीन ज्ञानसुद्धा नाही. दोन्हींचे स्वतंत्र परिणमन आपापल्या कारणाने होते.

माझ्या लक्षात हे येत नाही की, ज्ञानाने केवळ जाणल्याने वस्तुची स्वतंत्रता कशी खंडित होते. स्वतंत्रता ज्ञानाने खंडित होत नाही, अज्ञानाने खंडित होते, ज्ञान वस्तुच्या परिणमनामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप केल्याशिवाय केवळ त्यास जाणते.

दुसरे हे म्हणणे किती हास्यास्पद आहे की जे भगवंतांनी जाणले आहे त्यामध्ये ते स्वत: जरी परिवर्तन करू शकले नाही तरी मी तर करू शकतो ना ? हा भगवंताहूनही मोठा झाला. जे कार्य अनंतवीर्य प्रगट झालेल्या भगवंतांनादेखील करणे शक्य नाही, ते कार्य हा अल्पवीर्य प्रगट असलेला करू इच्छितो.

जर कोणी असे म्हणेल की, भगवान वीतरागी आणि सर्वज्ञ आहेत; वीतरागी असल्यामुळे त्यांना काहीही करण्याची आकांक्षा नाही आणि सर्वज्ञ असल्यामुळे जे जसे व्हायचे आहे तसे से सर्व जाणतात; म्हणून त्यांना काही फेरबदल करण्याचा विकल्प येत नाही. परंतु आम्ही तर रागीद्वेषी आणि अल्पज्ञ आहोत; त्यामुळे आम्ही भविष्य तर जाणत नाही, आणि आम्हाला काही करून दाखविण्याची इच्छा देखील आहे. म्हणून आमची तुलना वीतरागीसर्वज्ञ भगवंतांशी कशाला करता ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



त्यांना म्हणतात की येथे आचार्यदेवांनी 'भगवान पराचे कर्ते नाहीत' केवळ येवढेच म्हटले नाही. परंतु 'इन्दोवा' शब्दाद्वारे इन्द्र-देखील करू शकत नाहीत अर्थात कोणीही करू शकत नाही, असे म्हटलेले आहे.

जिनेन्द्र करू शकत नाहीत अर्थात सर्वज्ञ आणि वीतरागी करू शकत नाहीत आणि इन्द्र करू शकत नाहीत अर्थात रागी आणि अल्पज्ञ करू शकत नाहीत, जिनेन्द्रांच्यासमोर इन्द्र शब्दाचा प्रयोग करून 'आचार्य सर्व अल्पज्ञ आणि रागींचा उल्लेख करतात. कारण रागी आणि अल्पज्ञांमध्ये इन्द्रही सर्वशक्तीशाली आहे, वरील शंकेच्या समाधानासाठीच इन्द्र शब्दाचा उपयोग केला आहे. परंतु या अज्ञानी जगाला भगवंतांची नव्हे, आपली चिंता आहे. म्हणून तो म्हणतो की, भगवान करू शकले नाही तरी मी तर करू शकतो ना ?

क्रमबद्ध पर्याय पोषक वरील वचनाचा उद्देशच परकर्तृत्वाचा निषेध आहे. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्त्ता-हर्त्ता नाही. ही मान्यताच जैन दर्शनाचा मूलाधार (कणा) आहे.

प्रत्येक द्रव्य आपल्या पर्यायाचा कर्त्ता स्वयं आहे. परिणमन त्याचा धर्म आहे आपल्या परिणमनामध्ये त्यास परद्रव्याची किंचित-मात्रही अपेक्षा नाही. नित्यतेप्रमाणे परिणमनदेखील त्याचा सहज स्वभाव आहे, अथवा पर्यायाचा कर्त्ता स्वयं पर्याय आहे, त्यामध्ये तुला काहीही करणे नाही, अर्थात काहीही करण्याची चिंता करायची नाही. अजीव द्रव्य परामध्ये तर काही करीतच नाहीत. आपल्या पर्यायाला करण्याचीदेखील चिंता करीत नाहीत. म्हणून काय त्याचे परिणमन अवरूद्ध झाले ? नाही; तर मग जीवानेदेखील परिणामाच्या चिंते-मध्ये व्यर्थच का आकुल-व्याकुल व्हावे ?

प्रत्येक द्रव्य आपल्या पर्यायाच्या कर्तृत्वामध्ये अथवा ती पर्यायच आपल्या परिणमनामध्ये पूर्ण समर्थ आहे. हे आत्मन् ! तुला त्यामध्ये काहीही करायचे नाही, तू व्यर्थच त्याच्या चिंतेमध्ये आपला भव बिघडवीत आहेस. ज्या द्रव्य किंवा पर्यायाची चिंता तू आपल्या डोक्य वर घेऊन फिरतो आहेस, मिरवतो आहेस, त्यास तुझी किंवा

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तुझ्या सहयोगाची काडीमात्रही आवश्यकता नाही, **बलवान बैल ओढत असलेल्या गाडीखाली चालून 'मीच गाडी ओढीत आहे' या अभिमानाने ग्रस्त कुत्र्याप्रमाणे तू आकुल-व्याकूल होत आहेस.**

वस्तुस्वरूप तुला विश्वास देतो की, जगापासून निश्चिंत रहा, परंतु परकर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त जीव म्हणतो की, मुलगा दुकान सांभाळील तेव्हा मी निश्चिंत होऊ शकतो. जोपर्यंत जे काम मी करतो तो कोणी दुसरा करण्यास योग्य होत नाही, तोपर्यंत मी कसा निश्चिंत होऊ शकतो ? परंतु मी म्हणतो की 'क्रमबद्ध पर्यायाला' सोडून आजपर्यंत असा कोणताही मुलगा जन्मलेला नाही की जो कर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त बापाला पूर्ण निश्चिंत करू शकेल. क्रमबद्ध पर्यायच एक असा आहे की, त्याचे ज्ञान करून, त्यावर श्रद्धा करील तर तो निश्चिंत होऊ शकतो.

कर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त व्यक्तीची समस्याच ही आहे की कोणी त्याचे काम सांभाळील तर तो निश्चिंत होईल. हे त्याच्या लक्षातच येत नाही की तो पराचे किंवा पर्यायाचे काही करीतच नाही, अज्ञानामुळे केवळ त्याची चिंता करतो, आणि चिंतेचा कर्त्ता देखील तो पर्यंतच आहे जोपर्यंत अज्ञान आहे.

जैनदर्शनाला अकर्त्तावादी दर्शन म्हणतात. अकर्त्तावादाचा अर्थ केवळ एवढाच नाही की या जगाचा कर्त्ता कोणी ईश्वर नाही, परंतु हे देखील आहे की कोणतेही द्रव्य इतर कोणत्याही द्रव्याच्या परिणमनाचा कर्त्ता-हर्त्ता नाही. ज्ञानी आत्मा तर आपल्या विकारांचा देखील कर्त्ता नसतो. हे विवेचन समयसारच्या कर्त्ताकर्म अधिकार आणि सर्व विशुद्ध ज्ञान अधिकारामध्ये विस्ताराने स्पष्ट केले आहे.

सर्व विशुद्ध ज्ञान अधिकाराच्या ज्या गाथेच्या टीकेमध्ये क्रमनियमित पर्यायाचा उल्लेख आलेला आहे, त्यामध्ये अन्ततः अकर्तृत्व सिद्ध केले आहे. जे खालील ओळीतून स्पष्ट झाले आहे.

"एवं हि जीवस्य स्व परिणामैरूत्पद्यमानस्याप्यजीवेन सह कार्यकारणभावो न सिध्यति, सर्वद्रव्याणां द्रव्यांतरेण सहोत्पाद्योत्पादक भावाभावात, तदसिद्धौ चाजीवस्य जीवकर्मत्वं न सिध्यति, तदसिद्धौ च

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



कर्तृकर्मणोरनन्यापेक्षसिद्धत्वात् जीवस्याजीवकर्तृत्वं न सिध्यति. अतो जीवोऽकर्त्ता अवतिष्ठते ।

याप्रमाणे जीव आपल्या परिणामाने उत्पन्न होतो तरी देखील त्याचा अजीवाशी कार्यकारणभाव सिद्ध होत नाही, कारण सर्व द्रव्याचा अन्यद्रव्याशी उत्पाद्य–उत्पादक भावाचा अभाव आहे; त्याचे (कार्यकारणभावाच्या) सिद्ध न होण्यामुळे अजीवाचे जीवाशी कर्मत्व शिद्ध होत नाही; आणि त्याचे (अजीवाचे जीवाशी कर्मत्वाच्या) सिद्ध न होण्यामुळे, कर्त्ता-कर्माची अन्यनिरपेक्षतया (अन्यद्रव्याहून निरपेक्षतयया स्वद्रव्यामध्येच) सिद्धी झाल्याने जीवाचे अजीवाशी कर्तृत्व सिद्ध होत नाही. म्हणून जीव अकर्त्ता सिद्ध होतो.

भावार्थ– सर्वद्रव्यांचे परिणाम भिन्न भिन्न आहेत. सर्वद्रव्य आपापल्या परिणामाचे कर्त्ता आहेत, ते त्या परिणामाचे कर्त्ता आहेत, आणि ते परिणाम त्याचे कर्म आहेत. निश्चयाने कोणाचा कोणाशी कर्त्ता-कर्म संबंध नाही त्यामुळे जीव आपल्याच परिणामाचा कर्त्ता आहे, आणि त्याचे परिणाम कर्म आहेत. याप्रमाणे अजीव आपल्या परिणामांचाच कर्त्ता आहे, आणि त्याचे परिणाम कर्म आहेत. याप्रमाणे जीव दुसऱ्याच्या परिणामांचा अकर्त्ता आहे."[1]

यावरून मी पराच्या परिणमनाचा कर्त्ता नसलो तर नसलो, पण आपल्या परिणमनाचा कर्त्ता-हर्त्ता तर आहे ना ? की अवश्य आहेस, कारण प्रत्येक द्रव्य आपल्या परिणतीचा कर्त्ता-भोक्ता आहेच, परंतु ह्याचा हा आशय नाही की सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये आपले जे भावी परिणमन झळकलेले आहे त्यात आपण फेरफार करू शकतो.

जर फेरफार करू शकत नाही तर मग मी आपल्या परिणमताचा कर्त्ता कसा काय राहिलो– अशी शंका देखील जगात केली जाते. कारण ज्याने फेरफार करण्यालाच करणे मानले आहे, तो ह्यापेक्षा अधिक काय विचार करू शकतो ? फेरफार करण्यावाचून इतर

---

[1] समयसार गाथा ३०८ ते ३११ टीका व भावार्थ

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



काही करणे असू शकत नाही काय ? जसे व्हायचे नाही, तसे करणेच करणे आहे काय? जसे होणार असेल तसे करणे हे करणे नाही काय ?

स्वकर्तृत्व म्हणा, सहजकर्तृत्व म्हणा–अकर्तृत्व म्हणा सर्वांचा एकच अर्थ आहे. जैनदर्शन अकर्तावादी दर्शन आहे. याचा भावच असा आहे की सहज कर्तावादी किंवा स्वकर्ता वादी आहे. परकर्ता-वादी किंवा फेर–फार कर्तावादी नाही. सहज होणे आणि करणे एकच गोष्ट आहे. भविष्यामध्ये आमचे जे होणार आहे, तेच होईल अर्थात आम्ही पुरुषार्थ पूर्वक तेच करू यामध्ये पुरुषार्थांची कुठेही उपेक्षा नाही कुठे नाही, पराधीनता नाही सर्वत्र स्वाधीनतेचे साम्राज्य आहे. स्वभाव आहे. यामध्ये पुरुषार्थ आहे काललब्धी आहे. आणि निमित्त देखील आहे पाचही समवाय उपस्थित आहेत.

**प्रश्न** :– पर्यायी क्रमबद्ध आहेत, आत्म्याच्या पर्यायी देखील ज्या होण्यायोग्य त्याच होतात, म्हणून आत्मा त्यांचा अकर्ता आहे–हे बरोबर आहे काय ?

**उत्तर** :– नाही, आत्मा आपल्या पर्यायाचा अकर्ता आहे–हे बरोबर नाही, आत्मा आपल्या ज्या ज्या क्रमबद्ध पर्याय रूपाने परिणमित होतो. त्याचा कर्ता तो स्वतःच आहे. परंतु येथे येवढे विशेष समजण्यायोग्य आहे की 'आत्माचा ज्ञायक स्वभाव आहे' अशी ज्यांची दृष्टी झाली आहे. अथवा क्रमबद्ध पर्यायाचा निर्णय झाला आहे. तो जीव मिथ्यात्वादी भावरूपाने परिणमित होतच नाही म्हणून मिथ्यात्ववादी भावांचा तो अकर्ताच आहे तसेच जो अल्परागादी विकार असतो, त्यामध्ये देखील तो एकत्वरूपाने परिण-मित होत नाही; त्या अपेक्षेने तो रागादीचा देखील अकर्ता आहे; परंतु आपल्या सम्यग्दर्शनादी निर्मल क्रमबद्ध परिणामाचा तो कर्ता आहे.

क्रमबद्ध परिणामाचा असा अर्थ नव्हे की आत्मा स्वयं कर्ता झाल्याशिवायच तो परिणाम होतो. ज्ञानी आपल्या निर्मल ज्ञान भावाला करीत स्वयं त्याचा कर्ता होतो आणि अज्ञानी आपल्या अज्ञान भावाला करीत त्याचा कर्ता होतो.[1]

---

1 आत्मधर्म (हिंदी), मार्च १९८०

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



याप्रमाणे प्रत्येक द्रव्य स्वयंच आपल्या 'क्रमबद्ध परिणामाचा' कर्त्ता आहे. या विषयाचा वस्तुस्वरूपाच्या दृष्टीने विचार केल्यास हाच निष्कर्ष निघेल. कारण नित्यतें प्रमाणे परिणमन देखील प्रत्येक द्रव्याचा स्वभाव आहे. ज्या वस्तुचा जो स्वभाव आहे, त्याच्या होण्यामध्ये पराच्या संयोगाची काय आवश्यकता आहे ? जर द्रव्यास आपल्या परिणमनामध्ये पराची अपेक्षा राहिल्यास तो त्याचा स्वभावच कसा राहील ? द्रव्य शब्दच द्रवण शीलतेचा परिणमनशीलतेचा द्योतक आहे. जो स्वयं द्रवे-परिणमे त्यालाच द्रव्य म्हणतात.

प्रत्येक द्रव्यामध्ये एक द्रव्यत्व नावाचा सामान्यगुण आहे. शक्ती आहे. त्याकारणानेंच द्रव्य परिणमनशील आहे. परिणमनशीलता द्रव्याचा सामान्य धर्म आहे, सहज धर्म आहे, स्वभाविक धर्म आहे, परनिरपेक्ष धर्म आहे.

जर प्रत्येक द्रव्य स्वयं आपल्यामुळे परिणमत आहे (द्रवत आहे,) आपल्या नियमित प्रवाहामध्ये वाहत आहे, सहज क्रमबद्ध परिणमत आहे; तेव्हा तो आपल्या क्रमाला भंग करील हयाची काय आवश्यकता आहे ; वस्तूच्या स्वरूपामध्ये असे कुठले व्यवधान आहे की तो आपली चाल बदलेल ? आणि का बदलेल ? त्याला काय गरज आहे आपली चाल बदलण्याची ?

बदलेल ही कशी ? कारण प्रत्येक द्रव्याची प्रत्येक पर्याय स्वसमयी होतच आहे. याप्रमाणे वर स्पष्ट केलें आहे की जेवढे तीन काळाचे समय आहेत. तेंवढयाच प्रत्येक द्रव्याच्या पर्यायी आहेत. आणि एक एक पर्याय एका एका समयामध्ये खचित आहे. जर एका पर्यायाला आपल्या स्थानावरून (समयावरून) हटविले तर स्थान (समय) रिकामे राहील. त्या स्थानाच्या (समयाच्या) पूर्तीसाठी दुसरी पर्याय कुठून येईल ? ज्या इष्ट पर्यायाला आपण आणू इच्छिता, जर त्या पर्यायीस त्याच्या स्थानावरून (समयावरुन) हटवून येथे आणाल तरमग येथील पर्याय तेथे घेऊन जाल काय ? ते तर संभव नाही.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



शेवटी वस्तुस्वरूपाची सहज स्वीकृती का नाही, बळजबरीच्या परिवर्तनाचा हट्ट का ? धर्म तर वस्तुस्वरूपाची सहज स्वीकृतीला म्हणतात, स्वरूपाच्या सहज परिणतीची स्वीकृतीच धर्माचा आरंभ आहे. अशा व्यक्तीची दृष्टी सहज अन्तरोन्मुखी होते. क्रमबद्ध परिणमनाची सहज स्वीकृती करणाऱ्या जीवाच्या क्रमबद्धमध्ये देखील सहज स्वभाव-सन्मुख परिणमन असते. वस्तुस्वरूपामध्ये असा सुव्यवस्थित सुमेळ आहे.

द्रव्य आणि गुणासमान पर्याय देखील सत् आहे. प्रवचनसार गाथा १०७ मध्ये याचा स्पष्ट उल्लेख आहे. द्रव्य आणि गुण जर त्रिकाली सत् आहेत. तर पर्याय समय अर्थात एक समयाची सत् आहे. ज्याप्रमाणे द्रव्य आणि गुणाच्या सत्तेला आव्हान दिले जाऊ शकत नाही; त्याचप्रमाणे देखील पर्यायाच्या स्वसमयाच्या सत्तेला आव्हान दिले जाऊ शकत नाही.

परंतु द्रव्य आणि गुणाबद्दल माहिती नसलेल्या अज्ञानीची दृष्टी पर्यायावर असते, आणि तो पर्यायाच्या फर बदलाच्या विकल्पामध्येच फसलेला राहतो. याच गोंधळामुळे त्याची दृष्टी स्वद्रव्यावर जाऊ शकत नाही, तो द्रव्यदृष्टी अर्थात सम्यग्दृष्टी बनत नाही.

आगमामध्ये प्रवचनसार गाथा ९३ मध्ये **'पज्जयमूढा हि परसमया'** तथा गाथा ९४ मध्ये' **जो पज्जएसु णिरदा जीवा परसमइगत्ति णिदिट्ठा'** असे म्हणून पर्यायदृष्टीवंताला मिथ्यादृष्टी आणि द्रव्यदृष्टीवंताला सम्यग्दृष्टी म्हटलेले आहे.

द्रव्यदृष्टी प्राप्त करण्यासाठी पर्यायाच्या क्रमबद्धतेची प्रतीती आवश्यक आहे. पर्यायदेखील स्वकालमध्ये सत् आहे, त्यामध्ये देखील कुठल्याही प्रकारचे फेरबदल संभवत नाहीत – अशी प्रतीती होताच पर्यायाकडील निश्चिन्त दृष्टी स्वभावाकडे ढळते.

क्रमबद्धपर्यायाच्या प्रतीतीविना दृष्टी स्वभावसन्मुख होणे शक्य नाही. कारण पर्यायामध्ये आपल्या इच्छेच्या अनुकूल फेरबदल करण्याचे ओझे त्यावर लादलेलेच असते. फेरबदल करण्याच्या

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ओझ्याच्या दडपणाखालील दृष्टीमध्ये हे सामर्थ्य नाही की तो स्वभावाकडे दृष्टी करू शकेल. दृष्टी संपूर्ण निर्भार (ओझ्याने रहित) झाल्याशिवाय अन्तर–प्रवेश संभव नाही.

म्हटलेच आहे :–

जिनके माथे भार, वे डूबे मझधार में !
हम तो उतरे पार, झोंक भार को भार में ।।

भार घेऊन वर चढणे कठीणच नव्हे, असंभव आहे; विशेषत: असा भार की जो उचलण्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये नाही. कोणी पर्वत डोक्यावर घेऊन पर्वत चढू शकतो काय ? नाही कधीच नाही. त्याचप्रमाणे परद्रव्यामध्ये फेरबदल करण्याची बुद्धी असणारी व्यक्ती नित्य द्रव्यामध्ये प्रवेश करू शकत नाही.

जरी स्वयं परिणमनशील या जगाच्या परिणमनाचे किंचित मात्र उत्तरदायित्व याच्या डोक्यावर नाही, तरी देखील अज्ञानी आत्मा स्वत:च्या मिथ्या कल्पनेच्या आरोपित भारानें स्वत:च ओझ्याखाली दबून जातो आहे.

परामध्ये तर ह्याला काही करायचेच नाही, आपल्या पर्यायामध्ये देखील काही करायचे नाही. सर्व काही सहज होत आहे आणि होत राहील.

म्हडलेच आहे :–

"होता स्वयं जगत परिणाम, मैं जग का करता क्या काम ।।"

यावर काही लोक म्हणतात की, पराचे नाही तर नाही, परंतु आपले काम तर करायचे ना ? जर आम्ही आमचें ही काम नाही केले तर आमचे काम कोण करणार आहे ? खाणे–पिणे, उठणे–बसणे तर करावेच लागेल, आणि हे सर्व विचार करून करावे लागेल. नाही तर गडबड होईल स्वास्थ्य बिघडेल.

त्याला म्हणतात की जरा विचार तर कर, जेव्हा तू आईच्या पोटात होतास तेव्हा विचार करून काय करीत होतास ! त्याचप्रमाणे महिन्या दोन महिन्याचा होतास तेव्हा तू विचार करून काय

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



करीत होतास ? तरीदेखील एवढा मोठा झालास. आणि आता फार जाणकार झालास, फार विचार विनिमय करून खातोस-पितोस, उठतोस-बसतोस तरीदेखील निरंतर क्षीण का होतोस? आता सांभाळ ना या शरीराला चांगल्या प्रकाराने, नाहीतर हे येथेच सुटून जाईल आणि तू हे सोडून निघून जाशील. पूर्णतः सांभाळ करीत असताना देखील एक दिवस असा येईल की हे येथेच पडून राहील आणि तुला हे सोडून जावे लागेल. तरी देखील यामध्ये तुझ्या कर्तृत्वाचा अभिमान गळून जात नाही.

या शरीरावर तुझे किंचितमात्र ही नियंत्रण चालत नाही. हे तुझे काळे केस तुला विचारूनच पांढरे होत असतील, चेहऱ्यावर ज्या सुरकुत्या पडताहेत, त्यादेखील तुझी संमती घेऊनच पडत असतील ?

जर नाही तर मग हे का स्वीकार करीत नाहीस की "होता स्वयं जगत परिणाम, मैं जग का करता क्या काम" शरीरदेखील तर परच आहे, ज्यावर तू आपले कर्तृत्व लादीत आहेस.

यावर काही लोक म्हणतात की जाणणे-पाहणे तर आत्म्याचा स्वभाव आहे, ते तर करावेच लागेल. त्यांना आमचे म्हणणे आहे त्यातही काय करायचे आहे ? ते देखील सहज होत आहे.

काय जाणावे आणि काय जाणू नये-हा विवेक तरी करावाच लागेल ? असे थोडेच चालणार आहे की वाटेल ते जाणत-पहात रहा, काही तरी मर्यादा ठेवावीच लागेल, काही तरी नक्की करावेच लागेल, आम्ही आपल्या ज्ञान-दर्शनास असेच सोडून द्यावे-सांडाप्रमाणे त्याने वाटेल तेथे तोंड घालावे; कमीत कमी त्याला तरी स्वभाव सन्मुख करावेच लागेल काहीच करायचे नाही, काहीच करायचे नाही हे कसे काय चालेल ? "ज्ञानाला स्वभाव-सन्मुख करा' कमीत कमी एवढे तर राहू द्या.

जर कोणी असे म्हणेल तर त्याला म्हणतात की – भाई ! ज्ञानाला स्वभाव-सन्मुख करण्याच्या विकल्पाने ज्ञान स्वभावसन्मुख होत नाही, परंतु याविकल्पाच्या भारापासून निर्भार होऊनच ज्ञान स्वभाव-सन्मुख होते.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्ञानाची प्रत्येक पर्याय स्वकार्य करण्यामध्ये परमुखापेक्षी नाही. ती आपल्यामध्ये परिपूर्ण आहे, स्वकार्य करण्यामध्ये सक्षम आहे, पूर्ण सुयोग्य आहे. त्याच्या योग्यतेमध्ये त्याचे ज्ञेय देखील निश्चित आहेत. ज्ञानाचा ज्या पर्यायीमध्ये ज्या ज्ञेयाला जाणण्याची योग्यता आहे, ती पर्याय त्याच ज्ञेयाला आपला विषय बनवील, त्यामध्ये दुसऱ्या कोणाचा हस्तक्षेप चालू शकत नाही.

हे एक ध्रुव सत्य आहे की ज्ञेयानुसार ज्ञान होत नाही, परंतु ज्ञानाच्या अनुसार ज्ञेय जाणले जातें, अन्यथा असे का व्हावे की, जे ज्ञेय समोर आहे, त्याचे तर ज्ञान होत नाही आणि जे ज्ञेय समोर नाही; क्षेत्र-कालाने दूर आहे, त्याचे ज्ञान होताना लक्षात येते. नवविवाहित ऑफीसरला समोर बसलेला क्लार्क दिसत नाही, परंतु ऑफीसपासून दूर घरात किंवा माहेरी असलेली पत्नी दिसते.

या अर्थाचा एक श्लोक प्रमेयरत्नमालामध्ये दिला आहे. :–

"पिहिते कारागारे तमसि च सूचीमुखाग्रदुर्भेद्ये ।
मयि च निमीलितनयने तथापि कान्ताननं व्यक्तम् ।।[1]

कारागारामध्ये बंद एखादा कामी म्हणतो की, जरी कारागाराचे दार बंद आहे आणि अंधार येवढा घनदाट आहे की, सुईच्या अग्रभागाने (टोकाने) देखील भेदला जाऊ शकत नाही आणि मी आपले दोन्ही नेत्र बंद करून ठेवले आहेत, तरीदेखील मला आपल्या प्रियेचे मुख स्पष्ट दिसत आहे."

यावरून हे सिद्ध होते की, ज्ञेयानुसार ज्ञान होत नाही. परंतु ज्ञानानुसार ज्ञेय जाणले जाते. याचे तात्पर्य हे आहे की क्षयोपशम ज्ञानामध्ये ज्या वेळी ज्या ज्ञेयाला जाणण्याची योग्यता असते त्यावेळी तेच ज्ञेय ज्ञानाचा विषय बनते, अन्य नाही.

या विषयाला न्यायशास्त्राच्या खालील सूत्राद्वारे चांगल्या प्रकारे जाणले जाऊ शकते :–

---

1 आचार्य अनंतवीर्य : प्रमेय रत्नमाला, अ. २, सुत्र १२ ची टीका,

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



"स्वावरणक्षयोपशमलक्षणयोग्यतया हि प्रतिनियमतर्थं व्यवस्थापयति ॥९॥[1]

ज्याचे स्वावरण क्षयोपशम लक्षण आहे अशी योग्यताच ही व्यवस्था करते की ज्ञानाने कोणाला जाणावे.

येथे क्षयोपशम ज्ञान कोणाला जाणेल आणि कोणाला जाणणार नाही याची चर्चा चालली आहे. केवलज्ञानामध्ये हा प्रश्नच उपस्थित होत नाही, कारण ते एका समयामध्येच लोकालोकाला जाणते.

बौद्धांचे हे म्हणणे आहे की ज्ञान ज्ञेयामुळे उत्पन्न होते, ज्ञेयाकार असते आणि ज्ञेयाला जाणणारे असते; ज्याला ते तदुत्पत्ति, तदाकार आणि तदध्यवसायच्या रूपामध्ये प्रस्तुत करतात. जैनांना ही गोष्ट मान्य नाही.

या संदर्भात ते जैनांना विचारतात की, जर ज्ञान ज्ञेयाने उत्पन्न होत नाही तर मग तुमच्याकडे ज्ञान अमुक ज्ञेयालाच का जाणते,अन्य ज्ञेयाला का जाणत नाही – याचा नियामक कोण होईल ? बौद्धांकडे जे ज्ञान ज्या ज्ञेयाने उत्पन्न होते, त्यालाच जाणते – ही व्यवस्था आहे. जैनांमध्ये या संदर्भात काय व्यवस्था आहे, या उत्तरासाठी वरील सूत्र आलेले आहे. त्याचा आशय आहे की, योग्यताच त्याची नियामक आहे. अर्थात् ज्ञानाच्या विवक्षित पर्यायामध्ये जाणण्याच्या क्षमतेसह हे देखील निश्चित आहे की ते कोणत्या ज्ञेयाला जाणेल.

योग्यतेला परिभाषित करताना म्हटले आहे की, तत्संबंधी आवरणाचा क्षयोपशम हे योग्यतेचे लक्षण आहे, अर्थात् या योग्यतेमध्ये ज्या ज्ञेयाला जाणणे आहे, तत्संबंधी आवरणाचा क्षयोपशम होतो.

यामुळे हेच सिद्ध होते की, ज्ञानाच्या प्रत्येक पर्यायाचे ज्ञेयदेखील निश्चित आहेत आणि ते त्याच्या योग्यतेमध्येच सम्मिलित आहे -- समावेशित आहेत. जेव्हा ज्ञानाचे ज्ञेयदेखील निश्चित आहे, तर मग हे

---

[1] आचार्य माणिक्यनंदि : परीक्षामुख, अ. २, सूत्र ९

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



कुठे शिल्लक राहते की काय जाणावे आणि काय न जाणावे ? याचा विवेक तर करावाच लागेल, या दिशेमध्ये काहीना काही करावेच लागेल.

मला येवढाही भार आपल्या डोक्यावर ठेवायचा नाही तेव्हाच निर्भार होता येईल आणि तेव्हाच ज्ञानाच्या पर्यायाचे ज्ञेय आत्मस्वभाव बनेल. अर्थात् दृष्टीस्वभाव सन्मुख होईल. दृष्टी स्वभावसन्मुख होण्याचा हाच एकमेव उपाय आहे.

येथे हा प्रश्न निर्माण होऊ शकतो की, जर असे आहे तर हा उपदेश का दिला जातो की दृष्टीला आत्मसन्मुख करा, आत्म्याला जाणा इत्यादी.

या प्रकारे प्रश्न तर अनेक निर्माण होतात. त्या सर्वांवर पुढ वेगळा विचार केला जाईल.

प्रत्येक द्रव्य पर्वत (अचल) आहे. त्यास चलायमान करण्याचा प्रयत्न करणे बालचेष्टेविना आणखी काही नाही. जर द्रव्य पर्वत (अचल) आहे तर पर्याय देखील पार्वती (अचला) आहे ज्याप्रमाणे अचल द्रव्याला चलायमान केले जाऊ शकत नाही, त्याचप्रमाणे अचला पर्यायीला देखील चलायमान करणे शक्य नाही.

एका समयाच्या पर्यायाला सुद्धा बदलण्यासाठी अर्थात् त्यास स्वसमयापासून हटविणे आणि त्या स्थानावर दुसऱ्या पर्यायाला आणण्यासाठी जर सर्व जगाने देखील एकदम प्रयत्न केला तरी देखील तो सफल होणार नाही. ते त्या पर्यायाला स्वस्थानाहून हटवू शकत नाही. द्रव्यस्वभाव तर अनंत शक्तीशाली आहेच, परंतु पर्याय-स्वभावामध्ये देखील आपल्या पर्यायाला सुरक्षित ठेवण्याचे अनंत सामर्थ्य आहे, कोणीही त्याच्या सीमेमध्ये प्रवेश करू शकत नाही. त्यामध्ये फेरफार करण्याची बुद्धी करणाऱ्या जगाला शेवटी हारच पत्करावी लागेल.

द्रव्य जर त्रिकाल सत् आहे तर पर्यायदेखील स्वकाल सत् आहे अर्थात् सती आहे, इतिहास आणि पुराण याची साक्ष देतात की, सतीचे

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सत् (सतीत्व) लुटणारे कधी सफल झाले नाहीत, परंतु त्यांना आपल्या या अक्षम्य अपराधाचा कठोरतम दंड भोगावा लागला. त्याचप्रमाणे पर्यायाची छेडछाड करणे अर्थात् त्यास बदलण्याची वृत्ती ठेवणाऱ्या अपराधींना देखील त्याचा दंड भोगावा लागेल. अनंत काळपर्यंत संसारामध्ये भ्रमण करावे लागेल, पर्यायाच्या सत्चा अपमान करून ते या महापापापासून (मिथ्यात्वापासून) वाचू शकत नाहीत.

द्रव्य आणि गुणांमध्ये फेरफार करण्याचा विकल्प न येता पर्यायामध्येच फेरफार करण्याचा विकल्प का येतो? याचे सहज मनोवैज्ञानिक कारण आहे. जेथे फेरफार करण्याची सवड (स्थान) दिसते, तेथेच फेरफार करण्याचा विकल्प येतो. जेथे दिसत नाही, तेथे काही करण्याचा विकल्प देखील येत नाही.

ज्याप्रमाणे आम्ही एखादे अवैधकार्य करण्याची इच्छा करतो आणि ते करणे अनेक सरकारी कर्मचाऱ्यांच्या हातात असते, ज्या कर्मचाऱ्यांबद्दल आम्हाला हा विश्वास असतो की कोणत्याही परि-स्थितीत आणि किंमतीवर हे अवैध कार्य करीत नाही आम्ही त्यास करण्याला सांगतही नाहीत. परंतु ज्या कर्मचाऱ्यांबाबत आम्ही हे जाणतो की साम-दाम-दंड भेदाने काम केले जाऊ शकते, त्याचकडून कोणत्याही परिस्थितीत कार्य करण्याचा प्रयत्न करतो.

त्याचप्रमाणे द्रव्य आणि गुणांची अचलता प्रायः सर्वांच्या सहज लक्षात येते, म्हणून त्यामध्ये फेरफार करण्याची बुद्धी होत नाही परंतु पर्यायाची अचलता सहज लक्षात येत नाही, यामुळेच त्यामध्ये फेरफार करण्याची बुद्धी कायम राहते. क्रमबद्धपर्यायाचे खरे ज्ञान झाल्याशिवाय पर्यायाची अचलता लक्षात येत नाही आणि त्यामध्ये फेरफार करण्याची बुद्धी कायमच राहते.

पर्यायामध्ये फेरफार करण्याची मिथ्याबुद्धीच अज्ञान आहे. कर्त्तावाद आहे, याच कर्त्तावादी अज्ञानाचा निषेध कर्त्ताकर्म अधिकार आणि सर्वविशुद्धज्ञान अधिकारामध्ये पूर्ण सामर्थ्याने समयसारच्या केलेला आहे. जैनदर्शनाच्या अकर्त्तावादाचे हेच मर्म आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



जैनदर्शनाचा अकर्त्तावाद केवळ येथेपर्यंत सीमित नाही की कोणी तथाकथित ईश्वर जगाचा कर्त्ता नाही, अकर्त्तावादाचा व्यापक अर्थ हा आहे की कोणतेही द्रव्य कोणत्याही द्रव्याचा कर्त्ता-हर्त्ता-धर्त्ता नाही; येथेपर्यंत की आपल्याही क्रमनिश्चित पर्यायामध्ये तो कोणत्याही प्रकारचा फेरफार करू शकत नाही. जरी द्रव्य आपल्या पर्यायाचा कर्त्ता आहे, तरी देखील फेरफार कर्त्ता नाही.

क्रमबद्धपर्यायाची श्रद्धा किंवा वरील अकर्त्तावादी दृष्टिकोणाचे एकमात्र खरे फल दृष्टीला स्वभावसन्मुख करणेच आहे. क्रमबद्ध पर्यायाची विकल्पात्मक श्रद्धा आहे, जर दृष्टी स्वभावसन्मुख झाली नाही तर समजावे की त्यास सुद्धा विकल्पात्मकच श्रद्धा आहे, खरी श्रद्धा नाही. कारण क्रमबद्धपर्यायाची खरी श्रद्धा आणि दृष्टी स्वभाव सन्मुख होऊन पर्यायामध्ये सम्यग्दर्शनाची उत्पत्ती होणे एक काळ आहे, काळ भेद नाही.

काही लोकांचे असेही म्हणणे आहे की गोम्मटसारामध्ये नियति-वादीला मिथ्यादृष्टी म्हटले आहे. (गोम्मटसार कर्मकाण्ड, गाथा ८८२) ही क्रमबद्धपर्याय देखील थोडी तशीच आहे, म्हणून यामध्ये देखील एकान्ताचा दोष येतो; परंतु गोम्मटसाराचा नियतवाद आणि क्रमबद्धपर्याय यामध्ये फार अंतर आहे. एकान्त नियतिवादीतर पुरुषार्थादी अन्य समवायांची उपेक्षा करून एकान्त नियतिवादाचा आश्रय घेऊन स्वच्छन्दतेचे पोषण करतो, आणि क्रमबद्ध पर्यायाचा सिद्धान्त पुरुषार्थादी अन्य तथ्यांना सोबत घेऊन चालतो.

या संदर्भात जैनेन्द्र सिद्धांत कोषकारांची टिप्पणी दृष्टव्य आहे–

"जे कार्य किंवा पर्याय ज्यानिमित्ताने ज्याद्रव्यामध्ये ज्या क्षेत्र व कालामध्ये ज्याप्रकारे होणार असते, ते कार्य त्यानिमित्ताने त्याच प्रकारे होते. अशी द्रव्य, क्षेत्र, काळ, व भावरूप चतुष्टयाने समुदित नियत कार्य व्यवस्था आहे यास नियति म्हणतात. नियत कर्मोदयरूप निमित्ताच्या अपेक्षेने यालाच 'दैव, नियतकालाच्या अपेक्षेने यालाच काललब्धी आणि होण्यायोग्य नियतभाव किंवा कार्याच्या अपेक्षेने यालाच भवितव्य म्हणतात.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आपापल्या समयामध्ये क्रमपूर्वक नंबराप्रमाणे पर्यायांचे प्रगट होणे या अपेक्षेने यासाठी श्री कानजी स्वामींनी क्रमबद्धपर्याय शब्दाचा प्रयोग केला आहे.

जरी करण्या धरण्याच्या विकल्पांनी युक्त रागीजीवाच्या बुद्धीमध्ये सर्वकाही अनियत (अक्रमबद्ध) असल्याचे प्रतीत होते, तरी परंतु निर्विकल्प समाधीच्या साक्षीमात्रभावांमध्ये विश्वाची समस्त कार्यव्यवस्था वरीलप्रमाणे नियत (क्रमबद्ध) प्रतीत होते. म्हणून वस्तुस्वभाव, निमित्त (दैव), पुरुषार्थ, काललब्धी व भवितव्यया पाच समवायांसमवेत उपरोक्त व्यवस्था सम्यक् आहे; आणि याहून निरपेक्ष तेच मिथ्या आहे. निरूद्यमी पुरुष मिथ्या नियतीच्या आश्रयाने पुरुषार्थाचा तिरस्कार करतो, परंतु अनेकांत बुद्धीमान या सिद्धांताला जाणून सर्वबाह्य व्यापाराने विरक्त होऊन एक ज्ञाता-दृष्टा भावामध्ये स्थिर होतो."[1]

कार्योत्पत्तीमध्ये पाच कारणांच्या समवायांना सम्यक् घोषित करून आचार्य सिद्धसेन सम्मईसुत्तं (सन्मतिसूत्र) मध्ये लिहीतात :—

"कालो सहाव णियई पुव्वकयं पुरिस कारणेगंता ।
मिच्छतं तें चेव उ समासओ होंती सम्मतं ।।५३।।[2]

काल, स्वभाव, नियति, पूर्वकृत (निमित्त) आणि पुरुषार्थ या पाच कारणांमधून कोणत्याही एकाने कार्योत्पत्ती मानणे एकान्त आहे, मिथ्यात्व आहे, आणि यांच्या समवायाने कार्योत्पत्ती मानणे अनेकान्त आहे, सम्यक्त्व आहे."

पंचसमवायांची चर्चा पद्मपुराणामध्ये अशी केलली आहे :—

"कालः कर्मेश्वरो दैवं स्वभावः पुरुषः क्रिया ।
नियतिर्वा करोत्येवं विचित्रं कः समीहितम् ।।[3]

---

1 जैनेन्द्र सिद्धांत कोश, भाग २, पृष्ठ ६१२

2 सम्मईसुत्तं, अ. ३, गाथा ५३

3 आचार्य रविषेण: पद्मपुराण, सर्ग ३१, श्लोक २१३

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



वरील छन्दामध्ये रामाला वनवास आणि भरताला राज्य दिल्यानंतर जनता आपले भाव व्यक्त करीत आहे :–

अशी विचित्र स्थिती (चेष्टा) काल, कर्म, ईश्वर, दैव, स्वभाव, पुरुष, क्रिया अथवा नियतीच करू शकते आणखी कोण करू शकणार ?

याच गोष्टीचे स्पष्टीकरण करताना जैनेन्द्र सिद्धांत कोशकार लिहीतात :–

"कालास नियतीमध्ये, कर्म व ईश्वराला निमित्तामध्ये आणि दैव व क्रियेला भवितव्यामध्ये गर्भित केल्यास पाच गोष्टी राहतात. स्वभाव, निमित्त, नियती, पुरुषार्थ व भवितव्यया पाच समवायां-समवेतच कार्यव्यवस्थेची सिद्धी आहे, असे प्रयोजन आहे.[1]

या संदर्भामध्ये स्वामीजींचे स्पष्टीकरण सुद्धा पहा :–

"गोम्मटसारामध्ये जो नियतीवाद सांगितला आहे तो तर स्वच्छंदीपणाचा आहे. जो जीव सर्वज्ञांना मानत नाही, ज्ञानस्वभावाचा निर्णय करीत नाही, ज्याने अन्तरोन्मुख होऊन समाधान केले नाही, विपरीत भाव (परिणाम) देखील कमी केलेले नाहीत, आणि 'जसे होणार असेल तसे होईल' असे म्हणून केवळ स्वच्छंदी होत आहे आणि मिथ्यात्वाचे पोषण करतो आहे – अशा जीवाला गोम्मटसारामध्ये गृहीत मिथ्यादृष्टी म्हटले आहे. परंतु ज्ञानस्वभावाच्या निर्णयपूर्वक जर हा क्रमबद्धपर्याय समजला तर ज्ञायकस्वभावाकडील पुरुषार्थाद्वारे मिथ्यात्व आणि स्वच्छंद सुटेल."[2]

"अज्ञानी म्हणतात की, या क्रमबद्धपर्यायाला मानल्यास पुरुषार्थ नष्ट होतो, परंतु असे नाही. या क्रमबद्धपर्यायीचा निर्णय केल्यामुळे कर्त्ताबुद्धीचा मिथ्याभिमान सुटतो आणि निरंतर ज्ञाय-

---

1 जैनेन्द्र सिद्धांत कोश, भाग २, पृष्ठ ६१८

2 ज्ञानस्वभाव-ज्ञेयस्वभाव, पृष्ठ ७

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



कत्वाचा खरा पुरुषार्थ होतो. ज्ञानस्वभावाचा पुरुषार्थ न केल्यास त्याचा क्रमबद्धपर्यायाचा निर्णयदेखील खरा नाही. ज्ञानस्वभावाच्या पुरुषार्थाद्वारे क्रमबद्धपर्यायाचा निर्णय करून जेथे पर्याय स्वसन्मुख झाली तेथे एका समयामध्ये त्या पर्यायामध्ये पाच समवाय येतात. पुरुषार्थ, स्वभाव, काल, नियत आणि कर्माचा अभाव – हे पाच समवाय एकसमयाच्या पर्यायामध्ये येतात.''[1]

''ज्ञायकस्वभावाच्या आश्रयाने पुरुषार्थ होतो. तरीदेखील पर्यायाचा क्रम तुटत नाही.[2]

''पहा, ही वस्तुस्थिती ! पुरुषार्थदेखील उडत नाही आणि क्रमदेखील तुटत नाही. ज्ञायकस्वभावाच्या आश्रयाने सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्रवादीचा पुरुषार्थ होतो आणि तशी निर्मल दशा होत जाते, तरीदेखील पर्यायाची क्रमबद्धता तुटत नाही.''[3]

वरील कथनातून स्पष्ट होते की, गोम्मटसारामध्ये एकान्ताच्या कथनामध्ये जे नियतवादी मिथ्यादृष्टीचे कथन आहे, त्याचे क्रमबद्ध पर्यायाशी काही साम्य नाही नियतवादीप्रमाणे स्वच्छंदतेचे पोषण क्रमबद्धपर्यायामध्ये कधीही नाही.

स्वामीजींच्या स्पष्टीकरणानेदेखील हे पूर्णत: स्पष्ट होते की तें एकान्त नियतवादाचें पोषक नाहीत, परंतु खरे अनेकान्तवादी आहेत.

यावर काही लोक म्हणतात की, आपण काहीही म्हणा क्रमबद्ध पर्यायाचा सिद्धांत वाटतो तर काहीसा एकान्तच !

भाऊ ! आपल्या वाटण्याला आम्ही काय करावे ? जेव्हा अनेक आगम प्रमाण आणि युक्तींनी स्पष्ट केले तरीदेखील जर आपणास एकान्तासारखा वाटतो तर आम्ही काय करावे ? आम्ही तर आपणापुढे युक्ती आणि आगमच ठेवू शकतो, अनुभव तर दाखवू

---

[1] ज्ञानस्वभाव ज्ञेयस्वभाव, पृष्ठ ११

[2] ज्ञानस्वभाव ज्ञेयस्वभाव, पृष्ठ ९९

[3] ज्ञानस्वभाव ज्ञेयस्वभाव, पृष्ठ १४०

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



शकत नाही. जर खोलवर विचार करणार नाही आणि वर-वर विचार कराल तर एकान्ताप्रमाणे वाटेलही. खोलवर विचार केल्यास स्पष्ट येते की हा मिथ्या एकान्त नाही.

काय म्हणालात, मिथ्या-एकान्त नाही ?

होय ! होय ! सम्यक-एकान्ततर तो आहेच.

काय एकान्त देखील दोन प्रकारचा असतो ?

"होय ! होय !! एकांतच काय, अनेकांतदेखील दोन प्रकारचा असतो

म्हणजे काय जैनदर्शनामध्ये एकांताला देखील स्थान आहे ? काय हे अनेकांतवादी दर्शन नाही ?

जैनदर्शन अनेकांतामध्येदेखील अनेकांताला स्वीकार करते. जरी जैनदर्शनास अनेकांतवादी दर्शन म्हणतात, तरीदेखील त्यास सर्वथा अनेकांतवादी मानले तर तो देखील एकांत होईल, म्हणून जैनदर्शनामध्ये अनेकांतामध्ये देखील अनेकांताचा स्वीकार केला आहे. जैनदर्शन सर्वथा न एकांतवादी आहे आणि न सर्वथा अनेकांतवादी, ते कथंचित् एकांतवादी आणि कथंचित् अनेकांतवादी आहे. याचेच नाव अनेकांतात अनेकांत आहे.

म्हटलेच आहे :–

"अनेकान्तोऽप्यनेकान्तः प्रमाण-नयसाधनः ।
अनेकान्तः प्रमाणात्ते तदेकान्तोऽर्पितान्नयात् ॥[1]

प्रमाण आणि नय ज्याचे साधन आहेत, असा अनेकांतदेखील अनेकांत स्वरूप आहे. कारण सर्वांशग्राही प्रमाणाच्या अपेक्षेने वस्तु अनेकांत स्वरूप आणि अंशग्राही नयाच्या अपेक्षेने वस्तु एकांतरूप सिद्ध आहे."

जैनदर्शनाप्रमाणे एकांतदेखील दोन प्रकारचा असतो, आणि अनेकांतदेखील दोन प्रकारचा असतो, जसे – सम्यक्-एकांत आणि

---

1 स्वयंभूस्तोत्र, श्लोक १०३ (अरनाथ स्तुति, श्लोक १८)

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मिथ्या-एकांत, सम्यक्-अनेकांत आणि मिथ्या-अनेकांत. निरपेक्षनय मिथ्या एकांत आहे आणि सापेक्षनय सम्यक्-एकांत आहे. तथा सापेक्षनयाचा समूह अर्थात् श्रुतप्रमाण सम्यक्-अनेकांत आहे आणि निरपेक्षनयाचा समूह अर्थात् प्रमाणाभास मिथ्या-अनेकांत आहे.

म्हटलेच आहे :–

"जं वत्थु अणेयन्तं, एयंतं तं पि होदि सविपेक्खं ।
सुयणाणेण णएहि य, णिरवेक्खं दीसदे णेव ।।[1]

जी वस्तु अनेकान्तरूप आहे तीच सापेक्ष दृष्टीने एकांतरूप-देखील आहे. श्रुतज्ञानाच्या अपेक्षेने अनेकांत रूप आहे आणि नयाच्या अपेक्षेने एकांत रूप आहे. अपेक्षारहित वस्तुचे रूप पाहिले जाऊ शकत नाही."

अनेकांतामध्ये अनेकांताची सिद्धी करतांना आचार्य अकलंकदेव लिहीतात.

"जर अनेकांतास अनेकांतच मानले आणि एकांताचा सर्वथा लोप केला तर सम्यक् एकांतच्या अभावामध्ये, शाखादींच्या अभावा-मध्ये वृक्षाच्या अभावाप्रमाणे, तत्समुदाय रूप अनेकांताचादेखील अभाव होईल, म्हणून जर एकांताचाच स्वीकार केल्यास अविनाभावी इतर धर्माचा लोप झाल्यावर सुरवातीला सांगितलेल्याचा देखील लोप झाल्यामुळे सर्व लोप होण्याचा प्रसंग येईल."[2]

सम्यक्-एकांत नय आणि सम्यक-अनेकांत प्रमाण[3]

या दृष्टीने विचार केल्यानंतर 'क्रमबद्धपर्याय' सम्यक्-नियति-वाद अर्थात् सम्यक् एकांत आहे जो सम्यक्-अनेकांताच्या विरोधी नसून त्यास पुरक आहे.

---

1 कार्तिकेयानुप्रेक्षा. गाथा २६१

2 राजवार्तिक, अ–१, सुत्र ६ ची टीका.

3 राजवार्तिक, अ–१, सुत्र ६ ची टीका.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



या विषयाला जर आणखी स्पष्ट केल्यास स्पष्टीकरण असे होईल.

सम्यक्-अनेकांत अर्थात् श्रुतप्रमाणाच्या दृष्टीने विचार केल्यास कार्याची सिद्धी अनेक कारणाने अर्थात् पंचसमवायाने होते, परंतु सम्यक्-एकांत अर्थात् नयाच्या अपेक्षेने ज्या समवायाच्या अपेक्षेने कथन असेल त्याने कार्य झाले असे म्हटले जाते, अन्य समवाय यामध्ये गौण राहतात, त्यांचा अभाव अपेक्षित नाही.

या दृष्टीने विचार केल्यावर जरी प्रत्येक कार्य श्रुत प्रमाणाच्या (सम्यक्-अनेकांताच्या) अपेक्षेने पंचसमवायानेच होते, तरीदेखील नयाच्या अपेक्षेने ज्या समवायाला मुख्य करून केले जाते त्याने कार्य सिद्धी झाली – हे कथन सम्यक्-एकांत होते, मिथ्या-एकांत नाही; कारण त्यामध्ये अन्य समवाय गौण होतात, त्यांचा अभाव होत नाही.

प्रस्तुत प्रसंगामध्ये काळाच्या अपेक्षेने कथन केल्यावर प्रत्येक कार्य स्वकालात (स्व-समयात)च होते – हे म्हणणे सम्यक्-एकांत होईल, मिथ्याएकांत होणार नाही. कारण या कथनामध्ये पुरुषार्थादी अन्य समवाय गौण झाले . त्यांचा अभाव अभीष्ट नाही.

याप्रमाणे क्रमबद्धपर्यायाला सम्यक्-एकांत देखील म्हटले जाऊ शकते जे सम्यक्-अनेकांताला पूरक आहे, विरोधी नाही.

– एक कारण हे देखील आहे की, सम्यक्-एकान्त आणि मिथ्या-एकान्ताचा भेद न जाणणारांना क्रमबद्धपर्यायाचे कथन एकान्तासारखे आहे.

वरील संदर्भामध्ये एका महत्त्वपूर्ण तथ्याकडे आपले लक्ष्य आकर्षित करू इच्छितो की क्रमबद्धपर्यायामध्ये आपणास काळा-संबंधीच एकान्त का वाटतो, क्षेत्रासंबंधी का वाटत नाही, भावा-संबंधी का वाटत नाही, निमित्तासंबंधी का वाटत नाही ? क्रमबद्ध पर्यायाचे स्पष्टीकरण करताना स्पष्ट म्हटले आहे की, ज्या द्रव्याची जी पर्याय ज्या क्षेत्रामध्ये, ज्या कालामध्ये, ज्या विधानाने व ज्या

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



निमित्ताने जसा होणार असेल; त्या द्रव्याची, ती पर्याय, त्या क्षेत्रामध्ये, त्याच कालामध्ये, त्याच विधानाने, व त्याच निमित्ताने तसीच होईल.

वरील व्याख्येमध्ये काळासोबत द्रव्य, क्षेत्र, भाव, निमित्त आणि विधान देखील निश्चित दाखविलेले आहे. मग आपणास काळाच्या नियमिततेमध्येच का शंका निर्माण होते, क्षेत्रादींच्या नियमिततेमध्ये का होत नाही ?

ज्याप्रमाणे केवलज्ञान जीवालाच होईल, अजीवास होणार नाही; जीवामध्ये देखील भव्यालाच होईल, अभव्याला होणार नाही – ही द्रव्यासंबंधीची नियमितता आहे. यामध्ये काही शंका तुम्हाला आहे काय ? त्याचप्रमाणे केवलज्ञान क्षपकश्रेणी रूप ध्यानाने (विधीने)च होईल तथा ज्ञानावरणादी घातियाकर्माच्या अभाव (निमित्त) पूर्वकच होईल हे विधान आणि निमित्तासंबंधी नियमितता आहे. यामध्ये देखील आपणास काही शंका आहे काय ? जर नाही, तर मग काळाबाबत नियमिततेसंबंधीच शंका का ?

क्रमबद्धपर्यायामध्ये केवळ एका काळाचीच नियमितता स्वीकारलेली नाही; परंतु द्रव्य, क्षेत्र, काळ, भाव, आणि निमित्ताची देखील नियमितता स्वीकारलेली आहे.

जर क्रमबद्धपर्यायामध्ये द्रव्य, क्षेत्र, काळ, भाव, निमित्त सर्वांचीच नियमितता समावेशित आहे, तर मग ज्या समयी (काळात) जे व्हायचे आहे ते त्याच समयात होईल त्या जागी असेही म्हटले जाऊ शकते की ज्या द्रव्याचे होणार असेल, त्याचेच होईल; ज्या क्षेत्रामध्ये होणार असेल त्यामध्येच होईल. जे होणार असेल तेच होईल; ज्या विधानाने होणार असेल, त्या विधानानेच होईल, ज्या निमित्तपुर्वक होणार असेल, त्याच निमित्ताने होईल.

तर मग केवळ काळासंबंधीच आक्षेप का ? कालाच्याच नियमिततेमध्ये बंधनाची प्रतीती (भावना) का इतरामध्ये का नाही ? अज्ञानी काळासंबंधीच शंकित होतो. ह्याचे कारण काय ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



अज्ञानीचा उतावीळपणाच ह्याला कारण आहे. पर्यायाच्या अचलतेचे ज्ञान न झाल्यामुळे अज्ञानीमध्ये एक प्रकारचा उतावीळपणा आढळतो. त्यामुळे एवढी प्रतिक्षा कोण पाहिल असा भाव असतो. कार्य लवकर झाले पाहिजे. ज्याच्या सम्यग्दर्शन पर्यायाच्या प्राप्तीचा काळ दूर असतो, त्यांस काळाच्या नियमिततेचा विश्वास होत नाही.

लोक व्यवहारामध्ये देखील असे आढळते. की, ज्याला ज्या कामाची वेळ जवळची दिली जाते. तो तिचा सहज स्वीकार करतो. परंतु ज्यास दूरची (लांब अवधी) वेळ दिली जाते तो त्यास बदलण्याचा प्रयत्न करतो, तो ती वेळ स्वीकारीत नाही. त्याचप्रमाणे ज्याच्या आत्महिताचा काळ दूर आहे, त्यास काळाचे निश्चित असणे योग्य वाटत नाही. ज्यास काळाचे निश्चित होणे योग्य वाटत नाही. त्यावेळी जाणावे की त्याचा सत्य समजण्याचा काळ अद्याप दूर आहे, त्यामध्ये काळास बदलविण्याची वृत्ती आणि उतावीळपण स्वाभाविकपणेच असते. ही उतावळेपणाची वृत्तीच त्यास जे होणार आहे ते जेव्हा व्हायचे तेव्हाच होईल याचा स्वीकार करू देत नाही.

खोलवर विचार केल्यास ही गोष्ट समजू शकते की द्रव्य, क्षेत्र इत्यादी सारखा काळ देखील नियमित आहे, परंतु खोलवर विचार केला तर लक्षात येईल ना ? सूक्ष्मविचार कोणी करू इच्छित नाही, केवळ वरवर धावती दृष्टी टाकतात तेव्हा हे एकान्तासारखे वाटते; पुरुषार्थाचा लोप होईल – असे वाटते.

आजचे जग येवढे घाईत आहे, एवढे उतावीळ झालेले आहे की गंभीरपणे सूक्ष्म विचार करण्याला त्याला सवडच नाही. या धावपळीच्या युगामध्ये माणूस थांबणे तर फार दूर, चालत ही नाही, केवळ धावतो आहे. प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या तरी धावण्यामध्ये सहभागी आहे. धावण्याच्या धुंदीत आहे. हा आपल्या धुंदीमध्ये इतका व्यस्त आहे की त्यास 'क्रमबद्धपर्याय' सारख्या गंभीर विषयावर शांततेने गंभीरतेने विचार करण्याला वेळच नाही.

हे त्रस्त जग विषय-कषायामध्ये इतके अभ्यस्त झाले आहे; विषय-कषायाच्या साधनांना जोडण्याच्या विकल्पामध्येदेखील इतके

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



व्यस्त झाले आहे की 'मी कोण आहे, माझे स्वरूप काय आहे, हे जग काय आहे, याच्या परिणतीचा कर्त्ता कोण आहे ?' इत्यादी दार्शनिक विषयांवर विचार करण्याची त्याला सवडच कुठे आहे ? या विषयाचा विचार करणे हे रिकाम टेकड्या लोकांचे हा काम समजतो. हा तर केवळ धावतो आहे, ध्येयाशिवाय धावतो आहे.

जर आपणास या जगाचा उतावीळपणा बघायचा असेल तर कुठल्याही शहाराच्या गर्दीच्या चौकात जाऊन उभे रहा आणि पहा या जगाचा उतावीळपणा. चौकामध्ये मरणाची निशाणी लाल दिवा आहे. एक शिपाईपण आपणास थांबवण्यासाठी उभा आहे. तरी ही आपण थांबत नाही. आपले मरण दिसत असूनही आपण थांबत नाही. जरी आपण हे जाणतो की लाल दिवा सडकेवर असताना सडक पार करणे मरणाला निमंत्रण देणे आहे आपण केव्हाही जड वाहनाखाली सापडू शकतो पोलीस ही आपणास सचेत करतो आहे, तरी पण आपण धावतो आहोत. ही उतावीळपणाची पराकाष्टा आहे की नाही? एवढी घाईगर्दी काय कामाची तरी पण असा उतावीळपणा कुठेही बघायला मिळू शकतो.

हे देशाचे दुर्भाग्य नव्हे काय ? आपण आपल्या उतावीळपणामुळे लाल दिवा असूनही एखाद्या वाहनाखाली सापडून मरावे आणि त्या-साठी लाखो पोलीसांना चौका-चौकात उभे राहावे.

ज्यांना प्रत्यक्ष मरणाच्या किंमतीवरही उशीर जाणे मान्य नाही, पसंत नाही; अशा अधीर-उतावीळ लोकांच्या ज्ञानामध्ये हे कसे येऊ शकते की जे कार्य जेव्हा व्हायचे असेल, तेव्हाच होईल.

हे काम तर धीरतेचे आहे, गंभीरतेचे आहे; वीरतेचे सुद्धा आहे. जो धैर्याने गंभीरतापूर्वक मनन करील चिंतन करील, त्या वीराच्या ज्ञानामध्ये 'क्रमबद्धपर्याय, येते. त्यामध्ये पुरुषार्थाचा लोप होत नाही, परंतु खरा पुरुषार्थ प्रगट होतो.

उतावीळतेविना पक्षव्यामोह देखील एक कारण आहे, त्यामुळे काळाच्या नियमिततेची सहज स्वीकृती होण्यामध्ये बाधा निर्माण होते.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पक्षव्यामोहाने रहित आत्मार्थी वीर बंधूंना अनुरोध आहे की, एक वेळा या महत्वपूर्ण विषयावर धीरतेने व गंभीरतेने विचार करावा.

'क्रमबद्धपर्यायीमध्ये जर काही लोकांना नियतवादाचा एकान्त दृष्टीस पडतो तर काही मनीषी यास एकान्त भाग्यवादी दृष्टीकोण मानतात. त्यांच्या दृष्टीमध्ये नियतिवाद, क्रमबद्धपर्याय आणि दैव-वादामध्ये काही अंतर नाही, कारण जे व्हायचे असेल ते होईल – असा विचार पुरुषार्थहीन बनवतो, त्यांच्या मते कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथाच्या गाथा ३२१ ते ३२३ पर्यंतचे कथन सार्वभौमिक सत्य नाहीत.

या संदर्भामध्ये आम्ही सिद्धांताचार्य पं. कैलाशचंदजी वाराणसी यांचे विचार जे त्यांनी कार्तिकेयानुप्रेक्षेच्या वरील गाथेच्या भावार्था-मध्येच व्यक्त केले आहे, ते उद्धृत करू इच्छितो :–

''सम्यग्दृष्टी हे जाणतो की, प्रत्येक पर्यायाचा द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भाव नियत आहे. ज्या समयी, ज्या क्षेत्रामध्ये, ज्या वस्तूची जी पर्याय होणार आहे ती होणार आहे – त्यास कोणी टाळू शकत नाही. सर्वज्ञदेव सर्व द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भावांच्या अवस्थांना जाणतात. परंतु त्यांच्या जाणल्यामुळे प्रत्येक पर्यायाचे द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भाव नियत झालेले नाहीत; परंतु नियत असल्यानेच त्यांनी त्या रूपात जाणले आहे.

जसे – सर्वज्ञ देवांनी आम्हाला सांगितले आहे की, प्रत्येक द्रव्यामध्ये प्रतिसमय पूर्व पर्याय नष्ट होते आणि उत्तर पर्याय उत्पन्न होते. म्हणून पूर्व पर्याय उत्तर पर्यायाचे उपादान कारण आहे, आणि उत्तर पर्याय पूर्व पर्यायाचे कार्य आहे. म्हणून पूर्व पर्यायातून कोणतीही उत्तर पर्याय उत्पन्न होऊ शकत नाही, परंतु नियत उत्तर पर्यायच उत्पन्न होते. जर असे मानले नाही तर मातीच्या पिंडामध्ये मधल्या पर्यायाविना (स्थास कोस पर्यायाविना) सुद्धा घटपर्याय तयार होईल; म्हणून हे मानावे लागते की, प्रत्येक पर्यायाचा द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भाव नियत आहे.

काही लोक यास नियतवाद समजून त्या भयाने प्रत्येक पर्यायाचे द्रव्य, क्षेत्र आणि भाव तर नियत मानतात, परंतु काळ नियत मानत

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, पर्यायाचे द्रव्य, क्षेत्र आणि भाव तर नियत आहेत, परंतु काळ नियत नाही. काळास नियत मानल्यास पुरुषार्थ व्यर्थ जाईल.

परंतु त्यांचे उक्त कथन सिद्धांत विरुद्ध आहे. कारण द्रव्य, क्षेत्र आणि भाव नियत असताना काळ अनियत होऊ शकत नाहीत. जर काळास अनियत मानले तर काललब्धी काही वस्तु राहणार नाही. मग संसार परिभ्रमणाचा काळ अर्द्धपुद्गल परावर्तनाहून अधिक शिल्लक राहिल्यावरसुद्धा सम्यक्त्व प्राप्त होईल आणि त्या काळास पूर्ण करण्यापूर्वीच मुक्ती होईल, परंतु हे सर्व आगमाविरुद्ध आहे, म्हणून काळासही मानावेच लागते.

राहिली पौरुषाच्या (पुरुषार्थ) व्यर्थतेची आशंका, पण समया-पुर्वी एखादे काम पुर्ण केले म्हणजेच पौरुषाची सार्थकता होत नाही; परंतु समयावर काम होणे हेच पौरुषाच्या सार्थकतेचे सूचक आहे. उदाहरणार्थ शेतकरी योग्य वेळी गहू पेरतो, आणि खूप श्रमाने शेती करतो, तेव्हाच योग्य समयी पिकून गहू तयार होतो. म्हणून काय शेतकऱ्याचे श्रम व्यर्थ गेले. जर तो पौरुष करीत नाही तर वेळेवर त्याची शेती पिकून तयार होत नाही, म्हणून काळाच्या नियतेमध्ये पौरुष व्यर्थ होण्याची आशंका मूलभूत नाही.

म्हणून ज्या समयामध्ये, ज्या द्रव्याची जी पर्याय होणार आहे ती अवश्य होतो असे जाणून सम्यग्दृष्टी संपत्तीमध्ये हर्ष आणि विपत्तीमध्ये विषाद करीत नाही, आणि संत्तीच्या प्राप्तीसाठी तसेच विपत्तीला दूर करण्यासाठी देवी–देवतांच्यापुढे डोके आपटत फिरत नाही."[1]

वरील कथनामध्ये कार्तिकेयानुप्रेक्षांच्या वरील गाथांच्या सार्व-भौमिकतेवरच जोर दिलेला आहे. आणि पौरुषाची सार्थकतादेखील सिद्ध केलेली आहे.

---

[1] कार्तिकेयानुप्रेक्षा : राजचंद्र जैन शास्त्रमाला, पान २२८

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सम्यग्दृष्टी ज्ञानी जीवाची परमुखापेक्षिता आणि दीनता याच सार्वभौमिक सत्याच्या आधारावर संपते, एक द्रव्य दुसऱ्याचे भले बुरे करू शकत नाही; तथा ज्या द्रव्याची जी पर्याय, ज्या काळामध्ये, ज्या विधानाने, ज्या निमित्तपूर्वक जसी होणार आहे; त्यास द्रव्याची ती पर्याय, त्याच काळामध्ये, त्याच विधानाने, त्याच निमित्तपूर्वक, तसीच होणार; त्यास इंद्रच काय, जिनेन्द्रदेखील बदलू शकत नाहीत. तर मग व्यंतरादी साधारण देव-देवतांची काय कथा ?

जरा विचार करा की, "कार्तिकेयानुप्रेक्षाचे उक्त कथन गृहीत मिथ्यात्वाच्या निषेधासाठी केलेले आहे, त्यास सार्वभौम मानू नये" ह्याचा काय अर्थ होऊ शकतो ?

काय हे सत्य नाही, केवळ गृहीतमिथ्यात्व सोडविण्यासाठी असेच सांगितलेले आहे ? असत्याच्या आश्रयाने गृहीत मिथ्यात्व सुटू शकते काय ? वेळेच्या पूर्वी कोणतेही कार्य केले जाऊ शकते काय ? समयाच्या पूर्वी करण्यामध्येच पुरुषार्थ आहे काय ? शेष कार्य पुरुषार्थाविनाच होते काय ? वरील सत्याला (कार्तिकेयानुप्रेक्षामध्ये सांगितलेल्या सत्याला) सार्वभौमिक व सार्वकालिक न मानल्यानंतर असे काही प्रश्न निर्माण होतात. तसाच मग सर्वज्ञतेचा प्रश्नसुद्धा निर्माण झालेलाच आहे.

आता राहिला एक पुरुषार्थ हीनतेचा प्रश्न ? त्या संदर्भात आमचे म्हणणे आहे की क्रमबद्धपर्यायाचे कथन सर्वत्र पुरुषार्थाला समोर ठेवूनच केले आहे, त्याची उपेक्षा करून नव्हे.

'होनहार'ची चर्चा करताना भैया भगवतीदासजीदेखील पुरुषार्थाची प्रेरणा देण्यास विसरले नाही. त्यांच्या दृष्टीमध्ये खरी 'होनहार' अर्थात क्रमबद्धपर्याय पुरुषार्थनाशक नाही, परंतु पुरुषार्थ-प्रेरक आहे.

त्या पदात ते लिहितात :—

"जो जो देखी वीतराग ने, सो सो होसी वीरा रे।
अनहोनी होसी नहिं क्यों ही, काहे होत अधीरा रे ।।

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



त्या पदामध्ये पुढे पुरुषार्थाची प्रेरणा देत असताता लिहीतात :—

"तू सम्हारि पौरुष बल अपनो, सुख अनंत तो तीरा रे।"

जरी कार्याच्या उत्पत्तीमध्ये अनेक कारणं मानले आहेत, ज्यांना पंच समवाय या नावाने ओळखतात; तरीदेखील त्या सर्वांमध्ये पुरुषार्थास विशिष्ट स्थान प्राप्त आहे, कारण प्रयत्न या संदर्भात शक्य आहे, भवितव्य (होनहार), काललब्धी इत्यादीमध्ये शक्य नाही. क्रमबद्धपर्याय अर्थात् सम्यक् नियती मानण्यामध्ये लोकांना पुरुषार्थाची अप्रासंगिकता दिसते, (पुरुषार्थ दिसत नाही). परंतु सम्यक्-नियतीमध्ये अन्य कारणांची उपेक्षा नसल्यामुळे असे काही वाटण्याचे कारण नाही. हे वरील कथनामध्ये स्पष्ट केले आहे.

आचार्यकल्प पंडित टोडरमलजींनी मुक्तमार्गाच्या संदर्भात या विषयासंबंधाने चांगली मीमांसा केली आहे. त्याचा काही अंश लक्षात घेण्यासारखा आहे, तो असा :—

"येथे प्रश्न असा आहे की मोक्षाचा उपाय काललब्धी आल्यावर होतो किंवा मोह इत्यादीच्या उपाशमादीनंतर होतो, किंवा आपल्या पुरुषार्थाने उद्यम केल्यावर बनतो हे सांगा. जर आरंभीच्या दोन कारणांच्या प्राप्तीने होतो तर आम्हाला उपदेश कशासाठी देता ? आणि पुरुषार्थाने होतो तर उपदेश तर सर्व ऐकतात, त्यामध्ये काही उपाय करू शकतात, काही करू शकत नाहीत; याचे कारण काय?"

समाधान :— एका कार्यामध्ये अनेक कारण मिळतात (प्राप्त होतात). जेव्हा उपाय होतो (कार्य सिद्धी होते), तेव्हा तर पूर्वोक्त तीन्ही कारण मिळालेले असतात. आणि कार्य घडत नाही, तेव्हा तीन्हीही कारण मिळालेले नसतात.

पूर्वोक्त तीन कारण सांगितले आहेत त्यामध्ये काललब्धी आणि होनहार (भवितव्य) काही वस्तु नाही. ज्यावेळी कार्य झाले तीच काललब्धी आहे, आणि जे कार्य झाले ती होनहार. आणि जे कर्माचे उपशमादी आहेत ती पुद्‌गलाची शक्ती आहे, त्याचा आत्मा कर्ता-हर्ता नाही. तथा पुरुषार्थाने उद्यम करतो तो आत्म्याचे कार्य आहे; म्हणून आत्म्याला पुरुषार्थाने उद्यम करण्याचा उपदेश देतात.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्या कारणाने कार्यसिद्धी होते आत्म्याने त्या कारणरूपाने उद्यम करावा, त्यावेळी अन्य कारण मिळतातच मिळतात. आणि कार्याची सिद्धी होते किंवा होतही नाही, त्या कारणरुपाने जर उद्यम केला तर अन्य कारण मिळाल्यास कार्यसिद्धी होते, आणि न मिळाल्यास कार्य सिद्धी होत नाही.

म्हणून जिनमतामध्ये जो मोक्षाचा उपाय सांगितला आहे, त्याने मोक्ष होतोच होतो. म्हणून जो जीव पुरुषार्थाने जिनेश्वरांच्या उपदेशानुसार मोक्षाचा उपाय करतो त्यास कललब्धी आणि होनहार देखील होतो, आणि कर्माचे उपशमादी सुद्धा होतात तेव्हा तो असा उपाय करतो. म्हणून जो पुरुषार्थाने मोक्षाचा उपाय करतो त्यास सर्व कारणे मिळतात. आणि त्यास अवश्य मोक्षाची प्राप्ती होते. असा निश्चय करावा. तथा जो जीव पुरुषार्थाने मोक्षाचा उपाय करीत नाही त्याला काललब्धी आणि होनहार देखील नाही आणि कर्माचे उपशमादी देखील नाहीत तेव्हा तो उपाय देखील करीत नाही (असे जाणावे) म्हणून तो पुरुषार्थाने मोक्षाचा उपाय करीत नाही त्याला इतरही कारण मिळत नाहीत आणि त्याला मोक्षाची प्राप्ती होत नाही – असा निर्णय करावा."[1]

वरील कथनामध्ये पंडित टोडरमलजींनी कार्याचा निष्पन्नतेमध्ये पुरुषार्थाला मुख्य करून काललब्धी इत्यादी अन्य कारणांची देखील अनिवार्य उपस्थिती सांगितली आहे.

वस्तुतः पाच समवायांचा समवायच कार्याचा उत्पादक आहे, म्हणून असे म्हणणे कोरी कल्पनाच आहे की पाच समवायामधून जर एकही न मिळाल्यास कार्य होणार नाही, कारण असे घडतच नाही की कार्य होणार आहे आणि कोणीही समवाय मिळाला नाही. जेव्हा कार्य व्हावयाचे असते तेव्हा सर्व समवाय असतातच असतात. पुरुषार्थाला मुख्य करून हे पं. टोडरमलजींनी अत्यंत स्पष्ट केले आहे.

---

1 मोक्षमार्ग प्रकाशक, पान ३०९

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पुरुषार्थ देखील अन्य समवायांच्या अनुसारच होतो. पाच समवायामध्ये काही परस्पर संघर्ष नाही, परंतु अद्‌भूत सुमेळ आहे. म्हणून हे म्हणावे लागेल की जर होनहार नसेल किंवा काललब्धी पक्व नसेल तर पुरुषार्थाने काय होणार आहे ? किंवा निमित्त नाही मिळाल्यास होनहार काय करणार आहे किंवा पुरुषार्थ काय करील? याप्रमाणे केलेले कथन मानसिक व्यायामाशिवाय दुसरे काही नाही.

तसे तर पुरुषार्थाशिवाय कोणतेही कार्य होऊ शकत नाही. सर्वत्रच अन्य समवाय सापेक्ष पुरुषार्थाचे साम्राज्य आहे. मुक्ती कार्याच्या उत्पत्ती, स्थिती, वृद्धी आणि पूर्णतेमध्ये देखील काललब्धी इत्यादी अन्य समवायांसह पुरुषार्थाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे, तरी-देखील मुक्तीच्या मार्गाच्या संदर्भात पुरुषार्थाची व्याख्या भिन्नच आहे.

पुरुषार्थसिद्धउपायाच्या भाषा टीकेमध्ये ९ छंदाच्या भावार्थामध्ये पं. टोडरमलजींनी पुरुषाची व्याख्या अशी केली आहे :—

"पुरु = उत्तम चेतना गुणामध्ये, सेते = स्वामी होऊन प्रवर्तन करील त्याला पुरुष म्हणतात. ज्ञानदर्शन चेतनेच्या नाथास (स्वामीला) पुरुष म्हणतात."

अर्थ अर्थात् प्रयोजन याप्रमाणे उत्तम चेतना गुणाचा स्वामी होऊन त्यामध्येच प्रवर्तन करणे ज्याचे प्रयोजन आहे, त्यास पुरुषार्थ म्हणतात. दुसऱ्या शब्दामध्ये मुक्तीच्या मार्गामध्ये आत्मानुभवनाची प्राप्तीच पुरुषार्थ आहे.

क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेच्या अवस्थेमध्ये वरील पुरुषार्थ विशेषकरून जागृत होतो. कारण अनादी काळापासून जगाच्या परिणमनाला आपल्या इच्छेनुकूल करण्याच्या आकूलतेने व्याकूळ झालेला प्राणी जेव्हा हा अनुभव करतो की जगाच्या परिणमनामध्ये मी काहीही फेरफार करू शकत नाही तेव्हा त्याचा उपयोग सहजच जगापासून हटून आत्मसन्मुख होतो; आणि तेव्हा ही श्रद्धा बनते की

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मी आपल्या क्रमनियमितपर्यायामध्ये सुद्धा काही फेरफार करू शकत नाही. तेव्हा पर्यायावरूनही दृष्टी हटते आणि स्व-स्वभावाकडे ढळते.

दृष्टी स्वभावाकडे वळणेच (ढळणेच) मुक्तीच्या मार्गातील अनंत पुरुषार्थ आहे. क्रमबद्धपर्यायाची श्रद्धा करणाऱ्यास वरील श्रद्धेच्या वेळी (काळामध्ये) आत्मोन्मुखी अनंत पुरुषार्थ होण्याचा आणि सम्यग्दर्शन प्रगट होण्याचा क्रम देखील सहज असतो.

कर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त या जगाला परामध्ये किंवा पर्यायामध्ये काही फेरफार करण्यामध्येच पुरुषार्थ दिसतो, परंतु पर आणि पर्यायासंबंधी विकल्पापासून विराम घेऊन स्वमध्ये स्थिर होण्यामध्ये पुरुषार्थ दिसत नाही. सर्वज्ञ भगवान परामध्ये व आपल्या पर्यायायामध्ये देखील फेरफार करीत नाहीत, म्हणून काय ते पुरुषार्थ-हीन होतील ? त्यांचा मोक्ष पुरुषार्थ नाही काय ?

त्यांच्या वीर्यगुणांचा पूर्ण विकास झालेला आहे. तरीदेखील ते अनंतवीर्याचे धनी अर्थात् पूर्ण पुरुषार्थी नाहीत काय ? परामध्ये किंवा पर्यायामध्ये काहीही फेर-फार न करता देखील जर ते अनंत पुरुषार्थी होऊ शकतात तर मग आम्ही का नाही ? असे काही प्रश्न त्यांच्या समोर आहेत, ज्यांना क्रमबद्धपर्याय मानण्यामध्ये पुरुषार्थ उडतो असे वाटते.

वरील संदर्भामध्ये स्वामीजींचे विचारदेखील दृष्टव्य आहेत:—

"प्रश्न :— जेव्हा सर्वच क्रमबद्ध आहे आणि त्यामध्ये जीव काहीही परिवर्तन करू शकत नाही तर मग जीवामध्ये पुरुषार्थ कुठे राहिला ?

उत्तर :— सर्व काही क्रमबद्ध आहे—या निर्णयामध्येच जीवाचा अनंत पुरुषार्थ समाविष्ट आहे, आणि जे क्रमबद्ध आहे त्यामध्ये परिवर्तन करणे हे काही आत्म्याच्या पुरुषार्थाचे कार्य नाही. भगवान जगाचे सर्व काही जाणतात, ते त्यात काही परिवर्तन करू शकत नाहीत, म्हणून काही त्यामुळे भगवंतांचा पुरुषार्थ थोडाच परिमित झाला ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



नाही, नाही; भगवंतांचा अनंत अपरिमित पुरुषार्थ ज्ञानामध्ये समाविष्ट आहे. भगवंतांचा पुरुषार्थ स्वतःमध्ये आहे, परामध्ये नाही. पुरुषार्थ जीवद्रव्याची पर्याय आहे, म्हणून त्याचे कार्य जीवद्रव्याच्या पर्यायामध्ये होते; परंतु जीवाच्या पुरुषार्थाचे कार्य परामध्ये होत नाही.

जो हे मानतो की सम्यग्दर्शन आणि केवलज्ञान दशा आत्म्याच्या पुरूषार्थविना होते, तो मिथ्यादृष्टी आहे. ज्ञानी प्रतिक्षण स्वभावाच्या पूर्णतेच्या पुरूषार्थाची भावना करतो.

अहो ! ज्यांचा पूर्ण ज्ञायकस्वभाव प्रगट झाला आहे, ते केवलज्ञानी आहेत. त्यांच्या ज्ञानामध्ये सर्व काही एकाच वेळी ज्ञात होते. अशी प्रतीती (अनुभव) केल्यावर तो करणारा स्वतःदेखील निजदृष्टीने पाहणाराच राहिला; ज्ञानाच्या व्यतिरिक्त पराचे कर्तृत्व किंवा रागादिक सर्व काही अभिप्रायामधून दूर झाले अशा द्रव्यदृष्टीच्या बलाने, ज्ञानाच्या पूर्णतेच्या भावनेने तो वस्तुस्वरूपाचे चिंतवन करतो.

ही भावना ज्ञानीची आहे, अज्ञानी मिथ्यादृष्टीची नाही; कारण मिथ्यादृष्टी जीव पराचे कर्तृत्व मानतो आणि कर्तृत्वाची मान्यता असलेला जीव ज्ञातृत्वाची यथार्थ भावना करू शकत नाही, कारण कर्तृत्व आणि ज्ञातृत्वाचा परस्परामध्ये विरोध आहे.

सर्वज्ञ भगवंतांनी आपल्या केवज्ञानामध्ये जसे पाहिले आहे, तेच होते. जर आम्ही त्यामध्ये काही परिवर्तन करू शकत नाही, तर त्यात पुरुषार्थ राहिला नाही याप्रमाणे जे मानतात ते अज्ञानी आहेत.

रे भाऊ ! तू कोणाच्या ज्ञानाने (जाणतोस) हे सर्व बोलतोस? स्वतःच्या ज्ञानाने की दुसऱ्याच्या ज्ञानाने ? जर तू आपल्या ज्ञानानेच बोलतो आहेस तर मग ज्या ज्ञानाने सर्वज्ञांचा आणि सर्व द्रव्यांच्या व्यवस्थेचा निर्णय केला आहे त्या ज्ञानामध्ये स्वद्रव्याचा निर्णय होणार नाही – हे कसे होऊ शकते ? स्वद्रव्याचा निर्णय करणाऱ्या ज्ञानामध्ये अनंत पुरूषार्थ आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



तू आपल्या तर्कामध्ये म्हटले आहेस की 'सर्वज्ञ' भगवंतांनी आपल्या केवलज्ञानामध्ये जसे पाहिले आहे तसे होते; हे तू केवळ बोलण्यासाठीच म्हटले आहे की तुला सर्वज्ञांच्या केवलज्ञानाचा निर्णय झाला आहे ?

जर तुला केवलज्ञानाचा निर्णय नसेल तर सर्वप्रथम हा निर्णय कर आणि जर तू सर्वज्ञ भगवंतांचा निर्णय करून हे म्हणत असतील तर सर्वज्ञ भगवंतांच्या केवलज्ञानाचा निर्णय करणाऱ्या ज्ञानामध्ये अनंत पुरूषार्थ येऊनच जातो. सर्वज्ञाचा निर्णय करण्यामध्ये ज्ञानाचे अनंतवीर्य कार्य करते, तरीदेखील त्यास नाकारून तू हे म्हणतोस की क्रमबद्धपर्यायामध्ये पुरुषार्थ कुठे आहे ?

खरे तर असे आहे की तुला पूर्ण केवलज्ञानाच्या स्वरूपाचीच श्रद्धा नाही, आणि केवलज्ञानाचा स्वीकार करण्याचा अनंत पुरुषार्थ तुझ्यात प्रगट झाला नाही. केवलज्ञानाचा स्वीकार करण्यामध्ये अनंत पुरुषार्थाचे अस्तित्व येऊन जाते, तथापि जर तू त्यास स्वीकारीत नाहीस तर म्हणावे लागेल की तू केवळ गप्पा मारतो आहेस, केवळ बोलतो आहेस, परंतु तुला केवलज्ञानाचा निर्णय नाही. जर सर्वज्ञाचा निर्णय असता तर पुरुषार्थाची आणि भवाची शंका राहिली नसती. यथार्थ निर्णय झाला आणि पुरुषार्थ प्रगट होणार नाही असे होऊ शकत नाही."[1]

खोलवर विचार केल्यास क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयामध्येच अनंत पुरुषार्थ येऊन जातो. क्रमबद्धपर्यायाचा निर्णय स्वयं अनंत पुरुषार्थाचे कार्य आहे, कारण क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयामध्ये सर्वज्ञतेचा निर्णय येऊन जातो. ज्याप्रमाणे सर्वज्ञतेची प्रतीती–आस्था याशिवाय क्रमबद्धपर्यायाचा निर्णय शक्य नाही; त्याप्रमाणे क्रमबद्धपर्यायाच्या सम्यक् निर्णयाशिवाय सर्वज्ञतेची देखील खरी प्रतीती शक्य नाही.

आता राहिली परकर्तृत्वाच्या अहंकाराची बाब, ज्याला हे अज्ञानी जग पुरुषार्थ मानते, परंतु तो पुरुषार्थ तर तुटलाच पाहिजे

---

[1] ज्ञानस्वभाव-ज्ञेयस्वभाव, पृष्ठ २४६

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



कारण तो खरा पुरुषार्थच नाही, ती तर नपुंसकता आहे. जर क्रमबद्ध-पर्यायाच्या श्रद्धेने परकर्तृत्वाचा अहंकार तुटला नाही तर समजावे की 'क्रमबद्धपर्याय' त्याच्या लक्षात आलाच नाही. क्रमबद्धपर्यायाच्या खऱ्याश्रद्धेचे फल तर कर्तृत्वाचा अहंकार तुटणे (संपणे) आणि अन्तरोन्मुखी सम्यक् पुरुषार्थाची जागृती होणे हे आहे.

ज्या लोकांना क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेमध्ये पुरुषार्थ नष्ट होते असे वाटते त्या लोकांना वस्तुतः पुरुषार्थाचे खरे स्वरूपच लक्षात आले नाही. ते परकर्तृत्व आणि पर्यायाच्या फेरबदल करण्यालाच पुरुषार्थ मानून बसले आहेत. त्यांना सर्वप्रथम पुरुषार्थाच्या सम्यक्स्वरूपाचा गंभीरतेने विचार केला पाहिजे.

आमचा विश्वास आहे की त्यांच्या दृष्टीमध्ये पुरुषार्थाचे खरे स्वरूप स्पष्ट होताच त्यांची शंका-आशंका स्वतः होऊन नाहीशी होईल. याशिवाय त्यांच्या वरील शंकेचे निरसण शक्य नाही, म्हणून त्यांना पुरुषार्थाच्या खऱ्या स्वरूपाचा गंभीरपणे विचार करण्याचे विनम्र सांगणे आहे.

कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथाच्या गाथा ३०२ च्या भावार्थ आणि उत्थानिकेमध्ये सर्वज्ञांना धर्माचे मूळ म्हटले आहे.

जो व्यक्ती सर्वज्ञ भगवंतांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने आणि पर्यायरूपाने जाणतो, तो आपल्या आत्म्याला देखील जाणतो. आचार्य कुंदकुंददेव अत्यंत स्पष्ट शब्दात लिहीतात की :–

"जो जाणदि अरहंतं दव्वत्तगुणत्तपज्जयत्तेहिं।
सो जाणदि अप्पाणं मोहो खलु जादि तस्स लयं ॥[1]

जो जीव अरहंत अर्थात् सर्वज्ञ भगवंतांना द्रव्यत्वपाने, गुणरूपाने आणि पर्यायरूपाने जाणतो, तो आपल्या आत्म्याला देखील जाणतो, आणि त्याचा मोह अवश्य नाश पावतो."

---

[1] प्रवचनसार गाथा ८०

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



या गाथेमध्ये मोहाला जिंकण्याचा उपाय सांगितला आहे. यामध्ये विशेष लक्ष देण्या योग्य हे आहे की मूलरूपामध्ये तर असे म्हटले आहे की – जो आत्म्याला जाणतो, त्याचा मोह (मिथ्यात्व) नाहीसा होतो, परंतु त्यासोबतच हे देखील म्हटले आहे की जो अरहंत भगवंतांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने आणि पर्यायरूपाने जाणतो, तो आपल्या आत्म्याला जाणतो. याप्रमाणे मिथ्यात्वाच्या नाशासाठी अरहंतभगवंतांना जाणणे देखील अनिवार्य सांगितले आहे. केवळ अरहंतांना नाही, परंतु त्यांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने आणि पर्याय-रूपाने जाणणे अनिवार्य आहे, असे म्हटले आहे.

आपला आत्मा आणि अरहंत भगवंतांचे द्रव्य-गुण तर समान शुद्धच आहेत. वर्तमान पर्यायामध्ये अंतर आहे आपला पर्याय अल्पविकसित आणि अशुद्ध आहे. त्यांची पर्याय पूर्ण विकसित आणि शुद्ध आहे. यावरून स्पष्ट आहे की आचार्यदेवांनी पूर्णता आणि शुद्धतेला जाणायला सांगितले आहे. याप्रमाणे त्यांनी पूर्ण वीतरागता आणि सर्वज्ञतेच्या ज्ञानाला मोह (मिथ्यात्व) नाशासाठी अनिवार्य मानले आहे. यामुळेच आत्मानुभूतीसोबत खऱ्या देव-गुरु-शास्त्राची सम्यक् ओळख देखील सम्यक्त्व प्राप्तीसाठी अनिवार्य आहे.

जेव्हा सर्वज्ञता आमचे लक्ष्य आहे, प्राप्तव्य आहे, आदर्श आहे, त्यास प्राप्त करण्यासाठीच सर्व प्रयत्न आहे; तर मग त्याच्या खऱ्या स्वरूपाचे परिज्ञान झाल्याशिवाय त्यास प्राप्त करण्याचा मार्ग कसा आरंभ होऊ शकतो ?

जैनदर्शनाचा मूलाधार असलेली सर्वज्ञताच आज संकटामध्ये पडली आहे. आमचे काही धुरंधर धर्मबंधु पक्षव्यामोहामध्ये इतके गुरफटलेले आहेत की सर्वज्ञतेमध्ये देखील मीन-मेख (शंका) काढीत आहेत. आचार्य समंतभद्रांना 'कलिकालसर्वज्ञ' यासाठी म्हणत असत की त्यांनी कलिकालामध्ये 'डंके की चोट' सर्वज्ञता सिद्धी केली होती. ते काही स्वयं सर्वज्ञ नव्हते, परंतु त्यांनी कलिकालाच्या जोराने संकटापन्न झालेल्या सर्वज्ञतेला पुनर्स्थापित केले होते, म्हणून त्यांना 'कलिकाल सर्वज्ञ' म्हणत. आज परत कलिकाल जोर करीत आहे,

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आज युगाला परत एक संमतभद्र हवे आहेत की जे 'डंके की चोट' सर्वज्ञता सिद्ध करू शकतील, पुन्हा स्थापित करून करू शकतील.

मोहाशा नाश करून आत्मश्रद्धान-ज्ञान आत्मलीनता इच्छिणाऱ्यांना अनंत पुरुषार्थपूर्वक मरावे लागले तर मरणप्राय कष्ट घेऊनही (मरूनही) सर्वज्ञतेचा निर्णय समावेशित आहे. सर्वज्ञता आणि क्रमबद्धपर्यायाचा निर्णय ज्ञायकस्वभावाच्या सन्मुख होऊनच होतो. ज्ञापक स्वभावाची सन्मुखताच मुक्ती मंदिराची पहिली पायरी आहे; त्यावर आरोहण करण्याचा अनंत पुरुषार्थ क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेमध्ये समावेशित आहे.

याप्रमाणे 'सर्वज्ञता' आणि क्रमबद्ध पर्याय एकप्रकारे परस्परानु-बद्ध आहेत. एकाचा निर्णय (खरी जाणीव) दुसऱ्याच्या निर्णयाशी जोडलेला आहे. दोन्हींचाही निर्णय ज्ञानस्वभावी निज आत्म्याच्या सन्मुख होऊनच होतो. जर कोणी परोन्मुखीवृत्तीने 'सर्वज्ञता' किंवा 'क्रमबद्धपर्याया'चा निर्णय करण्याचा प्रयत्न करील तर तो कधी यशस्वी होणार नाही.

सर्वज्ञता प्राप्त करण्याचा प्रारंभिक उपाय सर्वज्ञतेचे स्वरूप समजून घेणे आहे. ज्याप्रमाणे तीर्थंकर मातेच्या गर्भात येतात तेव्हा, त्यापूर्वी तिच्या स्वप्नात येतात. त्याचप्रमाणे ज्या आत्म्यामध्ये सर्वज्ञता प्रगट होते, तेव्हा प्रगट होण्यापूर्वी त्यास सर्वज्ञचे ज्ञान होते; सर्वज्ञता जाणल्याशिवाय प्राप्त केली जाऊ शकत नाही.

अद्याप तर सर्वज्ञताच लक्षात येत नाही, प्रगट होण्याचा प्रश्न कुठे? सर्वज्ञता जाणल्याशिवाय, तिच्या स्वीकार केल्याशिवाय धर्माची उत्पत्ती संभवत नाही त्यामुळे तिची स्थिती, वृद्धी आणि पूर्णतेचा प्रश्नच कुठे निर्माण होतो.

सर्वज्ञतेच्या श्रद्धेशिवाय देव-शास्त्र-गुरुजी खरी श्रद्धादेखील संभवत नाही. कारण खऱ्या देवाचे स्वरूपच सर्वज्ञता आणि वीतरागता आहे. शास्त्राचे मूळ देखील सर्वज्ञ आहे. गुरूदेखील सर्वज्ञकथित मार्गानुगामी असतात. साधूंना आगम चक्षु म्हटले आहे.[1] सर्वज्ञ

---

[1] आगमचक्खु साहू

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



कथित मार्गाचे निरूपण शास्त्रामध्ये आहे शास्त्राच्या प्रामाणिकतेचा अभाव असेल तर गुरूंचे स्वरूपदेखील कसे स्पष्ट होईल ? म्हणून देव-शास्त्र-गुरूंचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी सर्वज्ञतेचे स्वरूप समजणे अति आवश्यक आहे.

म्हणूनच तार्किकचक्रचूडामणि समंतभद्र आचार्यांनी देव-शास्त्र गुरूंच्या सम्यक्श्रद्धेला सम्यग्दर्शनाच्या स्वरूपामध्ये समावेशित केले आहे.

ते लिहीतात :–

"श्रद्धानं परमार्थानामाप्तागमतपोभृताम् ।
त्रिमूढापोढमष्टाङ्गं सम्यग्दर्शनमस्मयम् ।।[1]

तीन मूढता आणि आठ मदाने रहित आणि आठ अंगासहित खऱ्या देवशास्त्रगुरूंचे श्रद्धानच सम्यग्दर्शन आहे.

काही लोकांचे म्हणणे आहे की आपण 'क्रमबद्धपर्यायाला' सर्वज्ञासोबत का गुंडाळता ? त्यास सरळ-सरळ वस्तुरूपाने का सिद्ध करीत नाहीत ?

भाऊ ! आम्ही गुंडाळीत नाही, तोच गुंडाळलेला आहे. कारण सर्वज्ञतेच्या श्रद्धेशिवाय क्रमबद्धाची श्रद्धा आणि क्रमबद्धाच्या श्रद्धे-शिवाय सर्वज्ञतेची श्रद्धा शक्य नाही.

सर्वज्ञतेच्या आधाराशिवायदेखील क्रमबद्धपर्याय सिद्ध करता येतो, वस्तु स्वरूपाच्या आधारावर आम्ही विस्ताराने 'क्रमबद्ध' यापूर्वी सिद्ध केलेले आहेच तरीदेखील सर्वज्ञपासून त्यास वेगळे करण्याचा आग्रह का ?

सर्वज्ञतेच्या आधारावर क्रमबद्धपर्याय सिद्ध करण्याचे एक कारण असे ही आहे की सवज्ञता जैनदर्शनामध्ये सर्वमान्य आहे. त्यामध्ये कोणाचाही विवाद नाही. म्हणून क्रमबद्धपर्याय सिद्ध करण्याचा हा एक पक्का आधार आहे तसेच ज्यांना सर्वज्ञतेची वर-वरच खरे परंतु थोडीफार श्रद्धा आहे; त्यांना सर्वज्ञतेच्या आधारावर क्रमबद्ध समजणे चांगले सोपे जाते.

---

1 रत्नकरंड श्रावकाचार, श्लोक ४

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



दुसरे असे की क्रमबद्धपर्यायाचा विषय अतिसूक्ष्म आहे; तो सर्वज्ञतेचा आधार घेतल्याशिवाय साधारण बुद्धी असलेल्यांच्या लक्षात येणे अशक्य जरी नसले तरी कठीण अवश्य आहे.

मी आपणास विचारतो की सर्वकथित आगमाच्या आधाराशिवाय आपण मला एकलाख योजन ऊंच असलेला सुमेरू पर्वत समजाऊन सांगा; शेवटी तुम्हाला हेच सांगावे लागेल की शास्त्रामध्ये तसे लिहीले आहे आणि शास्त्र सर्वज्ञकथित आहेत. जर आपण एवढा स्थूल एकलाख योजनाचा सुमेरू पर्वतदेखील सर्वज्ञता आणि आगमाशिवाय सिद्ध करू शकत नाही, तरमग 'क्रमबद्धपर्याय' सारखा सूक्ष्म विषय समजावून सांगताना आम्हाला सर्वज्ञ आणि सर्वज्ञकथित आगमाचा आधार घेऊ नका असे का सांगता ?

आमचा विश्वास सर्वज्ञता आणि सर्वकथित आगमावर नाही काय ? जर आहे तर असा प्रश्न का ? सर्वज्ञतेचा आधार घेऊ नका किंवा सोडा असा हट्ट का ? असे वाटते की आपला सर्वज्ञतेवर पूर्ण विश्वास नाही किंवा सर्वज्ञतेचे स्वरूप आपल्या दृष्टीमध्ये पूर्णपणे स्पष्ट नाही आणि सर्वज्ञांच्या सत्तेचा (अस्तित्वाचा) नकार देण्याची आपणामध्ये हिंमत नाही; म्हणून कुठली ना कुठली सबब काढून या समर्थ हेतुपासून आपला जीव वाचवू इच्छितात.

सर्वज्ञतेचे स्वरूप आपल्या दृष्टीमध्ये स्पष्ट असते आणि त्यावर आपला विश्वासही असता तर क्रमबद्धपर्याय देखील सहज स्वीकृत झाली असती. मग हीं तक्रार देखील राहीली नसती की आपण क्रमबद्धपर्यायाच्या सिद्धीसाठी सर्वज्ञतेचा आधार का घेता ?

थोडावेळ क्रमबद्धपर्यायाचा प्रश्न सोडून द्या. तरीदेखील सर्वज्ञतेचा निर्णय करावा लागेलच ना ? त्याशिवाय तर देव-शास्त्र-गुरूंचे स्वरूप स्पष्ट होणारच नाही.

देव-शास्त्र-गुरूंच्या रक्षणाचा जयघोष करणारे देव-शास्त्र-गुरूंच्या खऱ्या स्वरूपाचा तरी कधी गंभीर विचार करण्याचे कष्ट

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



घेतलेत का? सर्वज्ञता समजल्याशिवाय देव-शास्त्र-गुरूंचें स्वरूप समजले किंवा समजावले जाऊ शकते काय?

जे आगमाचे संरक्षक आहेत त्यांना हे सांगावे लागेल की आगमाची सर्वात पहिली शर्त आहे की– ते सर्वज्ञकथित (आप्तोपज्ञ) आहे.[1] आणि हा सर्वज्ञ कथित आगम निश्चित भविष्याच्या असंख्य घोषणांनी भरलेला आहे.

करणानुयोगाचा एकही विषय सर्वज्ञकथित आगमाच्या आधारा शिवाय सिद्ध केला जाऊ शकतो काय? आठ कर्मांची सत्ता, त्याचा बंध, उदय, संक्रमण, उत्कर्षण, अपकर्षण, उद्वेलन इत्यादी सर्वज्ञ-कथित आगमाच्या आधाराशिवाय सिद्ध करू शकतो काय? याचप्रमाणे अंधःकरण, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरणाच्या परिणामांच्या सिद्धीचा आधार काय आहे?

या सर्व विषयाच्या वेळी आणि या प्रकारच्या अन्य विषयाच्या पठनपाठनाच्या वेळी आपणास हा प्रश्न का उपस्थित झाला नाही की सर्वज्ञकथित आगमाच्या आधाराशिवाय या सर्वांना सिद्ध केले पाहिजे. आजचा हा नवा प्रश्न का निर्माण झाला?

बन्धु! म्हटलेच आहे ना की सर्वज्ञ हे धर्माचे मूळ आहे, मग त्यानुसार धर्मरक्षकांना सर्वज्ञांचा निर्णय करावाच लागेल. शेवटी एक जैनदर्शनच हे एक असे दर्शन आहे की प्रत्येक आत्मा हा परमात्मा बनू शकतो असे प्रतिपादितच करतो केवळ प्रतिपादितच करतो असे नाही, परमात्मा बनण्याचा मार्ग दाखवितो त्यावरून चालण्याची प्रेरणा देतो आणि छाती ठोकून हा विश्वास देतो की या मार्गावर चालणारा अवश्य परमात्मा बनतो.

परमात्मा होण्यापूर्वी परमात्म्याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक नाही काय? जर आहे, तर सर्वज्ञतेच्या चर्चेला विराम द्या असा आग्रह का? क्रमबद्धपर्यायच नव्हे, आचार्यांनी सर्व जिन सिद्धांतांचे प्रतिपादन सर्वज्ञतेच्या आधारावरच केले आहे. आम्ही कोण-कोणत्या सिद्धांताच्या प्रतिपादनामध्ये सर्वज्ञ आणि सर्वज्ञकथित आगमाला तिलांजली देणार आहोत?

---

1 आचार्य समन्तभद्र : रत्नकरण्डश्रावकाचार, श्लोक ९

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



परमात्मा बनण्यासाठी आपल्या आत्म्याला जाणणे-अनुभवणे आवश्यक नाही काय ? श्री कुन्दकुन्द आचार्यांनी आपल्या कथनामध्ये स्पष्टच लिहीले आहे की जो अरहंतांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने आणि पर्यायरूपाने जाणतो तो आत्म्याला जाणतो, आणि जो आपल्या आत्म्याला जाणतो तो मोहाचा नाश करतो.

वरील कथनामध्ये स्पष्ट निर्देश केला आहे की मोहाचा नाश करण्यासाठी आपल्या आत्म्याला जाणणे जरूरी आहे आणि आपल्या आत्म्याला जाणण्यापूर्वी अरहंत (सर्वज्ञ) भगवंतांना जाणणे जरूरी आहे.

देव-शास्त्र-गुरूंचे रक्षण त्यांचे स्वरूप जाणल्याशिवाय होईल काय ? ते तर आपल्या स्वरूपामध्ये नेहमी सुरक्षित असतात. त्यांना आमच्या कडून रक्षणाची आवश्यकता नसते. जर आम्हाला स्वतःची सुरक्षा हवी असेल तर त्यांचे खरे स्वरूप समजून घेतले पाहिजेत. त्यातच आमचे आणि आमच्या धर्माचे रक्षण होईल. धर्म रक्षणाच्या गप्पा मारणाऱ्यांनी या गोष्टीकडे ही थोडे लक्ष दिले पाहिजे.

प्रवचनसारच्या मध्ये कुन्दकुन्दाचार्यांनी म्हटले आहे की :-

"सव्वे वि य अरहंता तेण विधाणेण खविदकम्मंसा ।
किच्चा तधोवेदसं णिव्वादा ते णमो तेसिं ।।

सर्व अरहंत भगवंतांनी त्याच विधीने कर्माचा क्षय करुन मोक्ष प्राप्त केला आहे, आणि अन्य आत्म्यांना परमात्मा बनण्याचा उपदेशदेखील दिला आहे, अर्थात् तोच मार्ग सांगितला आहे. अशा अरहंतांना नमस्कार असो.

त्याच विधीने अर्थात् ८०-८१ व्या गाथेमध्ये सांगितलेल्या विधीने त्यांनी स्वतः मोक्षप्राप्त केला आणि उपदेशदेखील तोच दिला. ८०-८१ व्या गाथेमध्ये सांगितले आहे की, जो अरहंत भगवंतांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने आणि पर्यायरूपाने जाणतो तो आपल्या आत्म्याला जाणतो आणि त्याचा मोह नष्ट होतो; त्यानंतर राग-द्वेष सोडून तो शुद्ध आत्मा प्राप्त करतो अर्थात् पूर्ण वीतरागता आणि सर्वज्ञता प्राप्त करतो.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सर्वज्ञता प्राप्त करण्याची ही विधी आहे. ज्या विधीने सर्व अरहंतांनी सर्वज्ञता प्राप्त केली आणि प्राप्त करण्याचा उपदेश दिला. प्रवचनसारच्या ८२ व्या गाथेच्याच टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी तर असे म्हटले आहे की सर्वज्ञता प्राप्त करण्याचा इतर प्रकार असंभव आहे. तेथे आचार्य अमृतचंद्र लिहीतात :–

"अधिक प्रलाप पुरे, माझी मति व्यवस्थित झाली आहे"[1]

"भगवंतांनी अनुभूत आणि सांगितलेला हाच एक मोक्षाचा पारमार्थिक मार्ग आहे. याप्रमाणे बुद्धीला व्यवस्थित करतात.[2]

अहो ! ज्याची बुद्धी अव्यवस्थित आहे त्यास जग अव्यवस्थित दिसतं. ज्याप्रमाणे चालत्या आगगाडीत बसलेल्या व्यक्तीला जमीन धावताना दिसते, परंतु जेव्हा तो विवेकपूर्वक विचार करतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की जमीन तर आपल्या जागी स्थिर आहे, धावतोय तर मीच, त्याचप्रमाणे अव्यवस्थित मती असलेल्या व्यक्तीला जग अव्यवस्थित दिसतं, आणि जेव्हा तो गंभीर विचार करतो तेव्हा लक्षात येते की जगाला व्यवस्थित करायचे नाही, ते तर व्यवस्थितच आहे; मला आपली मती व्यवस्थित केली पाहिजे.

परंतु हे अव्यवस्थित मत वाले लोक जगाला व्यवस्थित करण्याच्या विकल्पामध्येच गुरफटलेले असतात. जस-जसे निसटण्याचा प्रयत्न करतात, तस-तसे अधिक गुरफटतात. कारण जेथे अव्यवस्था आहे तेथे त्यांचे लक्षच नाही, आणि जथे सर्व काही पूर्ण व्यवस्थित आहे, जेथे काही ही फेरबदल शक्य नाही तेथे व्यवस्थापक बनण्याच्या धुंदीत विकल होतात. जोपर्यंत ते स्वतः आपल्या मतीला वस्तु-स्वरूपाच्या अनुकूल व्यवस्थित करणार नाहीत तो पर्यंत ते विकल होतील.

दुसरी गोष्ट अशी आहे की जे कर्त्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त आहेत त्यांची मती व्यवस्थित होऊ शकत नाही. कारण व्यवस्थापक

---

1 अलमथवा प्रलपितेन । व्यवस्थिता मतिर्मम

2 अथायमेवैको भगवद्भिः स्वयमनुभूयोपदर्शितो निःश्रेयसस्य पारमार्थिकः पन्था इति मतिं व्यवस्थापयति ।

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



बनण्याच्या धुंदीत मस्त असलेले जग, की जग स्वयं व्यवस्थित आहे· ह्याचा कसा काय स्वीकार करील ?

कारण जग स्वयं व्यवस्थित आहे असे मानल्यास ते स्वत: व्यवस्थापक कसे राहतील ? त्यांना व्यवस्थापक म्हणून कायम राहण्यासाठी जग अव्यवस्थित असण्याची आवश्यकता आहे, नाहीतर ते व्यवस्था कशाची करतील आणि काय करतील ? त्यामुळेच जगाची व्यवस्था आहे – हे व्यवस्थापकांच्या लक्षात येऊ शकत नाही कारण त्यामुळे त्याचा अहमला ठेस पोहोचते; त्यामुळे व्यवस्थापकाचा अधिकार हिरावला जातो.

व्यवस्थापकांना जग अव्यवस्थित हवे असते, ज्याची व्यवस्था ते करतील आणि मानाने व्यवस्थापक राहतील. याच कारणामुळे सुनिश्चित स्वयंचलित व्यवस्था जगाच्या लक्षात येत नाही, आणि त्यांची मती व्यवस्थित होत नाही. सर्वज्ञता आणि क्रमबद्धपर्यायाची श्रद्धा-प्रतीती शिवाय मतीव्यवस्थित होऊ शकत नाही.

व्यवस्थापक कितीही प्रामाणिक असला तरी व्यवस्थापकाने केलेली व्यवस्था कधीच पूर्ण व्यवस्थित, खरी आणि न्यायसंगत होऊ शकत नाही; स्वयंचलित व्यवस्थाच पूर्ण व्यवस्थित, खरी व न्यायसंगत असते.

वजन करण्याचे एक यंत्र आहे, त्यात दहा पैशाचें नाणे टाकल्यानंतर खरे वजन माहित होते. त्या यंत्राद्वारे जेवढे व्यक्ती आपले वजन करतील तेवढी दहा पैशांची नाणी त्या यंत्राच्या पोटात अवश्य आढळतील. पैसा न टाकता एखादा वजन करुन घेईल असे तेथे होऊ शकत नाही. त्या यंत्राचा मालक जरी आला तरी त्याला नाणे टाकूनच वजन करून घ्यावे लागेल; परंतु असा माणूस शोधूनही सापडणार नाही की त्याच्याकडे वजनाचा काटा सोपवला आणि सांगितले की वजन केले की दहा पैसे घेत जा. वजन प्रामाणिक पणे होणार नाही. तो स्वत:चे वजन करील आणि दहा पैसे जमा करणार नाही. तो आपल्या मुलांचे वजन करील आणि पैसे जमा करणार नाही. त्यामुळे जेवढी माणसं त्या काटयावर वजन करतील तेवढे पैसे त्या मालकाला मिळू शकणार नाहीत.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



म्हणून स्वयंचलित (ॲटोमॅटिक) व्यवस्थाच ठीक आहे, खरी आहे, परंतु व्यवस्थापक हे मानणार नाही. कारण त्यामुळे तो बेकार होतो. त्याचे कर्तृत्व हिरावले जाते, अहंकार तुटतो म्हणूनच त्याची मती व्यवस्थित होऊ शकत नाही.

व्यवस्थित व्यवस्थेमध्ये लबाडी शक्य नाही. यामुळेच जे नियमित क्रम अर्थात् व्यवस्थित-व्यवस्थेचा भंग करून, समयापूर्वी काम करण्याची भावना करतात, त्यांना व्यवस्थित-व्यवस्था सहज स्वीकार नसते.

"पैशाने आज काय होऊ शकत नाही, पैशाने काय मिळू शकत नाही ? पैसा एक अशी शक्ती आहे की त्यापुढे कोणतेच नियम चालू शकत नाही. त्यापुढे सर्व व्यवस्था बेकार आहे. पैशाच्या बलावर मी वाटेल ते करू शकतो. पैशाने सर्व व्यवस्था बदलू शकते."

या प्रकारचे किंवा याप्रकारच्या इतर कुठल्यातरी अभिमानाने ग्रस्त बेईमान जगाची मती व्यवस्थित होणे अशक्य नसली तरी कठीण मात्र निश्चित आहे. त्यांना एक व्यवस्थित-व्यवस्था अर्थात् क्रमबद्धपर्यायाची स्वीकृति होणे सोपे नाही.

या मनुष्यभवामध्ये करण्यायोग्य केवळ एक हेच कार्य आहे की आम्ही आपली मती व्यवस्थित करावी.

सर्वज्ञतेच्या निर्णयाने, क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयाने मती व्यवस्थित होते कर्तृत्वाचा अहंकार गळतो. सहज ज्ञातादृष्टेपणाचा पुरुषार्थ जागृत होतो. परामध्ये फेरफार करण्याची बुद्धी संपते. यामुळे त्यासबंधी आकुलता-व्याकुळता देखील नाहीशी होते. अतीन्द्रिय आनंद प्रगट होतोच पण त्यासोबत अनंत शक्तीचा अनुभव होतो.

सर्वज्ञतेचा निर्णय आणि क्रमबद्ध पर्यायाच्या श्रद्धेमुळे येवढा लाभ तर तत्काळ होतो यानंतर जेव्हा हा आत्मा, आत्म्याच्या आश्रयाने वीतराग-परिणतीची वृद्धी करीत जातो, तेव्हा एक समय असाही येतो की तो पूर्ण वीतरागता आणि सर्वज्ञता स्वत: प्राप्त करतो. आत्म्याहून परमात्मा बनण्याचा हाच मार्ग आहे

म्हणून मोक्षाभिलाषी मुमूक्षु बंधूंनी मरून परकरूण ज्यामार्गाने होईल त्यामार्गाने सर्वज्ञतेचे खरे स्वरूप समजून घेण्याचा अवश्य

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



प्रयत्न केला पाहिजे. सर्वज्ञतेचे खरे स्वरूप लक्षात येताच क्रमबद्ध-पर्याय स्वतःच लक्षात येईल. त्यासाठी वेगळा काही प्रयत्न करावा लागत नाही.

परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की सर्वज्ञता परोन्मुखी वृत्तीने लक्षात येणारी वस्तु नाही सर्वज्ञतेच्या पर्यायाच्या सन्मुख झालेल्या दृष्टीने देखील सर्वज्ञता लक्षात येणार नाही. सर्वज्ञस्वभावी आत्म्याच्या आश्रयाने सर्वज्ञता लक्षात येते. सर्वज्ञतेचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी आत्मोन्मुखी पुरुषार्थ अपेक्षित आहे, क्रमबद्धपर्याय समजून घेण्याचा देखील हाच एकमेव उपाय आहे

सर्व प्राणि 'क्रमबद्धपर्याय' आणि 'सर्वज्ञतेचे' खरे स्वरूप जाणून स्वभाव-सन्मुख व्हावेत आणि अनंत शांती व सर्वांनी अतीन्द्रिय आनंद प्राप्त करावा, काही कालाने यथासमय सर्वज्ञता प्राप्त करून परमसुखी व्हावे – या भावनेने विराम घेतो.

□□□

---

**जो - जो देखी वीतराग नै - - - - - -**

जो-जो देखी वीतराग ने, सो-सो होसी वीरा रे।
बिन देख्यो होसी नहिं क्योंही, काहे होत अधीरा रे।।
जो-जो देखी० ।।१।।

समयो एक बढ़ै नहीं घटसी, जो सुख-दुःख की पीरा रे।
तू क्यों सोच करै मन मूरख, होय वज्र ज्यों हीरा रे।।
जो-जो देखी० ।।२।।

लगै न तीर कमान बान कहुँ, मार सकै नहीं मीरा रे।
तू सम्हारि पौरुष बल अपनो, सुख अनन्त तो तीरा रे।।
जो-जो देखी० ।।३।।

निश्चय ध्यान धरहु वा प्रभु को, जो टारे भव भीरा रे।।
'भैया' चेत धरम निज अपनो, जो तारे भव नीरा रे।।
जो-जो देखी ।।४।।

---

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# द्वितीय खंड

## क्रमबद्धपर्याय : कांही प्रश्नोत्तर

आजचा हा बहुर्चित विषय 'क्रमबद्ध पर्याय' ची विस्तृत चर्चा झाल्यानंतर सुद्धा काही शंका, आशंका आणि प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

गेल्या एका वर्षापासून 'आत्मधर्म' च्या संपादकीय व प्रवचनाच्या माध्यमाने क्रमबद्धपर्यायची निरंतर चर्चा चालत आली आहे. या 'क्रमबद्ध' वर्षात त्याचा प्रचार व प्रसार सुद्धा फार झाला आहे. तरी परंतु अनेक आत्मार्थी बंधूकडून सुद्धा काही स्पष्टीकरण पाहिजे असल्याने प्रश्न निरंतर विचारण्यात येत आहेत

जरी 'क्रमबद्धपर्याय : एक अनुशीलन' मध्ये बरेच स्पष्टीकरण येऊन गेले असले तरी सर्वांगीण स्पष्टीकरणाकरिता त्या प्रश्नांचा विचार करणे असंगत होणार नाही.

याच भावनेने काही महत्वपूर्ण प्रश्नोत्तरे येथे दिले जात आहेत, विषयाची पुनरावृत्ति न करता सर्व संभावित प्रश्नांची उत्तरे यावीत. या दृष्टीने सर्व प्रश्नांना जसेच्या तसे न ठेवता सर्व संभावित प्रश्नांना लक्षात घेऊन या प्रश्नोत्तर मालेस व्यवस्थित रूप देणे उचित वाटते. त्यानुसार काही महत्वपूर्ण प्रश्नोत्तरे येथे दिले जात आहेत –

१) **प्रश्न :–** समयसार गाथा ३०८ ते ३११ च्या टीकेमध्ये ज्या वाक्यांना 'क्रमबद्धपर्याय' च्या समर्थनार्थ प्रस्तूत केले जाते, त्यांचा आशय तर मात्र इतकाच आहे कि जीव, अजीव नाही आणि अजीव, जीव नाही. त्यात तर दोन द्रव्याची भिन्नता दाखवली आहे, त्यात पर्यायी क्रमबद्धच होतात – ही गोष्ट कुठे आहे ?

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**उत्तर** :– उक्त वचनांत दोन द्रव्यांची भिन्नताच सिद्ध केली आहे असे नाही, परंतु हे स्पष्ट केले आहे की, "जीव क्रमनियमितपणे आपल्या परिणामाने उत्पन्न होणारा जीवच आहे, अजीव नाही; त्याचप्रमाणे अजीव सुद्धा आपल्या क्रमनियमित परिणामाने उत्पन्न होणारा अजीवच आहे, जीव नाही."

येथे दोन द्रव्यांच्या भिन्नते बरोबरच द्रव्यांच्या परिणमनाची व्यवस्थाही सांगितली आहे. तसेच हे ही स्पष्ट केले की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्त्ता-हर्त्ता नाही, प्रत्येक द्रव्य आपल्या परिणमनाचा कर्त्ता-हर्त्ता स्वयं आहे आणि ते परिणमन सुद्धा अव्यवस्थित नाही, नियमित आहे; नियमितच नाही परंतु एका निश्चित क्रमामध्ये बांधलेला आहे, पूर्ण व्यवस्थित तसेच निश्चित आहे.

आणि यापेक्षा अधिक स्पष्ट केल्यास – जीवाला अकर्त्ता सिद्ध केले आहे, जसे की गाथेच्या मथळचात तसेच टीकेच्या अंतिम ओळीमध्ये स्पष्ट आहे की–

"अथात्मनोऽकर्तृत्वं दृष्टांतपुरस्सरमाख्याति ।
आता आत्म्याचे अकर्तृत्व दृष्टांतपूर्वक स्पष्ट करण्यात येते."
"अतो जीवोऽकर्ता अवतिष्ठते ।
या प्रकारे जीव अकर्त्ता सिद्ध होतो".

जीवाची अजीवापासूनची भिन्नता तर जीवाजीवाधिकार मध्येच स्पष्ट केली आहे, सर्वविशुद्धज्ञान अधिकारामध्ये त्या चर्चेची काय आवश्यकता होती ? येथे तर जीव आपल्या क्रमनियमित परिणामाने स्वयं परिणमत असतांना बदलत असतांना सुद्धा इतका बदलून जात नाही कि ज्यामुळे तो अजीव बनून जाईल – ही गोष्ट सांगण्यात येत आहे. याच्या बदलण्याची सुद्धा एक मर्यादा आहे, तो आपल्यामध्येच बदलू शकतो. बदलून सुद्धा आपल्यारूपच राहतो, पररूप होत नाही; परपदार्थ सुद्धा त्यारूप होत नाही.

जे ज्ञानगुण आता कुमतिज्ञानरूप आहे, ते बदलून पुढल्या क्षणी सुमतिज्ञानरूप होऊ शकते, सुमतिज्ञान पलटून पुढच्या क्षणी केवलज्ञानरूप होऊ शकते; परंतु असे कधीच होऊ शकत नाही कि ते

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



रसरूप होईल, रंगरूप होईल किंवा सुखरूप होईल. पर्यायीच्या बदलण्याची सुद्धा एक मर्यादा आहे आणि ती नियमित पण आहे, ती आमच्या इच्छेनुसार नाही, परंतु ती आपल्या निश्चित क्रमानुसार बदलत असते. ही गोष्ट येथें स्पष्ट करण्यात आली आहे.

एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचें कोणतेच परिणमन करीत नाही, करेल तर ते त्यारूप होऊन जाईल अर्थात् जेव्हा ते त्यारूप होईल तेव्हा त्यास परिणमवू शकते, अन्यथा नाही अजीवाला परिणमवण्याकरिता – बदलवण्याकरिता जीवाला अजीवरूप व्हावे लागेल. जेव्हा तो स्वयं अजीवरूप होईल तेव्हा तो अजीवाच्या परिणमनाचा कर्त्ता होऊ शकतो, आणि असे कधी होत नाही. यामुळे असे सिद्ध होते की, जीव आपल्या क्रमनियमित परिणामात परिमणत – बदलत जीवच राहतो, अजीव होत नाही.

दुसरी गोष्ट अशी की, जरी जीव आपल्या परिणमनाचा कर्त्ता आहे, तरी परिणमन करण्याचे कोणतेही ओझें त्याच्या डोक्यावर नाही कारण ते परिणमन सुद्धा सहज होते आणि नियमितक्रमाने होते. पुद्गलादि अजीव द्रव्य आपल्या परिणमनाचे कोणतेच ओझे बाळगत नाही म्हणून काय त्याचे परिणमन थांबते. जर नाही, तर जीवानेच आपल्या डोक्यावर ओझे का बाळगावे ?

परिणमनाला निश्चित सांगून द्रव्य-गुणांचा कोणताही अधिकार कमी केला नाही पण ओझे हटवले आहे, कारण तो आपल्या परिणमनाचा अधिकृत कर्त्ता व भोक्ता तर आहेच. वस्तुत: तर ज्याप्रकारे द्रव्य सत्य आहे, गुण सत्य आहे, त्याचप्रकारे पर्याय सुद्धा सत्य आहे.

द्रव्य आणि गुणांच्या बाबतीत आम्हा सर्वांचा विश्वास आहे कि, त्यात कोणत्याही फेरफाराची संभावना नाही, त्यामुळे त्यांना बदलण्याचा आम्हास विकल्पसुद्धा येत नाही. परंतु परिणमनशील असल्यामुळे पर्यायांच्या संबंधी जगाची धारणा आहे त्यात की फेरफार केला जाऊ शकतो; त्यामुळे त्यांत फेरफार करण्याची बुद्धी होते.

द्रव्यगुणासारखीच पर्याय सुद्धा त्याच्या स्वसमयाची सत्य आहे– त्यातसुद्धा आपल्या इच्छेनुसार कोणताच फेरफार केला जाऊ शकत

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



नाही. जेव्हा आम्हाला असा विश्वास निर्माण होईल, तेव्हा त्यांत फेरफार करण्याची बुद्धी सुध्दा राहणार नाही.

पर्याय सुद्धा तीच्या स्वकाळाची सत्य आहे, अचला आहे, पार्वती आहे, सती आहे, इत्यादी विस्ताराने या आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे येथे त्याचा विस्तार करणे उपयुक्त होणार नाही, परंतु जे लोक पर्यायीला आपल्या इच्छेनुसार बदलवू इच्छितात त्यांना आम्हास असे विचारायचे आहे की, पर्यायींच्या अनादि-अनंत प्रवाहक्रमात ते भूतकाळाची पर्याय बदलवू इच्छितात कि वर्तमानाची की भविष्याची?

भूतकाळाच्या पर्यायी तर बदलल्या जाऊ शकत नाही, कारण त्या तर स्वयं बदलून गेल्या आहेत, समाप्त झाल्या आहेत; त्यामुळे त्यांच्या फेरबदलाची कल्पना सुध्दा केली जाऊ शकत नाही. आता राहिल्या वर्तमान व भविष्याच्या पर्यायी. वर्तमान पर्यायी सुद्धा होऊन राहिल्या आहेत, त्यात सुद्धा काय केले जाऊ शकते ?

येथे जर कर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त झालेला कोणी अज्ञानी म्हणाला की, वर्तमान पर्यायीमध्ये फेरफार का केला जाऊ शकत नाही ? पहा मी त्यांना आता उखडून फेकतो. त्यास म्हणतात, अहो भाऊ ! जरा विचार तर करा. ती उत्पन्न तर होऊन राहिली आहे, त्यामुळे तीला उत्पन्न होण्यापासून तर अडवणे शक्य नाही. आता राहिली गोष्ट उखडून फेकण्याची, तर भाऊ तिचा कालच एक समयाचा आहे. एका समयानंतर तो स्वतः उखडून जाणारी नाश पावणारी आहे, तशात तुमचे काय काम ?

दुसरी गोष्ट अशी की, आमच्या क्षयोपशम ज्ञानात ती पर्याय उत्पन्न होण्याच्या असंख्य समयानंतर येते, जेव्हा आम्ही तिला उखडून फेकण्याचा विचार करू तोपर्यंत ती केव्हाच उखडलेली असेल.

यावर जर कुणी म्हणेल की भूतकाळ व वर्तमान काळाची नाही तर नाही पण भविष्य काळाची पर्याय तर बदलू शकतो.

त्यास म्हणतात की, भविष्याच्या पर्यायी आता आहेतच कुठे की ज्यांना तू बदलवू शकशील ?

शिवाय जर असे म्हटले की, भविष्यात वाईट पर्यायी येऊ देणार नाहीत, चांगल्या पर्यायीच आणू; तर येथे असा प्रश्न निर्माण

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



होतो की कोणती पर्याय चांगली आहे आणि कोणती वाईट - याचा निर्णय कोण करेल ? 'विभिन्न रुचय: हि लोक:' या नीतीप्रमाणे चांगल्या वाईटाचा निर्णय असंभव तर आहेच शिवाय कठीणही आहे.

जर कोणी म्हणेल की आम्ही आपल्या रूचीप्रमाणे निर्णय करू, त्यांना म्हणतात की, जर आपण फक्त आपल्याच भावी पर्यायीचे कर्त्ता बनू इच्छित असाल तर गोष्ट वेगळी; पण आपण तर परपदार्थाच्या पर्यायी सुद्धा आपल्या अनुकूल बदलवू इच्छिता, त्यात इष्ट-अनिष्टतेचा निर्णय आपल्याच इच्छेप्रमाणे कसा होईल ? जगात अन्य प्राणीसुद्धा आहेत, त्यांच्या इच्छेवर आघात होण्याचा प्रसंग येईल.

दुसरे असे की, आपणास माहीत आहे कि भविष्यात अमुक एक पर्याय येणार आहे, ज्यामुळे आपण हा निर्णय घेऊ शकता कि अमुक पर्यायीला बदलवून अमुक पर्याय आणीन. जर नाही, तर हा अहंकार खोटा सिद्ध झाला की मी असे नाही होऊ दिले आणि असे केले, कारण जे कार्य घडले, ते न होणारे होते, दुसरेच होणारे होते त्याचा निर्णय कसा होईल. असे मात्र होऊ शकते, तेच होणार होते, ज्यास आपण असे म्हणू शकता की मीच तसे केले.

फार प्रयत्न करूनही भविष्याच्या पर्यायीमध्ये फेरफार करण्याची गोष्ट सिद्ध करणे संभव नाही, म्हणून व्यर्थ प्रयत्न करण्यात काय लाभ ?

अंतत: हे स्वीकारणेच श्रेष्ठ आहे की प्रत्येक द्रव्य क्रमनियमित आपल्या परिणामाने उत्पन्न होत असून निजरूपच राहते, पररूप होत नाही.

२) **प्रश्न** :–जर कुणी कुणास परिणमवत नाही तर हे परिणमन कसे होते, याला कोण करतात ? जर कधी हे परिणमन थांबले तर? किंवा कधी हळूहळू कधी जोरात झाले तर याचा नियंत्रक कोण होईल ?

**उत्तर** :– प्रत्येक द्रव्य स्वयं परिणमनशील आहे, ध्रुवतेसारखे परिणमन सुद्धा त्याचा स्वभाव आहे, त्यास आपल्या परिणमनतेत पराची रंचमात्रही अपेक्षा नाही कारण स्वभाव पर निरपेक्षच असतो. हे परिणमन कधी थांबून जाईल असा प्रश्नच निर्माण होऊ शकत

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

नाही, कारण की परिणमनच त्याचा नित्यस्वभाव आहे. अर्थात्, नित्य परिणमनशीलता प्रत्येक द्रव्याचा सहज स्वभाव आहे. लवकर किंवा उशीर होण्याची सुद्धा कोणतीच समस्या नाही, कारण प्रत्येक पर्याय एका समयाचीच असते. कोणत्याच पर्यायीचा दोन समय थांबण्याचा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही आणि एका समयापूर्वी समाप्त होण्याचाही प्रश्न संभवत नाही.

आता शिल्लक उरते की, हे सर्व कोण करतो ? त्यासंबंधी असे आहे की, प्रत्येक द्रव्यात अनंत शक्ती आहेत, निरंतर प्रगट होत आहेत, त्याद्वारेच हें सर्व सहज होत असतें.

३) **प्रश्न** :- ज्याद्वारे हे सर्व होते त्या अनंत शक्ती कोणत्या आहेत ?

**उत्तर** :- काय अनंताचीही मोजदाद होऊ शकते ?

४) **प्रश्न** :- काही तर सांगा ना ?

**उत्तर** :- भावशक्ती, अभावशक्ती, भावाभावशक्ती, अभाव-भावशक्ती, भावभावशक्ती, अभावाभावशक्ती इत्यादि.

५) **प्रश्न** :- पर्यायींच्या उत्पाद व व्ययामध्ये या शक्तीचे काय योगदान आहे ? कृपा करून संक्षेपात समजावून द्यावे.

**उत्तर** :- प्रत्येक द्रव्यामध्ये एक अशी शक्ती आहे जिच्या कारणाने द्रव्य आपल्या वर्तमान अवस्थेने युक्त असते, अर्थात् त्याची निश्चित अवस्था होतच असते त्याला भावशक्ती[1] म्हणतात. प्रत्येक द्रव्यांत एक अशी सुद्धा शक्ती असते जिच्या कारणाने वर्तमान अवस्थेच्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही अवस्था होत नाही या शक्तीचे नाव अभावशक्ती आहे,

वरील दोन्ही शक्तीच्या कारणाने प्रत्येक द्रव्याची प्रतिसमय सुनिश्चित पर्याय होतच असते, अन्य नाही.

६) **प्रश्न** :- पर्यायीला स्वसमयात कोण आणतो आणि एका समयानंतर कोण घालवतो ? पर्याय स्वसमयात येतेच आणि नंतरच्या समयात निघून जाते-याचा नियंत्रक कोण आहे ? जर पर्याय स्वसमयात

---

[1] भूतावस्थत्वरूपा भावशक्तिः - समयसार आत्मख्याति टीका, परिशिष्ट

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



येत नसेल तर तीला कोण आणणार आणि एका समयानंतर निघून जाणार नाही तर तीला कोण घालविणार ? अशा परिस्थितीत एक तर द्रव्य पर्यायरहित होऊन जाईल किंवा एका समयात दोन-दोन पर्यायी उत्पन्न होतील ?

**उत्तर** :– याची आपण चिंता करू नये. असे कधीच घडणार नाही, कारण की प्रत्येक द्रव्यामध्ये एक अशी शक्ती आहे जिच्या कारणाने वर्तमान पर्यायीचा नियमाने येणाऱ्या समयात अभाव होतो; त्या शक्तीचे नाव आहे भावाभावशक्ती [1] तसेच एक शक्ती अशी सुद्धा आहे जिच्या कारणाने येणाऱ्या समयात उत्पन्न होणारी पर्याय नियमाने उत्पन्न होतेच. या शक्तीचे नाव आहे अभावभावशक्ती.[4]

जी पर्याय ज्या समयात उत्पन्न होणार आहे, ती पर्याय त्या समयामध्ये होणारच, अशी सुद्धा एक शक्ती प्रत्येक द्रव्यामध्ये आहे, जिचे नाव आहे भावभावशक्ती.[3] तसेच एक शक्ती अशीही आहे की जिच्या कारणाने जी पर्याय त्या समयात उत्पन्न होणार नसेल, ती नियमाने होणार नाही, त्या शक्तीचें नाव आहे अभावाभावशक्ती.[4]

वरील सहाही शक्तीचे स्वरूप असे सुनिश्चित सिद्ध करते की ज्या द्रव्याची, जी पर्याय, ज्या समयांत, आपल्या उपादानाने जशी होणार असते; ती स्वत: नियमाने त्याच समयात, तशीच होते. त्यात पराची रंचमात्रही अपेक्षे राहत नाही.

सर्वश्रेष्ठ दिगंबराचार्य कुन्कुन्दांच्या प्रसिद्ध परमागम समयसाराच्या आचार्य अमृतचन्द्र कृत आत्मख्याती टीकेच्या शेवटी परिशिष्टात उल्लेखित ४७ शक्तीवर श्री कानजीस्वामीचे विस्तृत प्रवचन आत्मप्रसिद्धी' नावाने हिन्दी भाषेत आणि 'आत्म-वैभव' या नावाने, गुजराथीमध्ये प्रकाशित झाले आहेत – विशेष जिज्ञासा असणाऱ्या आत्मार्थी बंधूनी आपली जिज्ञासा ती वाचून शांत करावयास पाहिजे.

---

[1] शून्यावस्थस्वरूपा अभावशक्ति: तेच
[2] अभवत्पर्यायोदयरूपा अभावभावशक्ति: तेच
[3] भवत्पर्यायभवनरूपा भावभाव शक्ति: तेच
[4] अभवत्पर्यायाभवनरूपा अभावाभावशक्ति तेच

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



येथे त्यासंबंधी विस्तृत चर्चेकरीता वेळ तर नाहीच शिवाय ते न्यायसंगतही नाही.

७) **प्रश्न :–** जेव्हा आम्ही आपल्या पार्यायीला सुद्धा बदलवू शकत नाही तर मग आमच्या परिणमनाचा कर्त्ता तरी आम्ही कसे होऊ शकतो ?

**उत्तर :–** 'आम्ही आपल्या पर्यायीला सुद्धा बदलवू शकत नाही'–जेव्हा असे म्हटले जाते तेव्हा त्याचा आशय असा होतो की, आम्ही तीच्या निश्चित क्रमात कोणताही फेरबदल करू शकत नाही, याचा अर्थ नाही कि तीच्या परिणमनाचा कर्त्ता सुद्धा आम्ही नाही. सहाव्या प्रश्नाच्या उत्तरात ज्या सहा शक्तींची चर्चा केली आहे त्या द्रव्याच्या शक्ती तर आहेत, ज्यांच्या कारणानेच ती पर्याय स्वसमयात होत असते. त्यामुळे आपल्या पर्यायीचा कर्त्ता तर द्रव्यच आहे.

जिनवाणीमध्ये एका अपेक्षेने असे सुद्धा येते – जेथे पर्यायीचा कर्त्ता पर्यायच म्हटले जाते, द्रव्यास नाही. त्रिकाली उपादानाच्या अपेक्षेने पर्यायीचा कर्त्ता ते द्रव्य किंवा गुण म्हटले जाते ज्याची ती पर्याय असते, आणि क्षणिक उपादानाच्या अपेक्षेने त्यासमयाची योग्यताच कार्याची नियामक असल्यामुळे पर्यायीलाच पर्यायीचा कर्त्ता म्हटले जाते, ही पर्यायीच्या स्वतंत्रतेची अंतिम परिणती आहे. जी तिच्या सहज क्रमनियमित परिणमनास सिद्ध करते.

परिणमनशीलता द्रव्याचा सहज स्वभाव आहे. आणि स्वभाव नेहमी पर-निरपेक्ष असतो; म्हणून प्रत्येक द्रव्याच्या परिणमनांत पराची अजिबात अपेक्षा राहत नाही. कोणतेही द्रव्य एक समयसुद्धा परिणमनाशिवाय राहू शकत नाही. जर एक समयाकरिता परिणमन थांबून जाईल तर द्रव्याचे द्रव्यत्वच कायम राहणार नाही. द्रवण-शीलता-परिणमनशीलतेच नांवच द्रव्य आहे.

परिणमन-स्वभावाच्या अभावात स्वभाववान द्रव्याच्या सत्तेच्या अभावाचा प्रसंग सुद्धा उपस्थित होईल. ज्याप्रकारे शरीरात जे रक्त धावते, जर ते धावणे बंद झाले तर हृदयगती थांबुन मनुष्याच्या मरणाचा प्रसंग उपस्थित होईल; त्याप्रकारे जर द्रव्याचे एक समया करीता सुद्धा परिणमन थांबले तर त्याच्या मरणाचा (अभाव) प्रसंग

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



उपस्थित होईल, आणि द्रव्याच्या अभावासोबतच विश्वाच्या अभावाचा ही प्रसंग येईल, कारण सहा द्रव्याच्या समुहाचे नावच विश्व आहे.

ज्याप्रकारे रक्त सतत धावते, थकत नाही, कारण कि धावणे हेच त्याचे जीवन आहे, सतत गतीमान राहण्यातच त्याला सुगती आहे; त्याप्रकारे द्रव्याच्या सतत परिणमनाला कोणतीही अडचण होत नाही, सतत परिणमनच त्याचे जीवन आहे.

याकरीता अशी कोणतीच समस्या नाही कि प्रत्येक समयाला नव्या नव्या पर्यायी कुठून आणायच्या ? त्या स्वभावातून सहज येतात त्यांना अन्यत्र कुठून आणाव्या लागत नाहीत; त्या परमुखापेक्षी नाहीत, जर त्यांना दुसऱ्याची अपेक्षा असेल तर द्रव्य पराधीन होईल किंवा परिणमन त्याचा स्वभाव राहणार नाही, कारण स्वभावास पराची अपेक्षा नसते ज्याला पराची अपेक्षा असते तो स्वभाव कसा? म्हणून म्हटले आहे–

'यह जगत स्वयं परिणमनशील, केवलज्ञानी ने गाया है।'

किंवा

'होता स्वयं जगत परिणाम, मैं जग का करता क्या काम।'

८) **प्रश्न :–** जर आम्ही पराचे काहीच करू शकत नाही तर मग आमची स्वतंत्रताच काय राहिली ?

**उत्तर :–** काय पराचे काही करण्याचेच नाव स्वतंत्रता आहे ? जेव्हा असे म्हटले जाते कि एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीच करू शकत नाही तर त्याचा अर्थ आपण फक्त इतकाच का घेता कि आपण दुसऱ्याचे काहीच करू शकत नाही, असा का घेत नाही कि आपले सुद्धा कुणी काहीच करू शकत नाही ? तेव्हा आपण असा विचार कराल तेव्हा आपणास स्वतंत्रतेचा अनुभव येईल की पहा माझे कोणच काही बिघडवू शकत नाही.

जेव्हा एखाद्या राज्यासंबंधी असे म्हटले जाते की या राज्यात कोणीच कुणास लुटू शकत नाही, मारू शकत नाही, दुःखी करू शकत नाही; तर असे कुणीच म्हणत नाही कि हे कसे खोटे राज्य आहे कि ज्यामध्ये कोणीच कुणास लुटू शकत नाही, मारू शकत नाही, दुःखी करू शकत नाही; परंतु असे म्हणतात कि हे किती छान राज्य आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



असे तर एखादा हत्यारा किंवा चोरच म्हणू शकतो की हे कसे राज्य आहे कि येथे मारायची किंवा लुटायची सुद्धा स्वतंत्रता नाही; त्याच प्रकारे असे तर एखादा कर्तृत्वाच्या अहंकाराने ग्रस्त अज्ञानीच म्हणू शकतो की हे कसे वस्तूस्वरूप आहे की ज्यात आम्ही पराचे काहीच करू शकत नाही.

क्रमबद्धपर्यायीची गोष्ट तर अनंत स्वतंत्रतेची सूचक आहे. तीला बुद्धिपुर्वक मनापासून स्विकार करणाऱ्यास तर अनंत स्वतंत्रतेची प्रतीती होते. हे जाणून कुणास प्रसन्न वाटणार नाही की आमचे सुख-दुःख, जीवन-मरण, चांगले-वाईट, सर्व-काही आमच्या अधिकारात आहे. त्यात अन्य कुणाचाच हस्तक्षेप नाही; हे जाणून सुद्धा ज्यांना प्रसन्नता वाटणार नाही, असे समजावे की तो एक तर गुलामवृत्ति व्यक्ति असावा अथवा अन्य लोकास गुलाम बनवण्याच्या वृत्तिचा असावा. 'क्रमबद्धपर्यायी' मध्ये वस्तुच्या अनंत स्वतंत्रतेची घोषणा आहे.

९) **प्रश्न :–** ज्ञानी सुद्धा असे म्हणतांना आढळतात की मी असे केले, तसे केले ?

**उत्तर :–** होय, ही गोष्ट खरी आहे की ज्ञानीच्या जीवनात सुद्धा असा वचन व्यवहार आढळतो, परंतु त्याची मान्यता अशी नसते. त्याची मान्यता तर वस्तुस्वरूपाच्या अनुकूलच असते, कारण तसे म्हणणे तर व्यवहार आहे आणि मानने मिथ्यात्व आहे.

ज्या प्रकारे सम्यग्दृष्टी ज्ञानी आत्मा स्त्री-पुत्र, घर, इस्टेट इ. संयोगी पदार्थांना आपले म्हणतांना आढळतो की ही माझी स्त्री आहे. ही माझी मुले आहेत, हे माझे घर आहे – परंतु मानतो असे कि हे सर्व माझे नाहीत; त्याच प्रकारे परामध्ये करण्याचा वचन-व्यवहार सुद्धा त्यांच्या ठिकाणी आढळतो. कथनामुळे ते मिथ्यादृष्टी होत नाहीत कारण मिथ्यात्व तर मान्यता संबंधी दोष आहे.

या संदर्भात पंडितप्रवर टोडरमलजींचे विचार दृष्टव्य आहेत–

"जसे एकादा मुनीम सेठजीचे काम करतो, त्या कामास आपले म्हणतो, आनंदी-दुःखी सुद्धा होतो, काम करतांना आपण व सेठजी वेगवेगळे असल्याचा विचार सुद्धा करीत नाही; परंतु अंतरंगात तर अशी मान्यता आहे की हे माझे काम नाही. असे काम करतांना

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मुनीम सावकार आहे. जर तो सेठजीचे धन चोरून आणले तर तो मुनीम चोर समजण्यात येईल. त्याप्रमाणे कर्मोदयामुळे शुभाशुभरूप कार्य करतांना त्याप्रकारे परिणमीत होत असला तरी अंतरंगामध्ये अशी मान्यता असते कि हे काम माझे नाही. जर शरीराश्रित व्रत-संयमांना सुद्धा आपले मानले तर तो मिथ्यादृष्टी होय.

१०) **प्रश्न** :– याचा अर्थ तर असा झाला की ज्ञानीच्या मान्यतेत आणि कथनामध्ये अंतर आहे ?

**उत्तर** :– होय. अवश्य आहे; परंतु याचे कारण ज्ञानीच्या हृदयाची अपवित्रता नसून वस्तुस्थिती आहे. कारण की ज्ञानीची मान्यता तर वस्तुच्या स्वरूपानुसार होते आणि वचनव्यवहार लोक प्रचलित व्यवहारानुसार होतो.

वस्तुस्वरूपाच्या अपेक्षेने विचार केला तर स्त्री-पुत्रादि, घर-दार कुणाचेच नाहीत तरी परंतु लोकांत त्यांना आपले म्हणण्याचा व्यवहार प्रचालित आहे. मान्यतेचा संबंध सरळ वस्तुस्वरूपाशी आहे आणि वाणीचा व्यवहार लौकक जीवनाशी आहे, म्हणून ज्ञानीची मान्यता तर वस्तुस्वरूपानुसार असते आणि वचन-व्यवहार लोकव्यवहारा-नुसार असतो.

आचार्य अमृतचंद्र समयसार आत्मख्याती टीकेच्या प्रारंभी लिहीतात की "ही टीका करण्यामुळे माझी परिणती परमविशुद्धिला प्राप्त होवो."[1] आणि टीकेच्या शेवटी लिहीतात की "ही टीका लिही-ण्यामध्ये स्वरूपगुप्त अमृतचंद्र आचार्यांचे कोणतेच कर्तृत्व नाही."[2]

अशाच प्रकारची चर्चा पंडित टोडरमलजींनी सम्यग्ज्ञान-चंद्रिकेच्या पीठिकेमध्ये तसेच प्रशस्तीमध्ये केली आहे. पीठिकेमध्ये तर टीका लिहीण्याची चर्चा करतात तसेच लिहीण्याचे प्रयोजन

---

1 परपरिणतिहेतोर्मोहनाम्नोऽनुभावा –
दविरतमनुभाव्यव्याप्तिकल्माषितायाः ।
मम परमविशुद्धि. शुद्धचिन्मात्रमूर्ते –
र्भवतु समयसारव्याख्ययैवानुभूतेः ॥३॥

2 स्वशक्तिसंसूचितवस्तुतत्त्वैर्व्याख्या कृतेयं समयस्य शब्दैः ।
स्वरूपगुप्तस्य न किंचिदस्यि कर्तव्यमेवामृतचंद्रसूरेः ॥२७८॥

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



इत्यादिचे विस्ताराने स्पष्टिकरण करतात. तसेच शेवटी प्रशस्तीमध्ये लिहीतात :–

वचनादिक लिखनादिक क्रिया, वर्णादिक अरू इन्द्रिय हिया ।
ये सब हैं पुद्गल के खेल, इनमें नाहिं हमारो मेल ।।
रागादिक वघनादिक चनां, इनके कारण कारिज पनां ।
तातैं भिन्न न देखो कोय, बिनु विवेक जग अंधा होय ।।
ज्ञान राग तो मेरौ मिल्यौ, लिखनौ करनौ तन को मिल्यौ ।
कागज मसि अक्षर आकार, लिखिया अर्थ प्रकाशन हार ।।
ऐसौ पुस्तक भयो महान, जातैं जानें अर्थ सुजान ।
यद्यपि यहु पुद्गल कौ खंद, है तथापि श्रुतज्ञान निबंध ।।[1]

आचार्य अमृतचंद्र आणि पंडित टोडरमलजी – दोन्हीही ज्ञानी आत्मा होते. त्यांच्या वरील कथनामुळे हे स्पष्ट होते की यात कोणतेच कपट नाही. जो पर्यंत वचन-व्यवहार आहे तो पर्यंत मान्यता आणि वाणी यातील अंतर राहणारच.

क्षायिकसम्यग्दृष्टि भरत इत्यादि चक्रवर्ती सुध्दा सहा खंडाच्या विभूतींना आपली म्हणत होते, पण मानत नव्हते. हे चवथ्या, पांचव्या आणि सहाव्या गुणस्थानांच्या भूमिकेमध्ये आढळणारे पर्यायगत सत्य आहे – याला जाणणे सुद्धा आवश्यक आहे. या सत्याच्या स्विकृति-शिवाय अशा प्रकारच्या शंका राहतीलच.

११) प्रश्न :– जेव्हा सुख-दुःख, जीवन-मरण, सर्व कांही निश्चित आहे, स्वकाळांतच होत आहे, तर मग अकालमृत्यू नांवाची कांही चीजच बाकी उरणार नाही; परंतु शास्त्रामध्ये तर अकाल-मृत्यूची चर्चा आढळते, तत्त्वार्थसूत्राच्या दुसऱ्या अध्यायाच्या अंतिम सूत्रांमध्ये अकालमृत्यूबद्दल स्पष्टपणे लिहीले आहे.

उत्तर :– विषभक्षणादि द्वारा होणाऱ्या मृत्यूला अकालमृत्यू म्हटले जाते हे कथन आयुष्याच्या उदीरणा किंवा अपकर्षणाच्या अपेक्षेने केले जाते; किंवा अपेक्षित आयुष्याच्या पूर्वीच होणाऱ्या मरणाच्या अपेक्षेने हे कथन केले जाते, वस्तुस्थितीच्या अपेक्षेने नाही;

---

1 मोक्षमार्ग प्रकाशक (हिन्दी) प्रस्तावना, पृष्ठ २१

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

कारण केवलीभगवंतांच्या ज्ञानामध्ये तर ज्या काळात मरण होणे ज्ञात झाले होते, त्याच काळांत झाले आहे; म्हणून ते सुद्धा स्वकालमरणच आहे, अकालमरण नाही.

तत्त्वार्थसूत्रामध्ये पण आयुकर्माच्या स्थितीच्या अपकर्षणाची बाब सांगितली गेली आहे तत्त्वार्थसूत्राच्या ज्या सूत्रामध्ये उक्त चर्चा आहे, ते अशाप्रकारे आहे :–

"औपपादिकचरमोत्तमदेहाऽसंख्येयवर्षायुषोऽनपवर्त्यायुषः ।।"[1]

उपपाद जन्मवाले देव आणि नारकी, चरमोत्तम देहवाले अर्थात् त्याच भवांत मोक्ष जाणारे आणि असंख्यात वर्ष आयुष्यवाले भोग-भूमीचे आयुष्य अपवर्तनरहित असते, अर्थात् त्यांच्या आयुष्याचे त्याच भवांत अपकर्षण होत नाही. आयुष्य दोन प्रकारचे असते – १) भुज्यमान आयुष्य २) बध्यमान आयुष्य. ज्या आयुष्याला जीव वर्तमानात भोगत असतो, त्याला भुज्यमान आयुष्य म्हणतात आणि ज्या आयुष्याचा बंध झाला आहे, परन्तु ज्याचा उपभोग पुढच्या भवांत होणार आहे, त्याला बध्यमान आयुष्य म्हणतात.

बध्यमान आयुष्याच्या स्थितीमध्ये तर अपकर्षण होऊ शकते; परन्तु भुज्यमान आयुष्याचे अपकर्षण उक्त सूत्रांतील कथित जीवाचे होत नाही, हे दाखविणे उक्त सूत्राचा उद्देश्य आहे.

राजा श्रेणिकाने तेहतीस सागराच्या नरक आयुष्याची स्थिती बांधली होती आणि त्याचें अपकर्षण होऊन चौऱ्याऐंशी हजार वर्षाची राहिली, परंतु हे पूर्वभवांमध्ये झाले; नरक आयुचा उपभोग आरंभ झाल्यानंतर त्याचे अपकर्षण संभवित नाही; परन्तु उक्त सूत्रामधील कथित जीवांना सोडून अन्य जीवांच्या आयुष्याचे अपकर्षण त्या भवांतसुद्धा होऊ शकते.

ही संपूर्ण चर्चा आयुष्याच्या अपकर्षणाची आहे, त्याने क्रमबद्ध-पर्यायाच्या निश्चिततेमध्ये कांही फरक पडत नाही.

जसे जेव्हा आपण एखाद्या दुकानदाराकडून खरेदी केलेले सामान पसंत न आल्याने परत करण्यास जातो, तो सीलबंद पाकिटांचे

---

1 तत्त्वार्थसूत्र अध्याय २, सूत्र ५३

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सामान तर परत घेतो, परंतु खुल्या पाकीटांतील सामान नाही; त्याचप्रमाणे ज्या आयुष्याच्या उपभोगास आरंभ झाला नाही, त्यात तर सर्वांमध्ये अपकर्षण शक्य आहे, परंतु उपभोग आरंभ झाल्यानंतर उक्त सूत्रामध्ये कथन केलेल्या आयुष्याचे अपकर्षण संभवित नाही, हीच गोष्ट उक्त सूत्रामध्ये सांगितली गेली आहे.

ह्याने काळाच्या नियमिततेमध्ये कांही फरक पडत नाही आणि ना तर अन्य समवायांची उपेक्षाही होते, कारण आयुष्याचे अपकर्षण-सुद्धा अन्य समवायांच्या सापेक्षतेने होते.

वस्तुतः हे कथन अकालमृत्यूचे नसून आयुष्याच्या अपकर्षनाचे आहे. ह्या संदर्भामध्ये जैनसिध्दांतकोषकार श्री जिनेन्द्रवर्णीचे खालील कथन पाहण्याजोगे आहे :—

"पाचवा प्रश्न आहे अकालमृत्यूसंबंधी. समयाच्यापूर्वी विषभक्षणादिने होणाऱ्या मृत्यूला 'अकालमृत्यू' म्हणतात. कर्म सिद्धान्ताच्या अंतर्गत पूर्वबद्ध कर्माच्या स्थिती आदीच्या हानि-वृद्धिस 'अपकर्षण' व 'उत्कर्षण' म्हणतात आणि प्रकृतिच्या बदलण्यास संक्रमण म्हणतात. समयाच्या पूर्वी कर्मास उदयाला आणण्यास 'उदीरणा' म्हणतात आणि समयाच्या पूर्वी त्यांना झटकून टाकण्यास 'निर्जरा' म्हटले जाते.

आगमकथित हे सर्व विषय नियतिचे बाधक आहेत, अशी शंकासुद्धा करण्याजोगी नाही, कारण त्याचे उत्तर तर तोच उपरोक्त विकल्प आहे, ज्याच्या उदयाने तदनुरूपच प्रवृत्ति स्वयं बनते तीव्र क्रोध आल्याने विषभक्षण आदींची क्रिया होते, त्याच्या अभावामध्ये नाही अशाप्रकारे अपकर्षण उदीरणा व निर्जरा आदींच्या बाबतीत जाणावे; कारण अकालमृत्यूचा अर्थ आयुकर्माच्या उदीरणे व्यतिरिक्त दुसरे कांही नाही.

अकाल तर केवळ एवढ्यासाठी म्हटले जाते की जेवढे आयुष्य बांधले तेवढी स्थिती पूर्ण केली नाही. वास्तविक असे कोणतेच कर्म नाही की ज्याची स्थिती बंधनानुसारच उदयाला येईल. बुद्धिहीन सूक्ष्म प्राण्यामध्ये पण हे उत्कर्षणादि अगदी व्यवस्थित होतात. जो-जो विकल्प ज्या-ज्या वेळी येतो, तस-तसी प्रवृत्ति त्या-त्यावेळी

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



होते, तत्फलस्वरूप तस-तसाच नवीन बंध व अपकर्षण आदि होतात. उत्कर्षण आदीचे परिणाम कांही वेगळे असतात आणि बंधाचे वेगळे असतात असे नाही. एकसमयाच्या ज्या एका परिणामाने किंवा प्रवृत्तिने बंध होतो, त्यानेच त्यासमयी यथायोग्य उत्कर्षण, अपकर्षण आदि सुद्धा होतात; म्हणून ह्यामुळे नियतीला बाधा येत नाही." [1]

१२) **प्रश्न** :– आपण असे का म्हणता की केवलज्ञानानुसार प्रत्येक मृत्यू स्वकालातच होतो, कारण ह्यातून असे प्रतिध्वनीत होते की, कोणत्यातरी अपेक्षेने अकालमृत्यूसुध्दा होत असावा ?

**उत्तर** :– होत तर काय असावा ? पण म्हटले तर अवश्य जाते. अपकर्षण, उदीरणाआदींच्या अपेक्षेने अशा प्रकारचे कथन होत असते. ह्याला क्षयोपशम ज्ञानाच्या अपेक्षेने सुद्धा म्हटले जावू शकते.

जसे – एका घड्यामध्ये दहा लिटर पाणी आहे आणि त्याला एक छिद्रपण आहे, त्यातून ते पाणी एका तासांत एक लिटर ह्या वेगाने बाहेर पडते.

जर गणितज्ञाला विचारले की, तो घडा किती वेळात रिकामा होईल तर तो आपल्या गणितानुसार दहा तासच सांगेल – ते बरोबर आहे, परंतु जर एकाद्या भविष्यकाराला विचारले की, तो घडा केव्हा रिकामा होईल, तर तो हे पर सांगू शकेल की पाच तासात. कारण त्याला हे माहीत आहे की पाच तासानंतर एका बालकाच्या धक्क्याने तो घडा कलंडेल आणि त्यातून पाणी निघून जाईल. (तो घडा रिकामा होईल)

आता गणिताच्या अपेक्षेने त्याला असमयी रिकामा होणे म्हटले जाईल आणि भविष्यज्ञानी किंवा वस्तुस्थितीच्या अपेक्षेने असे म्हटले जाईल की, त्याचे भवितव्यच असे होते, म्हणून स्वसमयामध्ये आपल्या भवितव्यानुसार उचित निमित्तपूर्वकच सर्व–कांही घडले आहे.

अशाप्रकारे जसे एखाद्या अपराध्याला दहा वर्षाची सजा झाली आहे. जेव्हा त्याने न्यायाधीशाला, वकीलाला, जेलरला विचारले की, जेलमधून कधी सुटेन ? तर सर्वांनी एकस्वरात हेच उत्तर दिले की,

---

1 शांतिपथदर्शन, पृष्ठ १२३

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



दहावर्षानंतर आणि कथनाला खोटे सुद्धा म्हटले जाऊ शकत नाही, परन्तु जर एखाद्या भविष्यज्ञानीला विचारले गेले तर तो म्हणू शकतो की, पाच वर्षानंतर. कारण त्याला माहीत आहे की, पाच वर्षानंतर राजाला पुत्रप्राप्ति होईल आणि त्या आनंदाप्रित्यर्थ सर्व कैदी सोडले जातील आणि हा ही सुटेल.

न्यायाधीशादीकांचे कथन निकालामध्ये दिल्या गेलेल्या शिक्षेच्या आधारावर आहे, आणि भविष्यवक्त्याचे कथन वास्तविकतेच्या आधारावर म्हणून ते वास्तविक आहे आणि न्यायाधीशादीकांचे सापेक्ष

अशाप्रकारे एखाद्या जीवाने आयुकर्माची स्थिती ऐंशीवर्षाची बांधली आहे आणि चाळीसवर्षे वयामध्ये त्याचे अपकर्षण व्हावयाचे आहे किंवा त्याची उदीरणा होऊन खिरून जावयाचे आहे. वीस वर्षे वयामध्ये त्याने अवधिज्ञानीला ज्याचे भविष्याचे ज्ञान दहा वर्षाहून अधिक नाही – अशाला विचारले की, मरण केव्हा होईल ? त्याने आपल्या अवधिज्ञानाने त्याच्या आयुष्याची स्थिती जाणून सांगितले की वयाच्या ऐंशीव्या वर्षी, परन्तु जेव्हा केवलज्ञानीला विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, चाळीसाव्या वर्षी; तर आपणाला दोघामध्ये एक खोटा वाटेल. ही कथने खोटी नाहीत, परन्तु सापेक्ष कथने आहेत.

अवधिज्ञानरूप क्षयोपक्षमज्ञानाच्या अपेक्षेने त्याला आपण अकालमृत्यू म्हणू आणि केवलज्ञानाच्या अपेक्षेने स्वकालातच मरण झाले असे म्हटले जाईल.

अथवा स्वास्थ्य आदि पाहून आपण अपेक्षा तर हीच ठेवतो की, हा माणूस ऐंशी वर्षे जगेल, पण विषभक्षणाने जेव्हा तो चाळीसाव्या वर्षीच मरतो तेंव्हा म्हटले जाते – असमयी मरण पावला. आमच्या ह्या ज्ञानाचा कोणता आधार आहे की ज्यायोगे तो चाळीस वर्षापेक्षा अधिक जगणार होता ? ह्या ज्ञानाशिवाय त्याला अकाली म्हणणे कथना व्यतिरिक्त अजून काय होऊ शकते ?

उक्त कथनावरून हे स्पष्ट होते की, मरण जेव्हा व्हावयाचे होते तेव्हा झाले आहे, त्यामध्ये कांही फेरफार झालेला नाही. जो कांही फरक झाला आहे तो फक्त कथनामध्ये झालेला आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्या शब्दांमध्ये 'अ' लावून निषेधवाचक बनविले जाते. त्यामध्ये 'अकाल' सुद्धा एक शब्द आहे. ज्याचा अर्थ समयापूर्वी न होता काळाहून भिन्न असे काही अन्य कारण आहे – असा होतो. कारण ह्या प्रकरणामध्ये 'काळ' चा प्रयोग एक कारण – ह्या अर्थाने केलेला आहे.

मृत्यूरूपी कार्य होण्यामध्ये अनेक कारणे असतात, त्यात काळ सुद्धा एक कारण आहे. कथनामध्ये तर अनेक कारणे एकावेळेस येऊ शकत नाहीत; म्हणून एखाद्या कारणाला मुख्य करून कथन केले जाते. तेव्हा त्याला कालमृत्यु म्हणतात आणि जेव्हा काल मुख्यकारणरूपाने दिसत नाही, आणि काळाहून भिन्न विषभक्षणादि अन्य कारण मुख्यरूपाने दिसते, तेव्हा अकालमरण म्हणता येईल. अकालमृत्यूच्या व्याख्येमध्ये सांगितले गेले की, विषभक्षणादिद्वारे होणाऱ्या मृत्यूला अकालमृत्यू म्हणतात.

ह्यावरून हा निष्कर्ष निघतो की, 'अकाल' शब्द असमयाचा सूचक असून काळाव्यतिरिक्त अन्य कारणाचा द्योतक आहे.

जेव्हा आपण एखाद्याच्या मृत्यूनंतर विचारतो की, काळपर्यंत तर हा व्यवस्थित होता एकदम अचानक असे काय झाले ? तेव्हा उत्तर मिळते की, कांही नाही, त्याचा काळच आला होता ज्याची घटिका भरते त्याला कोण वाचवू शकतो ? आणि जर कारणाचा पत्ता लागला तर त्यावर इलाजही केला गेला असता.

तसेच कोणी विषभक्षण, अपघात आदि अन्य कारणे दृष्टिपंथास आली तरी कोणी हे म्हणत नाही की, त्यांचा काळ आला होता, परंतु असे म्हटले जाते की, घरुन तर व्यवस्थित निघाले होते पण अपघात झाला, कोणीतरी विष दिले अथवा जे काही झाले असेल ते म्हटले जाते. शिवाय हे ही म्हटले जाते की, अहो ! ते तर बिचारे अकालमृत्यूचे शिकार झाले अशाप्रकारे अकालमृत्यू असमयाचे सूचक नसून काळाव्यतिरिक्त मुख्यरूपाने अन्य कारणाने होणाऱ्या मृत्यूचे सूचक आहे. अशातऱ्हेने हे स्पष्ट होते की, अकालमृत्यूच्या कथनाने 'क्रमबद्धपर्याय'च्या मान्यतेमध्ये काही फरक पडत नाही.

१३) **प्रश्न :–** केवलीच्या ज्ञानानुसार सर्व काही क्रमबद्ध आहे व आमच्या ज्ञानानुसार अक्रमबद्ध आहे, असे मानले तर काय

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



नुकसान (हानी) आहे ? कारण केवलींना भविष्याचे ज्ञान आहे आणि आम्हाला नाही. अशा मान्यतेमध्ये अनेकान्तदेखील सिद्ध होतो.

**उत्तर :-** आमच्या मानण्यामुळे वस्तुचे स्वरूप दोन प्रकारचे थोडेच होणार आहे ते (वस्तुस्वरूप) जसे आहे तसेच आहे; आणि आम्हालादेखील ते जसे आहे तसेच समजून घेतले पाहिजे (समजून घ्यावे) आपली मान्यता थोडीच त्यावर लादायची आहे.

केवली भगवंतांचे ज्ञान पर्यायाची क्रमबद्धता स्पष्ट पाहते-जाणते आणि आम्ही आगमाने, अनुमानाने, युक्तीने जाणतो. केवली भगवंत हे देखील स्पष्ट जाणतात की कोणत्या द्रव्याची कोणती पर्याय केव्हा आणि कोणत्या विधीने आणि कोणत्या निमित्तपूर्वक कशी होणार आहे, आणि आम्ही केवळ इतके जाणतो की प्रत्येक द्रव्याच्या प्रत्येक पर्यायीचा द्रव्य-क्षेत्र-काल-भाव आणि निमित्त सर्व काही निश्चित आहे, परंतु आम्ही हे जाणत नाही की कोणाचे, केव्हा, काय आणि कसे होणार आहे ?

भविष्याच्या पर्यायीदेखील क्रमबद्धच होतात.' हे ज्ञान होऊन-सुध्दा आम्हाला हे ज्ञान नाही की कोणत्या पर्यायानंतर कोणता पर्याय होणार आहे. यामुळे त्या पर्यायी अक्रमबध्द कशा काय होणार ? त्यामुळे आम्ही हे कसे काय म्हणू शकतो की आमच्या ज्ञानानुसार पर्याय अक्रमबध्द होतात.

यामुळे तर आमची अज्ञानताच सिध्द होते. पर्यायाची अक्रमबध्दता सिध्द होत नाही. आम्हाला आमच्या अज्ञानाला पर्याया-वर थोपविण्याचा (लादण्याचा) काय अधिकार आहे ?

जरा विचार तर करा ? रविवार इत्यादी सात वारांचा क्रम निश्चित आहे. काही व्यक्तींना त्या क्रमाचे ज्ञान आहे, ते चांगल्या प्रकारे जाणतात की कोणत्या वारानंतर कोणता वार येणार आहे आणि हे देखील जाणतात की भविष्यामध्ये कोणत्या वारानंतर कोणते वार येतील, परंतु काही लोकांना याचे ज्ञान नाही. म्हणून काय ज्या लोकांना ह्याचे ज्ञान आहे, त्या लोकांच्या ज्ञानानुसार वार क्रमबध्द आहेत. आणि ज्यांना ज्ञान नाही किंवा चुकीचे ज्ञान आहे त्यांच्या ज्ञानानुसार वार अक्रमबध्द किंवा अनिश्चित आहेत.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मला असा विश्वास आहे की हे आपणासही स्वीकार होणार नाही. कारण त्यांचे ज्ञान अज्ञान किंवा चुकीचे ज्ञान ह्याचा वारांवर काय परिणाम होणार आहे ? ते तर आपल्या निश्चित क्रमानुसारच येतील (राहतील) त्याचप्रमाणे पर्यायाचे क्रमबद्धतारूप वस्तुस्थितीमध्ये केवलीच्या ज्ञानाने आणि क्षयोपशमज्ञान असणाऱ्यांच्या ज्ञानाने किंवा अज्ञानाने काय फरक पडतो, त्या पर्यायी जशा आहेत तशाच राहतील.

ज्ञान, अज्ञान, अल्पज्ञान, पूर्णज्ञान, मिथ्याज्ञान यांच्या स्थितीचा (अवस्थेचा) वस्तुच्या स्थितीशी काही संबंध नाही. यांच्यामुळे त्यामध्ये काही फरक पडत नाही. परंतु वस्तुची जी स्थिती आहे, त्या अनुसारच ज्ञान जाणते – अर्थात् ती वस्तुची स्थिती जे यथार्थपणे जाणते, तेच ज्ञान खरे ज्ञान आहे. जे पूर्ण जाणते ते पूर्णज्ञान आहे. जे अपूर्ण जाणते ते अपूर्ण ज्ञान आहे. जे मिथ्या जाणते ते मिथ्याज्ञान आहे, आणि जे जाणत नाही ते अज्ञान आहे.

म्हणून केवलीच्या ज्ञानानुसार पर्यायी क्रमबद्ध होतात, आणि आमच्या ज्ञानानुसार अक्रमबद्ध हे म्हणणे तसेच क्रमबद्धपर्यायाचे खरे स्वरूप जाणल्याशिवायच 'माझे देखील खरे आणि तुमचेही खरे' ही उभयाभासी बालचेष्टा आहे, हा काही अनेकान्त नव्हे.

जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चेमध्ये सहभागी झालेल्या दोन्हीही पक्षातील सर्व दिग्गज विद्वानांनी हे एकमताने स्वीकारले आहे की प्रत्येक कार्य स्वकालामध्येच होते. या संबंधीचा उल्लेख जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चेमध्ये खालील प्रमाणे आहे :–

१. "अपर पक्षाद्वारे प्रत्येक कार्य स्वकालामध्ये होते याचा स्वीकार"

यास प्रारंभ करीत अपरपक्षाने सर्वप्रथम आम्ही प्रथम आणि द्वितीय उत्तरामध्ये उल्लेख केलेल्या पाच आगम प्रमाणाच्या आधाराने हे स्वीकार केले की 'प्रत्येक कार्य स्वकालामध्येच होते' याबद्दल आम्हाला प्रसन्नता वाटते. आम्हाला विश्वास आहे की समग्र जैन परंपरा यामध्ये प्रसन्नतेचा अनुभव करील. कारण 'प्रत्येक कार्य स्वकालामध्येच होते' हे तथ्य एक अशी वास्तविकता आहे की जी जैनधर्म आणि वस्तु व्यवस्थेचा प्राण आहे. याचा अस्वीकार केल्यामुळे

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



केवलज्ञानाची सर्वज्ञताही सिद्ध होत नाही आणि वस्तु व्यवस्थेच्या अनुरूप कार्य-कारण परंपरासुद्धा सुघटित होऊ शकत नाही.

अपर पक्षाने प्रतिशंका ३ मध्ये ज्या शब्दाने स्वकालामध्ये कार्य होण्याचा स्वीकार केला आहे, ते शब्द खालील प्रमाणे आहेत :–

'हे आम्ही जाणतो की जिनेन्द्र देवांना केवलज्ञानाद्वारे प्रत्येक कार्याच्या उत्पन्न होण्याचा समय माहीत आहे, कारण केवलज्ञानामध्ये विश्वाच्या संपूर्ण पदार्थाच्या त्रिकालवर्ती समस्त पर्यायाचे केवलज्ञानी जीवांना युगपत् ज्ञान करण्याचे सामर्थ्य जैन संस्कृतीने स्वीकारलेले आहे. त्याच आधारावर आम्ही हे देखील मानतो की प्रत्येक कार्याची उत्पत्ती त्याच कालामध्ये होते. ज्या कालामध्ये त्याच्या त्या उत्पत्तीचे होणे आहे,केवलज्ञानीजीवाच्या केवलज्ञानामध्ये ते प्रतिभासित होत आहे

२. केवलज्ञान ज्ञापक आहे कारक नाही–

वरील तथ्याच्या स्वीकृतीनंतर अपर पक्षाकडून जो भाव व्यक्त करण्यात आला तो असा– "परंतु कोणत्याही कार्याची उत्पत्ती ज्या कालामध्ये होते त्या कालामध्ये ती उत्पत्ती या आधारावर होत नाही की त्या कालामध्ये त्या कार्याच्या त्या उत्पत्तीचे होणे केवलज्ञानींच्या ज्ञानामध्ये प्रतिभासित होत आहे. (केवलज्ञानींच्या ज्ञानामध्ये ती उत्पत्ती प्रतिभासित होते म्हणून काही त्याकालामध्ये त्या कार्याची उत्पत्ती होते असे नव्हे – हा याचा अभिप्राय आहे) कारण वस्तुची ज्याकालामध्ये जी अवस्था होते त्या अवस्थेला जाणणे हेच केवळ केवलज्ञानाचे कार्य आहे. त्या कार्याचे होणे कर्त्तारूप हे काही केवलज्ञानाचे कार्य नव्हे."

म्हणून हे कथनदेखील आगम परंपरेच्या अनुरूप असल्यामुळे स्वीकार करण्यायोग्य आहे, परंतु अपरपक्षाच्या या कथनामध्ये आम्ही आणखी थोडे जोडू इच्छितो की – "ज्याप्रमाणे ज्या कालामध्ये जे कार्य होते त्यास केवलज्ञान यथावत् जाणते; त्याचप्रमाणे त्या कार्याच्या कारक सामुग्रीलादेखील केवलज्ञान जाणते.

केवलज्ञान कोणत्याही कार्याचा कारक नसून केवळ ज्ञापक आहे यामध्ये कोणालाच विवाद नाही."[1]

---

[1] जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चा, प्रथम भाग, पान २४९

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



वरील उल्लेखाने हे सिद्ध होते की प्रत्येक कार्य स्वकालामध्येच होते – हे एक सर्व मान्य तथ्य आहे.

आता अनेकान्तसंबंधी स्पष्टीकरण राहिले, ते असे – अनेकान्त वस्तुच्या स्वरूपामध्ये सहजच घटित होतो, त्यास घटित करण्यासाठी वस्तु स्वरूपाला बळजबरीने विकृत करण्याची काही आवश्यकता नाही.

"पर्यायी क्रमबद्धच होतात, अक्रम होत नाहीत; आणि गुण अक्रमच असतात, क्रमाने नसतात" – हा विधी निषेधपरक सम्यक् अनेकान्त आहे, याहूनही अधिक स्पष्ट करायचे झाल्यास गुणांच्या अपेक्षेने द्रव्य अक्रम (युगपद्) आहे आणि पर्यायाच्या अपेक्षेने क्रमबद्ध

याप्रमाणे गुण-पर्यायात्मक वस्तुमध्ये क्रम-अक्रमासंबंधीचा अनेकान्त घटित होतो.

उदाहरणार्थ आत्मख्यातीमध्ये आचार्य अमृतचंद्रदेवांनी लिहीले आहे :–

"क्रमाक्रमप्रवृत्तविचित्रभावस्वभावत्वादुत्संगितगुणपर्याय:"[1]

आणि तो समय (आत्मा अथवा कुठलेही द्रव्य) क्रमरूप (पर्याय) आणि अक्रमरूप (गुण) प्रवर्तमान असे अनेकभाव त्याचा स्वभाव असल्यामुळे त्याने गुण-पर्यायांचा अंगिकार केला आहे – असा आहे.

येथे परवस्तुला गुण-पर्यायात्मक म्हटले आहे तसेच गुणांचा स्वभाव अक्रम व पर्यायांचा स्वभाव क्रमवर्ती म्हटले आहे.

जर पर्यायामध्येच क्रम-अक्रम घटित करणे अभिष्ट असेल तर ती अपेक्षा दूसरी होईल.

प्रत्येक द्रव्यामध्ये अनंतगुण आहेत आणि प्रत्येक गुणाची प्रत्येक समयाला एक पर्याय होते. या अपेक्षेने प्रत्येकद्रव्यामध्ये एका समयामध्येच अक्रम अर्थात् एकाचवेळी अनंत पर्याय होतात, तसेच एकागुणाच्या अनंतसमयामध्ये अनंत पर्याय होतात, त्या क्रमश: एका-एका समयामध्ये एक-एकच होतात.

[1] समयसार गाथा २ ची टीका

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



याप्रमाणे पर्यायीनादेखील क्रम-अक्रम म्हणू शकता, परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की या अपेक्षेने क्रम-अक्रम मानल्यास देखील 'क्रमबद्धपर्यायामध्ये' चर्चित पर्यायांच्या क्रमनियमिततेत काहीच प्रभाव पडत नाही.

याप्रकारचे कथन तत्त्वार्थराजवर्तिकमध्ये येते, ते खालील प्रमाणे :–

"स च पर्यायो युगपद्वृत: क्रमवत्तो वा। सहवृत्तो जीवस्य पर्याय: अविरोधात सहावस्थायी सहवृत्त: गतीन्द्रियकाययोगवेदकषाय-ज्ञानसंयमादि: क्रमवर्ती तु क्रोधादि देवादि-बाल्याद्यवस्था-लक्षण।"[1]

आणि ती पर्याय युगपत्‌ही होते आणि क्रमवर्तीदेखील होते. अविरोधाने एकाचवेळी होणारी जीवाची पर्याय एकाचवेळी होत असल्याने गती इन्द्रिय, काय, योग, वेद, कषाय, ज्ञान आणि संयम इत्यादी सहावस्थायी पर्याय आहे, तसेच क्रोधादी, देवादी आणि बाल्यादी अवस्थालक्षण क्रमवर्ती पर्याय आहे।"

क्रम आणि अक्रम या शब्दांचे अर्थ दोन प्रकाराने केले जातात. पहिला अर्थ क्रम म्हणजे क्रमश: अर्थात्‌ एकानंतर एक आणि अक्रम म्हणजे युगपद्‌ अर्थात एकाचवेळी (एकदम) दुसरा अर्थ क्रम म्हणजे एकानंतर एक आणि ते देखील निश्चित, एकदम व्यवस्थित तसेच असे की 'यानंतर हेच, अन्य नाही.' आणि अक्रम म्हणजे अव्यवस्थित, काहीही निश्चित नाही, वाटेल त्यानंतर वाटेल तो.

वरील दोन्ही अर्थामधे पहिल्या अर्थाप्रमाणेच पर्यायामध्ये क्रम-अक्रम दोन्ही अपेक्षा घटित होतात, परंतु या अनुशीलनामध्ये द्वितीय अर्थाच्या अपेक्षेने क्रमबद्ध पर्यायाचे अनुशीलन केलेले आहे, त्याप्रमाणे पर्यायी एका निश्चित क्रमाप्रमाणेच होतात, अक्रमाने नव्हे – असा सम्यक्‌ एकान्त फलित होतो, जो स्याद्वादी जैनदर्शनास अभीष्ट आहे.

सम्यक्‌ आणि मिथ्या अशा भेदाने एकान्तदेखील दोन प्रकारचा आहे. आणि अनेकान्तदेखील दोन प्रकारचा आहे. त्याची चर्चा 'क्रमबद्धपर्याय : एक अनुशीलन" मध्ये विस्ताराने केलेली आहे. हे

[1] तत्त्वार्थवार्तिक, अध्याय ४; सूत्र ४२, पृष्ठ २५९

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



देखील स्पष्ट केलेले आहे की जैनदर्शन सम्यक् एकान्तवादी आणि सम्यक् अनेकान्तवादी दर्शन आहे.

सम्यक् अनेकान्त द्रव्य पर्यायात्मक वस्तुवर घटित होतो आणि सम्यक् एका अंशावर अर्थात् द्रव्य किंवा पर्यायावर घटित होतो.

येथे पर्यायाची चर्चा असल्यामुळे त्यावर सम्यक्‌एकान्तच घटित होतो. पर्याय क्रमबद्धच होतात, हा सम्यक् एकान्त आहे आणि गुण अक्रमबद्ध (युगपद्) च होतात, हादेखील सम्यक् एकान्त आहे.

गुण आणि पर्याय – दोन्ही वस्तु (द्रव्य) चें अंश आहेत; आणि वस्तु अर्थात् द्रव्य अंशी आहे, नयरूप सम्यक्‌एकान्त अंशग्राही आहे आणि प्रमाणरूप सम्यक् अनेकान्त अंशीग्राही अर्थात वस्तुग्राही आहे. गुण आणि पर्याय वस्तुचे अंश आहेत. म्हणून ते सम्यक् एकान्त स्वरूप आहेत, आणि गुण पर्यायात्मक वस्तु अंशी असल्यामुळे अनेकांत स्वरूप आहे.

अक्रमवर्ती गुण आणि क्रमवर्ती पर्याय – याप्रमाणे गुण पर्यायात्मक वस्तुमध्ये अनेकांत घटित होतो.

तसे तर एका अपेक्षेने वरील पर्यायीमध्येदेखील घटित केले आहे आणि हे देखील स्पष्ट केले आहे की अकलंकदेवांनी असा प्रयोग केला आहे तरीदेखील जर आपण याच अपेक्षेने केवळ एका पर्यायामध्ये क्रमाक्रम घटविण्याचा आग्रह (हट्ट) कराल तर मग आम्ही आपणास असेही म्हणू शकतो की केवळ एका पर्यायामध्ये आपण नित्यनित्यात्मक अनेकान्तदेखील घटवा किंवा पर्यायारहित एका द्रव्यामध्येदेखील नित्यानित्यात्मक अनेकान्त घटवून दाखवा.

शेवटी नित्यानित्यात्मक अनेकान्तदेखील गुणपर्यायात्मक वस्तुमध्येच घटिक होतो केवळ एका पर्यायामध्ये घटित होत नाही, केवळ एका द्रव्यामध्येदेखील नाही.

ज्याप्रमाणे वस्तु द्रव्यदृष्टीने नित्य आहे आणि पर्यायदृष्टीने अनित्य आहे पर्यायरहित केवळ एका द्रव्यामध्ये किंवा केवळ एका पर्यायामध्ये नित्यानित्यात्मकता घटू शकते काय ? नाही, तर मग क्रम अक्रमांनादेखील केवळ एका द्रव्यामध्ये घटित करण्याचा आग्रह

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



(हट्ट) का? क्रम अक्रमाचा अनेकान्तदेखील गुणपर्यायात्मक वस्तुमध्येच घटित होईल.[1]

अनेकान्ताचे खरे स्वरूप समजल्याशिवाय वाटेल तसा उलट-सुलट अनेकान्त लावणे चांगले नाही. अनेकान्त घटित करण्यापूर्वी त्याचे खरे स्वरूप समजून घेतले पाहिजे.

१४) **प्रश्न** :– अकाल मृत्युच्या संदर्भात आपणच घड्यातील पाणी अपराधीचे कैदेतून सुटणे इत्यादी उदाहरणे देऊन हे सांगितले आहे की – केवलींच्या ज्ञानाप्रमाणे मरणादी कार्य स्वकालामध्येच होतात, परंतु ज्योतिष्य इत्यादी क्षयोपशम ज्ञानाप्रमणाणे जे काही मरणादी संबंधी भविष्य वर्तविले जाते त्यात आयुचे अपकर्षण इत्यादी द्वारे फेर बदल देखील होतो.

यावरून असे वाटते की केवलींच्या ज्ञानाप्रमाणे पर्यायी क्रमबद्ध आणि आमच्या ज्ञानाप्रमाणे अक्रमबद्ध होतात?

**उत्तर** :– वरील उदाहरण देऊन हे सिद्ध केले होते की – मरणादी प्रत्येक कार्य (पर्याय) स्वकालामध्येच होते, परंतु त्याचे कथन दोन प्रकारे होते; असे सांगितले नाही की काही पर्यायी स्वकालात होतात आणि काही अकालामध्येदेखील होतात.

आयुकर्माची जेवढी स्थिती आहे त्या स्थितीचे अपकर्षण इत्यादी न होता आयुकर्माची स्थिती पूर्ण झाल्यानंतर जे मरण येते त्या मरणास काल मरण म्हणतात आणि आयुकर्माची जी स्थिती आहे त्या स्थितीचे अपकर्षणादी झाल्यामुळे जे मरण होते त्या मरणाला अकाल मरण म्हटले जाते.

अकाल मरणाचा आशय असा नाही की हे मरण स्वकाल मरणाशिवाय होते. अर्थात् हे मरणदेखील स्वकालात होते, परंतु आयुकर्माच्या अपकर्षणादीने होते. आयुकर्माच्या अपकर्षणादीच्या कारणाने जे मरण होते त्याची अकालमरण केवळ संज्ञा आहे. वास्तविक तर प्रत्येक कार्य स्वकालामध्येच होते.

---

1 अनेकान्ताच्या विस्तृत माहितीसाठी लेखकाचे 'अनेकान्त आणि स्याद्वाद्' पुस्तक वाचावे

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मोक्ष आणि सम्यक्त्वरूपी कार्याच्या संबंधी कलश टीकाकार पांडे राजमलजींनी लिहीले आहे :–

"हा जीव एवढा काळ व्यतीत झाल्यानंतर मोक्षाला जाईल अशी नोंद केवलज्ञानामध्ये आहे. – जरी जीवद्रव्य सम्यक्त्वरूप परिणमतो तरीदेखील काललब्धी नसताना करोडो उपाय केले तरी-देखील जीवाचे सम्यक्त्वरूप परिणमन होणे शक्य नाही (त्याची परिणमनाची योग्यता नाही.)"[1]

कोणतीही घटना नवीन घटित होत नाही, परंतु ती आधीच स्थित आहे, निश्चित आहे; ती केवळ स्वकालात प्रगट होते. या प्रकारचा भाव सापेक्षवादाचे प्रखर प्रचारक प्रसिद्ध वैज्ञानिक आइन्स्टीन (Einstein) यांनीदेखील व्यक्त केला आहे ते असे :–

"Events do not happen, they already exist and are seen on the time-machine.

घटना घडत नाहीत; त्या आधी पासूनच विद्यमान असतात आणि काल चक्रावर पाहिल्या जाऊ शकतात."

१५) **प्रश्न** :– शास्त्रामध्ये एक अकालनय सुद्धा आहे? कालनयाने कार्य स्वकालात होते आणि अकालनयाने अकालीदेखील होते – असे मानण्यात काय अडचण आहे ?

**उत्तर** :– अकाल नयाचा अर्थ असा नाही की कार्य स्वसमयात न होता असमयात होते. कार्य तर पाच समवाय असल्यानंतर होते; परंतु जेव्हा एका कारणाला मुख्य करून करून केले जाते तेव्हा अन्य कारण गौण असतात, त्यांचा अभाव नसतो.

जसे निसर्गज सम्यक्दशनदेखील देशनालब्धी शिवाय होत नाही आणि अधिगमज सम्यग्दर्शन देखील स्वभावाच्या आश्रयानेच होते. तरीदेखील ज्यामध्ये उपदेशाची मुख्यता असते त्यास निसर्गज सम्यग्दर्शन म्हणतात.

त्याचप्रमाणे ज्या कार्याच्या उत्पत्तीमध्ये काळास सोडून पुरुषार्थादी अन्य समवाय प्रमुख दिसतात, त्यांना अकाल नयाचा

---

[1] समयसार कलश ४ था टीकेचा भावार्थ

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



विषय म्हणतात. तसेच ज्यामध्ये काळाची प्रमुखता दिसते, त्यास कालनयाचा विषय म्हणतात, यालाच असेही व्यक्त केले जाते की कालनयाने स्वकालामध्ये कार्य होते आणि अकालनयाने अकालामध्ये.

या कथनाचे तात्पर्य असे मुळीच नाही की कार्य समयापूर्वी झाले आहे.

१६) **प्रश्न** :– प्रवचनसारमध्ये जेथे कालनय आणि अकालनयाचे कथन आहे, तेथे आंब्याचे उदाहरण देऊन स्पष्ट लिहीले आहे :–

"कालनयाने आत्मद्रव्याची सिद्धी समयाचा आधार होते, हे उन्हाळ्याच्या दिवसात पिकणाऱ्या आंब्याप्रमाणे जाणावे आणि अकालनयाने आत्मद्रव्याची सिद्धी समयाचा आधार घेत नाही, कृत्रिम उष्णतेने पिकविलेल्या आंब्याप्रमाणे जाणावे,"[1]

**उत्तर** :–लिहीलेले स्पष्टच आहे, परंतु त्याचा अर्थ काय आहे ? याचा विचार केला कधी ? कृत्रिमतेने पिकविलेला आंबा समयापूर्वी पिकविला – हे कुठून आणले ? तुम्हाला हे माहीत होते काय की तो केव्हा पिकणार होता ? असे असू शकत नाही काय की तोच त्याचा पिकण्याचा समय असेल, आणि त्याच्या पिकण्याचे निमित्त-देखील कृत्रिम उष्णता असेल व जर हे आपल्याला माहीत नाही की तो केव्हा आणि कसा पिकणार आहे; आपण असे कसे म्हणू शकता की तो समयापूर्वी पिकला ?

प्रत्येक कार्याच्या होण्याचा फक्त काळ नव्हे, निमित्तादी सर्व समवाय निश्चित आहेत आणि सर्वांच्या एकत्र येण्यानंतरच कार्य होते. तसेच जेव्हा कार्य होणार असते किंवा जे कार्य होणार असते तेव्हा ते सर्व कारण (समवाय) एकत्र येतातच (मिळतात), असे कधी होत नाही की कधी काही मिळालेच नाहीत (एकत्र आलेच नाहीत). सर्वांच्या एकदम एकत्र येण्यामुळेच त्यांना समवाय म्हणतात.

फांदीला लागलेल्या आंब्याच्या पिकण्यामध्ये कृत्रिम उष्णता इत्यादी देण्याचा पुरुषाचा प्रयत्न दिसत नाही, म्हणून जरी त्यास

---

1 कालनयेन निदाघदिवसानुसारिपच्यमानसहकारफलवत्समयायत्तसिद्धिः ।
अकालनयेन कृत्रिमोष्मपाच्यमानसहकारफलवत्समयानायत्तसिद्धिः ।
– प्रवचनसार, परिशिष्ट, पृष्ठ ५२७–२८

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



कालनयाला मुख्यता देऊन काललब्धी आल्यावर स्वयं पिकला असे म्हणतात, तरी देखील त्यामध्ये ऋतुकृत उष्णतेचें निमित्त देखील असतेच. गवत इत्यादीमध्ये पिकवलेल्या आंब्यामध्ये कृत्रिम उष्णता देण्याचा पुरुषाचा प्रयत्न लक्षात आला (दिसला), म्हणून कालास गौण करून अन्य समवाय, उदा. पुरुषाचा पुरुषार्थ, कृत्रिम उष्णतेचे निमित्त इत्यादी एकाधिक समवायाच्या मुख्यतेने त्यास अकालनयाच्या अपेक्षेने अकाल अर्थात् कालाहून भिन्न अन्य कारणांमुळे पिकला असे म्हटले.

येथे अकालचा अर्थ असमय किंवा समयापूर्वी असा नाही, परंतु काललब्धी व्यतिरिक्त अन्य पुरुषार्थादी समवायांचा समुदाय आहे. काल या शब्दाचा अर्थ केवळ समय नव्हे, परंतु काललब्धी नावाचा एक समवाय हा आहे. कालास सोडून शेष चार समवायांना एकाच नावाने संबोधायचे होते तेव्हा अकाल या शब्दाशिवाय आणखी वेगळे काय म्हटले जाऊ शकत असते ?

जसे जीवाहून भिन्न पाच द्रव्यांना अजीव म्हणतात; त्याचप्रमाणे येथे काल (काललब्धी) हून भिन्न चार समवायांना अकाल म्हटले आहे. म्हणून 'कालनयाने' चा अर्थ आहे – काललब्धीच्या अपेक्षेने कथन केल्यावर आणि 'अकाल नयाने' चा अर्थ आहे – काललब्धीला सोडून अन्य पुरूषार्थादी समवायाच्या अपेक्षेने कथन केल्यावर.

विषय थोडा सूक्ष्म आहे, परंतु समजण्यायोग्य आहे. हा विषय समजल्याशिवाय ह्याचे रहस्य समजणे शक्य नाही. सूक्ष्म अवश्य आहे, परंतु समजू शकत नाही – असे नाही. म्हणून जर उपयोगास सूक्ष्म करून श्रद्धापूर्वक समजण्याचा प्रयत्न केल्यास, समजू शकेल असा विषय आहे.

कालनय आणि अकालनयाचा 'क्रमबद्ध पर्यायाशी' काही विरोध आहे, असे नाही. परंतु हे नय क्रमबद्ध पर्यायाचे साधकच आहेत.

या संदर्भामध्ये 'जयपूर (खानियां) तत्त्वचर्चा' या ग्रंथातील खालील कथन दृष्टव्य आहे :–

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



"विचार करून पाहिल्यास काल नयामध्ये कालाची विविक्षा आहे आणि अकालनयामध्ये कालास गौण करून अन्य हेतूंची विविक्षा आहे.

जेथे इतर हेतूंना गौण करून कालाच्या प्रधानतेने कार्याला दृष्टीपथात घेतात, तेव्हा तो कालनयाचा विषय होतो आणि जेथे कालयास गौण करून अन्य विविक्षेने किंवा प्रयोगाने प्राप्त हेतूंच्या प्रधानतेने कार्यास दृष्टीपथात घेतात, तेथे तो कालनयाचा विषय होतो.

याप्रमाणे एकच कार्य कालनयाचासुद्धा विषय आहे आणि अकाल नयाचासुद्धा आहे. जर असे न मानले तर त्यांना नयवचन म्हणणे संगत होणार नाही.

यावरून हे स्पष्ट आहे की आचार्य अमृतचंद्र यांच्या वरील कथनामुळे एखादी पर्याय क्रमनियत होते आणि एखादी पर्याय क्रम-अनियत होते – असे त्रिकालामध्ये सिद्ध होत नाही. यावरून हेच सिद्ध होते की सर्वच कार्य क्रमनियत असून देखील ते विवक्षा भेदाने काल आणि अकाल या दोन्हीही नयांचे विषय आहेत."[1]

१७) **प्रश्न** :– काल-अकाल अशा प्रकारचा प्रयोग लोकांमध्ये प्रचलित नाही ना ?

**उत्तर** :– का नाही ? कालाव्यतिरिक्त अन्य समवायाला जसे अकाल म्हणतात तसा प्रयोग अन्यत्र जिनवाणीमध्ये आढळतो. जसे– जीव-अजीव. लोकांमध्येदेखील असा प्रयोग होतो (प्रचलित आहे). जैन शब्ददेखील आम्ही जैनधर्मियांना सोडून अन्य धर्मियांच्यासाठी उपयोगात आणतो. अजैनामध्ये हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी सर्वच येतात. जेव्हा आम्ही असे म्हणतो की तो अजैन आहे तेव्हा त्याचा अर्थ हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी कोणीही होवू शकतो.

जेव्हा आम्ही असे म्हणतो की हे काम अजैनांच्या सहयोगाने पूर्ण झाले, तेव्हा या म्हणण्यामधील आमच्या आशयात जैनांना सोडून अन्य अनेक संप्रदायवालेच अपेक्षित आहेत. जर यामध्ये

[1] जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चा, पुस्तक १, पृष्ठ ३५१–५२

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आम्हाला काही शंका निर्माण होत नाही तर मग अकालच अर्थ 'काल' या समवायाच्या व्यतिरिक्त इतर समवाय केल्यास अडचण का भासावी ?

अकालचा अर्थ आजपर्यंत आमच्या लक्षात आला नाही, याचा अर्थ असा नव्हे की त्याचा हा अर्थ अनुचित आहे. आमच्या लक्षात पुष्कळशा गोष्टी येत नाहीत. आमच्या ज्ञानात नाहीत म्हणून त्या चूकच्या आहेत काय ? वस्तुची व्यवस्था आपल्या तुच्छ क्षयोपशम ज्ञानाच्या आधारावर संचालित आहे (चालते) थोडीच ?

हे विचार करण्यासारखे आहे की नाही ? जर आहे, तर मग एकवेळ गंभीरतेने विचार करावा. विचार केल्यावर सर्व काही स्पष्ट होईल.

१८) **प्रश्न :–** "सर्व काही निश्चित आहे, त्यात कुठेही काही फेरबदल केला जाऊ शकत नाही" – असे मानल्यास समागत किंवा संभावित विपत्तीचा (संकटांचा) पत्ता लागल्यानंतर सर्व जगात भयाचे वातावरण पसरेल; कारण 'सर्व काही निश्चित'च्या अनुसार त्यास थांबविण्याचा प्रयत्न शक्य नाही.

'सर्व काही निश्चित' असे न मानल्यानंतर जरी आम्ही केलेला एखादा प्रयत्न यशस्वी न झाला तरी यशाच्या शक्यतेमुळे आशा तर राहतेना, निराशेचे वातावरण तर बनत नाही.

अशी हिन्दीत म्हण आहे की 'आशासे आसमान लगा है !' तात्पर्य हे आहे की सर्व संसार आशेवरच चालतो आहे. जर आशा राहिली नाही तर संसारामध्ये राहणे देखील अशक्य होईल आणि कार्याच्या यशासाठी होणाऱ्या प्रयत्नांमध्ये उत्साह देखील राहणार नाही.

एक चिमणी एक-एक काडी जमवून अथक् परिश्रम करून घरटे बनविते आणि ते नष्ट झाले तर किंवा नष्ट केले तर परत त्या प्रयत्नाला लागते. याचा एक मात्र आधार आशाच आहे. निराश व्यक्ती जीवनात काहीही करू शकत नाही कारण त्याचे मनोबलच संपते-तुटते.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



मनोबल संपले म्हणजे सर्वच संपले, कारण म्हटलेच आहे की, 'मनके हारे हार है और मनके जीते जीत'

म्हणून (आमचे मत आहे) पर्याय क्रमबद्ध असेल तर असू द्या; परंतु निराशेचे वातावरण बनू नये आणि आमच्या हृदयात आशेचा द्विप राहावा यासाठी क्रमबद्धपर्यायाचा सिद्धान्त स्वीकार न करणेच श्रेयस्कर आहे ?

उत्तर :– वस्तुस्वरूपाचे वास्तविक ज्ञान झाल्यानंतर भयाचे वातावरण कसे काय बनेल ? भयाचे वातावरण ज्ञान आणि कषायाने बनते; भय स्वयं एक कषाय आहे; पंचवीस कषायामध्ये त्याचा समावेश आहे.

आध्यात्मिक कवी बुधजनजी म्हणतात :–

हमकौं कछु भय ना रे, ज्ञान लियो संसार ।।
जाकरि जैसे जाहि समम में, जो होतब जा द्वार ।
सो बनि है टरिहै कछु नाहीं, करि लीनों निराधार ।।
हम कौं कछु भय ना रे ।। ३ ।।

येथे बुधजनजी आपल्या निर्भयतेचा आधार 'क्रमबद्धपर्याय' असल्याचे स्पष्ट करतात. ते या काव्यात स्पष्ट म्हणताहेत की आम्हाला काही भय राहिले नाही; कारण आम्ही संसाराची खरी स्थिती जाणली.

ती खरी स्थिती काय आहे, जी जाणल्याने बुधजनजी निर्भय झाले.

ती खरी स्थिती हीच की ज्या द्रव्याचा जी पर्याय, ज्या समयामध्ये, ज्याच्याकडून, जशी होणार आहे; त्या द्रव्याची, तीच पर्याय, त्याच समयामध्ये, त्याच्याचकडून, तशीच होईल. त्यामध्ये काही फेर-बदल शक्य नाही त्यामध्ये एक समयही मागे पुढे होऊ शकत नाही – हा निर्धार (पक्का निर्णय) त्यांनी केला आणि त्याच्या आधारावर ते निर्भय झाले.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ते सत्याच्या आधारावर निर्भय झाले; या कल्पनेच्या आधारावर नाही की प्रयत्न करून पहा, कदाचित् काही फेरबदल होईल. ते कल्पना विश्वामध्ये विचरण करणारे सामान्यजन नव्हते. ते तर वस्तुचे खरे स्वरूप जाणून निर्भय होणारे ज्ञानी आत्मा होते आणि वस्तुस्थितीदेखील अशीच आहे की निर्भयता सत्याच्या आधारावर येते, कल्पनेच्या आधारावर नव्हे.

समजा ज्ञानी आणि अज्ञानी एका ठिकाणी बसले आहेत आणि समोरून एक प्रचंड नरभक्षी सिंह आला. यावेळी पळून जाण्याला वेळ नाही किंवा इतर काही वाचवण्याचा उपाय दिसत नाही. यावेळी ज्ञानी तर या क्रमबद्ध सिद्धांताच्या आधारावर धैर्य ठेवून निर्भयराहील आणि अज्ञानी भयाक्रान्त होईल. अज्ञानी वाटेल ते काही तरी निरर्थक करण्याचा अयशस्वी प्रयत्न करील; परंतु त्यामुळे काही होणार नाही, जे होणार आहे तेच होईल.

असे होऊ शकते की दोघेही भगवन्ताचे स्मरण करतील, णमोकार मंत्र म्हणतील, दोघेही निर्भय दिसतील. मारणाऱ्याला दोघेही एकसारखे दिसतील, परंतु दोघांच्या परिणामामध्ये (भावामध्ये) महान अंतर आहे. ते अन्तर वरून दिसणार नाही. कारण ते त्यांच्या अंतरंगातील अंतर आहे. दोघांच्या चिंतनाच्या आधारातील अंतर आहे. दोघांच्या चिंतनाचा आधार वेगवेगळा आहे.

अज्ञानी विचार करतो– मी णमोकार मंत्र म्हणत आहे, भगवंतांचे स्मरण करीत आहे. या प्रभावाने आता देवता येतील आणि मला वाचवतील कारण त्याने शास्त्रामध्ये अशा कथा वाचल्या आहेत. त्या कथेत असा उल्लेख आहे की एक धर्मात्मा संकटात सापडला होता, त्याने णमोकार मंत्राचे स्मरण केले आणि देवतांनी त्याचे रक्षण केले. त्याच आधारावर हा देखील आशा करीत आहे. जोर-जोराने णमोकार मंत्र म्हणत आहे, वरून निर्भय दिसत आहे, परंतु आंतून भयाक्रांत आहे. कारण ह्याला हा पक्का विश्वास नाही की देवता येतीलच. जर आल्या नाही तर – – –ही कल्पनाच त्याला भडकविते. जर त्यास दुसरा उपाय दिसला तर तो निश्चित-

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पणे णमोकार मंत्राच्या भरवशावर बसणार नाही जीव धोक्यात घालणार नाही. त्याचा णमोकार मंत्रावरही पक्का विश्वास नाही. नाईलाजाने त्यावर विश्वास करणे त्याला भाग पडले. म्हणून तो निर्भय राहू शकत नाही

णमोकार मंत्राच्या स्मरणाने कधी कोण्या धर्मात्म्याचे रक्षण करण्यासाठी देवता आल्या होत्या – हे पौराणिक व्याख्यान सत्य असू शकते, त्यात शंका करण्याची गरज नाही, परंतु यामुळे हा नियम कसा काय सिद्ध होतो की जेव्हा-जेव्हा कोणी संकटात पडेल आणि तो णमोकार मंत्र म्हणेल; तेव्हा-तेव्हा देवता निश्चितच येतीलच आणि अतिशय होईलच.

शास्त्रामध्ये केवळ घडलेल्या घटनेचा उल्लेख आहे त्यात असे कुठे लिहीले आहे की-- असे केल्यामुळे असे होतेच; हे तर याने आपल्या मनानेच लावले आहे (जाणले आहे) आणि याचा आपल्या या स्वतःच्या जाणण्यावर देखील विश्वास कुठे आहे ? असता तर आकुलता का? भयकान्त का ?

ज्ञानीदेखील णमोकारमंत्र म्हणत आहे; परंतु त्याच्या शांततेचा आधार णमोकारमंत्रावरील विश्वास नाही किंवा आपणास वाचविण्यासाठी कोणी देवता येतील हा देखील नाही. णमोकारमंत्र तो सहज अशुभभावापासून तसेच आकुलतेपासून वाचण्यासाठी म्हणत आहे. त्याच्या निर्भयतेचा आधार 'क्रमबद्धपर्यायाला पोषक असलेली ही ओळ आहे'–

हमको कछु भय ना रे ------

तो या आशेवर निर्भर नाही की देवता त्याला वाचवितील; परंतु तो या आधारावर निर्भय आहे की मरायचे असेल तर मरेणच, कोणी वाचवू शकत नाही आणि मरणार नसेल तर कोणी मारू शकत नाही. मरणाची वेळ आली असेल तर कोणी टाळू शकत नाही, आली नसेल तर कोणी मारू शकत नाही. जर याच निमित्ताने रायचे असेल तर कोणी बदलू शकत नाही आणि या निमित्ताने मरण नसेल तर कोणी मारू शकत नाही.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



त्याने द्रव्याच्या स्वभावाप्रमाणे पर्याय स्वभावालाही चांगले जाणले आहे. 'जान लियो संसार' चा हाच भाव आहे, त्याच आधारावर तो निश्चित आहे.

त्याची द्रव्यस्वभावामध्ये परिवर्तन करण्याची काही इच्छा नाही आणि पर्यायाच्या परिवर्तनामध्ये दखल देण्याचाही काही आग्रह नाही. थोडी अधिक व्याकुळता दिसते, त्यावरून जाणावे की चारित्राची दुर्बलता आहे, श्रद्धेचा दोष नाही. कारण त्याची श्रद्धा निर्दोष स्वभावाचा आश्रय घेतल्यामुळे पूर्ण निर्दोष झाली आहे.

दुसरी खोटी आशा ठेवण्यासाठी आपण सत्याच्या अस्वीकृतीचा महानतम (अत्यंत महान) अपराध का करू इच्छिता ? आणि आशा देखील दुःखच आहे. आशा असताना आजपर्यंत कोणीही सुखी झाला नाही आणि होणे शक्य नाही. विशेष गोष्ट अशी आहे की आशेची कधीच पूर्ती होत नाही.

आचार्य गुणभद्र यांनी असे लिहीले आहे :–

"आशागर्तः प्रतिप्राणि यस्मिन् विश्वमणूपमम् ।
कस्य किं कियदायाति वृथा वो विषयैषिता ।। ३६ ।।[1]

प्रत्येक प्राण्याचा आशारूपी खड्डा एवढा मोठा आहे की त्याच्या पूर्तीसाठी सर्व विश्व देखील अणुसमान आहे, अर्थात नाहीच्या बरोबर आहे, जणु उंटाच्या तोंडात जिऱ्याचा कण आहे. शिवाय जीवदेखील अनंत आहेत आणि प्रत्येकाच्या अशाच इच्छा आहेत, आशा आहेत; जर या विश्वाचे वाटप केले तर कोणाच्या इच्छेला किती येईल ? त्यामुळे आशारूपी खड्ड्याची पूर्ती होणे शक्य नाही. त्याची आशा करणेच व्यर्थ आहे. सुखी होण्याचा केवळ एक उपाय, आशेचा अभाव करणे हाच आहे."

आशेचा अभाव झाल्यानंतर निराशा होत नाही, अनाशा होईल, आशेप्रमाणे निराशादेखील दुःखस्वरूप आहे, परंतु आशेचा अभाव झाल्याने झालेली अनाशा सुखस्वरूप आहे.

---

1 आत्मानुशासनम् श्लोक ३६

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आणखी आपण असे म्हटले की आशेचा अभाव झाला तर संसारामध्ये राहणे कठीण (दुर्भर) होईल आणि ज्ञानींना तर हीच इच्छा आहे की संसारामध्ये राहणे दुर्भर (कठीण) व्हावे. त्यांना संसारात राहायचेच कुठेय ? संसाराचा अभाव करून मोक्ष प्राप्त करू इच्छितात; म्हणून त्यांना हे इष्टच आहे.

संसारकार्यामध्ये उत्साह राहणार नाही; तर हे देखील चांगलेच आहे. हा आत्मा संसारमार्गावरूनच निरूत्साहित होऊन मुक्तीमार्गामध्ये उत्साहित व्हावा, मुक्तीमार्गात लागावा हेच क्रमबद्ध पर्यायीच्या श्रद्धेचे फळ आहे. जर हे होत असेल तर काय वाईट आहे ?

मनोबल तुटल्याशिवाय आत्मबल जागृतही होत नाही. संसारात काही गडबड होऊ नये या भयाने सत्याचा स्वीकार करण्याला नकार का देता ?

बंधूंनो ! कोणत्याही भयामुळे किंवा शंकेमुळे या महान सत्याच्या स्वीकाराला नाकारू नका, चक्रवर्तीच्या मुलीचा निरोप आला आहे; चक्रवर्तीची मुलगी तुमच्या गळयात वरमाला टाकू इच्छिते; नाकारू नकोस. हे मोठे सौभाग्य आहे, याला सोडू नकोस. नाहीतर पश्चाताप करावा लागेल. सर्व प्रकारच्या अशुभ शंकापासून पूर्णविराम घे आणि एक वेळ गंभीरतेने विचार करून या महान सत्याचा स्वीकार कर. यामध्ये आमचा काहीही स्वार्थ नाही. तुझ्या भल्यासाठी आम्ही हे तुला सांगीत आहोत.

आता याप्रमाणे भाव आहे, म्हणून सांगीत तरी आहोत; जर उद्या हा भाव न राहिला तर न जाणो कोणी सांगणारा भेटणारही नाही.

१९) **प्रश्न :–** जर सर्व काही क्रमबद्धच आहे, तर आपण व्यर्थ का त्रास करून घेत आहात ? आम्हाला जेव्हा समजायचे असेल तेव्हा समजेल, आणि जर समजून येणार नसेल तर येणार नाही; आपण एवढे अधीर का होता ? बळजबरीने आपल्या डोक्यावर का थोपवू इच्छिता ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**उत्तर :–** 'आपण व्यर्थ का त्रास करून घेत आहात, एवढे अधीर का होत आहात ?' आपले हे विचारणे देखील बरोबरच आहे. 'आम्ही आपणामुळे नव्हे, आम्ही आमच्या स्वतःच्या रागामुळे अधीर होत आहोत. आमची ही इच्छा आहे की आम्ही देखील जगाच्या चिंतेमध्ये व्यर्थ अधीर न व्हावे; परंतु आम्हीतरी काय करणार आम्हाला हा राग येतोच आहे, आल्याशिवाय राहतच नाही आणि या भूमिकेमध्ये हे अनुचितही नाही. वीतरागी भावलिंगी मुनिराजांना-देखील याप्रकारचा राग आल्याशिवाय राहत नाही, नाहीतर परमागमाची रचना (शास्त्र लेखन) तरी कसे काय झाले असते ? परंतु याचा अर्थ हा नाही की राग चांगला आहे. शेवटी तो आहे रागच, अधीरता आणि आकुलतेचा उत्पादकच आहे. उत्पादकच काय, स्वयं आकुलतारूपच आहे.

मुनिराजांप्रमाणेच आम्हाला देखील हा राग आल्याशिवाय राहात नाही की जे सत्य आम्ही जाणले, ज्यामुळे आम्हाला अनंत शांती मिळाली; ते सत्य सर्व जगाला माहीत व्हावे. त्यांनी ते जाणावे आणि संपूर्ण जगाला देखील अशी अभूतपूर्व शांती प्राप्त व्हावी.

२०) **प्रश्न :–** आपली भावना ठीक आहे, परंतु आपले म्हणणे जर कोणी मानीत नसेल तर आपण काय करणार आहात ?

**उत्तर :–** काय करणार आहोत ? काही नाही. आम्ही परामध्ये (दुसऱ्यांमध्ये) करूच काय शकतो ? पर्यायीमध्ये फेरबदल करण्याच्या बुद्धीने आकुलित असलेले जग पाहून आम्हाला करूणा येते, म्हणून जे आम्ही जाणतो ते बोलतो, लिहीतो; ज्यांची होनहार (ज्यांचे भविष्य) चांगले आहे, ते ऐकतात, समजून घेतात, स्वीकार-देखील करतात, सुखी देखील होतात, शांतही होतात; आणि जे लोक ऐकत नाहीत, वाचत नाहीत, विचार करीत नाहीत, स्वीकारीत नाहीत; त्यांचे होनहारच तसे आहे – असे जाणून आम्ही देखील संतोष धारण करतो.

हाच मार्ग आमच्या श्रद्धास्पद महापंडित टोडरमलजींनी दाखविलेला आहे – त्यांच्याच शब्दात :–

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



ज्याप्रमाणे (एखाद्या) अत्यंत दरिद्रीला केवळ अवलोकनासाठी चिंतामणी रत्नाची प्राप्ती व्हावी आणि त्याने अवलोकन करू नये, तसेच जसे (एखाद्या) कोड झालेल्या गृहस्थाला अमृतपान करवावे आणि त्याने करू नये; त्याचप्रमाणे संसारपीडित जीवाला सुगम मोक्ष-मार्गाच्या उपदेशाचे निमित्त मिळावे आणि त्याने त्याचा अभ्यास करू नये तर त्याच्या अभाग्याची महिमा आम्ही तरी करू शकत नाही; त्याच्या भविष्या (होनहार) चा विचार केल्यावर आम्हाला समता येते."[1]

स्वभाव दृष्टीने प्राप्त होणारे हे पर्यागत महान सत्य जाणून, मानून सर्व आत्मे अनंतसुखी आणि शांत (शांततामय) व्हावेत; या पवित्र भावनेने विराम घेतो.

---

हमकौं कछू भय ना रे, जान लियौ संसार ॥
हमकौं कछू भय ना रे. ॥
जो निगोद में सो ही मुझ में, सो ही मोख मंझार ।
निश्चय भेद कछू भी नाहीं, भेद गिनै संसार ॥
हमकौं कछू भय ना रे. ॥१॥
परवश व्है आपा विसारि के, राग-दोष कौ धार ।
जीवत-मरत अनादि काल तें, यौं ही है उरझार ॥
हमकौं कछू भय ना रे. ॥२॥
जाकरि जैसे जाहि समय में, जो होतब जा द्वार ।
सौ बनिहै टरिहै कछु नाहीं, करि लीनौं निरधार ॥
हमकौं कछू भय ना रे. ॥३॥
अगनि जरावै पानी बोबै, बिछुरत मिलत अपार ।
सो पुद्गलरूपी मैं 'बुधजन', सबकौं जाननहार ॥
हमकौं कछू भय ना रे. ॥४॥

---

1 मोक्षमार्ग प्रकाशक पान २०

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

परिशिष्ट १

# क्रमबद्धपर्याय :

## पू. कानजी स्वामीजींची मुलाखत

आजच्या अत्यंत चर्चिलेला विषय 'क्रमबद्धपर्याय' च्या संदर्भात विक्रम संवताच्या एकवीसाव्या शतकामध्ये 'क्रमबद्धाची चर्चा प्रारंभ करणारे पू. कानजी स्वामींची त्यांच्याच वाढदिवसाच्या निमित्ताने दि. २८–४–१९७९ रोजी मुंबईला सायंकाळच्या तत्त्वचर्चेच्या वेळी हजारो मुमुक्षु बांधवांच्यामध्ये संपादक आत्मधर्म (ह्या पुस्तकाचे लेखक) द्वारे घेतली गेलेली मुलाखत इथे प्रस्तुत आहे.

'क्रमबद्धपर्याय' वर स्वामीजींची प्रवचने जरी 'ज्ञेयस्वभाव–ज्ञानस्वभाव' नावाने प्रकाशित झाली आहेत; तरी देखील त्यांचे ताजे विचार समाजाला प्राप्त व्हावेत – (ह्याच उद्देश्याने ही मुलाखत घेतली गेली आहे.) ह्या मुलाखतीचा हाच उद्देश आहे.

"धर्माचे मूळ सर्वज्ञ आहे, क्रमबद्धपर्यायाचा निर्णय झाल्याशिवाय सर्वज्ञाचा निर्णय होऊ शकत नाही.' धर्माचा आरंभच क्रमबद्धाच्या निर्णयाने होतो. हा निर्णय करणे फार जरूरीचे आहे."

उक्त शब्द पू. कानजी स्वामींनी तेव्हा उद्गारले होते, जेव्हा त्यांना सांगितले गेले की, "आत्मधर्मच्या संपादकीयामध्ये 'क्रमबद्ध-पर्याया'च्या संबंधात आम्ही एक लेखमाला चालवित आहोत, त्याचे नंतर पुस्तक रूपांत प्रकाशन होणार आहे. आपण ह्या युगांत 'क्रमबद्धपर्याय'चा एक प्रकारे उद्घाटनच केलेले आहे. ह्या संदर्भामध्ये उत्पन्न होणाऱ्या अनेक शंका-कुशंकाच्या संबंधामध्ये आपले ताजे विचार वाचकापर्यंत पोहोचवणे फारच उपयुक्त होईल. जरी आपली परवानगी असेल तर कांही गोष्टी आपणांस विचारू कां ?"

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



त्यांनी बोलणे सुरू करतांना प्रारंभी म्हणाले, "अहो! तुम्हाला जे विचारावयाचे असेल ते खुशाल विचारा, आम्ही केव्हा मनाई केली आहे ? समजून घेण्याकरीता जिज्ञासेने विचारणाऱ्या आत्मार्थीसाठी तर आमची दारे सदैवच खुली आहेत. वाद-विवाद करणाऱ्या साठी तर आमच्याजवळ जराही वेळ नाही. वाद-विवादामध्ये काहीच निष्पन्न होत नाही. चर्चेसाठी तर कोणतीच मनाई नाही.

पंडित टोडरमलजीने रहस्यपूर्ण चिट्ठीमध्ये लिहीले आहे की – 'साधर्मींनी तर परस्पर चर्चा केली पाहिजे.'

क्रमबद्धपर्यायावर लिहून तुम्ही चांगलीच गोष्ट करीत आहोत. कमीत-कमी लोकांचे ध्यान तरी इकडे आकृष्ट होईल. ज्याचे भवितव्य चांगले असेल, त्यांच्या ध्यानात ही गोष्ट अवश्य येईल. 'धर्माचे मूळ सर्वज्ञ आहे,' क्रमबद्धाचा निर्णय झाल्याशिवाय सर्वज्ञाचा निर्णय होऊ शकत नाही.' धर्माचा आरंभच क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयाने होतो. ह्याचा निर्णय करणे फार जरूरीचे आहे."

**प्रश्न :–** "आपण तर पर्यायावर दृष्टि ठेवणाऱ्यांना पर्यायमूढ म्हणतां ?"

**उत्तर :–** "आम्ही काय म्हणतो ? प्रवचनसार (गाथा ९३) मध्ये लिहीले आहे"–

'पज्जयमूढा हि परसमया'

**प्रश्न :–** "क्रमबद्धपर्यायसुद्धा एक पर्याय आहे, मग तिचा निर्णय करणे आवश्यक कां आहे ?"

**उत्तर :–** "क्रमबद्धपर्यायाचा निर्णय तर आवश्यक आहे, परंतु तो दृष्टिचा विषय नाही.

एक गोष्ट आणखी लक्षात ठेवा की, पर्यायीचा निर्णय पर्यायीच्या आश्रयाने होत नाही, परंतु द्रव्याच्या आश्रयाने होतो. ज्ञायकस्वभावाच्या आश्रयाने क्रमबद्धपर्यायाचा निर्णय होतो, म्हणून असे म्हटले जाते की, – आश्रय करण्यायोग्य एकमेव आपला ज्ञायक स्वभावच आहे, पर्याय आश्रय करण्यायोग्य नाही."

**प्रश्न :–** "तर मग क्रमबद्धपर्यायाचा निर्णय करावा कि नाही ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**उत्तर :–** "निर्णय अवश्य करा, आश्रय करू नका. आम्ही आश्रय करण्याचा निषेध करतो, तुम्ही तर निर्णय करण्याचा निषेध करू लागलात ! आम्ही तर हे सांगतो की, ज्ञायक स्वभावाच्या आश्रयाने क्रमबद्धाचा निर्णय होईल म्हणून क्रमबद्धाचा निर्णय करण्या करीता ज्ञायक स्वभावाचा आश्रय करा. ज्ञायक स्वभावाच्या आश्रयाने क्रमबद्धाचा निर्णय सहज होईल. क्रमबद्धाच्या निर्णयाची जरूरी आहे, आश्रय करण्याची जरूरी नाही.'

क्रमबद्धाचा निर्णय तर महापुरुषार्थाचे कार्य आहे. त्याने सारी दृष्टिच पलटून (बदलून) जाते. ही कांही साधी सुधी गोष्ट आहे? हे तर जैनदर्शनाचे मर्म आहे."

**प्रश्न :–** "जेव्हा सर्व कांही क्रमबद्धच आहे, तर मग जेव्हा आमच्या क्रमबद्धपर्यायामध्ये क्रमबद्धाचा निर्णय होणार असेल तेव्हा होईल. तत्पूर्वी क्रमबद्धपर्याय आमच्या लक्षांत तरी कसे येऊ शकते ? समजा की क्रमबद्ध आमच्या लक्षांत येण्यास अजून अनंत भव बाकी आहेत – तर मग आता कसे येणार ?"

**उत्तर :–** "ही गोष्ट कोणाच्या आश्रयाने आपण सांगता आहात ? काय तुम्हाला क्रमबद्धाचा निर्णय झाला आहे ? नाही, तर मग असे म्हणण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ? ज्याचा क्रमबद्धाचा निर्णय होतो, त्याला अशा प्रकारचा प्रश्नच उद्भवता नाही. क्रमबद्धाच्या श्रद्धावाल्यांना अनंतभव असतच नाही. क्रमबद्धाची श्रद्धा तर भवाचा अभाव करणारी आहे. ज्याचे अनंत भव बाकी आहेत त्याच्या ध्यानांत क्रमबद्ध येणेच शक्य नाही; कारण त्याची दृष्टि ज्ञायक सन्मुख नसते आणि ज्ञायकसन्मुख दृष्टि झाल्याशिवाय क्रमबद्ध पर्याय समजतच नाही.

ज्ञायकाच्या सन्मुख होऊन जेव्हा क्रमबद्धाचा निर्णय केला तेव्हा भव नाहीसेच होतात. क्रमबद्ध पर्यायाचा निर्णय होताच निर्मल पर्याय माझे कर्म आणि मी त्याचा कर्ता – ही गोष्ट पण राहत नाही. पर्याय स्वसमयामध्ये होईलच – अशी श्रद्धा झाल्याने त्याला कांही करण्याची व्याकुलता राहात नाही. मला भव नाहीत – अशा प्रकारची निःशंकता प्रगट होते.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेमध्ये कर्त्तापणाची वृद्धी नाहीशी होते आणि ज्ञानपणाची बुद्धी प्रगट होते – (हेच त्याचे फळ आहे) – हीच त्याची निष्पत्ति आहे. जर कर्त्ताबुद्धि नाहीशी झाली नाही तर, हे असे समजले पाहिजे की, अजून त्याला क्रमबद्ध पर्याय समजलीच नाही."

**प्रश्न** :– "आताच आपण बदलात की – क्रमबद्ध पर्यायाचा निर्णय पर्यायावर दृष्टि ठेवल्याने होत नाही, त्रिकाली ज्ञायक स्वभावावर दृष्टि ठेवल्याने होईल, तर मग क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयाची गरजच काय आहे ? बस्स ! आम्ही फक्त ज्ञायकस्वभा-वाचाच आश्रय घेवू ना ?

**उत्तर** :– घेऊ शकत असाल तर घ्याना, कोण नको म्हणतोय? परंतु विकल्पामध्ये पर्यायाच्या स्वतंत्रतेचा निर्णय झाल्याखेरीज पर्यायावरील दृष्टि हटते कुठे ? आणि ज्ञायक स्वभावावर दृष्टि गेल्याखेरीज क्रमबद्धपर्यायाचा सुद्धा खराखुरा निर्णय होत नाही. तसेच ज्ञायक स्वभावावर दृष्टि गेल्यानें क्रमबद्ध पर्यायाचा निर्णय होतोच म्हणून क्रमबद्धपर्यायाचा निर्णय न करण्याची गोष्टच कुठे उरली ? ज्ञायक स्वभावावर दृष्टि जाण्याअगोदर आगम आणि युक्तिच्या आधारे विकल्पात्मक निर्णय तरी होऊ शकतो, खरा नाही, परंतु विकल्पात्मक निर्णय तर आवश्यक आहे, त्याच्याशिवाय पर्यायाहून दृष्टि हटतच नाही."

**प्रश्न** :– "तर मग ह्याचा अर्थ असा झाला की, प्रथम आगम आणि युक्तिच्या आधारे विकल्पात्मक ज्ञानांत क्रमबद्धपर्यायाचा निर्णय करावा, तद्नंतर जेव्हा आमची दृष्टि पर्यायावरून हटून ज्ञायकस्वभावावर जाईल – स्थिर होईल, तेव्हा क्रमबद्ध पर्यायाचीं खरी श्रद्धा होईल ?

**उत्तर** :– "हां, हां, बाबा हे तर असच – आहे"

**प्रश्न** :– आगमाच्या आधारावर क्रमबद्धाचा निर्णय करावा ही गोष्ट तर खरी आहे, पण लोकांचे तर हे म्हणणे आहे की, शास्त्रा-मध्ये तर कुठे क्रमबद्धपर्याय आलेली नाही – ही गोष्ट तर आपणच नवीन काढली आहे ?"

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**उत्तर** :– नाही बुवा, अशी गोष्ट नाही, शास्त्रामध्ये अनेक ठिकाणी क्रमबद्धाची गोष्ट आढळते. समयसारच्या सर्व विशुद्धज्ञान अधिकारात आहे. तिथे आत्मख्याति टीकेमध्ये क्रमनियमित 'असे मूळ लिखाण आहे."

**प्रश्न** :– "क्रमनियमिता'चा अर्थ काय आहे ?"

**उत्तर** :– "क्रमनियमित शब्दामध्ये क्रम अर्थात् क्रमवार (नंबराप्रमाणे) तसेच नियमित म्हणजेच निश्चित ज्या समयी जी पर्याय येणारी आहे ती येईल, त्यामध्ये फेरफार होऊ शकत नाही."

**प्रश्न** :– "समयसारामध्ये तर आहे, परंतु आणखी इतर शास्त्रामध्ये नाही काय ? समयसार तर आपलेच शास्त्र आहे"

**उत्तर** :– "छान ! ही तर भलतीच गोष्ट सांगितलीत ! समयसार आमचे कसे आहे ? आम्ही तर ते शास्त्र वाचतो, ते आहे तर परमपूज्य दिगम्बराचार्य कुन्दकुन्ददेवाचे ! !

प्रवचनसारामध्ये पण गाथा ९९, १००, १०१ व १०२ मध्ये आहे; विस्ताराने सर्व कथन केलेले आहे. 'जन्मक्षण' आणि 'स्वअवसर' असा उल्लेख येतो. आकाशाच्या प्रदेशाचे (विस्तारक्रमा) उदाहरण देऊन कालक्रम (प्रवाहक्रम) समजविला आहे. जसे – जो प्रदेश जिथे आहे, तो तिथे तिथेच राहतो त्यामध्ये पुढे-मागे होणे शक्य नाही. त्याचप्रकारे जी-जी पर्याय ज्या-ज्या काळात होणार आहे, त्या त्या पर्याय त्या-त्या काळीच होतील, त्याचे पुढे मागे होणे शक्य नाही

प्रत्येक पर्याय स्वयंसत् आहे अहेतुक आहे. समयसाराच्या बंधाधिकारामध्ये पर्यायाला अहेतुक म्हटले आहे".

**प्रश्न** :– "पर्याय अहेतुक तर आहे, परंतु तिच्यानंतर हीच होईल– हे कसे बरे होऊ शकते ?"

**उत्तर** :– ह्यामध्ये न होण्यासारखी काय गोष्ट आहे. याच्यानंतर हीच होईल; जी होणारी आहे, तीच होईल – असेच आहे. मोत्याच्या हाराचा दृष्टान्त देऊन समजावले आहे ना ? जसे – माळेमध्ये जे मोती जिथे आहेत तिथेच राहतील. जर त्यांना मागे-

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पुढे केले गेले तर माळ तुटेल, तद्वतच जी पर्याय ज्या वेळेस होणार आहे, त्या वेळेस होईल – पुढे पाठीमागे करण्याने वस्तूव्यवस्थाच राहणार नाही. त्यांच्या मागे-पुढे होण्याचे कारण काय आहे ? ती अकारण तर मागे-पुढे होणार नाही आणि जर काही कारण नसेल तर पर्याय बहुतेक राहणार नाही."

**प्रश्न** :– "प्रवचनसारसुद्धा कुंदकुंदाचेंच तर आहे ? काय अन्य इतर कोणत्या आचार्यांच्या शास्त्रामध्ये क्रमबद्ध पर्यायाची गोष्ट येत नाही ?

**उत्तर** :– का नाही येत ? कार्तिकेयाप्रेक्षाच्या ३२१ तें ३२३ पर्यंतच्या गाथेमध्ये येते ना ? चारीही अनुयोगांच्या शास्त्रामध्ये कोणत्या ना कोणत्या रूपाने ही गोष्ट येतेच.

शिवाय सर्वज्ञतेची गोष्ट तर सर्व शास्त्रामध्ये आहे, जर सरळ लक्षात येत नाही तर सर्वज्ञतेच्या आधारे क्रमबद्धपर्याय समजून घेतली पाहिजे. 'केवलज्ञानीने जसे पाहिले असेल तसेच होईल' याचा हाच अर्थ होतो की, भविष्यामध्ये ज्या समयी जी पर्याय होणार आहे, तीच होईल."

**प्रश्न** :– "आपण क्रमबद्धपर्यायाला सिद्ध करण्यात सर्वज्ञतेच्या का आश्रय घेता ? सरळच समजवा ना ?

**उत्तर** :– अहो ! आम्ही तर हेच सांगितले की जेव्हा सरळ लक्षात येत नाही तेव्हा सर्वज्ञतेचा आश्रय घेतला पाहिजे, कारण सर्वज्ञतेच्या आधारामुळे समजण्यात सोपे जाते ?"

**प्रश्न** :– "सर्वज्ञतेच्या आधारामुळे समजण्यास सोपे कसे जाते?

**उत्तर** :– "सर्वज्ञ भगवान तीन लोकातील समस्त द्रव्य आणि त्यांच्या त्रिकालवर्ती समस्त पर्यायांना एकदम जाणतात. भूतकाळा-तील आणि वर्तमान पर्यायाबरोबर ते भविष्यात होणाऱ्या पर्यायांना-देखील जाणत."

**प्रश्न** :– "जाणतात ह्याचा अर्थ काय ?

**उत्तर** :– हाच की, ज्या द्रव्याची जी पर्याय भविष्यात ज्यासमयी जशी होणार आहे तिला सर्वज्ञ आता जाणतात, म्हणून ज्या भावी पर्याय सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये जशा आल्या आहेत, त्या तशाच होतील, त्यामध्ये कोणताच फेरफार संभवत नाही."

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



केवलज्ञाना (सर्वज्ञते)चा निर्णय अर्थात् अर्हन्ताचा निर्णय ! प्रवचनसार गाथा ८० मध्ये असे आहे की, जो अर्हन्त भगवंताना द्रव्यरुपाने, गुणरुपाने आणि पर्यायरुपाने जाणतो, त्याच्या मोहाचा नाश होतो.

आम्हास ६३ वर्षापूर्वी फाल्गुन शुद्ध १४ च्या दिवशी हाच भाव आतून आला होता ''

**प्रश्न :–** ''केवली भगवान भूत-भविष्याच्या पर्यायांना द्रव्यामध्ये योग्यतारुप जाणतात अथवा त्या पर्यायांना वर्तमानवत् प्रत्यक्ष जाणतात ?''

**उत्तर :–** ''प्रत्येक पदार्थाच्या भूत आणि भविष्यकाळाच्या पर्याय बर्तमानात अविद्यमान-अप्रकट असतांनासुद्धा सर्वज्ञ भगवान त्यांना वर्तमानवत् प्रत्यक्ष जाणतात. अनंतकाळापूर्वी झालेल्या भूतकाळातील पर्याय आणि अनंतकाळानंतर होणाऱ्या भविष्यकाळातील पर्यायी अविद्यमान असताना सुद्धा केवलज्ञान वर्तमानाप्रमाणे प्रत्यक्ष जाणते.

अ हा हा ! ज्या पर्यायी होऊन गेल्या आहेत आणि होणाऱ्या आहेत; अशा भूत-भविष्याच्या पर्यायांना प्रत्यक्ष जाणणाऱ्या त्या ज्ञानाच्या दिव्यतेचे काय वर्णन करावे ? केवली भगवान भूत-भविष्याच्या पर्यायीना द्रव्यामध्ये योग्यतारुप जाणतात – असे नाही, परंतु त्या सर्व पर्यायांना वर्तमानवत् प्रत्यक्ष जाणतात, हीच सर्वज्ञाच्या ज्ञानाची दिव्यता आहे. भूत-भविष्या अविद्यमान पर्याय केवलज्ञानात विद्यमान आहेतच. आहो एकसमयाची केवलज्ञानाची पर्यायाची अशी विस्मयकारक आणि आश्चर्यकारक आहे तर त्या पूर्ण द्रव्याचे सामर्थ्य किती विस्मयकारक आणि आश्चर्यजनक असेल ? त्याविषयी काय सांगावे ?

आ हा हा ! पर्यायीने कोलांडी मारणे ही काय मामुली गोष्ट आहे ? पर्याय तर अनादिपासून परामध्येच जात आहे, त्याला (पलटून) बदलून आंत घेऊन जावयाचे आहे. खोलामध्ये घेऊन जाणे महान पुरुषार्थाचें कार्य आहे. परिणामामध्ये अपरिणामी भगवंताचे दर्शन घेणे, हा पुरुषार्थ अपूर्व आहे.''

**प्रश्न :–** ''केवली भगवान निश्चयाने तर केवळ स्वतःचे स्वतःलाच जाणतात, पराला व्यवहाराने जाणतात, असे नियमसार-मध्ये म्हटले आहे आणि समयसारात व्यवहाराला खोटे म्हटले आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



खोटे अर्थात् असत्यार्थ . . . ह्याचा अर्थ काय ?"

**उत्तर :–** "व्यवहार नाहीच – असा त्याचा अर्थ नाही. व्यवहार जाणण्यायोग्य आहे असे १२ गाथेमध्ये म्हटले आहे. जो जाणलेला प्रयोजनवान आहे. सर्वथा खोटा नाही, त्याला गौण करून असत्यार्थ म्हटले आहे. प्रवचनसारच्या टीकेमध्ये पांडे हेमराजजींनी म्हटले आहे की, व्यवहाराला गौण करून असत्य म्हटले आहे, अभाव करून असत्य म्हटलेले नाही."

**प्रश्न :–** "तर काय केवली परास जाणत नाहीत ?"

**उत्तर :–** "कोण म्हणतो ? ते तर सर्व पदार्थांना जाणतात."

**प्रश्न :–** "तर मग त्यांच्या पराच्या जाणण्यास व्यवहार का म्हटले आहे ?"

**उत्तर :–** "पर आहे – म्हणून तसेच तन्मय होऊन जाणत नाहीत म्हणूनसुद्धा."

**प्रश्न :-** "क्रमबद्ध मानल्याने सर्व गोंधळ होऊन जातो ?"

**उत्तर :–** "गोंधळ तर क्रमबद्ध न मानल्याने होतो. क्रमबद्ध मानल्याने सर्व गोंधळ नाहीसा होतो. वस्तुमध्ये तर कांही गोंधळ नाही, ती पूर्ण व्यवस्थित आहे. अज्ञानीची बुद्धीच (मतिच) गोंधळून गेली आहे; परंतु क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेने मति व्वयस्थित होऊन जाते.

**प्रश्न :–** जेव्हा आमच्या केल्याने काही होत नाही, तर मग एखादा कार्य का करेल ? जर कोणी करणाराच असणार नाही तर मग हा मंडप कुणी तयार केला ? कारखाने कसे चालतील ? अन्यथा सर्व व्यवस्थेमध्ये गडबड होऊन जाईल."

**उत्तर :–** कोण मंडप तयार करतो आणि कारखाने चालवितो? अज्ञानी मंडप तयार करण्याचा आणि कारखाने चालविण्याचा अभिमान करतो – ही गोष्ट तर खरी आहे. परंतु तयार करणे किंवा चालविणे कोणीही करू शकत नाही जेव्हा एक द्रव्याचा दुसऱ्या द्रव्यामध्ये अत्यन्त अभाव आहे, तेव्हा एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यामध्ये काय करू शकणार ? अत्यन्त अभावाचा अर्थ काय ? हाच की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला स्पर्शदेखील करीत नाही. स्पर्श केलाच तर अभाव राहणार नाही."

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**प्रश्न** :– "जर आपण असा उपदेश दिला तर लोक आळशी बनतील. जेव्हा त्यांच्या करण्याने काही 'होतच नाही' तर मग कोण कशाला पुरुषार्थ करतील ?"

**उत्तर** :– "क्रमबद्धाच्या निर्णयामध्येच खरा पुरुषार्थ आहे कारण क्रमबद्धाचा निर्णय करण्यामध्ये ज्ञायक स्वभावाकडे दृष्टि जाते. ज्याप्रकारे ज्ञायकामध्ये भव नाहीत; त्याचप्रकारे क्रमबद्धाच्या निर्णय करणाऱ्यांना भव नसतात. एखाद दुसरा भव राहतो, तो सुद्धा ज्ञय म्हणूनच ठरतात.

आपल्या मतिमध्ये क्रमबद्धाच्या व्यवस्थेला व्यवस्थित करणे हाच खरा पुरुषार्थ आहे."

**प्रश्न** :– "पर्याय तर व्यवस्थितच होणारी आहे अर्थात् पुरुषार्थाची पर्याय जेव्हा प्रगट होण्याचा काळ येईल तेव्हाच होईल – अशा अवस्थेमध्ये करण्याचे काय बाकी आहे?"

**उत्तर** :– "व्यवस्थित पर्याय आहे. असे कोठून जाणले ? व्यवस्थित पर्याय द्रव्यामध्ये आहे, म्हणून तर द्रव्यावर दृष्टि स्थिर करावयाची आहे. पर्यायाच्या क्रमावर दृष्टि न करता क्रमवार पर्याय ज्यामधून प्रगट होते – अशा द्रव्यसामान्यावरच दृष्टि केंद्रित करावयाची आहे कारण त्यावर दृष्टि स्थिर करण्यात अनंत पुरुषार्थ होतो. क्रमबद्धाच्या सिद्धान्ताने अकर्तापना सिद्ध होतो. क्रमाकडे पाहण्याचे कारण नाही."

**प्रश्न** :– "क्रमबद्धामध्ये करण्यासाठी काय आहे ?"

**उत्तर** :– "करावयाचे काय आहे ? करण्यामध्ये तर कर्तृत्वबुद्धी येते. करण्याची बुद्धी सुटणे हाच क्रमबद्ध आहे. क्रमबद्धामध्ये कर्तृत्वबुद्धी सुटते. परामध्ये तर काही करू शकत नाही, आपल्यामध्येसुद्धा जे व्हावयाचे आहे तेच होते अर्थात् आपल्यामध्ये जो राग व्हावयाचा आहे तोच होतो, त्याचे काय ? रागामध्ये पण कर्तृत्त्वबुद्धी सुटली, भेद आणि पर्यायावरीलसुद्धा दृष्टि हटली तेव्हा वास्तविक क्रमबद्धाची प्रतिती झाली. क्रमबद्धाच्या प्रतितीमध्ये ज्ञातादृष्टा बनला; निर्मल पर्याय करावी – अशी बुद्धीपण सुटली, राग करू – ही गोष्ट तर फार लांब राहिली. अरे ! ज्ञान करू ही बुद्धिपण सुटून जाते, कर्त्तृत्वबुद्धि पण सुटून जाते आणि एकटे ज्ञान

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



बाकी राहते. ज्याला राग करावयाचा आहे, रागामध्ये अडकून रहावयाचे आहे, त्याला क्रमबद्धाची गोष्ट जमणार नाही. राग करणे किंवा राग सोडणे – हे सुद्धा आत्म्यात नाही, आत्मा नुसता ज्ञानस्वरुप आहे.

पर पर्याय तर जी व्हावयाची आहे ती होतेच त्यामध्ये मी काय करू शकतो ? आणि माझ्यामध्ये जो राग येत आहे त्याला मी थोडेच आणतो ? आणि माझ्यामध्ये जी शुद्ध पर्याय येणारी आहे तिला करू – आणू – अशा विकल्पाने तरी काय होणार आहे ? आपल्या पर्यायामध्ये होणारा राग आणि होणारी शुद्ध पर्याय करण्याचा विकल्प कशाकरीता ? राग आणि शुद्ध पर्यायांच्या कर्तृत्वाचा विकल्प शुद्ध स्वभावात नाहीच. अकर्त्तापणा येणेच मोक्ष-मार्गाचा पुरुषार्थ आहे."

**प्रश्न :–** "क्रमबद्धपर्यायाविषयी' सांगून आपण काय सिद्ध करू इच्छिता ?"

**उत्तर :–** "क्रमबद्धाच्या सिद्धान्ताने मूळ तर अकर्त्तापणा सिद्ध करावयाचा आहे – जैनदर्शन अकर्त्तावादी आहे. आत्मा परद्रव्याचा तर कर्त्ता नाहीच, रागाचा पण कर्त्ता नाही आणि पर्यायाचा पण कर्त्ता नाही. पर्याय आपल्या जन्मक्षणी आपल्या षट्काराने स्वतंत्र रूपाने जी होण्यायोग्य आहे तीच होते; परन्तु हा क्रमबद्धाचा निर्णय पर्यायकडे लक्ष केंद्रित केल्याने होत नाही क्रमबद्धाचा निर्णय करावयाचा असेल तर शुद्ध चैतन्य ज्ञायकधातुवर दृष्टि केंद्रित होते आणि तेंव्हा जाणणारी जी पर्याय प्रगट होते ती क्रमबद्धाला जाणते. क्रमबद्धाचा निर्णय स्वभावसन्मुख अनंतपुरुषार्थपूर्वकच होतो.

क्रमबद्धाच्या निर्णयाचा तात्पर्य वीतरागता आहे आणि ही वीतरागता पर्यायामध्ये तेव्हा प्रगट होते. जेव्हा वीतराग स्वभावावर दृष्टि केंद्रित होते. समयसार गाथा ३२० मध्ये म्हटले आहे की; ज्ञान बंध-मोक्षाचा कर्त्ता नाही, परंतु जाणणारा (ज्ञायक) आहे. अहाहा ! मोक्षाला ज्ञान जाणते– असे म्हटले आहे; मोक्षाला करतो – असे म्हटले नाही – आपल्यामध्ये होणाऱ्या क्रमवार पर्यायाचा कर्त्ता आहे– असे नाही; परंतु जाणणारा आहे – असे म्हटले; अद्भुत गोष्ट आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**प्रश्न** :– "जेव्हा काही करावयाचेच नाही तर मग आपण आत्म्याचा अनुभव करण्याचा – ज्ञायकस्वभावासन्मुख दृष्टी करण्याचा उपदेश का देता आहे त ?"

**उत्तर** :– "आम्ही कोठे उपदेश देतो ? वाणी तर जड आहे, म्हणून जडाच्या कारणाने ती निघते. परमपूज्य अमृतचंद्राचार्य देव आत्मख्यातिच्या शेवटी लिहीतात की, टीका आम्ही लिहीली – अशा मोहाच्या आवेशात नाचू नका. ही तर अक्षराची आणि शब्दांची परिणति आहे – आमची नाही – भाषा तर आमची नाहीच, समजावण्याच्या विकल्पालापण ज्ञानी आपला मानत नाहीत. आम्हीतर पर आणि विकल्पाला फक्त जाणतो आणि ते सुद्धा व्यवहाराने, निश्चयाने आम्ही फक्त स्व:लाच जाणतो"

**प्रश्न** :– "सर्व गुणांचे कार्य व्यवस्थितच आहे तर मग पुरुषार्थ करण्याची काय आवश्यकता ?"

**उत्तर** :– "ज्याला क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेमध्ये पुरुषार्थ भासत नाही, त्याने व्यवस्थितपणा मानलाच कोठे आहे.

**प्रश्न** :– "त्याला व्यवस्थितपणाचे श्रद्धान झाले नाही तरी त्याचे तसे परिणमन पण तर व्यवस्थितच आहे. तो व्यवस्थितपणाचा निर्णय करु शकला नाही ही गोष्ट सुद्धा व्यवस्थितच आहे. अशा दशेमध्ये निर्णय करावा असा उपदेश करणे व्यर्थच नव्हे काय ?"

"त्याचे परिणमन व्यवस्थितच आहे याची त्याला जाणीव तरी कुठे आहे ? परिणमन व्यवस्थितच आहे – असे सर्वज्ञाने सांगितले आहे, परन्तु त्याला सर्वज्ञाचा निर्णयच आहे कोठे ? प्रथम सर्वज्ञाचा निर्णय तर करून पहावा म्हणजे त्याला व्यवस्थित म्हणजे काय याची जाणीव होईल.

**प्रश्न** :– "व्यवस्थित परिणमनशील वस्तु आहे, अशाप्रकारच्या भगवंताच्या कथनाची श्रद्धा त्याला आहे काय ?"

**उत्तर** :– "नाही, सर्वज्ञ भगवंताचा खराखुरा निर्णय त्याला कोठे आहे ? प्रथम सर्वज्ञाचा निश्चय झाल्याशिवाय व्यवस्थितपणाचा निर्णय आला कोठून ? मात्र ज्ञानीच्या गोष्टी ऐकून-ऐकून तसेच-तसेच तो बोलतो – त्याचा काही उपयोग नाही. प्रथमत: सर्वज्ञाचा निर्णय तर करा. द्रव्याचा निर्णय केल्याशिवाय सर्वज्ञाचा निर्णय वास्तविकतेने होऊच शकत नाही."

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**प्रश्न :–** "आपण समजावताच आहात आणि म्हणतही आहात की, आम्ही कोठे समजावतो आहोत ?"

**उत्तर :–** "कोण समजावतो आहे ? सांगितले ना की भाषेच्या कारणाने भाषा होते आहे, विकल्पाच्या कारणाने विकल्प होतात आणि त्यावेळेस भाषा आणि विकल्पाचे ज्ञानपण आपल्याच (ज्ञानाच्याच) कारणाने होत आहे. ह्यामध्ये आमचे कर्तापण कोठे आले ?"

**प्रश्न :–** "म्हणून तर लोक म्हणतात की, आपल्या वचनात आणि वागण्यात फरक आहे म्हणून ?"

**उत्तर :–** (अत्यंत गंभीर होऊन) "वस्तुस्वरुपच असे आहे. आम्ही काय करावे ? जसे श्रद्धान, ज्ञान आणि वचन आहे तसे चारित्रपण असले पाहिजे, ते आता नाही; परन्तु श्रद्धेमध्ये फरक नाही. वागणे आणि बोलणे यातील हे अन्तर तर आहे. परन्तु हे अंतर तर क्षायिक सम्यग्दृष्टि भरतादी चक्रवर्तीमध्ये सुद्धाहोते. चतुर्थ गुणस्थानवर्ती सर्व ज्ञानीमध्ये हे असते – त्याला आमचाकाय इलाज आहे ?"

**प्रश्न :–** "जर ह्या श्रद्धा आणि चारित्रातील अंतर संपुष्टात आले तर किती बरे चांगले होईल ?

**उत्तर :–** "संपुष्टात आले तर काय बहार होईल ? आम्ही तर निरंतर हीच भावना करतो, परंतु तीर्थंकर ऋषभदेवांनाही ८३ लाखपूर्वपर्यंत चारित्रदोष राहिला होता. एक गुण दुसऱ्या गुणामध्ये दोष उत्पन्न करीत नाही – हा महासिद्धान्त आहे, अन्यथा सम्यग्दर्शन होऊ शकत नाही, चारित्र आणि वीर्यामध्ये दोष आहे, परंतु सम्यग्दर्शनामध्ये दोष नाही."

शेवटी चर्चेमध्ये बसलेल्या हजारो लोकांना संबोधित करीत स्वामीजी म्हणाले –

"आजची चर्चा चांगली झाली पंडितजींनी चांगले प्रश्न केले.

"क्रमबद्ध तर बाबांनो ! जैन-दर्शनाचे मस्तक आहे. जैनदर्शनाचे चक्षु आहे, वस्तुस्वभावाची मर्यादा आहे. याला समजने आणि नि:संदेह होणे मोठी अलौकिक गोष्ट आहे

आज भले याला कमी लोक समजत आहेत, परंतु हजारो लोक मोठ्या प्रेमाणे ऐकत आहेत. ऐकावे, जरूर ऐकावे, सर्वांनी ऐकावे, वाचावे . . . . आणि सर्वांचे कल्याण होवो."

असे म्हणत त्यांनी आपले संभाषण आटोपते घेतले.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

परिशिष्ट २

# संदर्भ ग्रंथ-सूची


१. अध्यात्म-रहस्य (योगोद्दीपन-शास्त्र) : पंडित आशाधरजी; व्याख्याकार-पंडित जुगलकिशोर मुख्तार; वीरसेवामंदिर, २१ दरियागंज, दिल्ली; वीर सं. २४८४

२. अध्यात्म-पद-संग्रह : संपादक – पंडित महेन्द्रकुमारजी अजमेरा 'प्रभाकर', आयुर्वेदाचार्य, पचेवर; पं. लादूमनजी अजमेरा; मदनगंज किशनगढ (राजस्थान)

३. अष्टशती : आचार्य अकलंकदेव

४. अष्टसहस्त्री : आचार्य विद्यानन्दि

५. अष्टपाहुड : श्रीमद् आचार्य कुन्दकुन्द; टीकाकार – श्री पंडित जयचंदजी छाबडा; श्री वीतराग सत् साहित्य प्रसारक ट्रस्ट, भावनगर (गुजरात); वीर सं. २५०२

६. अनेकांत और स्याद्वाद : डॉ. हुकमचंदजी भारिल्ल; पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट, ए-४, बापूनगर, जयपूर अगस्त, १९७३ ई.

७. आप्तमीमांसा (देवागम स्तोत्र) : श्रीमद् स्वामी समन्तभद्राचार्य; वीर-सेवामंदिर ट्रस्ट, २१ दरियागंज, दिल्ली; वीर सं. २४९४

८. आत्मानुशासन : आचार्य गुणभद्र; डॉ. हीरालालजी जैन, प्रो. आ. ने. उपाध्ये; पंडित बालचंद्रजी शिद्धान्तशास्त्री; जैन संस्कृति संरक्षक संघ, सोलापूर; वि. सं. २०१८

९. आदिपुराण : आचार्य जिनसेन; सपादक – पंडित पन्नालालजी जैन, साहित्याचार्य; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दुर्गाकुन्ड रोड, वाराणसी; वीर सं. २४९१

१०. आत्मधर्म (मासिक पत्रिका) ; श्री दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट, सोनगढ; मार्च, १९७०

११. कषायपाहुड : आचार्य गुणधर; भारतीय दिगंबर जैन संघ; चौरासी, मथुरा; वि. सं. २०००

१२. कार्तिकेयानुप्रेक्षा (भाषा टीका सहित) : स्वामी कार्तिकेय; पं. कैलाश-चंद्रजी; श्रीमद् राजचंद्र आश्रम, अगास, वाया आनंद (गुजरात)

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



१३. **गोम्मटसार कर्मकांड** (संक्षिप्त हिन्दी टीका सहित) : आचार्य नेमिचंद सिद्धान्तचक्रवर्ती; टीकाकार – पंडित मनोहरलालजी शास्त्री; श्रीमद् राजचंद्र आश्रम, अगास; ई. सन् १९७१

१४. **जयपूर (खानियाँ) तत्त्वचर्चा, दोन्ही भाग** : संपादक – सिद्धान्ताचार्य प. फुलचंदजी; आचार्यकल्प पंडित श्री टोडरमल ग्रथमाला, बापूनगर, जयपूर; फरवरी १९६७

१५. **जैनेन्द्र सिद्धान्तकोश, भाग २** : क्षुल्लक जिनेन्द्रवर्णी; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दुर्गाकुंड मार्ग, वाराणसी; वि. सं. २०२८

१६. **जैनतत्त्वमीमांसा** : (द्वितीय संस्करण) : पंडित फुलचंदजी सिद्धान्त शास्त्री; अशोक प्रकाशन मंदिर २/२४९, निर्वाण भवन, रवीन्द्रपुरी, वाराणसी, वीर सं. २५०४

१७. **तत्वार्थसूत्र** (मोक्षशास्त्र) : आचार्य उमास्वामी; संपादक – श्री पंडित कैलाशचंद्रजी सिद्धान्तशास्त्री; भारतवर्षीय दिगंबर जैन संघ, चौरासी, मथुरा; वीर सं. २४७७

१८. **तत्वार्थवार्तिक** (राजवार्तिक) आचार्य अकलंकदेव- संपादक – प्रो. महेन्द्रकुमारजी जैन, न्यायाचार्य; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दुर्गाकुंड रोड, वाराणसी, वीर सं. २४७९

१९. **तिलोयपण्णत्ति** : यतिवृषभाचार्य; जीवराज ग्रन्थमाला, सोलापूर, वि. सं. १९९९

२०. **धवला** : (षट्खंडागम) : आचार्य वीरसेन; जैन साहित्योद्धार फण्ड, अमरावती

२१. **नियमसार** (तात्पर्यवृत्ति संस्कृत टीका सहित) : आचार्य कुन्दकुन्द; श्री पद्मप्रभमलधारिदेव; श्री दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट, सोनगढ (सोराष्ट्र)

२२. **परमात्मप्रकाश और योगसार** : मुनिराज योगिन्दुदेव- श्रीमद् राजचंद्र आश्रम, अगास; वि. सं. २०१७

२३. **पद्मनन्दिपंचविंशतिका** : मुनिराज पद्मनन्दि; संपादक – श्री पंडित बालचंद्रजी सिद्धान्तशास्त्री; श्री जैन संकृति संरक्षक संघ, सोलापूर, वीर सं. २५०३

२४. **पद्मपुराण** : आचार्य रविषेण; संपादक – पं. पन्नालालजी साहित्याचार्य; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, वाराणसी, वि. सं. २०१६

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



२५. पुरुषार्थ-सिद्ध्युपाय (भाषा टीका सहित) : आचार्य अमृतचंद्र; टीकाकार-आचार्यकल्प पण्डित टोडरमलजी तथा पण्डित दौलतरामजी कासलीवाल; मुंशी मोतीलाल शाह, किशनपोल बाजार, जयपुर

२६. प्रवचनसार (तत्त्वप्रदीपिका संस्कृत टीका सहित) : आचार्य कुन्दकुन्द, आचार्य अमृतचन्द्र; श्री वीतराग सत् साहित्य प्रसारक, ट्रस्ट, ६०२, कृष्णनगर, भावनगर (गुजरात); वि. सं. २०३२

२७. प्रवचनसार (तात्पर्यवृत्ति संस्कृत टीका) : आचार्य कुन्दकुन्द; आचार्य जयसेन; श्री वीतराग सत् साहित्य प्रसारक ट्रस्ट, ६०२, कृष्णनगर, भावनगर, (गुजरात); वि. सं. २०३२

२८. परीक्षामुख : आचार्य माणिक्यनन्दि; हरप्रसाद जैन, वैद्यभूषण, मु. लुहरी, पो. मडावरा, झांसी (उ. प्र.) वीर सं. २४६५

२९. प्रयमेरत्नमाला : आचार्य अनन्तवीर्य; मुनि अनन्तकीर्ति ग्रन्थमाला, कालबादेवी रोड, बम्बई

३०. बुधजन विलास : कवि बधुजन; जिनवाणी प्रचारक कार्यालय, १६१/१ हरीसन रोड, कलकत्ता; वीर सं. २४७७

३१. भगवतीआराधना : आचार्य श्री शिवार्य; सम्पादक-पं. श्री कैलाशचंद्रजी, जैन संस्कृति संरक्षक संघ, शोलापूर; वीर सं. २५०४

३२. महापुराण : आचार्य जिनसेन और आचार्य गुणभद्र; सम्पादक-पण्डित पन्नालालजी जैन, साहित्याचार्य; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, वाराणसी; ई. सं. १९५१

३३. मोक्षमार्ग प्रकाशक : आचार्यकल्प पण्डित टोडरमलजी; सम्पादक – डॉ. हुकमचंदजी भारिल्ल; श्री दिगम्बर जैन स्वाध्याय मन्दिर ट्रस्ट, सोनगढ (सौराष्ट्र); वि. सं. २०३५

३४. मोक्षमार्ग प्रकाशक : आचार्यकल्प पण्डित टोडरमलजी; सस्ती ग्रन्थमाला, दिल्ली; वि. सं. २०१०

३५. योगसार प्राभृत : श्रीमद् आचार्य अमितगति; सम्पादक – श्री जुगलकिशोरजी मुख्तार 'युगवीर'; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दुर्गाकुण्ड मार्ग, वाराणसी; वीर सं. २४९५

३६. रत्नकरन्ड श्रावकाचार (भाषा टीका सहित) : आचार्य समन्तभद्र; पण्डित सदासुखदासजी कासलीवाल; श्री दिगम्बर जैन समाज, माधोराजपूरा (राजस्थान)

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



३७. रहस्यपूर्ण चिठ्ठी (मोक्षमार्ग प्रकाशक सोबत प्रकाशित) : आचार्यकल्प पंडित टोडरमलजी; श्री दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट, सोनगढ (सौराष्ट्र); वि. सं २०३५

३८. वर्तमान चतुर्विशतिजिनपूजा (चंद्रप्रभ जिनपूजा) : कविवर वृन्दावनदासजी; वीर पुस्तक भंडार, मनिहारों का रास्ता, जयपूर; वि. सं. २०३२

३९. शांतिपथ दर्शन ; क्षुल्लक श्री जिनेन्द्रवाणी; शान्ति निकेतन, उदासिन आश्रम, ईसरी बाजार, गिरडीह, १९७६ ई.

४०. समयसार (आत्मख्याति संस्कृत टीका सहित) : आचार्य कुन्दकुन्द; टीकाकार – आचार्य अमृतचद्र; श्री दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट, सोनगढ (सौराष्ट्र); वीर सं. २५०१

४१. समयसार (तात्पर्यवृत्ति संस्कृत टीका सहित) : आचार्य कुन्दकुन्द; टीकाकार – आचार्य जयसेन; श्री दिगंबर जैन समाज, अजमेर

५२. समयसार कलश (भाषा टीका सहित) : आचार्य अमृतचंद्र; टीकाकार – श्री पांडे राजमलजी; श्री वीतराग सत् साहित्य प्रसारक ट्रस्ट. भावनगर गुजरात); वीर सं. २५०३

४३. सम्मईसुत्तम् (सन्मति सूत्र) : आचार्य सिद्धसेन; संपादक – डॉक्टर देवेन्द्रकुमारजी शास्त्री; ज्ञानोदय ग्रंथ प्रकाशन, नीमच (मध्य-प्रदेश); १९७८ ई.

४४. सर्वार्थसिद्धि : आचार्य पूज्यपाद; संपादक – पंडित फूलचंदजी सिद्धान्त शास्त्री; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दुर्गाकुण्ड मार्ग, वाराणसी; १९७१ ई.

४५. स्वयंभूस्तोत्र : आचार्य समन्तभद्र; वीरसेवामंदिर, सरसावा

४६. हरिवंश पुराण : आचार्य जिनसेन; संपादक पंडित पन्नालालजी जैन, साहित्याचार्य; भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, वाराणसी; १९६२ ई.

४७. ज्ञानस्वभाव ज्ञेयस्वभाव (प्रवचन संकलन) : प्रवचन - श्री कानजी स्वामी; संकलनकर्त्ता – ब्र. हरिलाल; श्री दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट, सोनगढ (सौराष्ट्र); वीर सं सं. २५०३

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

परिशिष्ट ३

# मतप्रदर्शन

## आचार्य, मुनिराज, व्रती, विद्वान पंडीत, लोकप्रिय वर्तमान पत्र पत्रिकांच्या दृष्टिकोणातून प्रस्तुत प्रकाशन

□ **आचार्य श्री जयसागरजी महाराज**

क्रमबद्धपर्याय तर चारी अनुयोगामध्ये आहे. धवला, महाधवला, जयधवला वगैरे ग्रंथांमध्ये सुद्धा क्रमबद्ध तसेच सर्वज्ञतेला पोषक अशा गोष्टी आहेत. एक (सच्चा) खराखुरा जैन बनण्याकरिता क्रमबद्ध पर्याय आणि सर्वज्ञतेला मानणे अत्यंत जरुरीचे आहे. क्रमबद्धपर्यायाचा निबंध लिहून डॉ. भारिल्लजीनी अनेक रहस्यांचे उद्‌घाटन केले आहे. ते तत्त्वप्रचाराचे कार्य अशाच तऱ्हेने करीत राहोत. त्यांना आमचा मंगल आशिर्वाद आहे.

□ **मुनिश्री विजयसागरजी महाराज**

'क्रमबद्धपर्याय' ह्या पूस्तकातून डॉ. भारिल्लजींनी मानव–जगताला अव्यवस्थितपनादेखील एका निश्चित व्यवस्थित क्रमानुसारच होत आहे–हे मोठ्या सोप्या प्रकाराने समजावण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वज्ञेचा आसरा घेऊन क्रमबद्धपर्यायाला जी उदाहरणे आणि दृढ प्रमाणे यांचे संकलन केले आहे, त्याने ज्ञानी पुरुष तर लाभान्वित अवश्य होतीलच, परंतु अज्ञानीवरही ह्याचा प्रभाव झाल्याशिवाय राहणार नाही.

भविष्यकाळांतदेखील डॉ. भारिल्ल अशा खऱ्याखुऱ्या (सच्च्या) जैन कृतिचे संकलन करत राहोत–असा आमचा परममंगल आशीर्वाद आहे.

□ **वयोवृद्ध विद्वान ब्र. पं. मुन्नालालजी रांधेलीय (वर्णी), न्यायतीर्थ, सागर.**

हे पुस्तक खूपच शोधपूर्वक आणि सुंदर तऱ्हेची अजोड अशी कलाकृति आहे. ह्यामध्ये डॉ. भारिल्लजीने जैन सिद्धान्ताचा सार आपल्या वरदहस्त लेखणीद्वारा विस्ताराने लिहले आहे. पुस्तकाचे मूळ प्रयोजन संसाराला कारणीभूत अशा कर्तृत्व आदिच्या अहंकाराला नाहीसे करणे हे आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



पुस्तकामध्ये अनेकान्त शैलीद्वारे वस्तुस्वभाव दर्शविला आहे. स्याद्वाद आणि अनेकान्त, जैन तत्त्वांचा मापदण्ड आहे, त्यामध्ये द्रव्य, गुण, पर्याय सर्वच गर्भित आहेत तसेच त्यांत लागू होणारे नियम कधी बदलत नाहीत. जो जीव, अज्ञानतावश ते नियम बदलण्याचा अहंकार करतो, तो दीर्घसंसारी आहे. ह्यामध्ये भय आणि दबाव यांचे काम नाही – हे तर वस्तु स्वभावाचे चित्रण आहे. क्रमबद्ध पर्याय मानल्यानंतर अकाल मृत्यूच्या कथनामुळे कोणती बाधा येत नाही. वस्तुतः तर अकालमृत्यू कधी होतच नाही पर्याय स्वयं आपापल्या समयी बदलते – असमयी नाही म्हणून भ्रम (शंका) सोडून दिला पाहिजे.

आमची शुभकामना आहे की, भारिल्लजींच्या शतायुष्यापर्यंत त्यांच्याकडून समाज लाभ घेवो. ह्या पुस्तकाव्यतिरिक्त धर्माचे दशलक्षण, तीर्थंकर भगवान महावीर, स्वतःस ओळखा, वगैरे पुस्तकेसुद्धा अपूर्व संग्राह्य आणि मनन करण्या जोगे आहेत.

□ **ब्र. यशपालजी जैन, एम. ए. सांगली (महाराष्ट्र)**

तसे तर 'क्रमबद्धपर्याय'च्या संबंधी अनेक वर्षापासून ऐकत आलो होतो, परंतु अनेक शंका (मुख्यतः पुरुषार्थहीनता येते इत्यादी) मनामध्ये आकुलता उत्पन्न करत होत्या, परंतु जेव्हापासून डॉ हुकमचंदजी भारिल्ल ह्यांचे 'क्रमबद्धपर्याय' (एक अभ्यास आणि प्रश्नोत्तरे आत्मधर्ममध्ये तसेच पुस्तक रूपाने समग्र वाचावयास मिळाले तेव्हा सर्व शंका स्वयम आपोआप नाहीशा झाल्या. 'क्रमबद्धपर्याय' एक संतोष प्रदायिनि अनुपम गुटिका (गोळी) आहे अशी माझी श्रद्धा बनली आहे.

आगमोक्त तर्कांनी आणि युक्तींनी कठीण विषय अत्यंत रोचक तऱ्हेने वाचकांच्या समोर लेखकाने ठेवला आहे. 'क्रमबद्धपर्याय' विषयावर डॉ. भारिल्ल-जींची प्रवचनं ऐकणे हे सुद्धा विषय-निर्णयाकरिता लाभदायक सिद्ध होते – असा माझ्या तसेच अनेक तत्त्व रसिकांचा अनुभव आहे. जिज्ञासूंनी त्याचाही लाभ घ्यावा.

पूज्य श्री कानजी स्वामीच्या इंटरव्ह्यु पुस्तकामध्ये ह्यापुस्तकाचे वर्णन 'सर्वोपरि स्वानुभवगर्भित अमृत आहे' असे केले आहे.

प्रत्येक आगमश्रद्धाळू व्यक्ति आणि आगमाभ्यासींनी ह्या पुस्तकाचे मनःपूर्वक मोठ्या आनंदाने स्वागत केले पाहिजे.

□ **डॉ पन्नालालजी जैन, साहित्याचार्य, सागर (म. प्र.)**

उत्पाद-व्यय-ध्रौव्यात्मक असल्याने द्रव्य परिणमनशील आहे. द्रव्याचे हे परिणमन सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये झळकते आहे. जरी द्रव्याचे परिणमन द्रव्याच्या

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आधीन आहे, आणि सर्वज्ञाच्या ज्ञानाचे परिणमन सर्वज्ञाच्या आधीन आहे, तरी हे निश्चित आहे की सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये प्रत्येक द्रव्याची त्रिकालवर्ती पर्याय झळकत आहेत अतः सर्वज्ञतेचा स्वीकार करणाऱ्यांसमोर पर्यायाची क्रमबद्धता स्वतः सिद्ध होते.

पर्यायाच्या क्रमबद्धतेचा स्वीकार करण्यामध्ये ना नियतवादाचा एकान्त येतो, ना पुरुषार्थवादाचा अभाव होतो. नियतवादाचे लक्ष जेव्हा अकर्मण्यता आणि स्वेच्छाचारिता आहे, तेथे पर्यायाची क्रमबद्धतेचे लक्ष्य कर्तृत्ववाद च्या अहंकारापासून दूर राहणे हे आहे. कार्याची सिद्धी ज्या निमित्ताने आणि ज्या प्रकारच्या पुरुषार्थाने होणार आहे ती त्याच निमित्ताने आणि त्याच पुरुषार्थाने होणार आहे. सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये ते निमित्त आणि पुरुषार्थाचा तो प्रकार देखील झळकतो. वाद तेथे येतो की, जेथे आपण कार्याची भवितव्यता सर्वज्ञाच्या ज्ञानानुसार स्वीकृत करतो आणि पुरुषार्थाला आपल्या छद्मस्थाच्या ज्ञानाचा विषय बनवितो.

कालनय आणि अकालनयाची चर्चा तसेच उदय आणि उदीरणेचे प्रकरण श्रुतज्ञानाचा विकल्प आहे. ज्या जीवाचा मोक्षास जाण्याचा काळ येतो तो नित्यनिगोदातून निघून कर्मभूमीचा मनुष्य होऊन त्याच पर्यायात मोक्ष प्राप्त करून घेतो. द्रव्यादि स्वचतुष्टयानुसार पदार्थाचे परिणमन अनादिकाळापासून चालत आले आहे आणि अनंतकाळापर्यंत चालत राहील. ह्याला परिवर्तित करण्याचा अहंकार सुटणे हाच सर्वात मोठा पुरुषार्थ आहे. **पर्यायांची क्रमबद्धता मला इष्ट आहे. फक्त विरोधाकरिता विरोध करणे योग्य नाही.**

श्री डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांनी 'क्रमबद्धपर्याय' लिहीण्याचे जे श्रम घेतले आहेत त्यांची मी प्रशंसाच करतो.

□ **डॉ. हरीन्द्रभूषणजी जैन, प्राध्यापक, विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन**

'क्रमबद्धपर्याय' जैनदर्शनाची एक महत्वपूर्ण विचारधारा आहे. सर्वज्ञतेच्या विषयी सर्वत्र ह्यावर विचार केला गेला आहे. ह्या दोन्ही तत्त्वांचा विचार करते वेळी ह्याच्याशी संबंधीत अनेक बाबींचे विश्लेषण करणे आवश्यक असते. जसे अनेकान्त, प्रमाण, नय, नियतिवाद आणि पुरुषार्थवाद, कर्तृत्व आणि अकर्तृत्व, द्रव्य, गुण, पर्याय उत्पाद, व्यय, ध्रौव्य, निमित्त, नैमित्तिक, पांच समवाय [वस्तुस्वभाव, दैव, पुरुषार्थकाललब्धि तसेच भवितव्य] इत्यादि.

डॉ. हुकमचंद भारिल्लने उपर्युक्त सर्व बाबींच्या माध्यमाने क्रमबद्ध पर्यायाचे जे सुंदर, सायुक्तिक आणि सप्रमाण विवेचन केले आहे, ते त्यांच्या ज्ञान आराधनेचे सातत्य आणि श्रमशीलतेचे द्योतकच आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



आम्हांस खात्री आहे की, प्रबुद्धजन ह्या अमूल्य रचनेने लाभान्वित होतील. मी डॉ. भारिल्लजींना त्यांच्या ह्या महत्वपूर्ण रचनेवर साधूवाद (आशिर्वाद) देतो आणि अशी आशा करतो की, ते निश्चय-व्यवहार, निमित्त-उपादान इत्यादि विषयांवर देखील अशाच तऱ्हेची पुस्तके लिहून समाजाला लाभान्वित करतील.

□ **डॉ. देवेन्द्र कुमारजी शास्त्री, व्याख्याता, शास्त्रीय महाविद्यालय, नीमच.**

डॉ. भारिल्लजींनी प्रस्तुत पुस्तकामध्ये तर्क प्रधान शैलीतून सर्व अनुयोगांच्या दृष्टीकोनांतून विस्ताराने सारगर्भित विवेचन केले आहे. जैनदर्शन आणि सर्वज्ञतेच्यां मूळ सिद्धान्ताला समजून घेण्याकरिता हे पुस्तक सर्वथा उपयोगी आहे. आहे. अशा आहे की, सर्व प्रकारचे वाचक ह्यापासून लाभान्वित होतील. अशा सुंदर व उपयोगी प्रकाशनाकरिता माझे हार्दिक अभिनंदन त्यांनी स्वीकारावे.

□ **डॉ. राजेन्द्रजी बंसल, ओ. पी. मिल्स लिमिटेड, शहडोल (म.प्र.)**

डॉ. हुकमचंदजी भारिल्लनी क्रमबद्धपर्यायाच्या महान सिद्धांतावर आगमाच्या जगतामध्ये मोकळया मनाने आणि बुद्धीने चिंतन-मनन केले. जिनवाणीमध्ये तत्संबंधी विखूरलेल्या तत्त्वांना एकत्रित करून तर्क आणि युक्तीने विश्लेषण केले आणि सार गर्भित परंतु सहजग्राही निष्कर्ष काढले. ही त्यांच्या कुशल आणि सक्षम लेखनीचीच कमाल आहे. जिच्या माध्यमातून चारी अनुयोगांचे मर्म सुबक, सरळ भाषा आणि रोचक शैलीमध्ये प्रकट केले आहे.

डॉ. साहेबांनी एका सफल शल्य चिकित्सका (डॉक्टर) प्रमाणे सर्वज्ञता, पुरुषार्थ आणि क्रमबद्धपर्यायाच्या सिद्धान्ताचे अर्थ आणि त्यांच्यातील परस्पर संबंध सुस्पष्ट करून हे सिद्ध केले आहे की, जो पुरुषार्थ आहे तो स्वभावामध्येच संभावित (शक्य) आहे, परवस्तुमध्ये नाही. आणि जे दृश्य-अदृश्य जगामध्ये घडत आहे, ते सर्व कांही क्रमव्यवस्थित आणि क्रमबद्धच आहे, अन्यथा नाही. क्रमबद्धपर्यायाच्या सिद्धान्ताचे गूढ काय आहे ? ह्या सिद्धान्ताची मोक्षमार्ग आणि सांसारीक जीवनामध्ये कोणती उपादेयता आहे ? तिच्या श्रद्धेकरिता स्वस्वभावाच्या सन्मुख कसे जाता येईल ? इत्यादि भिन्न-भिन्न विषयाचे विशुद्ध, तर्कसंगत आणि सहजग्राही प्रतिपादन प्रस्तुत लेखामध्ये झाले आहे. समग्ररुपाने डॉ. भारिल्लजी वाद-विवाद आणि गूढरहस्यमयतेच्या भोवऱ्यात अडकलेल्या क्रमबद्धपर्याय सिद्धान्ताच्या नौकेला कौशल्य आणि सफलतापूर्वक बाहेर काढून प्रबुद्ध वाचकांच्या मानस-सरोवरापर्यंत पोहोचविण्यांत यशस्वी नाविक ठरले आहेत. त्यांचा हा प्रयत्न अभिनंदनीय आहे. शेवटी प्रश्नोत्तराच्या रूपाने ह्या

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



संदर्भात उठणाऱ्या सर्व शंकाचे समाधान सुद्धा सरळ भाषा आणि सहज शैली मध्ये प्रस्तुत केली आहे.

□ **श्री अक्षयकुमारजी जैन भूतपूर्व संपादक 'नवभारत टाईम्स' दिल्ली**

पुस्तक अत्यन्त उपयोगी, रोचक आणि ज्ञानवर्धक आहे. माझ्यातर्फे डॉ. भारिल्लजींचे अभिनंदन !

□ **डॉ. पारसमलजी अग्रवाल, भीलवाडा (राज.)**

आत्मधर्मच्या संपादकीयमध्ये क्रमबद्धपर्यायाचे निवेचन ज्या सुंदर रितीने चालू आहे, ते अभूतपूर्व आहे. पुरुषार्थ आणि क्रमबद्धपर्यायाचा एवढा सुंदर समन्वय दर्शनशास्त्राच्या एका मूल्यवान समस्येचा एक तोडगा आहे की, भाग्य आणि पुरुषार्थ यांचे एकमेकांशी पटत नाही असे नाही

□ **डॉ. भागचंदजी जैन, अध्यक्ष, पालि प्राकृत विभाग, विश्वविद्यालय, नागपूर.**

डॉ. भारिल्ल जैनधर्म आणि जैनदर्शनाचे एक सुपरिचित चिंतक-विद्वान आहेत. 'क्रमबद्धपर्यायांसारख्या दुर्बोध, दार्शनिक आणि वादविवादास्पद विषयाला सुबोध आणि निर्विवाद बनविण्याचा प्रयत्न आपण प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे हे ह्यांच्या प्रतिभा आणि समर्थ अभिव्यक्तिचे सुन्दर उदाहरण आहे. म्हणून एवढ्याचा गेल्या आणि उपयोगी पुस्तकाचा लेखक निश्चितपणे अभिनंदनीय आहे.

□ **डॉ. नरेन्द्र भानावत, प्राध्यापक, राज. विश्वविद्यालय, संपादक 'जिनवानी'**

डॉ. भारिल्ल लोकप्रिय आध्यात्मिक प्रवकता तसेच दार्शनिक चिंतक आणि सफल लेखक आहेत. आपल्या चिंतनामध्ये मौलिकता, तार्किकता आणि स्पष्टतेचा अद्‌भूत मिलाप जो आपण घडवून आणला आहे तो वाखाणण्यासारखा आहे. प्रस्तुत पुस्तक ह्याचे सुंदर उदाहरण आहे. ह्यामध्ये जैनदर्शनाचे एक प्रमुख तत्त्व क्रमबद्धपर्यायाचे विवेचन- विश्लेषण करताना लेखकाने स्पष्टपणे घोषित केले आहे की, प्रत्येक वस्तु एका निश्चित क्रमानुसारच परिणमीत होत असते. नियतिवाद आणि पुरुषार्थवादाच्या संबंधी अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित (निर्माण) करून हे सिद्ध केले आहे की, जैनदर्शनाचा अकर्त्तावाद हा फक्त एवढ्यापुरताच मर्यादीत नाही की, कोणी तथाकथित ईश्वर जगाचा कर्त्ता नाही आहे. अकर्त्तावादाचा व्यापक अर्थ हा आहे की, कोणतेही द्रव्य अन्य कोणत्याही द्रव्याचा कर्त्ता, हर्त्ता, धर्त्ता नाही; एवढे नसून एखादे द्रव्य आपल्या क्रमनिश्चित पर्यायामध्ये ते कशाही प्रकारचा फेरबदल (अदलाबदल) करू शकत नाही. अशाप्रकारे क्रमबद्धपर्यायाची माहिती सांगून लेखकाने वस्तुच्या अनंत स्वतंत्रतेची घोषणा केली आहे - लेखकाच्या प्रतिपादनाची शैली तर्कशुद्ध आणि रहस्यमय असून सुद्धा रोचक आणि सहज सुंदर आहे. हेच ह्याचे उद्दिष्ट आहे. हे पुस्तक विचार क्षेत्रांमध्ये चिंतनाचे नवे दालन उघडत आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **डॉ. प्रेमचंदजी रांवका, प्राध्यापक, राज. महाविद्यालय, मनोहरपूर (राज.)**

डॉ. भारिल्लजींची नवीनतम रचना 'क्रमबद्धपर्याय' समक्त्वाच्या अभ्यासाकरिता एक महत्वपूर्ण मार्गदर्शन करणारी रचना आहे. हृया रचनेच्या माध्यमातून वाचकांना दर्शनशास्त्राच्या एका मौलीक समस्येच्या समाधानाचे एक नवे दालन (दृष्टीकोण) मिळाले आहे. हृया अभिनव प्रकाशनाकरीता डॉक्टर भारिल्ल साहेबांचे अभिनंदन.

□ **डॉ. चन्दूभाई टी. कामदार, राजकोट (गुजरात)**

प्रस्तुत रचना 'क्रमबद्धपर्याय'चा मी अत्यंत गंभीरतेने अभ्यास केला. हृया विषयाला आपण मौलिक रुपामध्ये ज्या सुंदर तऱ्हेने आपण प्रस्तुत केले आहे, त्याचा अभ्यास करताना अत्यंत आनंद होत होता. त्यामध्ये जी वस्तु व्यवस्थेचा उहापोह केला आहे, "क्रमनियमित अवस्था हीच वस्तुची व्यवस्था आहे." केवलज्ञानाच्या आधारे आगम आणि युक्तीद्वारा अनेक प्रकाराने जे वस्तुस्वरुप सिद्ध केले आहे त्याचा गांभीर्याने विचार करणाऱ्यांना पराच्या आणि आपल्या पर्यायाचे कर्तृत्व उडून जाते, तसेच अकर्त्तापणाचा स्वभावसन्मूख अनंतपुरुषार्थ जागृत झाल्याशिवाय रहात नाही हा तर भवभ्रमण टाळण्याचा अमोघ उपाय आपण मोठ्या सुंदरतेने सांगितला आहे.

हृया सुंदर रचनेकरिता आपल्याला खूप-खूप धन्यवाद ! असेच उत्तम कार्य करत रहावे – हीच भावना आहे.

□ **विद्वदवर्य पं. खीमचंद जेठालाल शेठ, सोनगढ**

डॉ. हुकमचंदजी शास्त्रींनी आत्मज्ञसंत पूज्य श्री कानजीस्वामीच्या, श्री समयसार गाथा ३०८ – ९ – १० – ११ वर झालेल्या अध्यात्मरण-पूर्ण भाववाही प्रवचन आणि तसेच इतर अनेक शास्त्रांच्या आधारे हृया 'क्रमबद्धपर्याय' नामक शास्त्राची अद्वितीय रचना केली आहे. जो जीव हृयाचे वाचन-मनन करून अंतर्मुख परिणमन करतील त्यांची अनंत पदार्थांची कर्तृत्व-बुद्धी तसेच आपल्या पर्यायामध्ये फेरफार करण्याशी बुद्धी अवश्य सुटेल क्रमबद्धपर्यायाच्या श्रद्धेने अनंत आकुलतेचा अभाव होवून अनंत वीतरागता प्रगट होते आणि हेच हृया शास्त्राचे तात्पर्य आहे. अशा वीतरागपोषक शास्त्राची रचना करण्याकरिता पंडितजी अभिनंदनास पात्र आहेत. सर्व जीव हृया शास्त्राचा यथार्थ भाव समजून विशुद्धतेला प्राप्त करो, हीच आंतरिक भावना आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **बाबू श्री जुगलकिशोरजी 'युगल', एम्. ए. साहित्यरत्न. कोटा, (राजस्थान)**

डॉ. भारिल्लजीची 'क्रमबद्धपर्याय' निश्चितच न केवळ सामान्यशिवाय विशिष्ठ बौद्धिक जन-मानसामध्ये उत्पन्न होणाऱ्या असंख्य भ्रम आणि शंकांचे निरसन करून सर्वज्ञाची गौरवाने आणि अभिमानाने स्थापना करणारे पहीले पुस्तक आहे.

□ **पं. नरेन्द्रकुमारजी भिसीकर, शास्त्री, न्यायतीर्थ, सोलापूर (महाराष्ट्र)**

वस्तुस्वभावाचे मर्मज्ञ, धुरंधर विद्वान लेखक महोदयाने 'क्रमबद्ध पर्याय' ह्या ग्रंथाद्वारे यथार्थ वस्तुस्वभावाचे मार्गदर्शन करून शांति-सुखाच्या मार्गाचेही मार्गदर्शन केले आहे.

□ **पं. नन्हेलालजी, न्यायसिद्धान्तशास्त्री, राजाखेडा (राजस्थान)**

डॉ. भारिल्लांच्या प्रतिभासंपन्न ज्ञानाची जेवढी प्रशंसा केली जावी तेवढी कमीच आहे. डॉ. भारिल्ल यांनी ह्या छोटया अवस्थेमध्ये अनेक मार्मिक, आगमिक विषयांच्या मनन चिंतनाबरोबरच त्या विषयांना जैन-जगता समोर लिपिबद्ध करून प्रस्तुत केले आहे – ही त्यांच्या विशिष्ट क्षयोपक्षम आणि परभव-गत पुण्याची बाब आहे – माझ्या शुभभावनेबरोबर त्यांना शुभाशीर्वाद आहे की त्यांचे भविष्य ह्याहीपेक्षा अधिक प्रगतिशील बनो.

□ **पं. भंवरलालजी पोल्याका, जैनदर्शनाचार्य, साहित्यशास्त्री, मारोठ (राज.)**

डॉ. हुकमचंदजी भारिल्ल द्वारा रचित 'क्रमबद्धपर्याय' नामक पुस्तकाचे मी आद्योपान्त शब्दश: पारायण केले आहे आणि हे लिहण्यात मला यत्किंचितही संकोच वाटत नाही की, अशा शुष्क दार्शनिक विषयाला ज्या रोचक आणि तर्कशुद्ध शैलीमध्ये प्रस्तुत केले गेले आहे. ती डॉ. भारिल्लजींच्याच लेखणीतून उतरू शकली असती.

'क्रमबद्धपर्याय' श्रद्धेचा विषय आहे आणि हे खरे आहे की, त्याला जाणल्या-मानल्या शिवाय जीवाला सम्यग्दर्शन होऊ शकत नाही. हे पुस्तक स्वाध्याय-प्रेमी करिता उपयोगी आहे. प्रकाशन सर्वांग-सुंदर आहे. लेखक, मुद्रक तसेच प्रकाशक सगळेच अभिनंदनास पात्र आहेत. ट्रस्टद्वारे जे जिनवाणीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य होत आहे ते दीर्घकाळपर्यंत चालत राहो हीच सदिच्छा.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **पं. रतनलालजी कटारिया, केकडी (राजस्थान)**

'क्रमबद्धपर्याया'वर आजपर्यंत कोणी एवढे मनन चिन्तनपूर्वक लेखन केलेले नाही. आपण केलेले विश्लेषण खूप सुंदर झाले आहे. जे काही लिहीले गेले आहे ते रोचक आणि युक्तियुक्त आहे. आपले परिश्रम वस्तुतः स्तुत्य आहेत. पुस्तकाची छपाई, सफाई, बाईडींग वगैरे सर्व आकर्षक आहे.

हया श्रुतसेवेकरिता आशिर्वाद !

□ **श्री अमृतलालजी जैन, जैन विश्वभारती, लाडनू**

आपल्या लेखणीतून उतरलेले 'क्रमबद्धपर्याय' पुस्तक मी आद्योपान्त रुचिपूर्वक वाचले व प्रसन्नता वाटली. प्रस्तुत विषयावर भरपूर प्रकाश टाकणारी ही एक रचना जगावेगळी आहे. आर्ष-ग्रंथ आणि प्रबळ युक्तिवादाच्या आधारे आपण प्रस्तुत विषयावर सखोल विचार केलेला आहे. अशा सुंदर रचनेकरिता आपण आणि प्रकाशक दोघेही हार्दिक अभिनंदनास पात्र आहात.

□ **श्री नरेन्द्रप्रकाशजी जैन, प्राचार्य, जैन इन्टर कॉलेज, फिरोजाबाद (उ. प्र.)**

'क्रमनियमितपर्याय' जैनदर्शनाचा एक बहुचर्चित सिद्धान्त आहे. मुख्यतः आजच्या काळी हयाच्या बाजूने किंवा किंवा विरुद्ध बाजूने खूप चर्चा होत आहे. हया विषयावरील विद्वज्जनांतील मतभेद कोणापासून लपून राहिलेले नाहीत. मला खरोखरच आनंद होत आहे की, हया संदर्भामध्ये इतक्या विस्ताराने सर्व पैलूंना स्पर्श करणारा आणि सर्व सामान्य वाचकाला समजू शकेल एवढ्या सरळ व सोप्या भाषेत बहुतेक पहिल्यांदाच लिहीले गेले आहे. साधारणतः दार्शनिक गुंता (गोतावळा) गूढ आणि शुष्कच असतो. परंतु डॉ. भारिल्लजी त्याला रुचकर आणि सरस बनवून प्रस्तुत करण्यात सिद्धहस्त आहेत. मी त्यांच्या हया कौशल्याला सादर अभिवादन करतो.

जे लोक हया सिद्धान्ताशी अजूनही मतभेद ठेवतात, त्यांना हया ग्रंथाच्या प्रकाशनाने एक संधी प्राप्त झाली आहे की त्यांनी हया अथांग आगम-सिंधूमध्ये पुन्हा-पुन्हा डुबकी मारावी आणि नव नवे मोती हुडकून काढावेत.

मला पूर्ण आशा आहे की, तत्त्वचिंतन आणि चर्चेच्या हया निरोगी आणि संतुलीत प्रयत्नांची संपूर्ण जैन जगतामध्ये निश्चितपणे वाहवा होईल. माझ्यातर्फे विद्वान लेखकास हार्दिक साधुवाद प्रेषित करतो.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **पं. उदयचंदजी जैन, प्राध्यापक, काशी हिन्दू विद्यालय वाराणसी**

डॉ हुकमचंदजी भारिल्ल द्वारा लिखित 'क्रमबद्धपर्याया'चे सूक्ष्म दृष्टीने अध्ययन केल्यानंतर हे लक्षात आले की, हे पुस्तक जैनदर्शनाचा गुढ सिद्धान्त – पर्यायांच्या क्रमबद्धतेला आगमिक तसेच तार्किक आधाराद्वारे सप्रमाण सिद्ध करते. क्रमबद्धतेमध्ये ज्या अनेक शंका उत्पन्न होतात, त्याचे समाधान देखील प्रश्नोत्तराच्या रुपामध्ये उत्तम तऱ्हेने केले गेले आहे.

पर्यायांच्या क्रमबद्धतेमध्ये सर्वात मोठा दोष पुरुषार्थाची निष्क्रियतेचा येतो, परंतु जेव्हा सर्वकाही क्रमबद्ध आहे तेव्हा पुरुषार्थ देखील त्याच्याच गर्भामध्ये सामावलेला आहे. महावीराने भगवान बनण्याकरीतां आपल्या पुर्वभवामध्ये जो पुरुषार्थ केला, त्याला पर्यायांच्या क्रमबद्धतेच्या नियमानुसारच करावयाचा होता असे नव्हे की, जर त्यांची इच्छा नसती तर त्यांनी पुरुषार्थ केला नसता. पुरुषार्थ करणे वा न करणे त्यांच्या आधीन नव्हते. म्हणून जी वस्तु किंवा पर्याय क्रमनियत आहे, त्याला कोणी बदलू शकत नाही.

पर्यायांच्या क्रमबद्धतेच्या सिद्धिमध्ये सर्वज्ञता एक प्रमुख आधार आहे आणि जैनदर्शनाची इमारत सर्वज्ञतेच्या पायावरच आधारलेली आहे. जी व्यक्ति जैनदर्शन-प्रतिपादित 'सर्वज्ञा'ला मानते, त्याला क्रमबद्धपर्यायाच्या सिद्धान्ताला मानणे आवश्यक आहे. ज्यांचा विश्वास सर्वज्ञावर भले नसेल परंतु ते पर्यायांच्या क्रमबद्धतेच्या सिद्धान्ताने मुक्ती मिळवू शकतील.

क्रमबद्धपर्याय एक गंभीर विषय आहे आणि श्री कानजी स्वामी द्वारा हा विषय विशेषकरून प्रकाशात आणला गेला. म्हणून ह्या गंभीर विषयाला समजण्याकरिता डॉ. हुकमचंद भारिल्लजींची महत्त्वपूर्ण रचना 'क्रमबद्धपर्यायाचे' अध्ययन, मनन तथा चिंतन आवश्यक आहे ह्या उपयोगी रचनेकरीता लेखक प्रकाशक दोघेही अभिनंदनास पात्र आहेत.

□ **प्रसिद्ध ऐतिहासिक विद्वान श्री अगरचंदजी नाहटा, बीकानेर (राज.)**

वास्तविक डॉ. भारिल्लजींना ह्या विषयाचे (क्रमबद्धपर्याय) खूप सखोल चिंतन आहे त्यामुळे गुंतागुंतीचा विषय अधिक स्पष्ट झाला आहे. सर्वज्ञाच्या ज्ञानामध्ये जे झळकते ते त्याचप्रकाराने झाल्याशिवाय रहात नाही. म्हणून सर्व पर्याय निश्चित आहेत. अन्यथा सर्वज्ञाचे ज्ञान अन्यथा होईल. क्रमबद्धपर्याय मान्यतेमध्ये – जसे भारिल्लजींनी लिहीले आहे की, – मोठ्या प्रमाणात शांति मिळू शकते. समभाव ठेवला जाऊ शकतो. म्हणून हा ग्रंथ खूपच उपयोगी आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **पं. भरतचक्रवर्तीजी जैन, शास्त्री, न्यायतीर्थ, (मद्रास)**

हृयामध्ये संशय नाही की 'क्रमबद्धपर्याय' एक अनुपम रचना आहे. आपण हे सिद्ध केले आहे की, सर्वज्ञतेला मानल्याशिवाय क्रमबद्धपर्यायाचे वास्तविक ज्ञान संभवत नाही, कारण आपल्यासारख्या अल्पज्ञांच्या ज्ञानामध्ये 'क्रमबद्ध-पर्याय' झळकत नाही, हृयाच्या पुष्टीकरिता उद्धृत पूज्यश्री कुन्दकुन्द, पूज्यपाद आदि महान आचार्यांच्या ओळी निरंतर आठवणीत ठेवण्याजोग्या आहेत. त्याबरोबरच सर्वथा एकान्त नियतवाद, पुरुषार्थहीनता, अकर्तृत्वपणा वगैरे निरर्थक वादांचे निराकरण करताना आपण आगम, युक्ति आणि लौकिक उदाहरणासह हे दाखविले की, पुरुषार्थ कर्तृत्वणा वगैरे कशाप्रकारे पर्यायाबरोबर गुंत्यामध्ये गुरफटलेले आहेत. अकालमृत्यूच्या संबंधी आपले स्पष्टीकरण अत्यंत स्पष्ट आहे. अवघड विषयांना सोप्या भाषेत व्यक्त करण्याची आपली कला विशिष्ठ आहे.

अभ्यासाबरोबर संलग्न संभाव्य प्रश्नोत्तरे आणि इंटरव्ह्यू तर सोन्यामध्ये सुगंध दरवळला हृया म्हणीला सार्थच करीत आहे. थोडक्यात हृयाला चारी अनुयोगरुप महासागराला घुसळून काढलेला 'सिद्धान्तामृत' म्हटले तर अति-शयोक्ति होणार नाही.

□ **प्रसिद्ध साहित्यकार श्री यशपालजी जैन, मंत्री, सस्ता साहित्य मंडळ, दिल्ली.**

डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांची लोकोपयोगी रचना 'क्रमबद्धपर्याय' वाचून मला मन:पूर्वक अंत:करणापासून आनंद झाला. हृया पुस्तकात त्यांनी एका अशा गूढ विषयावर अत्यंत सरळ, सुबोध, प्रामाणिक तसेच युक्तीसंगत तऱ्हेने प्रकाश टाकला आहे. ज्याच्या संबंधी अधिकांश जैन समाज अनभिज्ञ आहे.– परंतु त्याला जाणल्याशिवाय व्यक्ति चिरशांति आणि वास्तविक सुख प्राप्त करु शकत नाही. क्रमबद्ध पर्यायाचा अभ्यास आपणास जीवनाच्या तळाशी नेवून ती रत्ने शोधून काढण्याची क्षमता प्रदान करतो की, जी रत्ने मानव जीवनास समृद्ध करतात, धन्य आणि कृतार्थ बनवितात. पुस्तकाचे सर्वांत मोठे वैशिष्ट हे आहे की, ते एक नवीन दृष्टी देते आणि पूर्ण शक्तिनिशी पुरुषार्थ करण्यास प्रेरीत करते. अशा उत्तम रचनेनिमित्त मी लेखकाचे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन करतो आणि अशी आशा करतो की, हे पुस्तक जैन तसेच जैनेतर समाजामध्ये मन:पूर्वक वाचले जावे.

□ **पं. बंशीधरजी शास्त्री, एम. ए., जयपूर (राजस्थान)**

हृया शताब्दीमध्ये श्री कानजी स्वामींनी 'क्रमबद्धपर्याय' नामक अमूल्य चिंतामणिरत्न, जैनसिद्धान्त ग्रंथाचे मंथन करून जे प्राप्त केले आहे, ते सर्व-

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



सामान्यालाही सोपे करून दिले आहे. जरी प्रथमत: स्वामी कार्तिकेय, समन्तभद्र व भैय्या भगवतीदासाने आपल्या साहित्यामध्ये ह्या मान्यतेत पुष्टी दिली होती तरी देखील ह्याचा ज्याप्रकारे श्री. कानजी स्वामीद्वारे प्रचार झाला आहे तसा पूर्वी झाला नव्हता, काही जणांनी ह्याचा अन्य कारणामुळे विरोध केला, परंतु त्यांना सर्वज्ञता किंवा अवधिज्ञानाच्या आधारावर ह्याला मानावेच लागले, लागते आणि लागेल.

सुरवातीला पं. फूलचंदजी शास्त्रींनी जैनतत्त्व-मीमांसा आणि खानिया तत्त्व चर्चेमध्ये ह्याला जैनागमाच्या आधारे बरोबर आहे हे सिद्ध केले होते. त्यावर अनेक प्रकारे ह्याचा उहापोह होत राहिला. त्याकरिता हे आवश्यक होते की, ह्या साऱ्या उहापोहाला श्री कानजी स्वामींच्या विचारसरणीबरोबर सोप्या शैली आणि भाषेमध्ये प्रस्तुत केली जावे की ज्यामुळे सर्वसामान्य मनुष्यही ह्या तत्त्वाला समजून, रागद्वेष सोडून, आत्मकल्याणाच्या मार्गी लागो– मला सांगण्यास आनंद होतो की, डॉ. हुकमचंदजींनी हा विषय सरळ–सुबोध शैली व भाषेमध्ये शास्त्रीय प्रमाणासहीत सुंदर विवेचनासह प्रस्तुत केला आहे. हे पुस्तक क्रमबद्धपर्यायास सम्यक् रूपाने समजण्यास जिज्ञासू आणि विवेकशील वाचकांना लाभदायक ठरेल. पं. टोडरमल स्मारक ट्रस्टनेसुद्धा ह्याच्या दहा हजार प्रति प्रथम आवृत्तीमध्ये छापून श्री कानजी स्वामींच्या शास्त्र-सम्मत विचारसरणीच्या प्रचारामध्ये मोठे अपूर्व योगदान दिले आहे.

प्रकाशित पुस्तक लेखन आणि प्रकाशन दोन्ही दृष्टीने सर्वोत्तम तऱ्हेने मनमोहक बनले आहे. त्याकरिता लेखक व प्रकाशक दोघेही धन्यवादास पात्र आहेत.

□ श्री. प्रवीणचंद्रजी जैन, डायरेक्टर, उच्च. अध्ययन अनुसंधान स्थान, जयपूर

'क्रमबद्धपर्याय' एक समग्र दर्शनच आहे. त्याला समजून घेण्यासाठी आस्थापूर्ण सूक्ष्मदृष्टीच हवी. हे दर्शन त्यालाच फल देते की जो ही आस्था ठेवते की, केवलज्ञानीला द्रव्याच्या त्रिकाल सत्तेचा आणि त्याच्या समस्त पर्यायांचे दर्शन होते.

डॉ. हुकुमचंद भारिल्लने ह्या गुढ दर्शनाला इतक्या सूक्ष्म विवेचनासह जिज्ञासूंच्या समोर कदाचित् पहिल्यांदाच आणले आहे. त्याचे प्रतिपादन आगम-समंत आणि सायुक्तिक असूनही सोप्या भाषेने ओतप्रोत भरले आहे. वस्तुस्थिती समजण्यास आणि त्याद्वारे निराकुल भावाच्या

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



उपलब्धीमध्ये ह्याचा अभ्यास यथेष्ट रूपाने सहाय्यकच ठरेल. ह्या रचनेच्या प्रतिपाद्य तत्त्वाला समजण्याने मानव, कर्तृत्वाच्या अभिमानापासून मुक्त होऊन आपल्या स्वभावानुसार ऊर्ध्वमुखी होत जाईल. तो कर्त्तापणाच्या स्थितीपासून सरकून ज्ञान आणि दृष्टाच्या स्थितिला प्राप्त होत जाईल.

रचनेचे हे यश असाधारण यश आहे. मी डॉ. भारिल्ल ह्यांच्या ह्या बहूमूल्य रचनेला सत्साहित्यामधील एक रचना मोजली जावी असे समजतो आणि तिचे त्याच रूपामध्ये स्वागत करतो.

□ प्रो. खुशालचंदजी गोरावाला, प्रधान मंत्री, भा. दि. जैन संघ

'क्रमबद्धपर्याय' एक शाश्वत तथ्य आहे. कारण जैनांची सर्वज्ञता ज्ञानीपरक आहे. ज्ञेयपरक किंवा ज्ञेयाधीन नाही. त्याकरिता अनादि अनंत ज्ञेयांचे सुनिश्चित असणे अनिवार्य आहे लौकीक ज्ञाता-ज्ञान शैलीच्या दृष्टीकोनांतून विचार करूनही बरेचसे विद्वानदेखील ह्यात नियतिवाद आणि तद्भव अकर्मण्यतेची कल्पना करतात. परंतु ह्यामध्ये वस्तुभाव किंवा वस्तुस्वतंत्रतेमध्ये काही फरक आढळत नाही.

जगामध्ये कोणतेही परिवर्तन किंवा पर्याय आकस्मिक नाही– हे सुनिश्चित आहे.

ह्या युगामध्ये आचार्यकल्प पं. टोडरमलजी, पूज्य गणेशवर्णीययांनी समयसाराच्या स्वाध्यायाप्रमाणे क्रमबद्धपर्याय, सर्वज्ञता, जगदकर्तृत्व आणि स्याद्वादाचे प्रवचन-प्ररुपण केले आहे. श्री कानजी स्वामीने ह्या विषयाचा व्यापक प्रचार केला. तसेच डॉ. भारिल्लजी त्यांच्या गणधराचे काम करीत आहेत फलस्वरुप प्राकृत-संस्कृत न जाणणाऱ्या बहुसंख्य जैनधर्मियांना ज्ञानाच्या दृष्टीकोनांतून देखील जैन बनण्याचे सद्भाग्य प्राप्त होईल.

□ पं. धन्यकुमार भोरे, न्यायतीर्थ, कारंजा (महाराष्ट्र)

वर्तमानकाळात बहुचर्चित विषय 'क्रमबद्धपर्याया'वर ह्या पुस्तकात खूप प्रकाश पडला आहे. आपले प्रयत्न मुख्यत: केवलज्ञान-सर्वज्ञतेच्या आधारे क्रमनियतपर्यायाचे समर्थन करणे आहे हे तर आपण दोन-चार जागी स्पष्टपण केलेच आहे की, पर्यायांच्या क्रमाचा कर्त्ता केवलज्ञान नाही.

विषयाचे गांभीर्य अगाध आहे. अध्यात्म ग्रंथांचा सुव्यवस्थित आधार दिला आहे. पुस्तकाचे मुद्रण, कागद, गेटअप आदि अति उत्कृष्ट आहे.

□ पं. हीरालालजी जैन 'कौशल', शास्त्री, न्यायतीर्थ, दिल्ली

'क्रमबद्धपर्याय' गंभीर चिंतन आणि मननाचा विषय आहे. लेखकाने बरीच विचाहार्य सामुग्री प्रस्तुत केली आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **श्री. पांडे परमेष्ठीदासजी जैन, उज्जैन (म. प्र.)**

'क्रमबद्धपर्याय' मी हा विषय समजण्याच्या पलिकडचा समजून सोडून दिला होता त्यामध्ये सदैव हेच जाणवत होते की, पुरुषार्थाला धक्का दिला जातो आहे. परंतु जेव्हापासून ह्याविषयावर डॉ. भारिल्लजींचे संपादकीय लेख वाचले तेव्हा समजू लागले. आता तर पुढे वाचण्याची अभिलाषा वाढतच आहे.

□ **श्री कमलकुमारजी जैन, इंदौर (म. प्र.)**

'क्रमबद्धपर्याय' : एक अभ्यासा'मधील पूर्वीच्या लेखांमध्ये अव्यवस्थितपणा-देखील एक निश्चित व्यवस्थित क्रमानुसारच होत असतो हे वाचून अतिसंतोष वाटला. घटनांना तटस्थतेने पाहण्याचे-समजण्याचे बळ प्राप्त होते. कार्य होणे अथवा न होण्याचा दोष परपदार्थावर ( चेतन किंवा अचेतन निमित्तावर ) टाकण्याची भ्रमित-बुद्धि असते ती नाहीशी होते. क्रमबद्धपर्यायाचे चिंतन राग-द्वेषाने रहित अशा चैतन्यपुरुषार्थाला जागृत करतो, ज्यामुळे प्रतिकूलता किंवा अनुकुलतेमध्ये वैभवात किंवा दारिद्रयात निर्मळ समता परिणाम पर्यामध्ये अनुभव होऊ शकतो, परंतु आपल्या पदार्थावरच दृष्टी जाते- स्थिर होण्याकरिता भीति एकाच गोष्टीची वाटते की, 'क्रमबद्धपर्याया'ला नीट व्यवस्थित न समजल्याने समाज ह्याला एकान्त नियतवाद न समजो.

□ **सन्मतिसदेश (मासिक), दिल्ली, जानेवारी १९८०**

हा प्रकाशनाचा विषय काही धर्मबंधूना नवा वाटतो, परंतु चारी अनुयोगामध्ये पर्यायाला क्रमनियमित असण्याचे वर्णन येते. कारण तो वस्तुचा स्वभाव आहे; परंतु त्याचे गांभीर्याने अध्ययन-मनन न झाल्याने हा विषय जैनसमाजापासून अपरिचितच राहिला आहे. **परंतु हे सुनिश्चित आहे की, क्रमबद्धपर्यायाच्या निर्णयाशिवाय केव्हाच निर्भयता आणि वीरागता येऊ शकत नाही.**

श्री कानजीस्वामींनी ह्या विषयाशी आपला परिचय करून दिला. ज्याचे सांगोपांग स्पष्टीकरण प्रस्तुत प्रकाशनामध्ये लेखकाद्वारे आगम-प्रमाणाने कथित केले गेले आहे. जे वाचल्यानंतर कोठेच कोणता अटकाव बाकी रहात नाही. ह्या विषयामध्ये जेवढ्या म्हणून शंका उपस्थित होऊ शकतील त्या सर्वांचे समाधान ह्यामध्ये मिळत असल्याने विषय सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट होतो, ज्यांना ह्या विषयाचा सत्य निर्णय करावयाचा असेल, त्यांनी ह्या ग्रंथाचे अध्ययन-मनन केले पाहिजे, कारण ह्यामध्ये मोठ्या सूक्ष्मतेने ह्या विषयाचे निरुमन केले आहे.

— प्रकाशचंद्र 'हितैषी'

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



□ **जैनपथ प्रदर्शक (पाक्षिक), जयपूर, १ जानेवारी १९८०**

रचना सर्वांगसुंदर, प्रतुत विषयाचा पूर्ण प्रकाराने खुलासा करणारी विषय अत्यंत दुर्गम असून सुद्धा सुबोध शैली व सरळ सोप्या भाषेत लिहीली गेली आहे ...... ह्यापेक्षा अधिक विस्तृत, अधिक संक्षिप्त आणि सरळ सारभूत ह्या विषयामध्ये अधिक काय बरे लिहीले जाऊ शकते ? ही रचना आपल्या विषयांतील अद्वितीय आणि अनुपम देन आहे.

– रतनचंद भारिल्ल

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com



**डॉ. हुकमचन्द भारिल्ल** यांचे नाव आज समाजातील उच्चकोटीच्या विद्वानांमध्ये घेतले जाते. त्यांचा जन्म दि. २५ मे १९३५ ला **ललितपूर** (उ.प्र.) जिल्ह्यातील **बरौदास्वामी** गावामध्ये एका धार्मिक जैन कुटूंबामध्ये झाला. डॉ. भारिल्ल यांनी शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न व एम्. ए. केल्यानंतर 'पंडित टोडरमल : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' विषयावर संशोधन करून इंदोर विद्यालयातून पीएच् डी. मिळविली. समाजाकडून सुद्धा विद्यावाचस्पति, वाणीविभूषण, जैनरत्न इत्यादी उपाध्या देण्यात आल्या आहेत.

सरल, सुबोध, तर्कसंगत व आकर्षक शैलीचे प्रवचनकार डॉ. भारिल्ल आज आध्यात्मिक प्रवक्ता आहेत. त्यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी हजारो श्रोता उत्सुक असतात. आध्यात्मिक असे कोणते सुद्धा घर नसेल जेथे त्यांचे प्रवचन कॅसेट व त्यांचे साहित्य मिळत नसेल. त्यांनी धर्मप्रचारार्थ आता पर्यंत अनेक विदेश दौरेपण केले आहेत.

डॉ. भारिल्ल यांनी समाजाकरिता २६ पुस्तके लिहिली आहेत. आणि अनेक ग्रंथांचे संपादन कार्य पूर्ण केले आहे. आम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल की आता पर्यंत आठ भाषेमध्ये प्रकाशित त्यांचे प्रकाशन १३ लाखापेक्षा अधिक संख्येनी समाजामध्ये पोहचले आहे.

सर्वात अधिक विक्रीचे जैन आध्यात्मिक मासिक **वीतराग विज्ञान** हिंदी व मराठीचे, तसेच **आत्मधर्म** तमिल व कन्नडचे संपादक आहेत. पं. टोडरमल स्मारक ट्रस्ट आणि त्याच्या अंतर्गत सचालीत, वीतराग-विज्ञान पाठशाला समिती, श्री कुन्दकुन्द कहान दि. जैन तीर्थ सुरक्षा ट्रस्ट द्वारा संचालीत सत्साहित्य प्रकाशन विभाग, तसेच श्री टोडरमल दि. जैन सिद्धांत महाविद्यालय आदि, संचालनामध्ये सुत्रधार असून संस्थेचे प्राण आहे.

आपण पुज्य गुरुदेव श्री कानजी स्वामीजींचे निकटतम शिष्य आहेत. आध्यात्मिक क्रांतिमध्ये त्यांचे अभूतपूर्व योगदान आहे.